म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९०२
५२१२




REFBK-0007768

Pratibha Prakashan
प्रतिभा प्रकाशन
१९ डोंगरेबाग, मुंबई २८ ★ ★ ★ ★

# विचारतरंग

१०८१५१
५५६७९
20131649-
2902

: लेखक :

प्रा. द. के. केळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५५६७९ वि: निबंध
क्रमांक 2902 नोंद दि 20131649

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

REFBK-0007768

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६७६८
(स्थळ प्रत)

प्रतिभा प्रकाशन
मुंबई २८.

किंमत
तीन रुपये

प्रकाशक
वसंत आत्माराम गांगल,
बी. ए. (ऑनर्स)
प्रतिभा प्रकाशन
१९ डोंगरेबाग, मुंबई २८.

प्रथमावृत्ति : १९५२
सर्वाधिकार लेखकाधीन
मुखपृष्ठ : चित्रकार गांगल
मुद्रा : नाईक ब्रदर्स, मुंबई.

मुद्रक
मुकुंद विष्णु जोशी,
बी. एस्सी.
पेपको प्रेस
२७६, शुक्रवार पेठ, पुणें २.

● या संग्रहांतील शेवटचे दोन तरंग सोडून बाकी सर्व तरंग निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध झाले होते. ते सर्व एकत्र करून तुमच्या हातांत देण्याचें सर्व श्रेय रुइया कॉलेजमधील माझे विद्यार्थी श्री. वसंत आत्माराम गांगल, बी. ए. (ऑनर्स) यांना आहे.

—द. के. केळकर

२६ जानेवारी, ५२

●● मुंबई मराठी साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. द. के. केळकर यांच्या अनेक गाजलेल्या लेखांचा संग्रह ‘प्रतिभा प्रकाशन’ तर्फे सादर करितांना मला आनंद होत आहे. प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करण्याच्या कामीं ज्यांनीं मला मदत केली त्या सर्वांचे आभार.

—वसंत गांगल

# वेस्टर्न इंडियाचा विमा

म्हणजेच

# विमेदाराच्या फायद्याची परिसीमा

१८ हिंदी कंपन्या प्रत्येकीं २ कोटींवर नवें काम पुरें करतात. या सर्व कंपन्यांत चालू हप्त्याचे व बोनसचे दर लक्ष्यांत घेतां जास्तींत जास्त फायदा वेस्टर्न इंडियांतच मिळतो. उदाहरणार्थ, वय २५, मुदत ३० वर्षें, हयातींतील नफ्याचे विम्यांत वेस्टर्नमध्यें, दर हजारीं रु. १९५ वर फायदा होतो.

## आपण असें करा कीं,

२६९०५ वर फोन करा, जमल्यास एक कार्ड टाका; पण उत्तम म्हणजे सर फिरोजशहा मेहता रोडवर वेस्टर्न इंडिया हाउसमध्यें मुंबई शाखेचे शाखाधिकारी यांना भेटण्यास या. ते सर्व माहिती आनंदानें सांगतील.

## वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, लिमिटेड.

सा ता रा

# अनुक्रम

१ विवेक व श्रद्धा हातांत हात घालूं देत ! ९
२ योगसिद्धि व आस्तिक्य बुद्धि १९
३ अहिंसेच्या मर्यादा २७
४ विज्ञानप्रणित समाजरचना ३२
५ कुंवार माता ४२
६ घरचे तात्या ४६
७ दोन प्रवासी ५२
८ श्रेष्ठ वाङ्मय कसें निर्माण होईल ? ५७
९ कलेंतील चंचल अंश ६१
१० ललित कला आणि ललित वाङ्मय यांतील समानतेच्या मर्यादा ६६
११ दिङ्नागाचें कुन्दमाला नाटक ७३
१२ सावरकरांचीं भावगीतें ७८
१३ प्राचीन कवींतील अनुकरणप्रकार ८४
१४ उपेक्षितांचें अंतरंग ९०
१५ गुरुशिष्यसंबंध ९४
१६ शास्त्रीय परिभाषेचा बागुलबोवा १०१
१७ माझ्या आवडीचे ग्रंथ १०८
१८ अव्वल इंग्रजींतील कांहीं अनुवाद व अनुवादक १११
१९ रसचर्चेचें चर्वितचर्वण १२२

## आमचीं कांहीं प्रकाशनें व इतर पुस्तकें


| | रु. |
|---|---|
| **न. र. फाटक** | |
| न्या. रानडे चरित्र | ६ |
| ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी | ३ |
| अर्वाचीन महाराष्ट्रांतील सहा थोर पुरुष भा. १ (आ. २ री) | १ |
| मराठ्यांचा इतिहास | |
| **प्रा. गोवर्धन पारीख** | |
| महात्मा गांधी | २ |
| **प्रा. द. के. केळकर** | |
| विचारतरंग | ३ |
| अव्वल इंग्रजींतील कांहीं अनुवाद व अनुवादक | ।= |
| **मामा वरेरकर** | |
| जागलेली आई (पुरुषपात्रविरहित नाटिका) | ।।। |
| **व्यंकटेश वकील** | |
| सूनमुख | ।। |
| गांवकाकू (पुरुषपात्रविरहित नाटिका) | ।। |
| **वि. म. फणसे** | |
| पं. नेहरू चरित्र | ।= |
| **न. वि. गाडगीळ** | |
| घटना प्रबोधिनी | १० |
| **पु. गो. काणेकर** | |
| माझ्या कांहीं नाट्यस्मृति | २ |

| | रु. |
|---|---|
| **पी. विठ्ठल** | |
| माझें क्रीडाजीवन | ५ |
| **वि. मा. दी. पटवर्धन** | |
| कागदी घोडे | २। |
| **सर का. त्र्यं. तेलंग** | |
| शाहणा नेथन | ३ |
| **बा. दा. गांगल** | |
| कालीदास कथा | १ |
| **प्रा. श्री. दा. भालेराव** | |
| कला आणि कलास्वाद | ८ |
| **सं. प्रा. देशपांडे, प्रा. टोपे** | |
| मेघदूतम् (विस्तृत टीपा व इंग्रजी अनुवादासह) | ४ |
| **PROF. Mathrani** | |
| Studies in Inductive Logic | 3 |
| **सं. मा. का. दामले** | |
| जगाला आव्हान (गांधी, वल्लभभाई इत्यादींचीं निवडक व्याख्यानें) | १ |
| **दिवाकर** | |
| नाट्यछटा | ४ |

**आगामी**

अ मचीं लोकगीतं — व. दि. राव

कम्युनिझम कां नको ? (ले. ? ?)

**प्रतिभा प्रकाशन, १९, डोंगरेबाग, मुंबई २८.**

**पुस्तकेंच पुस्तकें** (जुनीं व नवीं)

शाळा--कॉलेजचीं मराठी, इंग्रजी वा हिंदी

तसेंच,

एंजिनीअरिंग, सायन्स, आर्टस् व कॉमर्स कॉलेजच्या व शाळेच्या विद्यार्थ्यांना लागणारीं सर्व पुस्तकें आणि स्टेशनरी मिळण्याचें एकच ठिकाण

# ‘ए वन् ट्रेडर्स’

[ कॉलेज डिपार्टमेन्टल स्टोअर्स ]

रामनारायण रुइया कॉलेजसमोर, माटुंगा, मुंबई १९.

**स्व दे शी**

भारतीयांनीं निवडून दिलेलें सरकार आतां प्रस्थापित झालेलें आहे.

....स्वतंत्र भारताला सर्वतोपरी स्वयंपूर्ण करावयाचें हें भारतभाग्यविधात्यांचें ध्येय आहे. या ध्येयाच्या पूर्तीसाठीं आम्ही आमच्यापरीनें शक्यतों प्रयत्न करीत आहोंत. आणि म्हणून **छत्र्या, ट्रंकस्, होल्डॉल** इत्यादि प्रवासी सामानासाठीं एकदां या व पुन्हा केव्हांही—

# स्व दे शी ट्रं क मा र्ट

★ सरकारी तबेला, गिरगांव, मुंबई ४

★ विजयनगर, दादर ( बी. बी. ), मुंबई २८

★ फॅक्टरी : भवानीशंकर रोड, दादर, मुंबई २८

## अलंकार

अलंकार व्यक्तीच्या सौंदर्यांत भर घालतात. परंतु ते कलात्मक आणि अस्सल हवेत. गेल्या ४० वर्षांहून अधिक दिवसांच्या अनुभवावरून आम्ही खात्रीनें सांगूं शकतों कीं जेव्हां आपल्याला **हिऱ्यामोत्यांचा** व **सोन्याचांदीचा** माल घ्यावयाचा असेल तेव्हां अर्थातच आमचेकडे याल.

# वामन हरि पेठे ज्युवेलर्स

६९, पोर्तुगीज चर्च स्ट्रीट,
दगडी वाडी, दादर [बी. बी],
मुंबई २८.

★

टे. नं. ३०३८५
पेठे बिल्डिंग,
मुंबई ४.


## शुद्धिपत्रक

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १३८ | २५ | देशपांडे | देशमुख |
| १३९ | ७ | ,, | ,, |
| १३९ | २४ | ,, | ,, |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७७३८
ग्रंथ (प्रवेशक प्रत)

# विवेक व श्रद्धा हातांत हात घालूं देत !

**श्रद्धावाद कीं बुद्धिवाद** याचा झगडा तुम्हां आम्हां सर्वांनाच खेळावा लागतो. त्याचें एक शब्दचित्र अवलोकावयाचें असल्यास जीवन आणि साहित्य हा आचार्य भागवत यांच्या ३१ लेखांचा संग्रह उघडा. यांतील कांहीं लेख आकारानें छोटे असले तरी विचाराला चालना व धक्के देणारे आहेत. येथें रवींद्रनाथ, टॉलस्टॉय, रोमँरोलँ, कृपलानी यांच्या लेखांचे अनुवाद आहेत; शिवरामपंत परांजपे, आचार्य जावडेकर, साने गुरुजी, महात्मा गांधी, रवींद्रनाथ ठाकूर, काणे, लो. टिळक, समर्थ रामदास यांचीं शब्दचित्रें व त्यांच्या जीवनाचें आणि साहित्याचें मूल्यमापन आहे; आणि स्वतः आचार्य यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान मांडणारें ' जीवनाचें साफल्य ' व ' उद्यांची संस्कृति ' यांसारखे लेख आहेत. हे सर्वच लेख मार्मिक आणि मूलग्राही विचारांनीं ओथंबून भरलेले असून त्यांना प्रकट करणारी भाषाहि स्वल्पाक्षरांनीं बह्वर्थ व्यक्त करणारी, प्रौढ आणि अर्थवती अशी आहे. यांपैकीं कांहीं लेखांची प्रथम ओळख करून देतों व नंतर एकदोन विवाद्य प्रश्नाकडे वळतों.

## टागोर व टॉलस्टॉय

कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर यांच्या सत्तराव्या वाढदिवशीं त्यांचा सत्कार करण्याचा मोठा समारंभ करण्यांत आला. त्या प्रसंगीं आपल्या जीवनयात्रेचें समालोचन करणारें जें हृदयस्पर्शी भाषण कविवर्यांनीं केलें त्याच्या अनुवादानें प्रस्तुत लेखसंग्रहास प्रारंभ होतो. या भाषणामध्यें रवींद्र म्हणतात, " सध्यां पाश्चात्य देशांत साहित्यामध्यें लोकांची अभिरुचि बदलत असल्याचें

दिसून येतें, हें लक्षांत घेऊन या वयांत मी कीर्तीचा विश्वास धरीत नाहीं असें म्हणतों. पण फुलांचें साफल्य त्यांच्या आविर्भावांतच असतें. सौंदर्याच्या संपर्कानें हृदयांत जो अनुराग भरून राहतो, त्या अनुरागानें मानवी चैतन्याला उद्दीपित करणें हें कवीचें काव्य होय. काव्याचे चिरकालिक विषय हे आधुनिक कालीं जुनेपुराणें होऊन गेले आहेत असें वाटूं लागलें असेल तर आधुनिक कालच रसहीन झाला असें आम्ही समजूं. मला आशा आहे कीं, ज्यांनीं मला जाणण्याचा प्रयत्न केला असेल, त्यांना येवढें कळून आलें असेल कीं, मी जीर्ण जगांत जन्म घेतलेला नाहीं. चराचराला वेष्टन करून अनादिकालाची जी अनाहत-वाणी अनंत काला-कडे वाजत चालली आहे तिला मी आपल्या प्राण-मनांनीं साथ देत आलों आहें. मी या जगतावर प्रेम केलें आहे. परम-पुरुषाला आत्मनिवेदन करून लाधणाऱ्या मुक्तीची कामना केली आहे." अशा शब्दांत कविवर्यांनीं आपल्या साहित्याचें रहस्य सांगितलें आहे. रवींद्रांच्याच तोलाचे रशियांतील श्रेष्ठ साहित्यिक टॉलस्टॉय यांच्याविषयीं रोमाँरोलाँ लिहितात कीं, ' सर्व प्रकारच्या पूर्व-ग्रहांपासून मुक्त असा मुक्तात्मा ही दुर्लभ वस्तु आहे. टॉलस्टॉय हे या प्रवृत्तीचें फार मोठें उदा-हरण होय. दुष्टांच्या सामर्थ्यापेक्षां सज्जनांचें दौर्बल्य हाच जगाला जडलेला मोठा रोग आहे. स्वतंत्र विचाराच्या भयामुळें हा दोष उत्पन्न होतो. मोठे धैर्य-वान लोकहि रूढ विचारांच्या पहिल्या शृंखलांचा त्याग केल्यावर दुसऱ्या शृंख-लांत आनंदानें स्वतःस अडकवून घेतात.' खुद्द टॉलस्टॉय हे फ्रेंच साहित्यिक मोपासाँ यांच्या साहित्याचें मूल्यमापन करितांना सांगतात कीं, ' जीवनांतील मांगल्याची यथार्थ जाणीव, प्रासादिक रचना आणि अंतरींची कळकळ या श्रेष्ठ साहित्याच्या तीन कसोट्या होत. या कसोट्या लावून मोपासाँचें साहित्य पारखलें असतां तें तीन अवस्थांतून गेलेलें दिसतें. पहिल्या अवस्थेंत मोपासाँला निरा-शेनें ग्रासलें होतें. या अवस्थेंत कामगार स्त्रियांना कामुकता आणि वात्सल्य या दोनच भावना समजूं शकतात असें या स्त्रियांचें तो चित्रण करी. दुसऱ्या अव-स्थेमध्यें सद्गुणांविषयीं प्रेम आणि दुर्गुणाविषयीं तिरस्कार हीं उत्कटत्वानें उसळूं लागलीं. तिसऱ्या अवस्थेमध्यें तो विलासाचीं आणि दुर्गुणांचीं वर्णनें करण्यांतच कृतार्थता मानूं लागला. ' हें अधःपतन कां घडून आलें ? टॉलस्टॉयचें

उत्तर असें कीं, मोपासाँला स्तुति आणि संपत्ति हीं दोन्ही अलोट मिळालीं आणि त्याचा कैफ चढल्यामुळें जीवनाकडे ध्येयवादी दृष्टीनें पाहण्याची धमक पांगुळली. अनुवादित लेखांत अशा प्रकारचीं विचार–रत्नें सर्वत्र विखुरलेलीं आहेत.

## टिळक व परांजपे

प्रस्तुत संग्रहाचा दुसरा भाग म्हणजे थोर साहित्यिकांच्या जीवनाचें व साहित्याचें आचार्यांनीं केलेलें मंथन हा होय. ते लिहितात कीं, " लोकमान्य टिळक व समर्थ रामदास यांनीं कर्मयोग व नेटका संसार यांचा उपदेश केला. त्याचा अर्थ धूर्त लोक वैयक्तिक स्वार्थाकरितां कर्म करीत राहावें व स्वतःचा संसार उत्तम थाटावा असा करीत असतात." पण आचार्य त्यांना बजावून सांगतात कीं, "कर्में निःस्वार्थ बुद्धीनें करणें म्हणजेच कर्मयोग व समाजाच्या धारणेला आणि पोषणाला उपकारक होईल अशा रीतीनें केलेला संसार तोच नेटका संसार होय." या भागांतील शिवरामपंत परांजपे यांच्यावरील लेख विशेष चिकित्सक आणि मार्मिक असा उतरला आहे. शिवरामपंतांचें असामान्य वक्तृत्व, उच्चारशुद्धिविषयीं त्यांचा कळकळीचा कटाक्ष, त्यांची श्रेष्ठ कलोपासना या सर्वांचें आचार्यांनीं मोठें रसभरित वर्णन केलें आहे.

शिवरामपंतांच्या जीवनाचें पर्यालोचन करितांना एक महत्त्वाचें विधान आचार्यांनीं केलें आहे तें उद्‌धृत करून प्रस्तुत संग्रहांतील तिसऱ्या भागाकडे वळतों. शिवरामपंताच्या विषयांचें तें विधान आचार्य भागवत यांची भूमिका समजण्यास उपकारक होईल. शिवरामपंतांविषयीं भागवत लिहितात कीं, " शिवरामपंत बुद्धीनें तर्कवादी आणि भावनेनें आस्तिक होते. बुद्धिवादानें मनुष्य अज्ञेयवादी बनतो. आस्तिक्याच्या अनुभूतीसाठीं शुद्ध भावनांची आणि उच्च श्रद्धेची आवश्यकता लागते. आस्तिक्याचा नाश होणार नाहीं अशा बेतानें ते आपली तर्कशक्ति चालवीत ! " आचार्य भागवत यांची बौद्धिक बैठक शिवरामपंतांच्या या बैठकीसारखीच आहे, म्हणजे माझ्या दृष्टीनें कांहींशी धरसोडीच्या बुद्धिवादाची आहे. ती भूमिका समजून घेण्याच्या दृष्टीनें या संग्रहांतील ' जीवनाचें साफल्य ,' उद्यांची संस्कृति ', ' ध्येयवादी जीवन ' व ' व्यासांचा

आक्रोश ' ह्या लेखचौफुला मननपूर्वक वाचण्याजोगा आहे. तो वाचीत असतां असें दिसतें कीं, बुद्धिवादाच्या मार्गावर कांहीं काल आचार्य भागवत हे ताठ सपासप पाऊलें टाकीत चाललेले दिसतात. हीं पाऊलें टाकीत असतां आजूबाजूला सर्वत्र माजून राहिलेल्या चिररुढ आचारविचारांच्या आवाजांनीं त्यांचें चित्त विचलित होत नाहीं. बुद्धिवादाच्या आगीनें मार्गांतील कांटेरी झाडें जाळून काढण्यास ते कचरत नाहींत. समाजांतील आजची आर्थिक, सामाजिक, राजकीय, सर्व क्षेत्रांतील विषमता ही पूर्णतेनें नष्ट केली पाहिजे असें ते रोखठोक प्रतिपादितात. पण अध्यात्माचे, आस्तिक्याचे, अत:प्रेरणेचे मंजुळ ध्वनि ऐकू येऊं लागले म्हणजे मात्र आचार्यांच्या बुद्धिवादाचे पाय सरगळूं लागतात. व तडफदार पाऊलें टाकावयाचें सोडून देऊन पाहतां पाहतां ते गूढवादाच्या धुक्यांत शिरून बैठक मारतात! बुद्धिवादी भागवत लिहितात कीं, "मानवी जीवनांतील सर्व प्रवृत्तींचें स्वरूप शुद्ध होऊन त्यांतील विरोध नष्ट होणें ही मानवी संस्कृतीची कल्पना होय. जीवनाची प्रगति आणि संस्कृति यांचें स्वरूप वर्धिष्णु असणार, त्यासाठीं अखंड साधना चालविली पाहिजे. जीवनदर्शन पूर्ण होण्यासाठीं मनुष्यानें आपल्या सर्व शक्तींचा योग्य विनियोग केला पाहिजे. दर्शन हें केवळ बौद्धिक नाहीं. तो अनुभव आहे. कल्पनांचें सत्यत्व पारखण्याची सोय जर जीवनांत नसेल तर कल्पना भ्रमात्मक होण्याचा संभव आहे " हे आचार्यांचे उद्‌गार खणखणीत बुद्धिवादाचे आहेत. हा शास्त्रज्ञांचा बुद्धिपूत, प्रयोगपूत मार्ग होय. शास्त्रज्ञ हा कल्पना मांडूनच प्रयोगाला सुरुवात करतो. पण त्यांपैकीं प्रयोगाच्या सत्यतेंत टिकतील तेवढ्यांचाच स्वीकार करितो. प्रयोगास तंतोतंत उतरण्याच्या दृष्टीनें जेवढी उणीव असेल तेवढी तो प्रामाणिकपणें नमूद करून ठेवतो व तीहि उणीव भरून निघेल अशी नवी उपपत्ति सुचल्यास पहिलीं दीर्घकाल स्वीकारलेली उपपत्तीहि सोडून देण्यास तो तयार होतो. भौतिक शास्त्राची अभिमानास्पद वाढ झालेली आहे ती या प्रयोगनिष्ठ अनुभवावरून उपपत्तीकडे जाण्याच्या मार्गानें झालेली आहे. जीवनाच्या तत्वज्ञानाचा शोध चालू ठेवतांनाहि हीच शास्त्रीय दृष्टी स्वीकारली पाहिजे. ती हीच कीं, जीवनाविषयक तत्त्वज्ञानाच्या सत्यासत्यतेची पारख ही शेवटीं जीवनांतील प्रत्यक्ष अनुभवावरूनच केली

पाहिजे. शास्त्रीय शोधकाप्रमाणें जीवनाचा शोध करणारालाहि कांहीं कल्पना घेऊनच मार्ग आक्रमण्यास प्रारंभ करावा लागतो. पण ज्या कल्पना प्रयोगाला उतरणार नाहींत त्या सोडून देण्याचें श्रेष्ठ धारिष्ट्य ज्याप्रमाणें शास्त्रज्ञाला जागवावें लागतें; त्याप्रमाणें जीवनाच्या शोधकानें तें जागविलें पाहिजे. हा बुद्धिवादाचा मार्ग होय व त्याला जीवनांतील साधनेची तपस्या करण्याची तयारी लागते.

## वैतागलेला बर्नार्ड शॉ

आचार्य भागवत हे स्वतः साधनोपासक आहेत या दृष्टीनें त्यांनीं शिवरामपंतांविषयीं जें लिहिलें आहे तें अर्थपूर्ण आहे. ते लिहितात कीं, "शिवरामपंतांच्या हृदयांत आशानिराशांचे शुक्लकृष्णपक्ष सदैव चालू असत. कारण, कल्पनेला कर्तृत्वाची जोड नसली म्हणजे तिचा आदेश लुला होतो—" पण आचार्यांची ही भूमिका सर्वत्र टिकून राहिलेली नाहीं. नाहींतर बर्नार्ड शॉच्या जीवनांतील उणीव त्यांनीं नीट ओळखली असती. भागवत लिहितात, "शॉला वाटलें कीं, समाजांतील सर्व वर्गांत पुरेसें ज्ञान पसरविलें कीं अन्याय आणि विषमता गळून पडेल. पण दोन तपें या तऱ्हेनें उद्योग केला असतांहि इष्टसिद्धी झाली नाहीं. तेव्हां शॉनें घोषणा केली कीं, आदर्श समाजाच्या निर्मितीला आजचा मानवप्राणी स्वभावतःच अपात्र आहे." या शॉच्या घोषणेवर भागवतांनीं असा शेरा मारला आहे कीं, 'केवळ बुद्धिवादाच्या पराभवाची ही स्पष्ट कबुली आहे.' बुद्धिवाद ही संज्ञा या विधानांत ढिलेपणानें वापरली गेली आहे व त्यामुळें बुद्धिवादाच्या भूमिकेविषयीं गैरसमज होण्यासारखा आहे. केवळ बुद्धिवाद किंवा कृतिहीन बुद्धिवाद असा निराळा कांहीं पोटभेद कुणी करीत नाहींत. बुद्धिवादाच्या नुसत्या पांडित्यानें जगांतील मानवनिर्मित विषमता नाहीशी होईल असा बुद्धिवादाचा दावाच नाहीं मुळीं. जगांतील वैषम्य दूर करण्यास प्रत्यक्ष झगडलेंच पाहिजे; आणि त्या झगड्याचें डावपेंच प्रत्यक्ष झगडून शिकले पाहिजेत असेंच बुद्धिवादी म्हणेल. शॉ वैतागला याचें कारण जीवनाच्या आखाड्यांत उतरून स्वतः झगडण्याची व लोकांना झगडण्यास शिकविण्याची धडाडी शॉमध्यें नव्हती म्हणून, बुद्धिवाद खोटा ठरला म्हणून नव्हे. बुद्धिवादी म्हणजे बुद्धीशीं

खेळत बसणारा असें कोणी म्हटलें तर श्रद्धावादी म्हणजे श्रद्धा उगाळीत बसणारा असें म्हणावें लागेल. पण हीं दोन्हीं वर्णनें विडंबनात्मक होत. प्रामाणिक बुद्धिवादी आणि प्रामाणिक श्रद्धावादी यांच्यामध्यें कर्तृत्वाच्या दृष्टीनें फरक नाहीं. फरक आहे तो कर्तृत्वाचें क्षेत्र निवडतांना बुद्धि ही सर्वश्रेष्ट निर्णायक मानावयाची कीं नाहीं याबद्दल आहे. भागवत लिहितात, "आधुनिक काळीं पाश्चात्य देशांत बुद्धिपूजेचें पुनरुज्जीवन मोठ्या उत्साहानें करण्यांत आलें आहे, परंतु या बुद्धिपूजकांची श्रद्धा प्रत्यक्ष व्यवहारांत बहुतांशीं विफल ठरलेली सध्यां दिसत आहे" आणि या वैफल्याचें उदाहरण म्हणून त्यांनीं शॉचें उदाहरण दिलें आहे. पण रशियांतील समाजवादी क्रांतिकारकांची कां त्यांना आठवण झाली नाहीं ? तेहि बुद्धिवादीच आहेत ना ? पण शॉप्रमाणें बुद्धिवादाचें नुसतें पांडित्य घोटणारे ते नव्हते. बुद्धीला पटलेलीं तत्त्वें व्यवहारांत उतरून दाखविण्याची व त्याकरितां सोसावयास लागणाऱ्या हालअपेष्टा सोसण्याची त्यांची तयारी होती, म्हणूनच शॉप्रमाणें हताशपणानें कपाळाला हात लावीत न बसतां आपलीं तत्त्वें कांहीं प्रमाणांत तरी व्यवहारांत चालतीं बोलतीं करून त्यांनीं दाखविलीं आहेत.

रशियांतील समतावाद किंवा पाश्चात्यांतील बुद्धिवाद हा भागवतांना अमान्य आहे असेंहि नव्हे. ' समर्थांचें स्मरण ' या लेखांत ते लिहितात कीं, "आजच्या अनुभवानें मागच्या इतिहासाकडे पाहूं लागलों म्हणजे वाटतें कीं युरोपांत उत्पन्न होणाऱ्या नव्या संस्कृतीची कल्पना आमच्या ज्ञात्यांस वेळींच झाली असती तर भारतीय समाजाला वेगळें वळण मिळालें असतें. युरोपांत भौतिक शक्ति उत्पन्न होत होती. पण त्याचे आधीं तेथें बुद्धिवाद व समता यांचा प्रत्यक्ष समाजरचनेंत प्रवेश करून देण्याचा जोराचा प्रयत्न चालला होता. उलट आंधळेपणानें आणि भोळसटपणानें आमच्यांतले ज्ञातेहि भयंकर अज्ञानांत राहून गेले होते. त्यांच्या अज्ञानाचा परिणाम आज आपण भोगीत आहोंत." हे खणखणीत बुद्धिवादाचे बोल होत. मग शॉच्या उदाहरणावरून बुद्धिपूजकांना दटावण्यात हंशील काय ?

## गूढवादांत गुंतलेला बुद्धिवाद

पण हे असे विसंगत सूर निघतात याचें कारण भागवतांचा बुद्धिवाद हा अध्यात्माच्या आणि गूढवादाच्या छायेंतून पूर्णपणें स्वतंत्र झालेला नाहीं हें

दिसतें. ' ध्येयवादी जीवन ' या लेखांत भागवत लिहितात, " अध्यात्मवादाविरुद्ध सध्यां बुध्दिवादाचें बंड उभारण्यांत येत आहे. पण वस्तुतः या दोहोंमध्यें विरोध असण्याचें कारण नाहीं. मनुष्य आपल्या आंतरींच्या प्रेरणेमुळें विविध ध्येयें निर्माण करितो. या प्रेरणा बुध्दिनिर्मित म्हणतां येणार नाहींत. त्या अतिबौध्दिक असल्यामुळें बुध्दीला त्यांचेवर कुरघोडी करतां येत नाहीं. या प्रेरणांचें स्वरूप समजून घेऊन त्यांच्या सिध्दीसाठीं साधनांची निर्मिति करणें इतकेंच बुध्दीचें क्षेत्र आहे." आचार्य म्हणतात त्याप्रमाणें बुध्दीचें क्षेत्र येवढें संकुचित नसून मूळच्या प्रेरणांपैकीं समाजहितकारक प्रेरणा कोणत्या हें पारखून घेणें, त्या प्रेरणांची बुध्दीपुरस्सर जोपासना करणें आणि सर्वस्वी स्वार्थी प्रेरणांना निराळें वळण देणें ही बुध्दीची श्रेष्ठ कामगिरी होय. मनुष्याच्या कर्तृत्वाला चालना मिळते ती आंतर–प्रेरणांमुळें, पण या कर्तृत्वानें कोणती दिशा घ्यावी हें ठरविण्याचें काम बुध्दीचें. मग या बुध्दीच्या मार्गदर्शकत्वाला कुरघोडी म्हणा वा न म्हणा.

**आंतर-प्रेरणा या मूळांतच निस्वार्थी व ध्येयवादी असतात असें जें आचार्यांच्या वरील विधानांत गृहीत धरलेलें आहे तेंच मुळीं विवाद्य आहे.** आंतरप्रेरणेनें पाप कोणतें आणि पुण्य कोणतें हें कळतें तर नीतिशास्त्रांतील कूटें फारच सोपीं झालीं असतीं. प्रेरणावादी म्हणेल कीं वाटेल त्याची प्रेरणा नव्हे, तर शुध्द अन्तःकरणवानाची प्रेरणा असें आम्ही म्हणतों. पण शुध्द अन्तःकरण तरी कशानें ठरवावयाचें ? तर आपण आधीं जें पाप आणि पुण्य म्हणून ठरविलें आहे त्याच्याशीं ज्याची प्रेरणा जुळेल तें ! असें हें चक्र आहे. त्यापेक्षां नैतिक कल्पना या अन्तःकरणाच्या प्रेरणा नसून सामाजिक जीवनांत जो अनुभव येतो त्या अनुभवावरून समाजाचें म्हणजे सर्वांचें सुख ज्यांत साधेल तें पुण्य, आणि अनेकांना दुःखांत लोटून कांहींचें सुख साध्य करील तें पाप असें प्रतिपादन करणें हें बुध्दिवादास धरून होय.

मग असा पक्ष न मांडतां आंतर–प्रेरणेवर भर देण्याची आवश्यकता कां वाटते ! त्याचें कारण या आंतर–प्रेरणा 'आत्म्याच्या ' होत असें अध्यात्मवादी मानतात हें होय. भागवतांचाहि तोच पक्ष आहे. ते लिहितात कीं,

'आंतर-प्रेरणा' हेंच आत्म्याचें स्थान होय. हा पक्ष स्वीकारला म्हणजे बुध्दीला कार्याकार्यनिर्णयाचें कांहीं क्षेत्रच उरत नाहीं. आत्म्याच्या प्रेरणा या अशुद्ध असूंच शकणार नाहींत. आणि तसें असेल तर त्या प्रेरणांच्या सफलतेचीं साधनें जुळविणें येवढेंच दुय्यम काम बुध्दीला करावें लागेल. पण प्रत्यक्ष अनुभव तरी असा कीं आंतर-प्रेरणा या सुष्ट आणि दुष्ट अशा दोन्ही प्रकारच्या असतात. निदान सामान्य माणसांचा तरी असा अनुभव असतो. उदाहरणार्थ, ज्ञानलालसा ही जशी आंतर-प्रेरणा आहे, तशी वर्चस्व गाजविण्याची लालसाहि आंतर-प्रेरणा आहे. या दुसऱ्या प्रेरणेला कह्यांत ठेवण्याला बुद्धिपुरस्सर प्रयत्न करावा लागतो. **किंबहुना मूळ अन्तःप्रेरणांना नवीन वळण देणें यांतच मानवाचें मानव्य अथवा कार्याकार्य विवेक श्रेष्ठत्व आहे.** स्त्री दृष्टीस पडली मात्र कीं कामुक होणें ही अन्तःप्रेरणा, पण त्या प्रेरणेला स्वस्त्रीविषयावरच नियंत्रित करणें ही जागत्या बुद्धीची कामगिरी होय. यामुळें आंतर-प्रेरणा या आत्म्याच्या प्रेरणा होत असें मानणें म्हणजे आत्म्याविषयींच्या कल्पनेला शबलत्व आणणें होय. टिळकांनीं गीतारहस्यांत बुद्धिवाद आणि अध्यात्मवाद यांची सांगड घालतांना सर्वांभूतीं आत्मभाव हे अध्यात्माचें तत्त्व आणि सर्व सुखी व्हावें हें बुद्धिवादाचें तत्त्व यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यांनीं अन्तःप्रेरणेला नसतें महत्त्व दिलेलें नाहीं. बुद्धिवादाच्या दृष्टीनें पाहिलें तर सर्वांभूतीं आत्मभाव हें तत्व न स्वीकारतांहि नीतीची उभारणी उत्तम रीतीनें करतां येण्यासारखी आहे. त्यामुळें टिळकांचा एतद्विषयक आग्रह हाहि बुध्दिवादाला पटण्यासारखा नाहीं.

## बुद्धिवादाची जोपासना

भागवत लिहितात, "जीवनाच्या मांगल्यावरील, जीवनाच्या अर्थपूर्णतेवरील श्रध्दा वाढत गेली पाहिजे." त्यावर बुध्दिवादी म्हणेल जीवन हें मूळचेंच मंगलमय आहे कीं नाहीं हें मला समजण्याचें साधन नसल्यानें त्याच्यावर मी श्रध्दा ठेवूं कशी ? आणि जीवनाचा मूळचा अर्थ काय आहे, म्हणजे ज्यानें हें विश्वचक्र निर्माण केलें त्याच्यापुढें कांहीं योजना विशेष होती कीं काय हेंहि शोधून काढणें माझ्या बुध्दीच्या आवांक्याबाहेरचें आहे. म्हणून जीवनाच्या

अर्थपूर्णतेवरहि मी श्रध्दा ठेवूं शकत नाहीं. पण मी एक सांगतों कीं, जीवनांतील मांगल्याचा अर्थ काय असेल तो असो, माझ्या दृष्टीनें जें मंगल म्हणून मला वाटतें कीं ज्याच्यामुळें सर्व समाज सुखी होईल तें मांगल्य जीवनांत आणण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन. आणि तेहि कां तर सर्वांच्या सुखांतच माझें सुख सामावलें आहे हें मला पटूं लागलें आहे म्हणून. मग तुम्ही मला स्वार्थी म्हटलेंत तरी हरकत नाहीं. जीवन मूळचें मंगल आहे कीं नाहीं कोणास ठाऊक? पण माझ्या कल्पनेप्रमाणें तें मांगल्य जीवनांत उतरविण्याचा प्रयत्न मी करणार आहे. आणि एवढें तत्त्व मला पुरें आहे.

भागवत लिहितात, 'जीवनाचा असा एक सिध्दांत समजण्यास हरकत नाहीं कीं अत्यंत सत्यनिष्ठेनें आपण आपल्या अंतरींचीं स्फुरणें जर तपस्यापूर्वक श्रवण केली, आणि श्रध्देनें त्यांच्या सिध्दतेसाठीं आपण साधना करूं लागलों तर त्या साधनेंतच आपल्या स्फुरणांचीं अशुध्द रूपें नाहींशीं होऊं लागतात. अंतरींची हांक न लाजतां न भितां ऐकणाऱ्या हृदयदेवाच्या पूजनांत आपलें सर्वस्व अर्पणाऱ्या भक्ताला जीवनानें दगा दिल्याचा दाखला अद्याप उपलब्ध नाहीं, जीवनाशीं जर आपण प्रतारणा करणार नाहीं तर जीवनहि आपणाशीं प्रतारणा करणार नाहीं.' आचार्यांच्या काव्यमय आणि ठांशीव प्रतिपादनाचा हा एक उत्तम नमुना आहे. पण त्यांतील सिध्दांत प्रत्ययोत्पादक नाहींत. वरील उताऱ्यांत अंतःकरणाचीं स्फुरणें हीं अशुध्द असून हळूहळू शुध्द होत जातात असें विधान आहे. पण शुध्द कोणती आणि अशुध्द कोणती हें जीवनांतील अनुभवावरून ठरविण्याचें काम बुध्दीचेंच ना? अंतरींची हांक न लाजतां, न भितां ऐकावी या प्रतिपादनांतील धैर्याचा आदर्श योग्य आहे. पण कोणती प्रेरणा ऐकावी व कोणती ऐकूं नये याचा विवेक नसेल, तर या धैर्यानें अनवस्था प्रसंग ओढवेल. आणि हा विवेक सामाजिक जीवनाच्या अनुभवावरून बुध्दीनें करावयाचा असतो. आंतरिक स्फुरणें ही जातितः शुध्दहि नसतात व अशुध्दहि नसतात. तीं फक्त स्फुरणें असतात. त्यापैकीं कोणत्या स्फुरणांचा पुरस्कार करावयाचा व कोणतीं दडपून टाकावयाचीं हें सामाजिक जीवनांतील अनुभवावरून बुध्दि ठरवीत असते. बुध्दीचा असा पहारा शतकानुशतकें जागता ठेवून

मानवानें आंतरिक स्फुरणांना कह्यांत आणलें आहे व इष्ट दिशेला वळविलें आहे. आंतरिक प्रेरणांतून माणसाच्या कार्यकर्तृत्वाला लागणाऱ्या शक्तीचा पुरवठा केला जात असतो, पण कार्य कोणतें करावें हें त्याच्या अनुभवावरून शहाण्या होत जाणाऱ्या बुध्दीनें ठरवावें लागतें. आंतरिक स्फुरणें हीं स्वभावतः शुद्ध होत जात नाहींत, तर बुध्दीच्या अहर्निश आघातानें तीं तशीं करावीं लागतात, म्हणूनच जन्मास आलेल्या प्रत्येक नव्या अर्भकावर लहानपणापासून नीतितत्त्वें बिंबविण्याचा सहेतूक प्रयत्न करावा लागतो, आणि अशा प्रयत्नांचा मारा सारखा घरांत आणि शाळेंत सुरू असला म्हणजे नीतीच्या कल्पना या स्वतः सिध्द होत अशी भूल उत्पन्न होते. असो.

हें बुध्दिवादाचें पुराण परीक्षणाच्या मर्यादेंत अधिक लांबविणें इष्ट नव्हे. पण आचार्यांनीं ' जीवनाचें साफल्य ' या लेखांत म्हटलें आहे कीं, " मानसिक सृष्टींत पुंडावा करणाऱ्या अनेक भ्रामक वृत्तींना आपण प्रखर बुद्धिकिरणांखालीं भाजून काढलें पाहिजे". म्हणूनच आचार्यांच्या प्रखर बुध्दीनें पेटविलेल्या होमाग्नीला चारदोन समिधा अर्पण कराव्या एवढ्यासाठीं वरील विचार सादर केले आहेत.

—'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' अंक ७६

: दोन :

# योगसिध्दि व आस्तिक्य बुध्दि.

'मौजे' च्या ता. ६ मे १९४२ च्या अंकामध्यें बनारस येथें सहा महिने समाधि घेणाऱ्या एका योगिराजाची अद्‌भुत वाटणारी अशी हकीगत प्रसिद्ध झाली आहे. समाधीचा हा प्रयोग पहाण्यास बनारस येथील विद्यापीठाचे अनेक प्राध्यापक उपस्थित होते व त्यांच्यापैकींच एक प्रा. द. य. कुळकर्णी, एम्. एस्सी. यांनीं त्या प्रयोगाची समक्ष पाहिलेली हकीगत 'आरोग्य मंदिरा'त प्रसिद्ध केली असून त्याचाच उतारा 'मौज' मध्यें उद्‌धृत केला आहे.

अशा प्रकारच्या योगसमाधीचे प्रयोग मधून मधून जाहीररीत्या करण्यांत आलेले आहेत व अनेक चिकित्सक प्रेक्षकांनीं ते कसोशीनें निरीक्षण करून त्यांत कोणत्याही प्रकारची गफलत नसल्याविषयीं आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. यावरून अन्न, पाणी व हवा ह्या मानवी जीवनाला अत्यावश्यक असणाऱ्या ज्या वस्तु, त्यांचा स्वीकार न करतांही माणूस कांहीं काळ जगूं शकतो हें प्रयोगसिद्ध होय असें मानावयास प्रत्यवाय नाहीं. आणि स्वतःच निर्माण केलेल्या तंतुजालानें स्वतःलाच गुरफटून घेऊन योगसिद्ध समाधींत कांहीं दिवस निश्चेष्ट घालविणाऱ्या रेशमी किडयाचें उदाहरण आपणांपुढें आहेच ना ? मग मानवाला तें असाध्य असण्याचें कारण काय ?

या प्रयोगावरून जीं अनुमानें काढलीं जातात तीं मात्र तर्कशुद्ध असतातच असें नाहीं. असले चमत्कारवजा प्रयोग करून दाखविल्यानें प्रेक्षकांची ईश्वराच्या अलौकिक सामर्थ्यावरील श्रध्दा व आस्तिक्य बुध्दि ही दृढमूल होते अशी हे प्रयोग करणाराची किंवा ते करण्याबद्दल विनंति करणाऱ्या त्याच्या

भक्तांची समजूत असते असें दिसून येतें. कोणाची आस्तिक्य बुद्धि कशानें जागृत व्हावी किंवा दृढ व्हावी हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. पण यौगिक सिध्दीवरून ईश्वरी अनुग्रहाबद्दल काढलेलें अनुमान तर्कशुध्द असतें काय, याची चर्चा करण्यास हरकत नाहीं.

बनारस येथील ज्या प्रयोगाचा वर उल्लेख केला आहे त्या प्रयोगानंतर रामस्वरूपजी योगिराज व प्रा. कुळकर्णी प्रभृति चिकित्सक विद्वान् यांच्यांत जी खाजगी चर्चा झाली त्यांत या विद्वानांनीं योगिराजांना प्रश्न केला कीं, तुमच्या या समाधीपासून जगाचें काय कल्याण झालें? त्यावर योगिराजांनीं उत्तर दिलें कीं, "पंचभौतिक सृष्टीच्या पलीकडे ईश्वर म्हणून कांहीं निराळी शक्ति आहे आणि ह्या ईश्वराची शक्ति अतर्क्य असून मानवी बुध्दीच्या पलीकडे असणाऱ्या किती तरी गोष्टी ह्या जड सृष्टींत आहेत. म्हणूनच वेदावर विश्वास ठेवून आणि ईश्वरावर श्रद्धा ठेवून मनुष्यानें आपलें कर्तव्य करीत रहावें आणि आस्तिक्य बुध्दीची वाढ व्हावी या गोष्टी लोकांना कळाव्या एवढाच हेतु मनांत धरून हा प्रयोग समाजांत येऊन केला आहे."

## गवतांतील गूढ

असल्या प्रकारचे यौगिक सिध्दीचे चमत्कार हे आश्चर्यकारक आहेत, म्हणजेच चिकित्सकदृष्ट्या त्यांची सर्व उपपत्ति लावतां येण्याइतकी विज्ञानांची वाढ झालेली नाहीं ही गोष्ट खोटी नाहीं. तसें पाहिलें तर विज्ञानाला व मानुषबुध्दीला आकलन न झालेल्या अशा गोष्टी अद्याप थोड्या का आहेत? पण या असल्या मनुष्याच्या अज्ञानावर ईश्वरानुग्रहाची उभारणी करणें ही धार्मिक श्रध्देला फारशी भूषणावह गोष्ट आहे असें मला तरी वाटत नाहीं. मानवाच्या अज्ञानावरून ईश्वराच्या अतर्क्य सामर्थ्याविषयीं विश्वास दृढ करावयाला तुम्ही निघालांत तर यौगिक सिध्दीसारख्या थक्क करून सोडणाऱ्या प्रयोगांना आवाहान करण्याची तरी काय गरज आहे? तुमच्या हातांत असलेल्या एखाद्या गवताच्या काडीवरूनही तो करतां येईल. विज्ञानाला आज सृष्टीचे कांहीं थोडे व्यापार कळले असले, तरी न कळलेल्या असंख्य गोष्टी आपल्याभोंवतीं पसरलेल्या आहेत. साधें गवताचें पातें घ्या ना? जमिनीवर

पडलेल्या ह्या गवताच्या बीजावर पर्जन्य पडतांच अंकुर बाहेर कां पडावा, ठराविक प्रकारचाच आकार त्यानें धारण कां करावा, नंतर त्याला मंजिऱ्या कां फुटाव्या, व हें होत असतां ज्या असंख्य लहानसहान क्रिया होत असतील त्या सुरळीत एकामागून एक कां व्हाव्या यांची उपपत्ति बीजांतच पुढील विकासाचें सर्व सामर्थ्य सूक्ष्म रूपानें संचित असतें याशिवाय विद्वान् तरी दुसरी काय देणार ? आणि कदाचित् सर्व क्रियांचा उलगडा विज्ञानाला कधीं करतांही येणार नाहीं. कारण अंतिम मूलभूत घटकांचा विचार सुरू झाला कीं, तेथें विज्ञान तरी काय करणार ? सृष्टींतील यच्चावत् पदार्थांचे मूल घटक ९२ असतात, त्यापैकीं कोणताही परमाणु विभजन केला तर त्यांत इलेक्ट्रान, प्रोट्रान, न्युट्रान, वगैरे सांपडतात, येथवर मानवीबुध्दीनें प्रवेश करून घेतला आहे. पण अणूच्या अन्तर्गत रचनेंत पोट्रान-भोंवतीं इलेक्ट्रान्स कां फिरत असतात, व ही भ्रमणाची शक्ति त्यांना मूळ कोठून प्राप्त झाली, हें विज्ञान आज तरी काय सांगणार ?

प्राण्याच्या शरीरवाढीवर कंठग्रंथींचे नियंत्रण असतें व या कंठग्रंथींतील स्रावांत कोणते घटक असतात हें विज्ञानाला अवगत झालेलें आहे, इतकेंच नव्हे, तर त्या घटकांच्या मिश्रणानें कंठग्रंथींतील स्रावासारखा द्रवपदार्थ तो प्रयोगशाळेंत तयारही करूं शकतो. पण मूळ घटकांच्या अंगीं जे गुणधर्म आहेत ते कोठून आले हें विज्ञान कसें सांगणार ? पण अशा गोष्टी विज्ञानाला मानवी बुध्दीच्या आटोक्याबाहेर वाटत असल्या तरी सृष्टींतील ज्या अनेक क्रियांचें त्यानें आजवर अवलोकन केलें आहे त्यावरून सृष्टीचे व्यापार हे सुसूत्र नियमबध्द आहेत अशी मात्र त्याची दिवसेंदिवस अधिकाधिक खात्री पटत चालली आहे.

इलेक्ट्रान्सच्या गतिस्थितीचें नक्की मोजमाप करणें अशक्य ठरूं लागल्यामुळें सृष्टिव्यापाराच्या मानीव नियमबद्धतेविषयींची काटेकोर समजूत सोडून द्यावी लागेल असें कांहीं शास्त्रज्ञ म्हणूं लागले आहेत याची येथें वाचकांना आठवण होईल. या विषयाच्या खोलांत शिरण्याची येथें आवश्यकता नाहीं. फक्त एवढें सांगितलें म्हणजे पुरें कीं, एक तर शास्त्राच्या या विभागांत जी अनिश्चितता उत्पन्न झाली आहे ती फक्त अणूच्या अन्तर्गत असलेल्या इलेक्ट्रान्सपुरतीच

आहे. त्या अनिश्चिततेनें निरनिराळया मूलभूत द्रव्याच्या अणूंच्या कार्यासंबंधींचे जे नियम अबाधित म्हणून ठरले आहेत त्यांत त्यांना कोणताही बाध आलेला नाहीं. आणि दुसरें म्हणजे इलेक्ट्रान्सच्या गतिस्थितीच्या मोजमापासंबंधीं जी अनिश्चितता उत्पन्न झालेली आहे तिच्यावरून आजमितीस तर्कशुद्ध अनुमान एवढेंच काढतां येईल कीं, हें मोजमाप करण्याला अवश्य असणारीं साधनें आज विज्ञानाला साध्य झालेलीं नाहींत. तात्पर्य, व्यापक दृष्टीनें पाहिलें असतां सृष्टींचे व्यापार हे सुसूत्र नियमबद्ध आहेत असाच विज्ञानाचा अनुभव आहे.

असले सुसूत्र नियमबध्द विश्व ज्यानें निर्माण केलें असेल त्याच्या अलौकिक निर्माणकौशल्याबद्दल शास्त्रज्ञाला इतरांपेक्षां वाटला तर अधिकच आदर वाटेल. कारण अखिल विश्वांतील यच्चावत् व्यापारांची आश्चर्यकारक सुसूत्रता त्याला सर्वांत अधिक उत्कटतेनें प्रत्ययास आलेली असते. पण असें सुसंघटित विश्व निर्माण केल्यानंतर तो निर्माता त्यांत फिरवाफिरव करतो हें मानणें मात्र त्याला कठीण जातें. हें त्याला अशक्य आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं. ज्यानें विश्व निर्माण केलें त्याला त्यांत वाटेल ती उलाढाल करितां येणार नाहीं असें कसें मानतां येईल ? पण सृष्टींतील सुसूत्रपणाच्या नियमबध्दतेचा ज्यांनीं अभ्यास केला आहे त्या शास्त्रज्ञांना सृष्टींतील या नियमबध्दतेचा भंग झालेला आढळत नाहीं. जेथें सृष्टिक्रमाविरुध्द प्रकार झाला असें प्रथमदर्शनीं वाटतें तेथें अधिक परिशीलनानंतर पूर्वी अज्ञात असलेला असा दुसरा एखाद्या सृष्टीचा नियम प्रभावी असतो असें त्यांना आढळून येतें. आणि मग जी गोष्ट प्रथम अलौकिक, गूढ, अगम्य अशी वाटत होती ती तशी वाटेनाशी होते.

सर्वांच्या परिचयाचें रेडिओचें उदाहरण घ्या ना. विलायतेंत केलेलें भाषण त्याचक्षणीं जसेंच्या तसें हिंदुस्थानांत ऐकूं येईल असें जर एखाद्या भविष्यवाद्यानें पन्नास वर्षांपूर्वी जाहीर केलें असतें तर त्यावर तुमचा आमचा कोणाचाही विश्वास बसला नसता. तसें पाहिलें तर रेडिओचा चमत्कार हा योगसमाधीपेक्षां कोणत्याही तऱ्हेनें कमी का आश्चर्यकारक आहे ? पण रेडिओच्या चमत्काराच्या पाठीशीं असलेलें रहस्य शास्त्रज्ञांनीं उघड करून दाखविल्यामुळें त्यांतील चमत्कारिकत्व नष्ट झालें इतकेंच. तोच प्रकार योगसमाधीचें रहस्य उद्यां उलगडतां येऊं

लागलें म्हणजे होईल. समाधिसाधन करण्याची एक विशिष्ट प्रकारची प्रक्रिया आहे. ती साध्य झालेले योगी आपणांत आहेत. पण त्या प्रक्रियेची उपपत्ति ज्यांना देतां येत नाहीं. त्यांच्याकडून ती गूढ समजली जाते. प्रक्रिया आधीं साध्य होणें व त्याची उपपत्ति नंतर बसविणें असाच प्रकार बहुतेक वेळां होत असतो. औषधांनीं रोग बरे होतात हा अनुभव सहजगत्या लागलेल्या शोधांनींही मिळण्यासारखा असतो; पण त्या औषधानें शरीरांत काय काय प्रक्रिया घडून येतात व रोगहरण होतें म्हणजे काय होतें याची उपपत्ति सांगतां येणें हें फार कठीण असतें. तोंच प्रकार या योगसमाधीच्या बाबतींत असावा. समाधि लावण्याची प्रक्रिया ज्याला साध्य झालेली असेल त्याला त्याची उपपत्ति देतां येईलच असें नाहीं.

समाधि लावण्यापर्यंत ज्याची योगविद्येंत प्रगति झालेली आहे त्याची बुद्धि सर्वगामी झालेली असलीच पाहिजे असें मानणेंही वाजवी नव्हे. या बाबतींत बनारसच्या योगिराजांनीं काढलेले प्रांजल उद्गार महत्वाचे आहेत. प्रा. कुळकर्णी लिहितात कीं, तुलसीरामायण व भगवद्गीता हीं योगिराजांना मुखोद्गत आहेत. पण इतर कोणत्याही गोष्टीबद्दल किंवा शास्त्राबद्दल विचारलें असतां नम्रपणानें ते उत्तर देतात कीं, " मी एक साधा मनुष्य आहे. मी ही समाधिक्रिया एवढींच जाणतों. " योगिराजांच्या नम्रतेचा मी गैरफायदा घेऊं पहात नाहीं. पण मला वाटतें त्यांचे हे उद्गार प्रांजल व सत्यपूर्ण असावे. ज्यांना आपलें प्रस्थ माजवावयाचें असेल वा या विद्येचा धंदा करावयाचा असेल ते इतकी प्रांजल भाषा मुखांतून कधींही काढणार नाहींत. आणि त्यांचा भक्तगण त्यांनीं असे उद्गार काढले तरी ते खरे मानणार नाहीं. कारण या मार्गांत असणाऱ्या लोकांची सामान्य मनोवृत्ति अशा प्रकारची असते कीं, आपल्या गुरुमहाराजांना एखादी विद्या प्राप्त झालेली असली कीं, ते त्रिकाल-सर्वज्ञ आहेत व ईश्वराचा त्यांच्यावर साक्षात् अनुग्रह आहे असें मानावें. खुद्द गुरुमहाराजांचीही अशी समजूत होणें अशक्य नसतें. या विद्येंतील रहस्य पूर्णपणें उलगडून सांगतां येत नसल्यामुळें हे प्रकार ईश्वराच्या साक्षात् अनुग्रहाशिवाय साध्य होत नसावेत असें मानण्याकडे त्यांचीही साहजिक प्रवृत्ति होते. आणि ईश्वराचा अनुग्रह याचा अर्थ असा करण्यांत येतो कीं, ईश्वराचा वरदहस्त असल्यास वाटेल त्या

सृष्टिनियमांचें उल्लंघन करितां येईल. हवापाण्याशिवाय माणूस जगेल कसा? अर्थात् समाधींत तो जगूं शकतो, इतकेंच नव्हे, तर त्याच्या शक्तीचाही क्षय होत नाहीं हें कसें? अर्थात् येथें कांहीं खास ईश्वरानुग्रह असला पाहिजे असें मानण्याकडे साहजिकच प्रवृत्ति होते आणि ईश्वरानुग्रहानें वाटेल त्या सिद्धि प्राप्त होतात हा सिद्धांत एकदां गृहित धरला म्हणजे सृष्टीचें रहस्य समजून घेण्याच्या शास्त्रज्ञांच्या मार्गापेक्षां ईश्वरानुग्रह संपादन हा मार्ग अधिक श्रेयस्कर असें अनुमान फलित होतें. धर्मपंथाची शिकवण अशाच प्रकारची असते आणि यामुळें शास्त्रीय दृष्टि व धार्मिक दृष्टि यांमध्यें विरोध उत्पन्न होतो. योगिराज म्हणतात कीं, जडसृष्टीच्या पलीकडे कांहीं ईश्वरी तत्त्व आहे याविषयीं विश्वास उत्पन्न करण्याकरितां मी समाधीचा प्रयोग केला. जडसृष्टीच्या पलीकडे ईश्वरीतत्त्व असूं शकेल; पण त्या ईश्वराच्या ठिकाणीं प्रेमाला, भक्तीला, प्रार्थनेला वश होण्यासारखा मानवी गुण आहे व त्यामुळें भक्ताच्या संकटांचा परिहार, तो आपणच केलेल्या सृष्टीच्या नियमांचें उल्लंघन करून करितो असलें कर्तुमकर्तुम् सामर्थ्य ईश्वराच्या ठायीं कल्पिल्यानें ईश्वराचें विभूतितत्त्व गौरविल्यासारखें कसें होतें, कोणास ठाऊक! ईश्वरानें मानवास बुद्धिमत्ता दिली हाच त्याचा मानवजातीवर सर्वोत्तम अनुग्रह होय. या बुद्धीचा कसून उपयोग करणें हीच त्याच्या अनुग्रहाची सफलता होय. तें सोडून ईश्वराला आळवीत बसल्यानें त्याच्या अनुग्रहाची खरी किंमत आपणांस कळली नाहीं असेंच होईल. बुद्धीनें सर्वच गोष्टी कळतील असें नाहीं. पण एक एक गोष्ट समजून घेण्याचा हव्यास धरल्यानेंच मानवानें आजवर आपली प्रगति करून घेतली आहे.

योगसमाधीच्या प्रक्रियेंतील रहस्य आज बुद्धीस नीटसें आकलन झालेलें नसेल, पण त्यांत भांबावून जाण्यासारखें कांहीं नाहीं. आपल्या शरीरांत रासायनिक भट्टी सारखी पेटलेली असून अनंत क्रिया सारख्या चालू असतात त्या चालू रहाण्याकरितां हवेंतील प्राणवायूची आपणांस गरज लागते. आतां शरीरांतील ही घडामोड कमी करीत आणतां आणतां जर अगदीं सूक्ष्म प्रमाणावर आणून ठेवली तर शरीराची झीजही होणार नाहीं. क्रिया चालू रहाण्यास लागणारा प्राणवायूही अगदीं सूक्ष्म प्रमाणांत पुरेल. समाधि ज्या चिरेबंदी भुयारांत घेण्यांत येते

त्या खोलींत जेवढा प्राणवायु असेल तेवढा प्राणवायु समाधिस्त योग्यास चार-सहा महिनेही पुरेसा होईल. बनारसच्या योगिराजांचे भुयार ४×६×८ म्हणजे १९२ घनफुटांचें होतें. अंमळनेरच्या प्रकारांत भुयाराच्या सर्व बाजू ४॥ फुटाच्या म्हणजे एकंदर घनफळ सुमारें ९० फूट होतें. अंमळनेरची समाधि १३ तासांची होती व बनारसची सहा महिन्यांची होती. कालमर्यादेचा आणि भुयारांच्या १९२ व ९० या घनफळाचा कांहीं संबंध आहे का, हें पाहिलें पाहिजे. दुसरें असें कीं, शरीरांत प्राणवायूची आवश्यकता लागते ती त्यांतील बराच भाग शरीरांतील मल काढून टाकण्याकरितां खर्ची पडतो. म्हणून योगी शरीरशुद्धीची दक्षता घेत असतो. बनारसचे योगिराज सांगतात कीं, त्यांनीं प्रारंभीं प्रारंभीं कित्येक दिवस झाडाचीं पानें व गवत खाऊन काढले होते. खारट, तिखट, आंबट, गोड या उत्तेजक व शरीरांतील क्रियावर्धन करणाऱ्या पदार्थांचें सेवन हें ते पाप समजतात. समाधि घेण्याच्या पूर्वी आठ दिवस नुसतें दूध पिऊनच रहावयाचें व समाधिस्त होण्याच्या वेळीं लोटाभर पाणी पिऊन धर्मरंध्रे मोकळीं करावयाचीं व जिभेचा शेंडा तालुमार्गानें वर चढवून भ्रूमध्याच्या आंतल्या बाजूस पोंहोंचवायचा. असें केल्यानें शरीराचे व्यापार स्थगित होत होत अत्यंत सूक्ष्म प्रमाणापर्यंत स्थगित होत असावे व अशा स्थगित स्थितींत शरीरास झीजही अत्यल्प व प्राणवायूची आवश्यकताही अत्यंत अल्प भासत असली पाहिजे. हें सर्व कसें होतें ह्याची वैज्ञानिक भाषेंत उपपत्ति मांडतां येत नाहीं. पण ती एक विशिष्ट शारीरिक प्रक्रिया असून अभ्यासानें साध्य होण्यासारखी आहे असें अनेक योग्यांच्या हकीकतीवरून व यौगिक ग्रंथातील वर्णनावरून दिसून येतें. यांत साक्षात् ईश्वरानुग्रहाचा किंवा सृष्टीचे नियम उल्लंघण्याचा कांहीं प्रश्न नाहीं. समाधीची अवस्था प्राप्त करून घेण्याचे विशिष्ट नियम आहेत. ते आपल्याला आज वैज्ञानिक भाषेंत मांडून दाखवितां येत नाहींत एवढेंच. पण त्या नियमांचा व अस्तिक्यबुद्धीचा अथवा ईश्वरानुग्रहाचा अर्थाअर्थी संबंध नाहीं. योगविद्येचे अज्ञात नियम हेही सृष्टीच्या ज्ञात नियमाप्रमाणेंच असावेत आणि ज्ञात नियमाप्रमाणें हे गूढ नियमही कसोशीनें पाळले न गेल्यास दगाही देतात. प्रयोगशाळेंत प्रयोग चालू असतां विषारी वायु



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थूलमान
अनुक्रम ७५६७९ वि: निबंध

श्वासांत गेल्यास जसा शास्त्रज्ञ वेडा होण्याचा किंवा मृत्युमुखीं पडण्याचा संभव असतो, तसा यौगिक प्रक्रियेंत देखील कांही चूक झाल्यास वेड लागण्याचा किंवा मृत्यु येण्याचा संभव असतो. नेमलेल्या वेळीं समाधि न उतरल्यास मानेच्या शिरा दाबणें, जीभ खालीं ओढणें वगैरे ज्या क्रिया सांगितलेल्या आहेत त्या सर्व शारीरिक भौतिक क्रिया आहेत. वरील क्रिया करूनही समाधि उतरली नाहीं तर मृत समजून उत्तरक्रिया करावी असें योगिराजांनीं सांगितलें आहे. त्यावरून आस्तिक्यबुद्धीचा व ईश्वराच्या अलौकिक सामर्थ्याचा वगैरे कांहीं संबंध त्यांत आहे, असें दिसत नाहीं.

शरीरावर व मनावर विलक्षण प्रभुत्व संपादन करून देणारी योगविद्या ही एक प्रभावी विद्या होय यांत शंकाच नाहीं. एके काळीं या विद्येची जोपासना फार मोठ्या प्रमाणावर झाली असली पाहिजे. पण तिच्या भोंवती गूढतेचें आवरण उत्पन्न झाल्यानें तिची प्रगति स्थगित झाली असावी. शास्त्रीय दृष्टीनें तिचें परिशीलन झाल्यास शरीरविज्ञान व मानसशास्त्र यांत बहुमोल भर पडल्यावांचून रहाणार नाहीं. तसें होण्यास तिच्याभोंवतींचें धार्मिक पटल बाजूस सारून ती एक प्रयत्नसाध्य व नियमबद्ध अशी विद्या आहे अशा दृष्टीनें तिच्याकडे पहाण्यास शिकलें पाहिजे.

—मौज 'दिवाळी अंक' १९४२.

# अहिंसेच्या मर्यादा.

हिंसा–अहिंसा वाद [१]आज सर्वांमुखीं झाला आहे. राष्ट्रावर परचक्र आलें असतां योग्य त्या सर्व उपायांचा अवलंब करावा कीं अहिंसेचें व्रतच चालूं ठेवावें या विषयावर राष्ट्रांतील श्रेष्ठ पुढाऱ्यांमध्यें आजकाल दोन तट पडले आहेत. अशा वेळीं अहिंसेच्या पूर्वी होऊन गेलेल्या ऐतिहासिक प्रयोगाकडे लक्ष जाणें सहाजिक आहे. युरोपांत ख्रिस्ति धर्माच्या पहिल्या अमदानींत अहिंसेची अशीच एक जोराची लाट उठली होती. तिच्याकडे व तिच्या अतिरेकांतील फोलपणाकडे थोडें लक्ष देऊं या.

ख्रिस्ति धर्माचें मूळ प्राणभूत तत्त्व म्हणजे सर्वांभूतीं प्रेम हें होय. पण या पवित्र तत्त्वावर इतर अनेक कल्पनांची जी पुटें चढलीं तीं सामाजिक जीवनाला उपकारक ठरलीं नाहींत. मानवी प्राणी हा उपजतांच पापी असून त्याचा उद्धार होणें असल्यास तो सर्वस्वीं प्रभुकृपेनेंच होऊं शकेल ही अशीच एक कल्पना होय. आतां जन्मजात पापाच्या कल्पनेनें मनुष्याला स्वतःविषयीं तिटकारा वाटूं लागला म्हणजे त्याच्या आयुष्यांतील संगीत संपलेंच. मग पौरुषाला, कर्तृत्वाला, उत्साहाला भरतें कशानें आणावयाचें ?

पापमय आयुष्य कसें तरी सारावें येवढीच त्याची मग महत्वाकांक्षा. ही महत्वाकांक्षा धरून आयुष्य वेंचण्याचा राजमार्ग म्हणजे व्रत–वैकल्यें, उपासतापास यांनीं देहदंडन करीत बसणें हा होय. ही वैराग्यवृत्ति सर्व समाजांत पसरली तर व्यावहारिक जीवन नीरस झाल्याशिवाय कसें राहील ? अशी

---

[१] सात आठ वर्षांपूर्वी

वृत्ति ख्रिस्ति धर्माच्या अनुयायांमध्यें एके काळीं पसरली होती. वैराग्यवृत्तीनें भारलेल्या या ख्रिस्त्यांची सर्व दृष्टि परलोकांवर खिळलेली आणि इहलोकाविषयीं जितकें औदासिन्य जास्त तितका परलोक जवळ अशी त्यांची कल्पना. त्यामुळें व्यवहारिक जगांतील राजकीय, सामाजिक घडामोडीविषयीं ते पूर्ण उदासीन असत. व्यावहारिक जगांत कणखरपणा लागतो तर यांची शिकवण पहावी तों एका गालावर थापट मारली तर दुसरा गाल पुढें करावा अशा प्रकारची! या शिकवणीनें क्षात्रतेज लुप्त होत चाललें. त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला.

रोमवर परचक्र आलें तरीही ख्रिस्ति लोक शस्त्रग्रहण करण्याचें साफ नाकारत. रोमनराज्य रसातळास गेलें. कान्स्टाइननें ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यानंतरचेंही रोमनराज्य रसातळाला गेलें तर त्यांत हळहळण्यासारखें कांहींच नव्हतें. कारण जगाचा अंत लवकरच होणार असून प्रभु ख्रिस्ताचें राज्य साक्षात इहलोकीं सुरूं होणार आहे अशी ख्रिस्तांमध्यें दाट समजूत होती. या असल्या कल्पनांनीं कोणत्याही समाजाच्या स्थैर्याला आणि प्रगतीला लागणारा व्यावहारिक जीवनांतील उत्साह पार नाहींसा होऊन या वैराग्य नादानें रोमच्या डळमळणाऱ्या ऐश्वर्याचें थडगें खणण्यास सुरवात केली असा अभिप्राय गिबन, मिलमन लेकी अशा चौकस इतिहासकारांनीं दिलेला आहे, आतां ख्रिस्ति धर्माचा चांगुलपणा दाखविण्याकरितां गिबन येवढें मात्र म्हणतो कीं, ख्रिस्ति धर्मानें रानटी जेत्यावर मोहिनी टाकली नसती तर रानटी जेत्यांच्या हातून झाले त्यापेक्षां अतिरिक्त अत्याचार झाले असते. ( प्र. ३८. ) मिलमनही ख्रिस्त्यांनीं रोमचा विश्वासघात केला हें मान्य करतोच. पण येवढीच मखलाशी करतो कीं, ख्रिस्त्यांची वागणूक रोमला नाशकारक झाली असली तरी एकंदर समाजाला हितकारकच होती ( ख्रिस्ति धर्माचा इतिहास : खंड ३, पृ. ४८ ). कसेंही असलें तरी व्यावहारिक, सामाजिक जीवनास ख्रिस्ति कल्पना मारक होत्या हें लेकीनें मात्र स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. संन्यासी, बैरागी, जोगिणी होण्याचें व मठांत शिरण्याचें जें वेड ख्रिस्ति धर्मानें पिकविलें त्यानें तर गृहस्थाश्रमाचा उच्छादच मांडला होता. अनेक प्रेमळ माता, पिता, बंधु, भगिनी, पत्नी पती यांच्यावर या जोगवा घेण्याच्या सांथीमुळें दुःखाचे डोंगर कोसळले.मठांत

जाऊन हे लोक तामसी वृत्ति कायमची मारून टाकत असें नव्हे. कारण पाखंड्यांशीं गांठ पडली असतां एकमेकांचीं डोकीं फोडण्याइतकेंही त्यांचें माथें फिरे व त्यांचें क्षात्रतेज जागें होई. पण राष्ट्रावर परचक्र आलें असतां त्याचा प्रतिकार करण्यास हातांत शस्त्र घेणें हें मात्र पाप मानीत ! इतकेंच काय पण परचक्र ही ईश्वरी घटना मानून उदासीन राहात. मिलमन लिहितो—

" Hatred of Heresy was a more sterring motive than the danger of Islamism, And after the first defeats the Christion mind was still further prostated by the common motive that the invasion was a heaven commanded visitation and resistance an impious struggle to avert inevitable punishment." *

या वृत्तीमुळें ऐहिक जीवनाविषयीं औदासिन्य हें धर्मनिष्ठाचें पवित्र कर्तव्य मानलें जाऊं लागलें. याविषयीं लेकी या दुसऱ्या विद्वानाचे विचार ऐका.

" The abelest men in Christion Community vied with one another in inculcating as the highest form of duty the abandonment of Social ties and the modification of domestic affection (ch. 4. p.56). It was at once their Confession and boast that no interests were more indifferent to them than those of their country. They avowed with frankness, long after the Empire had become Christion, that it was a matter of indifference to them under what rule they live (p. 60).

अुत्साह हा माणसांत उपजतच आहे. त्याचा उपयोग ऐहिक कार्यांत होण्याऐवजीं तो सर्वस्वीं आतां परलोक विषयाच्या चरणीं वाहिला गेला व एकंदरीनें सामाजिक जीवनांत अनास्था उत्पन्न झाली. आपल्याकडील पंडितांनीं राष्ट्रीय जीवनाविषयीं अशीच अुदासीन वृत्ति धारण केली होती. तिचाही परिणाम व्हावयाचा तोच झाला.

---

* Latin Christion II p. 206.

मुसलमानी स्वाऱ्या जारी असतानांच मिताक्षराकार व हेमाद्रि हे होऊन गेले पण व्रतवैकल्याचा कीस काढणाऱ्या आणि प्रायश्चित्ताचे डोंगर रचणाऱ्या विद्वानांनीं परचक्राच्या आपत्तीविषयीं एक व्र काढलेला नाहीं. देशांत बुद्धि होती, जोम होता पण तो सर्व परलोकांत विकला जाई आणि इहलोकीं उपासमार होई.

ख्रिस्ति राष्ट्राचा पुढें उदय झाला तो त्यांनीं शस्त्र-संन्यासाची ही नेभळटपणाची वृत्ति झिडकारून क्षात्रवृत्ति पुन्हां प्रज्वलित केली तेव्हां. हें नवीन धोरण स्वीकारण्यास त्यांना मुसलमानी स्वाऱ्यामुळें स्फुरण आलें. प्रथम कांहीं वर्षे या स्वाऱ्यामुळेंही ख्रिस्त्यांनीं आपली अहिंसा वृत्ति सोडली नाहीं. उलट आपलें राष्ट्र परक्यांच्या लाथा खात आहे तें त्यांच्या पापक्षालनाकरितांच होय अशीहि ते आपली समजूत घालीत ! पण परक्या शूर लोकांच्या स्वाऱ्यामुळें जेव्हां सर्व युरोपखंडावर इस्लामी चांद फडकण्याची वेळ आली तेव्हां मात्र ख्रिस्ति राष्ट्रांना आपली चूक उमगूं लागली.

ख्रिस्ताच्या पश्चात् तीनचार शतकें शस्त्रग्रहण करणें पाप होय असें ख्रिस्ति धर्मोपदेशक कंठरवानें प्रतिपादन करीत. इतकेंच काय पण सत्पथाच्या बाजूनें कां होईना पण ज्यांनीं तरवार गाजविली त्या सैनिकांनाही विशेष प्रायश्चित्त घेतल्याविना ख्रिस्ती संघांत प्रवेश मिळत नसे. अहिंसेचें हें तत्त्व ख्रिस्ति समाजांत इतकें बद्धमूल झालेलें होतें कीं या तत्त्वाकरितां कांहींनीं देहांत शिक्षा पत्करली, पण रणांगणावर जाण्याचें झिडकारलें. मात्र हळूहळू ही वृत्ति पालटत गेली. रोमचें राज्य ज्या रानटी लोकांनीं उध्वस्त केलें त्या लोकांमध्यें रणांगणांत मृत्यु हें सद्भाग्य समजलें जाई. ही त्यांची कल्पना त्यांनीं ख्रिस्ति धर्म स्वीकारल्यावरही सोडली नाहीं, आणि रोमन साम्राज्याच्या अस्तानंतर जी एकंदर दंगल माजली त्या दंगलीमध्यें आपला धर्म टिकविण्यास व एकंदर ऐहिक व्यवहार चालवावयाचे तर शस्त्रसंन्यासाची कल्पना कायमची उराशी बाळगणें अशक्य होय, हें ख्रिस्त्यांनाही उमजूं लागलें. सर्वभूतीं आत्मत्व व विश्वकुटुंबत्व ह्या कल्पना निःसंशय उदात्त होत, पण परिस्थिति अनुकूल असल्याविना या कल्पना व्यवहारांत आणूं पाहणें हें विस्तवाशीं खेळण्यासारखें आहे. एका ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें—

In the socity of selfish people selfishness is only self-defence. If society is to disarm it must do so by common counselts ( Secley in Ecee Hown. )

स्वार्थी समाजामध्यें स्वार्थीपणा स्वीकारणें म्हणजे केवळ स्वात्मरक्षणाची तजवीज करणें होय हें तत्त्व ख्रिस्त्यांना पटूं लागलें. मुसलमानी स्वाऱ्या युरोपवर आदळूं लागल्यावर तर त्यांचे डोळे खाड्दिशीं उघडले. आणि पुढें मुसलमानांच्या विरुद्ध चालविलेल्या धर्मयुद्धांत जेव्हां अगणित लूट मिळूं लागली तेव्हां त्यांच्या लोभाला पान्हा फुटला आणि मग अहिंसेचें पाप टाळण्याकरितां आणि सर्वांभूतीं प्रेमाचा झेंडा उभविण्याकरितां ज्यांच्या पूर्वजांनीं प्राणाचीहि आहुति दिली त्यांच्याच वंशजांनीं रणांगणावर जाऊन देह अर्पण करणें हें पुण्यतम कृत्य होय, अशा प्रतिपादनाचा नुसता महागजर चालविला.

यापुढें ख्रिस्ति धर्माला जें वळण लागलें त्यांत ख्रिस्तांच्या दया, प्रेम, अहिंसादि प्रेमाचा मागमूसही राहिला नाहीं. त्याचें समर्थन मला करावयाचें नाहीं हें वाचकांना सांगावयास नकोच. तर मला लक्ष वेधावयाचें तें एवढयाच मुद्याकडे कीं अहिंसादि तत्त्वें हीं स्वतः सिद्ध स्वयंभू तत्त्वें असें न मानतां बहुजन समाजाच्या उत्कर्षाला पोषक या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहून त्यांच्या मर्यादाही ओळखल्या पाहिजेत. एका गालफडांत मारलें असतां दुसरा गाल पुढें करा असे प्रतिपादणाऱ्या येशूचे अनुयायी म्हणावयाचें व त्याच तोंडीं ॲटम बॉंबची भाषा बोलावयाची यापेक्षां दुबळयाला मारूं नका पण आततायीला ठोकून काढल्याशिवाय राहूं नका असें म्हणणें अधिक प्रामाणिक नाहीं का ?

—उन्मेष मासिक अंक २, १९४२.

# विज्ञानप्रणित समाजरचना.

प्रा. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या विज्ञानप्रणित समाजरचना या ग्रंथानें समाजशास्त्रीय वाङ्मयांत अव्वल दर्जाची भर पडली आहे. प्रस्तुत ग्रंथाचें स्वरूप ग्रंथांना रूढ असलेल्या पुष्पाच्या उपमेनें दर्शवावयाचें असल्यास तें हिरव्या चाफ्यासारखें आहे असें वर्णन करतां येईल. हिरव्या चाफ्याचा रंग भडक उठावदार नसतो. पाकळ्या नाजुक तर नसतातच पण फूल आहे कीं पान आहे हेंहि चटकन ओळखतां येऊं नये अशा स्वरूपाच्या असतात. अनेक पाकळया एकमेकांत वर्तुळाकार बसवून जो गेंदेदारपणा इतर फुलांत साधलेला असतो त्याचीहि हिरव्या चाफ्यास दखलगिरी वाटत नाहीं. असें असूनहि हिरवा चाफा तो हिरवा चाफा. कारण फुलाचें जीवनसर्वस्व जो सुवास तो हिरव्या चाफ्यामध्यें गोडच गोड ! प्रस्तुत ग्रंथाचेंहि असेंच आहे. ग्रंथांतील प्रकरणें मूळ चित्रमयजगत्मध्यें स्वतंत्र लेखरूपानें छापलीं गेलीं. त्या वेळीं तीं लिहितांना सबंध पुस्तकाचा आराखडा बहुधा लेखकापुढें नसावा. पण पुढें ती स्वतंत्र ग्रंथांत निविष्ट करतांना जो संस्कार त्यावर जरूर होता तोहि फारसा झालेला दिसत नाहीं. ग्रंथ फारच घाईनें छापला गेला आहे. पृष्ठसंख्या देण्यांतहि पहिलीं ४३ पानें झाल्यावर पुन्हां पहिल्यापासून सुरुवात झाली आहे ! पण इतके सर्व दोष असूनहि मराठींतील समाजशास्त्रावरील ग्रंथांत मानाचें स्थान मिळावें अशा योग्यतेचा हा ग्रंथ आहे.

## शास्त्राकडे पाहण्याची दृष्टि

समाजशास्त्रावर लिहितांना समतोल बुद्धी राखणें हें तारेवरील सर्कशीइतकेंच जवळ जवळ कठीण आहे. शास्त्र शब्द उच्चारला कीं, तर्ककर्कश कठोर निर्विकार

विचारप्रणाली मनापुढें उभी राहावी अशा प्रकारची प्रथा भौतिकशास्त्रांनीं निर्माण केली आहे. पण रसायन, पदार्थविज्ञान यांसारख्या शास्त्रांचा अभ्यास आणि समाजशास्त्रांचा अभ्यास यांच्यांत जें अंतर आहे तें इस्पितळांतील एखाद्या बेवारशी प्रेताची चिरफाड करण्यांत आणि स्वतःच्या एकुलत्या एक मुलावर नाजुक जागीं शस्त्रक्रिया करण्यांत जें अंतर असतें तितकें मोठें आहे. रसायनशास्त्री हिरा आणि कोळसा यांचें पृथक्करण सारख्याच निर्विकार मनानें करूं शकतो म्हणून हिरा हिरमुसत नाहीं. आणि प्राणिशास्त्रज्ञानें कोल्हा हा कुत्रा आणि लांडगा यांची संकर प्रजा होय अशासारखें एखादें विधान केलें तरी विष्णुशर्म्याशीं किंवा इसापाशीं गुजगोष्टी करणारा कोल्हा शास्त्रज्ञांशीं हुजत घालणार नाहीं. या दोन्ही गोष्टी मानवी भावनांनीं अस्पृष्ट म्हणूनच निर्लेप अशा राहूं शकतात. पण जेथें मानवी भावना, अहंकार, स्वार्थ यांचा प्रवेश झाला त्या त्या विषयांत शास्त्र या शब्दाकडे बऱ्याच साशंक वृत्तीनें पाहावयास शिकलें पाहिजे.

भौतिकशास्त्राचे विषय हे सामान्यतः मानवी भावनांच्या कक्षेबाहेरच वावरत असतात. पण त्यांतलि चुकून मानवी भावनांच्या सोवळ्या जागेंत एखाद्याचा पाय पडला तर तेवढ्यानेंहि त्यावर गहजब झाल्याविना राहत नाहीं. ज्योतिष-शास्त्रांत जुने स्थूल गणित सोडून टिळकांसारख्या थोर विद्वद्वर्यांनीं सुचविलेलें नवें सूक्ष्म गणित घेण्यानें वास्तविक कोणाचें काय नुकसान होणार ? पण या प्रकारानें पूर्वजांच्या बुद्धीविषयीं अनादर दाखविला जातो अशी भलतीच समजूत करून घेऊन या साध्या गोष्टीलाहि नाक मुरडण्यास लहरी भावना कमी करीत नाहीं. मग समाजशास्त्राची गोष्टच बोलावयास नको. समाजशास्त्र या समासांत शास्त्र हा शब्द बसलेला असला तरी रसायन गणितादि शास्त्रांना ज्या अर्थानें शास्त्र हा शब्द लागू पडतो त्या अर्थीं तो शब्द समाजशास्त्राला लागू पडण्याचा काल अद्याप तरी आलेला नाहीं. समाजाच्या घडामोडींच्या बुडाशीं असणाऱ्या प्रेरणांचा अभ्यास चालू आहे. पण या अभ्यासाला अद्याप निश्चित सिद्धांतरूपानें मांडण्यासारखें कोणतेंहि फळ धरलेलें नाहीं म्हटलें तरी चालेल. जीं कामचलाऊ प्रमेयें मांडलीं जातात तींहि पडताळून पाहणें कठीण असल्यानें या शास्त्रांत अभ्यासकाच्या भावनांना खेळावयास भरपूर वाव आहे. यामुळें जुने

स्मृतिग्रंथ वाचीत असतां धर्म या शब्दाचा जसा मर्यादित अर्थ घेतला पाहिजे तसा पाश्चात्यांचे ग्रंथ वाचीत असतांहि शास्त्र हा शब्दहि मर्यादित अर्थानेंच स्वीकारला पाहिजे.

## समाजाची समतेवर रचना

विज्ञानप्रणित समाजरचना म्हणजे विज्ञानाची विचार करण्याची जी पद्धत आहे त्या पद्धतीला पटेल अशी समाजरचना होय. ह्या पद्धतीचें सारसर्वस्व म्हणजे वस्तुस्थितीवरून शुद्ध तर्कानें जें प्रमेय निघेल तें स्वीकारणें हें होय. 'सर्वे नः सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः' म्हणजे पुष्कळांचें पुष्कळ सुख हें बुद्धिवादी ध्येय होय. या ध्येयाला जडवादी म्हणून नाक मुरडून जे आक्षेप घेण्यांत येतात त्याची ग्रंथकारानें उलट तपासणी करून असें दाखविलें आहे कीं, तेच आक्षेप आत्मवादावरहि तितक्याच यथार्थतेनें उलटविण्यांत येतील. सर्वांचें सुख हें ध्येय मानलें म्हणजे या ध्येयाला पोषक अशीं जीं दोन तत्त्वें समता व स्वातंत्र्य, त्यांचा स्वीकार करणें अपरिहार्य आहे. म्हणजे समाजाची रचना अशी असली पाहिजे कीं त्यांत जन्मतः सर्व व्यक्ती सारख्याच गणल्या जाव्यात व त्यांतील प्रत्येक व्यक्तीला आपल्या गुणांची योग्य जोपासना करून सामाजिक प्रतिष्ठेच्या अगदीं शिखरावर चढण्यास स्वातंत्र्य असावें.

सर्व व्यक्ती जन्मतः सारख्या नसतात ही रोजच्या पाहण्यातली गोष्ट आहे.हजार माणसें तपासलीं तरी जेथें दोन तोंडवळे सारखे आढळत नाहींत तेथें गुणावगुणांत सर्व माणसें सारखीं आहेत असें मानणें हें शुद्ध धाडस होय. किंबहुना सर्व माणसें एकाच छापाचीं असतीं तर वैचित्र्याच्या अभावीं सामाजिक जीवन नीरस झालें असतें. सर्व माणसें एक छापी नाहींत हें खरोखर मोठें भाग्य होय. पण वैचित्र्य असलें तरी श्रेष्ठ कनिष्ठपणा कोणावर जन्मतःच मुद्दाम लादावयाचा नाहीं हें समतेचें तत्त्व. हीन जातींत जन्मलास म्हणून तूं श्रेष्ठांची सेवाच जन्मभर कर किंवा मुलीच्या जन्मास आलीस म्हणून पतीच्या घरीं दासी म्हणून रहा, माहेरींहि येऊं नको, अशी वृत्ति न स्वीकारणें हें समतेचें सार. मग जो तो आपापल्या गुणावगुणांनीं श्रेष्ठ कनिष्ठ काय पदवी मिळवील ती मिळवो. गुणा-

वगुण मूळचे समान नसले तरी सर्वांना समान संधि मिळेल अशी समाजाची रचना करणें हें ध्येय.

## परिस्थितीचा कुंचला

जन्मतः सर्व माणसें तंतोतंत खरोखरच सारखीं असतात असेंहि मानणारे कांहीं पाश्चात्य समाजशास्त्रज्ञ आहेत. ते म्हणतात कीं, "माणूस जन्मतः निव्वळ ओल्या मातीचा गोळा असतो. त्याचा विनायक बनवायचा कीं वानर वठवावयाचा हें सर्वस्वीं परिस्थितीच्या संस्काराचा हात त्यावर कसा फिरेल यावर अवलंबून असतें. गारुडी मुठीवर फुंक मारुन हंडिबागाला विचारतो कीं, काय काढूं बोल? पेढे, कीं जिलबी, कीं आंबे? तशा ऐटीनें हे बिहेव्हियरिस्ट पंथवाले अथवा परिस्थितीप्रमाणवाले विचारतात कीं, "हें पाहा माझ्या हातांत आतांच जन्मलेलें हें अर्भक आहे. बोला याला कोण करूं? वेदान्ती शंकराचार्य, गणिती भास्कराचार्य, कीं नुसता कणिक तिंबणारा आचारी? परिस्थितीचा कुंचला माझ्या हातांत द्या आणि मग पाहा. मी या अर्भकाला सांगाल तें बनवतों." याच्या अगदीं उलट टोकाला जाणारे समाजशास्त्रज्ञहि आहेत. ते म्हणतात, "सर्व व्यक्ति जन्मतः सारख्या नसतात हें तर झालेंच. पण कांहीं कांहीं गुण कांहीं विशिष्ट वंशांत किंवा जातींतच आढळून येतात. म्हणजे कांहीं वंश हे मूलतःच श्रेष्ठ आहेत आणि दुसरे मूलतःच कनिष्ठ आहेत." युरोपियन समाजशास्त्रज्ञांचा सर्वांत प्यारा वंश म्हणजे नॉर्डिक वंश. पृथ्वीच्या पाठीवर देवाचा लाडका व श्रेष्ठांतील श्रेष्ठतम असा वंश कोठें असेल तर तो नॉर्डिक वंश होय. सुधारणेचें अत्युच्च गौरीशंकर कोणाला गाठतां येणार असेल तर तें फक्त या वंशालाच. पण या वंशाचें शुद्ध रक्त कोणत्या राष्ट्रांत सर्वांत अधिक सांपडतें हें सांगावयाची पाळी आली म्हणजे या शास्त्रज्ञांची जी गडबड उडते ती पाहण्यालायक असते. प्रत्येक शास्त्रज्ञ म्हणणार माझ्या राष्ट्रांत सर्वांत अधिक, आणि माझ्या शत्रूच्या राज्यांत औषधालाहि तें मिळणार नाहीं. जर्मन शास्त्रज्ञ गुंथूट याच्या मतें जर्मनीमध्यें नॉर्डिक रक्त सर्वांत अधिक, तर इंग्रज विद्वान डीन इंग व मॅकडुगल यांच्या मतें इंग्रजांत सर्वांत अधिक आणि जर्मनांत मुळींच

नाहीं. ते म्हणजे नुसते अल्पाईन जातीचे वेडगळ ! (पृ. २७) रक्ताची हिस्सेराशी काढणारे हे सर्वच शास्त्रज्ञ आणि रक्त येथून–तेथून सर्व सारखेंच म्हणणारे वर उल्लेखलेले, तेहि पण शास्त्रज्ञच ! यावरून समाजशास्त्रांतील ‘ शास्त्र ’ शब्दाविषयीं कसें सावध आणि जागरूक राहिलें पाहिजे याची कल्पना येईल.

अशीच सावधगिरी जुन्या ग्रंथांतील धर्म शब्दाविषयींहि आपण राखणें अवश्य होतें. जुन्या स्मृति ग्रंथांप्रमाणें विचार करावयाचा म्हणजे व्यक्तीचा आणि समाजाचा सर्वत्र झाडून सारा व्यवहार धर्माच्या हुकमतीखालीं चालला पाहिजे. आणि धर्माच्या म्हणजे पारलौकिक तर्कातीत गूढ अशा धर्मतत्त्वाचा ! यामुळें समाजाच्या ऐहिक गरजांची तर्कानें चर्चा करूं जाणेंच अशक्य होतें.

## संस्कारगत व पिंडगत गुणांची कसोटी

आजच्या हिंदु समाजांत जसें वैमनस्य सर्वत्र वावरत आहे तसें इतर समाजांतहि आहे. जगांतील कोणत्याहि समाजांत उच्च कनिष्ठ असे थर असतातच. पण इतर समाजांत ते खडकासारखे टणक बनलेले नाहींत. कारण उच्च किंवा नीच जातींत जन्मास येणें हें पूर्वसुकृताचें फळ होय या गूढ तत्त्वज्ञानाचें सीमेंट तेथें ओतलेलें नाहीं. या तत्त्वज्ञानाची रजा घेतल्याशिवाय समाजाच्या पुनर्घटनेचा विचारच संभवत नाहीं. पुर्नजन्म खरा कीं खोटा याविषयीं हुजतहि घालण्यांत अर्थ नाहीं. खरा मानून आत्मिक उन्नतीवर त्याचा परिणाम होत असेल असें मानलें तरीहि हरकत नाहीं. पण पूर्वजन्माच्या संचिताचा परिणाम मनुष्याच्या सर्व व्यावहारिक जीवनावर होतो व मनुष्यकृत ज्या उच्चनीच जाति त्यांपैकीं कोणतींत जन्मास येणें हेंहि पूर्वसंचितावरूनच ठरतें आणि तें ठरलें म्हणजे पुढें केव्हां तरी आपल्याला उच्च जातींत जन्म मिळेल या आशेनें आज ज्या नीच जातींत मी जन्मलों त्या नीच जातींचीं म्हणून ठरलेलीं कामें प्रामाणिकपणें करीत राहणें हेंच माझें कर्तव्यकर्म ठरतें वगैरे जी विचारसरणी आहे तिला वाटेस लावल्याशिवाय समाजशास्त्रांत तर्काला व विवेकाला प्रवेश मिळणेंच दुर्घट.

पण एकदां बोळवणी केलेला बहुरूपी दुसऱ्या दिवशीं दुसरेंच सोंग घेऊन पुन्हां यावा तसा एक नवीन प्रकार कांहीं समाजशास्त्रज्ञांनीं सुरूं केला आहे. ते

म्हणतात, "पूर्वसंचिताचें तुम्हांला वावडें असेल तर तें नका मानूं. पण तर्काचा आणि प्रयोगाचा विषय होऊं शकेल असें अनुवंशशास्त्र तरी तुम्ही मानतां ना? मग त्या अनुवंशशास्त्राचेंच असें म्हणणें आहे कीं ते ते गुण हे त्या त्या कुलांत आणि त्या त्या जातींतच कायमचे आढळून येतात. ते गुण त्या त्या जातीच्या पिंडगत तिजोरींतच सुरक्षित ठेवलेले असतात आणि या तिजोरीची किल्ली त्या त्या अनुवंशाच्याच हातीं असते. व्यक्तीनें आपल्या जातीचाच धंदा करावा, व आपल्या जातीच्या वधूशींच संसार करावा असें करणें यांतच तिचें कल्याण आहे, इतकेंच नव्हे तर असें न वागल्यास तिचा वंशक्षय होईल, असें जें पूर्वाचार्यांनीं प्रतिपादिलें आहे तें अनुवंशशास्त्राच्या आधारानेंच. आणि हें शास्त्र तर्कशरण असल्यानें गूढवादाची बोळवणी करणाऱ्या तुम्हांलाहि त्याचें स्वागत केलेंच पाहिजे."

युरोपमध्यें गाल्टननें या विचारसरणीचा पाया घातला आणि नंतर पियर्सनादि त्याच्या शिष्यवरांनीं पोकळ आंकड्यांच्या इंद्रजालानें त्यावर प्रचंड प्रासाद उठविला. इतका कीं कोणताहि एखादा गुण कोणत्या पिढींत कोणत्या क्रमानें किती टक्के उतरेल याच्या अगदीं सारण्या त्यांनीं बांधून टाकल्या. एखादें गवयाचें घराणें घ्यावयाचें आणि त्याच्या पांचपन्नास पिढ्या तपासून दाखवावयाचें कीं, या कुलांत गायनविद्या ही अनुवंशिकच आहे. तसेंच दुसरें एखादें भिक्षेकऱ्याचें कूळ घ्यावयाचें आणि दाखवून द्यावयाचें कीं, या कुळाच्या पन्नास पिढ्या तपासल्या तरी या कुलांत लायकी सांपडते ती फक्त भीक मागण्याची! आणि या काटकुळ्या प्रमेयांना आंकड्यांच्या कोष्टकांचे जाडजूड तट चढविले कीं झाले टोलेजंग सिद्धांत. पण उपजल्यापासून गाण्याचे आवाज ज्या मुलाच्या कानावर पडत असतात तें मूल गवई झालें तर त्यांत अनुवंशाचा गुण किती आणि संस्काराचा गुण किती हें ठरविणेंच मूळ कठिण. मग तें ठरवितांना गणिताच्या कितीहि कसरती केल्या म्हणून काय निष्पन्न होणार? तसेंच रोज दारोदार भटकण्याचाच ज्याच्या मनावर अव्याहत संस्कार झाला आहे अशा भिक्षेकऱ्याच्या मुलाला तूं भास्कराचार्य होणार नाहींस म्हणून सांगणें हें शास्त्रीय ठरेल काय? तेव्हां संस्कारगत गुण आणि पिंडगत गुण यांची फोड करण्याची

कसोटी जोंवर शास्त्रज्ञांना गवसली नाहीं तोंवर गाल्टन पियर्सनादि आंकडे-शास्त्रज्ञांची विचारसरणी ही हवेंतील हवेलीच मानली पाहिजे. तात्पर्य जाती त्या मूलतःच श्रेष्ठ कनिष्ठ आहेत, त्या कायमच्या तशाच राहातात, त्यांच्या धंद्यांत किंवा रक्तांत संकर आल्यास त्यांचा क्षय होतो वगैरे ज्या रूढ समजुती आहेत त्याला शास्त्रांत कोणताहि आधार मिळत नाहीं.

सगोत्र विवाहाविषयीं जो विद्वेश बद्धमूल झाला आहे त्यालाहि शास्त्रांत आधार कसा सांपडत नाहीं याचेंहि ग्रंथकारानें विवेचन केलें आहे. सगोत्र निषेधांत दोन गोष्टी मुख्य मानलेल्या आहेत. एक म्हणजे एकाच गोत्राची सर्व कुटुंबें हीं एकाच पूर्वजाच्या वंशांतली होत. म्हणजे त्या सर्व कुटुंबांत एकच रक्त खेळत आहे. आणि दुसरी म्हणजे एकाच रक्ताच्या कुटुंबांत विवाह होणें हें अनिष्ट आहे. पण हीं दोन्ही प्रमेयें निराधार आहेत. आजच्या गोत्रांची ऐतिहासिक तपासणी केली असतां दाखवून देतां येईल कीं, आजचीं गोत्रें हीं एक रक्तसंबंध मुळींच दाखवीत नाहींत. बौधायनाच्या मताप्रमाणें पूर्वी गोत्रें असंख्य होतीं. त्याचे-पुढें गंगाधर, खांडव, गोदायन, पांचाल वगैरे गण पाडले. या गणांचीं नांवें हीं देशनामे उघड दिसतात. ती एक रक्त दाखवीत नसून फक्त एकदेशीयत्व दाखवितात. दुसरें, पूर्वी गोत्रें बदलताहि असत. उदाहरणार्थ, शुनःशेप हा आंगिरस गणांतून विश्वामित्र गणांत गेला व भारद्वाजाचा वंशज शौनहोत्र हा भृगुकुळांत गेला असे उल्लेख आढळतात. तिसरें, एका गोत्रांतला मुलगा चौल संस्काराच्या पूर्वींच दुसऱ्या कुलांत दत्तक दिला तर त्याचें पूर्वीचें गोत्र अजी-बात बदलतें म्हणजे विवाहाच्या वेळीं त्या पूर्वगोत्राचा विचार करावा लागत नाहीं वगैरे नियमहि असेच दाखवितात कीं गोत्रांचा आणि रक्ताचा अभेद्य असा संबंध नाहीं. गोत्र तर राहोच, पण महाभारतकार सांगतो कीं, " जाती देखील ठरविणें कठीण आहे. संकरान् सर्ववर्णानां दुष्परीक्ष्येति मे मतिः ". दुसरें प्रमेय असें कीं एकाच रक्ताच्या कुळांत शरीरसंबंध होणें हें हानिकारक आहे. त्यासहि शास्त्रांत आधार नाहीं, उंदरांच्यावर केलेले प्रयोग माणसांना लागू असतील तर, अशा संबंधापासून कोणताहि अनर्थ उद्भवत नाहीं असाच उलट पुरावा उपलब्ध आहे. सारांश, सर्वांना समान संधि या तत्त्वानुसार समाजरचना

करूं पाहणाऱ्याला विरोध करणारीं अशीं जीं पाखंडें आज रूढ आहेत त्यांना तर्कशुद्ध असा पाया नाहीं.

## गृहसंस्थेचें महत्त्व

सर्वांना समान संधि या तत्त्वामध्यें स्त्रीपुरुषांना समान संधि ही गृहीतच आहे. आणि ती व्यवहारांत उतरावयाची म्हणजे कुटुंबसंस्था आणि अपत्यसंगोपन या गोष्टींचाहि विचार करणें अवश्य होतें. या बाबतींत एक मत असें आहे कीं, स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्याचें सुख अनुभवूं द्यावयाचें असल्यास त्यांच्या मानेवरचें अपत्यसंगोपनाचें जूं दूर केलें पाहिजे. म्हणजेच कुटुंब संस्था मोडली पाहिजे व अपत्यसंगोपन हें सार्वजनिक संस्थांवर सोपाविलें पाहिजे. पण राष्ट्रांतील सर्व अर्भकांची जोपासना करतील येवढ्या प्रचंड सार्वजनिक संस्था अद्याप निघाल्या नाहींत हें एक व जेथें थोड्याबहुत निघाल्या आहेत त्या रशिया व अमेरिका या देशांतील अनुभवहि मातांच्या इतक्या कळकळीनें या संस्था वागूं शकत नाहींत असाच आहे हें दुसरें. अपत्यसंगोपन हें मानेवरील जुवाप्रमाणें कष्टदायक आहे, असें न मानतां मांडीवरील वीणेइतकें आल्हादप्रद आहे अशा मानणाऱ्या माता थोडक्या नाहींत हें तिसरें, आणि समाजसेवेचे प्राथमिक धडे घेण्यास कुटुंबसंस्थेइतकी नमुनेदार शाळा दुसरी सांपडण्यासारखी नाहीं हें चौथें. या सर्व कारणास्तव गृहसंस्था मोडण्यांत समाजाचें हित साधेल असें वाटत नाहीं असा ग्रंथकारानें अभिप्राय दिला आहे आणि या त्याच्या अभिप्रायावरून ग्रंथकाराची विचारसरणी लक्षांत येईल.

## कांहीं विधानांचें परीक्षण

ही विचारसरणी प्रायः तर्कशुद्ध आणि समतोल अशीच आहे. क्वचित् कांहीं विधानें चित्य आहेत त्यांचा निर्देश करून हें परीक्षण संपवूं. एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचें विवेचन चालू असतां ग्रंथकार लिहितो कीं " 'हिंदु राष्ट्र' हा शब्द मी उगीच वापरला आहे. असें एखादें राष्ट्र मागें कधीं होतें किंवा पुढें कधीं होऊ शकेल असें मला वाटत नाहीं ". या विधानाला वैतागानें केलेल्या विधानाचा वास अगदीं वरवर देखील मारतो आहे. एक राष्ट्रीयत्वाचे पांच धागे

ग्रंथकारानें दिले आहेत. ते म्हणजे एक रक्त, एक धर्म, एक पूर्वपीठिका, एक भाषा व समान संधि हे ते पांच धागे होत. ते देऊन ग्रंथकार लिहितो कीं, "आपल्या हिंदु राष्ट्राला राष्ट्रीयत्वाच्या या पांच धाग्यांपैकीं कोणत्या धाग्यानें बांधलें आहे असें पाहिलें तर यांपैकीं कोणताहि धागा येथें नाहीं." या एकांतिक विधानाचा पाठपुरावा इतिहास करील असें मला वाटत नाहीं. रक्ताचें मिश्रण होऊं नये याविषयीं हिंदुशास्त्रकार उत्तरोत्तर अधिक कडक लिहूं लागले होते पण एके काळीं रक्तसंकर भरपूर होता हें मागें आपण पाहिलेंच आहे. शिवाय भिन्न रक्त असलें म्हणून भाषा भिन्न असावी, धर्म भिन्न असावा, पूर्व पीठिका भिन्न असावी आणि असलीच पाहिजे असें कोणी प्रतिपादन करीत असल्याचें ऐकिवात नाहीं. कांहींचे संस्कार वैदिक मंत्रानें होतात तर कांहींचे पौराणिक मंत्रानें होतात; येवढ्यावरून त्यांचे धर्महि भिन्न असावेत असल्या विचारसरणीच्या आहारीं जाणें म्हणजे भागवतधर्माची आणि वारकरी पथांची कामगिरी डोळ्याआड करण्यासारखें होय. आषाढी-कार्तिकीला चंद्रभागेच्या वाळवंटीं जो तुफान जनसम्मर्द लोटतो तो रक्तानें भिन्नभिन्न असला तरी विठ्ठल-भक्तीच्या एकमेव अखंड रसानें कसा आकंठ तुडुंब भरलेला असतो हें ज्यानें पाहिलें आहे त्याला, या लोकांना एक धर्म नाहीं असें विधान करतांना विचारच पडेल.

तीच गोष्ट एक भाषा आणि एक पूर्वपीठिका यांची. हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशाची एकच एक भाषा असणें ही गोष्ट मुळांतच अशक्य आहे; शिवाय तशी ती नसावीच असें कोणी प्रतिपादन केल्याचें वाचण्यांत नाहीं. पण या बाबतींत महत्त्वाची लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, प्रांतोप्रांतीं भिन्न भाषा नांदणाऱ्या या अफाट देशांत एक अशी भाषा होती कीं, ती काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र अभ्यासली जात होती. ही भाषा संस्कृत होय आणि ही भाषा ब्राह्मणांच्या सोवळ्या संवलींतच व धार्मिक चर्चेपुरतीच तेवढी वावरत नसून देशांतील सर्व उत्तमोत्तम वाङ्मय त्यांत संग्रहित केलें जात होतें. त्यांत धर्मचर्चा आहे, अर्थशास्त्राचे ग्रंथ आहेत, कामशास्त्र आहे, पैशाचींतून संस्कृतमध्यें आणलेला कथासरित्सागर आहे, इतकेंच नव्हे तर ज्या बौद्ध आणि

जैन विद्वानांनीं प्रथम पाली आणि अर्धमागधी यांचा स्वीकार केला त्यांनीहि उत्तरकालांत आपले ग्रंथ संस्कृतमध्येंच रचिले! या राष्ट्रीय संस्कृत भाषेनें भिन्न प्रांतांच्या वाङ्मयांत एकसूत्रीपणा राखण्यांत फार मोठी कामगिरी केली आहे ही गोष्ट डोळ्याआड करणें योग्य नव्हे.

आणि एक पूर्वपीठिका ! आर्य व द्रविड हे दोन मुख्य वंश घेतले तरी आर्यांच्या वैदिक धर्माला उत्तरेकडे उतरती कळा लागल्यावर त्याची जाज्वल्य अभिमानानें कोणी जोपासना केली असेल तर ती दाक्षिणात्य द्रविडांनीं. तसेंच ज्यांनीं बुद्धाला खुद्द दशावतारांत स्थान दिलें व जाखाई-जोखाईपासून निर्गुणनिराकारापर्यंत सर्व देवदेवतांना एका धर्मांत गोवलें, आणि वाराणशी, रामेश्वर, द्वारका, पुरी वगैरे पवित्र क्षेत्रांचें वर्णन करतांना प्रांताभिमानाचें वारें देखील लागूं न देतां देशाच्या अष्ट दिशेला असणाऱ्या क्षेत्रांचें सारखेंच पावित्र्य व महात्म्य मानलें त्यांस भरतखंडाची म्हणून एक पूर्वपीठिका निर्माण करण्याची कल्पना नव्हती असें कसें म्हणतां येईल ?

असेंच आणखी एक चिन्त्य विधान, म्हणजे ‘ जडवाद व लोकशाही ’ हीं तत्त्वें वगळलीं तर बाकीचीं तत्त्वें प्राचीन हिंदुस्थानला अवगत होतीं (पृ. १३५). हें होय. या वाक्यावरून जडवाद व लोकशाही ही हिंदुस्थानाला सर्वस्वीं अपरिचित होती असा जो ध्वनि निघतो तो यथार्थ नव्हे. कारण दोन्हींविषयीं इतिहासांत भरपूर पुरावा उपलब्ध आहे. जडवादी चार्वाकाचा आणि लोकशाही गणराज्यांचा नुसता उल्लेख केला तरी पुरे होईल. तसेंच पान ५९ वर लिहिलें आहे कीं ‘एकीच्या भावनेच्या बाबतींत अखिल हिंदु समाजाची स्थिति वाईट असली तरी महाराष्ट्राची बरीच समाधानाची आहे. धार्मिक क्षेत्रांत ज्ञानेश्वर एकनाथ या ब्राह्मणांच्या जोडीला तुकाराम नामदेव हे ब्राह्मणेतर बसूं शकले व राजकीय क्षेत्रांत संताजी-धनाजीच्या बरोबरीनें प्रतिनिधी-पटवर्धनांनीं उडी घेतली यामुळें जातींचा दुजाभाव राहिला नाहीं ’. हें विधान महाराष्ट्राची खुशामत करणारें असलें तरी महाराष्ट्रापुरतेंच वापरणें योग्य होणार नाहीं. कारण धार्मिक बाबतींत जें महाराष्ट्रांत घडलें तेंच संयुक्त प्रांतांत, मद्रासेंत व बंगालमध्यें घडलेलें आहे. म्हणजे महाराष्ट्रांतल्याप्रमाणेंच सर्व जातींतून संत निर्माण झालेले आहेत. आणि राजकीय बाबतींत शिखांना वगळून कसें चालेल? असो. अशीं स्थळें एकंदरींत थोडीं आहेत आणि जीं आहेत त्यांनीं ग्रंथाच्या मुख्य प्रमेयाला बाध येण्यासारखा नसून ग्रंथ रूढ विचारांना नवी कलाटणी देणारा असाच श्रेष्ठ उतरला आहे.

—केसरी १४।९।१९३७

: पांच :

# कुंवार माता

श्रद्धानंद अनाथ महिलाश्रमाचा ताजा अहवाल नुकताच वाचला. वाचीत असतां वाटलें कीं, आपल्या समाजांत जें परिवर्तन झपाट्यानें घडून येत आहे त्याचें प्रात्यक्षिकच येथें मी पहात आहें.

नव्या सुशिक्षित पिढींत पातिव्रत्यविषयक कल्पनेवरील श्रद्धा किती ढिली झाली आहे हें त्यांच्यांतील जाहीर चर्चेकरितां जो विषय अनेक वेळां निवडला गेलेला दिसतो त्यावरूनही लक्षांत येण्यासारखें आहे. तो विषय म्हणजे 'सहवासोत्तर विवाह कीं विवाहोत्तर सहवास.'

हा विषय आतां नुसत्या वादाच्या वादळांत राहिला नसून कृतीच्या कक्षेंत तो आतां फिरूं लागला आहे. याची सामान्य कल्पना असली तरी तो उजळ माथ्यानें फिरूं लागला नसल्यानें त्याचा संचार किती प्रमाणांत आहे याची योग्य कल्पना बांधणें अशक्य असतें. अमेरिकेंत न्यायाधीश लिंडसे यानें स्वतः इन्साफ केलेल्या एतद्विषयक गुन्हेगारांचे आंकडे प्रसिद्ध केले तेव्हांच विवाहपूर्व सहवासाच्या प्रसाराची खरी कल्पना तेथील समाजास आली.

ह्या प्रकाराचा आपणामध्यें कसा व किती फैलाव होत चालला आहे याची स्पष्ट कल्पना हवी असल्यास श्रद्धानंद आश्रमाचा अहवाल चाळा. गेल्या वर्षीं आश्रमामध्यें ७९ पतित स्त्रिया दाखल झाल्या. ( पतित याचा पातिव्रत्यापासून पतित झालेली असा अर्थ अभिप्रेत आहे. ) यांत २१ अविवाहित होत्या. ही संख्या प्रत्यक्ष आश्रमांत दाखल झालेल्यांची आहे. अर्थात विवाहपूर्व सहवासाचा अनुभव घेणाऱ्यांची संख्या यापेक्षां बरीच मोठी असली पाहिजे असें अनुमान काढल्यास तें चुकीचें होणार नाहीं.

प्रत्यक्ष अडचणींत ज्या सांपडल्या व त्या अडचणींचा परिहार आश्रमांत जाऊन करितां येणें शक्य आहे याची ज्यांना माहिती होती व त्या माहितीचा उपयोग करण्याचें धैर्य ज्यांच्यांत होतें अशा थोड्या पतिताच काय त्या आश्रमांत दाखल झाल्या. आश्रमाची माहिती नसणाऱ्यांची संख्या थोडी नसेल. माहिती असून त्याचा फायदा घेण्याचें धैर्य नसणारांचीही संख्या कमी नसणार. आणि सर्वांत शेवटीं म्हणजे संततिप्रतिबंधक साधनांच्या फैलावानें अडचणींत न सांपडणारांची संख्याही अल्प नसावी. या सगळ्या गोष्टी जमेस धरल्या तरच या वाढत्या प्रकाराची कांहींशी कल्पना येईल.

या प्रकाराचीं निरनिराळीं कारणें आहेत.

पातिव्रत्यविषयक कल्पना ज्या धार्मिक श्रद्धेच्या आश्रयाखालीं आजवर वाढलेल्या आहेत ती धार्मिक श्रद्धा डळमळूं लागतांच पातिव्रत्याच्या कल्पनेचा जोमही कमजोर झाला तर नवल नाहीं. शिवाय समाजस्थैर्याकरितां पातिव्रत्याची व कुटुंब संस्थेची आवश्यकता आहे याविषयींही संशय उत्पन्न झाला आहे.

या दोहोंपैकीं पापपुण्यात्मक गूढ वादावर उभारलेली धार्मिक श्रद्धा पुन्हां प्रस्थापित करणें अवघड आहे. तथापि प्रत्येक गोष्टीकडे निर्भीडपणें पहाण्याची संवय हीच अंतीं हितकारक ठरेल.

आणि या निर्भीड दृष्टीनें पाहूं लागलें म्हणजे स्वैराचार हा समाजस्थैर्याल बाधक आहे असेंच स्पष्ट दिसूं लागेल. धार्मिक अंमलाखालीं वैवाहिक बंधनें करकोचे पडण्याइतकीं आवळलीं गेलीं तेव्हां त्याविरुद्ध प्रतिक्रिया व्हावी हें अपरिहार्य होतें. पण प्रतिक्रिया होत असतांना दुसऱ्या बाजूस तोल जाणार नाहीं याविषयी खबरदारीचा इषारा देणें जरूर आहे.

धार्मिक बंधनें झुगारून देण्याचे प्रत्यक्ष प्रयोग करणारा देश म्हणजे रशिया. नव्या प्रयोगाच्या अंध अतिरेकानें तेथें प्रारंभीं थैमान मांडलें. पण लवकरच नेते जागृत झाले. नव्या रशियाचा आद्यप्रणेता जो लेनिन त्यानेंही स्वैराचाराला पाठिंबा दिलेला दिसत नाहीं. क्लॅरा झेटकिन हिनें ' लेनिनच्या आठवणी ' दिल्या आहेत. त्यांत लेनिनच्या तोंडीं असें वाक्य घातलें आहे कीं, लैंगिक विषयाकडे जें फाजील लक्ष सध्यां दिलें जातें त्यानें जीवनांतील आनंद

: पांच :

# कुंवार माता

श्रद्धानंद अनाथ महिलाश्रमाचा ताजा अहवाल नुकताच वाचला. वाचीत असतां वाटलें कीं, आपल्या समाजांत जें परिवर्तन झपाट्यानें घडून येत आहे त्याचें प्रात्यक्षिकच येथें मी पहात आहें.

नव्या सुशिक्षित पिढींत पातिव्रत्यविषयक कल्पनेवरील श्रद्धा किती ढिली झाली आहे हें त्यांच्यांतील जाहीर चर्चेकरितां जो विषय अनेक वेळां निवडला गेलेला दिसतो त्यावरूनही लक्षांत येण्यासारखें आहे. तो विषय म्हणजे 'सहवासोत्तर विवाह कीं विवाहोत्तर सहवास.'

हा विषय आतां नुसत्या वादाच्या वादळांत राहिला नसून कृतीच्या कक्षेंत तो आतां फिरूं लागला आहे. याची सामान्य कल्पना असली तरी तो उजळ माथ्यानें फिरूं लागला नसल्यानें त्याचा संचार किती प्रमाणांत आहे याची योग्य कल्पना बांधणें अशक्य असतें. अमेरिकेंत न्यायाधीश लिंडसे यानें स्वतः इन्साफ केलेल्या एतद्विषयक गुन्हेगारांचे आंकडे प्रसिद्ध केले तेव्हांच विवाहपूर्व सहवासाच्या प्रसाराची खरी कल्पना तेथील समाजास आली.

ह्या प्रकाराचा आपणामध्यें कसा व किती फैलाव होत चालला आहे याची स्पष्ट कल्पना हवी असल्यास श्रद्धानंद आश्रमाचा अहवाल चाळा. गेल्या वर्षी आश्रमामध्यें ७९ पतित स्त्रिया दाखल झाल्या. (पतित याचा पातिव्रत्यापासून पतित झालेली असा अर्थ अभिप्रेत आहे.) यांत २१ अविवाहित होत्या. ही संख्या प्रत्यक्ष आश्रमांत दाखल झालेल्यांची आहे. अर्थात विवाहपूर्व सहवासाचा अनुभव घेणाऱ्यांची संख्या यापेक्षां बरीच मोठी असली पाहिजे असें अनुमान काढल्यास तें चुकीचें होणार नाहीं.

प्रत्यक्ष अडचणींत ज्या सांपडल्या व त्या अडचणींचा परिहार आश्रमांत जाऊन करितां येणें शक्य आहे याची ज्यांना माहिती होती व त्या माहितीचा उपयोग करण्याचें धैर्य ज्यांच्यांत होतें अशा थोड्या पतिताच काय त्या आश्रमांत दाखल झाल्या. आश्रमाची माहिती नसणाऱ्यांची संख्या थोडी नसेल. माहिती असून त्याचा फायदा घेण्याचें धैर्य नसणारांचीही संख्या कमी नसणार. आणि सर्वांत शेवटीं म्हणजे संततिप्रतिबंधक साधनांच्या फैलावानें अडचणींत न सांपडणारांची संख्याही अल्प नसावी. या सगळ्या गोष्टी जमेस धरल्या तरच या वाढत्या प्रकाराची कांहींशी कल्पना येईल.

या प्रकाराचीं निरनिराळीं कारणें आहेत.

पातिव्रत्यविषयक कल्पना ज्या धार्मिक श्रद्धेच्या आश्रयाखालीं आजवर वाढलेल्या आहेत ती धार्मिक श्रद्धा डळमळूं लागतांच पातिव्रत्याच्या कल्पनेचा जोमही कमजोर झाला तर नवल नाहीं. शिवाय समाजस्थैर्याकरितां पातिव्रत्याची व कुटुंब संस्थेची आवश्यकता आहे याविषयींही संशय उत्पन्न झाला आहे.

या दोहोंपैकीं पापपुण्यात्मक गूढ वादावर उभारलेली धार्मिक श्रद्धा पुन्हां प्रस्थापित करणें अवघड आहे. तथापि प्रत्येक गोष्टीकडे निर्भीडपणें पहाण्याची संवय हीच अंतीं हितकारक ठरेल.

आणि या निर्भीड दृष्टीनें पाहूं लागलें म्हणजे स्वैराचार हा समाजस्थैर्याला बाधक आहे असेंच स्पष्ट दिसूं लागेल. धार्मिक अंमलाखालीं वैवाहिक बंधनें करकोचे पडण्याइतकीं आवळलीं गेलीं तेव्हां त्याविरुद्ध प्रतिक्रिया व्हावी हें अपरिहार्य होतें. पण प्रतिक्रिया होत असतांना दुसऱ्या बाजूस तोल जाणार नाहीं याविषयीं खबरदारीचा इषारा देणें जरूर आहे.

धार्मिक बंधनें झुगारून देण्याचे प्रत्यक्ष प्रयोग करणारा देश म्हणजे रशिया. नव्या प्रयोगाच्या अंध अतिरेकानें तेथें प्रारंभीं थैमान मांडलें. पण लवकरच नेते जागृत झाले. नव्या रशियाचा आद्यप्रणेता जो लेनिन त्यानेंही स्वैराचाराला पाठिंबा दिलेला दिसत नाहीं. क्लॅरा झेटकिन हिनें 'लेनिनच्या आठवणी' दिल्या आहेत. त्यांत लेनिनच्या तोंडीं असें वाक्य घातलें आहे कीं, लैंगिक विषयाकडे जें फाजील लक्ष सध्यां दिलें जातें त्यानें जीवनांतील आनंद

आणि जोम हीं कमी होत आहेत. ( wide spread hypertrophy in sexual matters takes away the joy and force of life ) याचें कारण असें कीं, संयमानेंच मनुष्याची जीवनशक्ति जोरदार होऊं शकते. या संयमाचें स्तोम माजविण्यांत आल्यानें त्यांतील सद्गुण विटूं लागतो. पण स्वैराचार आणि संयम या दोहोंत लढा उत्पन्न झाला असतां संयमाचा अवलंब हाच समाजउपकारक ठरेल यांत शंका नाहीं.

दुसरें कारण आर्थिक अनवस्था. पोटाला मिळवूं लागेपर्यंत विवाहाची जबाबदारी स्वीकारणें अवघड वाटलें तर दोष देतां येणार नाहीं. पण आर्थिक परिस्थिति ज्यांना अनुकूल असते असेही तरुण ती जबाबदारी योग्य काळीं स्वीकारण्याचें टाळूं लागलेले आढळून येतात. या परिस्थितीचा वडीलधाऱ्या माणसांनीं विचार करण्याची वेळ आली आहे.

या बाबतींत अशा कांहीं चमत्कारिक संक्रमणावस्थेच्या खिंडींत आपला समाज सांपडला आहे कीं, विवाह हा प्रेममूलक असावा हा विचार दृढ होत चालला आहे; पण आपणांस अनुरूप असा जिवाचा सोबती शोधून काढण्यास योग्य ती संधी मात्र मिळत नाहीं. आपल्या समाजांत अद्याप स्त्री पुरुष हे सर्रास एकत्र मिसळूं लागले नाहींत. तरुण–तरुणींना अधिक मोकळेपणें पण उघडपणें एकत्र येण्याची संधी दिल्यास चोरटेपणाचा व्यवहार एकंदरींत संकुचित होईल. चोरटेपणाच्या प्रकारांतील मनावर पडणारा ताण हा एकंदरींत जीवनशक्तीला क्षीण करणारा आहे.

सुशिक्षित तरुणी आपलीं लग्नें स्वतंत्रपणें जुळवितील या कल्पनेनें कांहीं पालक स्वतः या बाबतींत उदासीन रहातात. पण स्वतः निवड करण्याला अनुकूल अशी समाजाची घडी बसलेली नाहीं हें ते विसरतात. त्यामुळें मुलींची कुचंबणा होऊन विवाहाचें वय निष्कारण लांबतें. तरी पालकांनीं वरसंशोधन करणें व मुलींनीं त्यांतल्या त्यांत निवड करणें हा मधला मार्ग कांहीं काल अवलंबावा लागेल. तसेंच नैसर्गिक वासना लक्षांत घेतां विवाहाचा काल अनिश्चितपणें लांबविणें हें मनःस्वास्थ्याला अपायकारक आहे हें तरुणांना व पालकांना जितक्या लवकर उमजेल तितकें इष्ट ठरेल.

विवाहाची पूर्तता अपत्यानें होत असते. त्या अपत्याच्या संगोपनसंवर्धनाची तरतूद करण्याचें एक साधन या दृष्टीनें विवाह संस्थेकडे पहाणें ही मुख्य गोष्ट. सर्व अपत्यांचा सांभाळ करण्याची जोखीम सरकारनें घेण्याची व्यवस्था पुढें मागें कदाचित होईल. तेव्हां तिचा विचार तूर्त आवश्यक नाहीं.

—मौज दिवाळी अंक १९४३.

# घरचे तात्या

१४ तारखेला पहाटे ५ वाजतां * ती. तात्या इहलोक सोडून गेले ही अनपेक्षित वार्ता सकाळीं ९ वाजतां मुंबईस कळली, तेव्हां काय वाटलें असेल तें कोणत्या शब्दांत सांगू ? दोन दिवसापूर्वींचेंच त्यांचें जाहीर व्याख्यान वर्तमानपत्रांत आलें होतें. तें वाचतांना त्यांच्या मृत्यूची वार्ता दुसऱ्याच दिवशीं ऐकावी लागेल याचें स्वप्न तरी कोणास पडलें असेल का ? खुद्द तात्यांना मात्र येणाऱ्या मृत्यूचीं पावलें ऐकूं येऊं लागलीं असावीं. कारण, मृत्यूपूर्वीं कांहीं तास त्यांनीं स्वत: लिहिलेली कविताच त्यांच्या टेबलावर पडलेली होती. कालपुरुष निकट येत चालला आहे हें त्यांना दिसत असावें आणि तो प्रत्यक्ष जवळ येतांच शांत चित्तानें, निर्विकारपणें त्याच्याशीं हस्तांदोलन करीतच ते इहलोकाहून प्रयाण करते झाले असावे. मृत्यूचा मित्रभावानें असा स्वीकार करणारे फारच विरळा !

आणखी दहा पांच वर्षें तरी त्यांना डोळे भरून पाहावयास सांपडेल असें वाटत होतें. पण तें आतां म्हणून काय उपयोग ? आतां नजर पूर्वकालाकडेच वळविली पाहिजे व त्या काळांतील जीं दृश्यें स्मरणचक्षूसमोर येतात तीं पाहूनच समाधान मानून घेतलें पाहिजे. माझी दृष्टि तात्यांच्या घरांतल्या राहणीकडे वळत आहे.

माझे वडील व तात्यांचे वडील मिरजेस नोकरी करीत असत. पुढें तात्यांचे वडील सेवानिवृत्त होऊन पुण्यास तात्यांच्याकडे येऊन राहिले आणि माझ्या वडिलांनीं मिरजेस नोकरींत असतांनाच इहलोक सोडला. नंतर मी नऊ दहा वर्षांचा असतांनाच मिरजेहून तात्यांच्याकडे राहण्यास जो आलों, तो शाळेंतील

---

* कै. न. चिं. केळकर

कॉलेजांतील शिक्षण संपवून नोकरी करण्याकरितां बाहेरगांवीं जाईपर्यंत त्यांच्याच सहवासांत होतों. नंतरहि सामान्यपणें वर्षांतून महिनाभर तरी माझा मुक्काम तात्यांच्या घरीं असेच. मी पुण्यास आलों त्यावेळीं तात्यांनीं सदाशिव पेठेंतील घर विकत घेतलेलें होतें. यापूर्वी ते भाडेकरू म्हणून अन्यत्र राहात असत.

मालकीचें घर झाल्यावर त्यांच्या आवडी स्पष्ट होऊं लागल्या. सदाशिव पेठेंतल्या घरास आंगण मोठें होतें. त्या आंगणांत नाना प्रकारची बाग करण्याची त्यांना फार हौस. दरवर्षी मागच्या वर्षीचें बागेचें स्वरुप पार बदलून माळ्याकडून नवीन स्वरुप निर्माण करावयाचें. नवीं फुलझाडें, नवीं फळझाडें, नव्या पायवाटा, नवे जलप्रवाह हीं त्यांचीं नेहमीं चालू असत. कांहीं वेळां बागेंत बसण्याकरितां पांच-सहा मोठे ओटे बांधलेले असत. घरासमोरचें थोडें पटांगण सोडून बाकीच्यांत मात्र हा बागबगीचा चाले. कारण पटांगणांत रात्रीचे दोन तीन तास मोकळ्या हवेंत घालविल्याशिवाय तात्यांना चैन पडत नसे. पटांगणांत मोठा झोऱ्या अंथरावयाचा व मेणवत्तीचा ( रॉकेलचा वास त्यांना आवडत नसे ) दिवा समोर ठेवून वाचीत बसावयाचें, किंवा पडून वाचावयाचें, किंवा भेटीस आलेल्यांशीं गप्पा मारावयाच्या. अलीकडे म्हातारपणीं कांहीं वर्षे ते दर उन्हाळ्यांत कोकणांत जात व तेथें बंगल्याच्या बाहेर मंडप असे त्यांत अंगांत सदराहि न घालतां खुशाल दिवसभर वारा अंगावर घेत मजेनें बसत.

बागेचें स्वरुप जसें वरच्यावर बदलावयाचें तसें शक्य त्या प्रमाणांत घराचें स्वरुपहि बदलण्याची तात्यांना फार आवड ! नेहमीं येणारा पाहुणा वर्षभरानें पुन्हां आला कीं त्याला घराचें स्वरुप पूर्वीचें कधींच दिसावयाचें नाहीं ! नवा मजला दिसेल, कधीं नव्या खोल्या दिसतील, कधीं नवे जिने दिसतील, कधीं प्रवेशद्वारहि बदललेलें दिसेल. येवढ्यानेंच समाधान न होऊन पहिलें घर सोडून दुसरें घर बांधण्याचाहि उपक्रम सुरू होताच. कांहीं वर्षे सदाशिव पेठेंतल्या घरांत काढल्यावर त्यांनीं तें विकून टाकून टिळक रोडजवळील नवें घर विकत घेतलें. त्या घराचेहि अनेक फेरफार केले. पण तेवढ्यानेंहि समाधान न होतां तें घर सोडून कांहीं वर्षांनीं गांवाबाहेरील सध्यांचा पुष्करणी हा बंगला त्यांनीं बांधला व तेथें ते राहावयास आले. राहावयास आल्यावर त्या बंगल्याचीहि

पुष्कळ उलथापालथ व्हावयाची ती झाली. घराचें नवें काम केव्हां सुरू होईल याचा खुद्द घरांतल्या कोणालाहि पत्ता नसावयाचा. तात्यांच्या मनांत आलें कीं, त्यांच्या ओळखीच्या बांधकामगाराला ते बोलावीत व लगेच बांधकाम सुरू होई. प्रि. तात्यासाहेब गोखले दर वर्षीं पुण्यास तात्यांच्याकडे आले कीं, तात्यांचेंच हें घर ना ? म्हणून हंसून विचारीत ! गोखले स्वतः इंजिनिअर; पण इंजिनिअर झाला तरी आपल्या घराचें स्वरुप दरवर्षीं थोडेंच बदलणार ? पण तात्यांचें सर्वच निराळें !

या तीन इमारतींशिवाय आणखीहि एक बंगला तात्यांनीं बांधला. तो सध्यां सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीकडे आहे. तो बंगला त्यांनीं गांवाबाहेर सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यावरच गांवांत प्लेगचा उपद्रव झाला म्हणजे जाऊन राहण्याकरितां बांधला. मी शाळेंत व कॉलेजांत असतांना पुण्यांत प्लेग दर वर्षींच असे. आज बंगला आहे त्या ठिकाणीं पहिलीं कांहीं वर्षें झोपड्याच असत व प्लेग सुरू झाला म्हणजे आम्ही त्यांतच जाऊन राहात असूं. तात्यांना उघड्या जागेवर बसण्याची हौस. यामुळें या झोपड्यांत राहात असतांना रात्रीं स्वच्छ चांदणें पडलें म्हणजे हवाशीर अंगणांत ते येऊन बसत व सदाशिवराव बापट जवळच राहुटींत राहात असत, त्यांना लेखनास बोलावून कांहीं वेळा रात्रीं बारा वाजेपर्यंत लेख सांगत बसत. जवळच्या सोसायटीच्या बंगल्यांत तात्यांचे मित्र कै. गोपाळ कृष्ण देवधर राहात असत. कांहीं वेळां रात्रीं ते तात्यांच्याकडे येत व दोघांनाही भुइमुगाच्या शेंगा खाण्याची सारखीच आवड असल्यानें समोर परडींतल्या शेंगा सोलून दाणे तोंडांत टाकीत गप्पा मारीत मारीत ते दोघेहि तास दोन तास मजेंत घालवीत.

कांहीं वर्षांनंतर झोपडीच्या ठिकाणीं तात्यांनीं एक लहानसा बंगला बांधला. लहानसा म्हणजे फक्त तीन खोल्यांचा ! कल्पना मनांत आली कीं, लागलीच ती व्यवहारांत उतरावयाचा तात्यांना हव्यास असे. बंगला वाढवावयाची मूळची कल्पना नसल्यानें बंगला बांधला तो अगदीं एका कडेला. पुढें प्रत्यक्ष राहावयाला येण्याचें ठरल्यावर स्वयंपाकघर वगैरे स्वतंत्र असणें जरूर असें प्रथमच सुचूं लागलें, म्हणून मागें जेमतेम चार पांच फूट जागा होती त्यांत

तिन्ही खोल्यांना लागून एक लांबलचक पडवी बांधून काढली. पण तेवढयानें भागेना. मुलांबाळांना स्वतंत्र खोल्या हव्या होत्या. त्या पुढच्या भागांत बांधणें जरूर होतें आणि तेथें तर पुढची जमीन एका बाजूहून दुसऱ्या बाजूपर्यंत दोन तीन फूट उंच होती. जेव्हां ती उंची सर्व खणून काढली तेव्हां पुढचीं मुलांचीं दोन दालनें बांधणें शक्य झालें. असो.

मात्र घरांत तात्यांनीं लक्ष घातलें असेल तर तें फक्त या घरांच्या बांधकामांतच. घरांत भाडेकरी फारसे नसतच. सदाशिव पेठेंतल्या घरांत कांहीं काळ भाडेकरी होते तेवढेच. तात्या घरांत लक्ष घालीत नसत, कारण स्वतःच्या घरांतील व्यवहाराकडे कधींच लक्ष देण्याची त्यांना जरूरीच उत्पन्न झाली नाहीं. बाजारांत जाऊन कधीं एक जिन्नस तरी त्यांनीं विकत घेतला असेल तर शपथ! धोतर, कोट, पगडी वगैरे कपडेहि व्यापारी त्यांना घरीं आणून दाखवीत आणि त्यांतून ते घेत! आणि या गोष्टींत तसें पाहिलें तर वेळ घालविण्यास त्यांना फारशी सवडही नसे. सकाळचे व दुपारचे कांहीं तास केसरी कचेरींत जायचे. घरीं असले तरी कोण ना कोण भेटीस आलें नाहीं असें प्रसंग मला तर आठवतच नाहींत. भेटीस कोणी केव्हां जावें याचा आपल्याकडे कांहीं धरबंधच नाहींसा दिसतो. रात्रीं नऊ दहा वाजतांहि कांहीं लोक भेटीस येत. त्यांत विशेष सांगावयाचें म्हणजे असें कीं दुपारच्या प्रहरीं तात्यांचें लेखन चालूं असतांना अनेकदां लोक भेटीस येत. बाहेरचा कोणी आला कीं तेवढ्यापुरतें लेखन बंद, व तो गेला कीं जेथून सोडलें तेथून पुन्हां सुरू! स्वतः हातानें लिहिण्याचा तात्यांना कंटाळा असे. तोंडानें सांगून दुसऱ्याकडूनच ते बहुधा लिहून घेत. मी कॉलेजांत जाऊं लागल्यापासून मला मोठी सुट्टी असल्यानें तात्यांचे लेख लिहिण्याचें काम मला अनेक वेळां करावे लागे. वरील काम करीत असतां तात्यांच्याकडे कोणी येऊन बोलत बसला म्हणजे हातांत टाक घेऊन स्वस्थ बसण्याचा मला पुष्कळ वेळां कंटाळा येई, व काय लिहिलें तें विसरूनहि जाई. पण तात्यांच्याकडे पाहावें तों भेटीस आलेला माणूस निघून गेला कीं मला शेवटचें वाक्य वाचावयास सांगून जणूं कांहीं सगळा लेख मनांत तयारच आहे अशा रीतीनें पुढचें वाक्य ताबडतोब सांगण्यास ते सुरवात करीत! अलीकडे ते पहाटेसहि लिहीत. ते स्वतःच लिहीत हें सांगावयास नकोच.

तात्यांच्याकडे पाहुणेरावळे येत नसत असा दिवस क्वचितच जाई. टिळक तुरुंगांत असतांना तर महाराष्ट्राबाहेरचे कोणीहि विख्यात थोर पुरुष पुण्यास आले तर त्यांना घरीं जेवावयास बोलावून व त्यांच्या आवडीच्या विषयावर बोलून स्नेह संपादन केल्याशिवाय तात्या कधीं राहात नसत. तात्या अनेक विषयांतील तज्ज्ञांशीं कसे बोलत असतील हें त्यांच्या वाचकांना सांगण्याची जरुरी नाहीं. तात्यांच्याकडे अनेक लोक येत असत तरी त्यांनीं स्वतःच एक ठिकाणीं लिहिल्याप्रमाणें त्यांचा मित्रवर्ग असा फारच थोडा होता. त्यांपैकीं मुद्दाम उल्लेख करण्यासारखे त्यांचे मित्रवर्य म्हणजे सुप्रसिद्ध विनोदी लेखक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे होत. कोल्हटकरांचीं तात्यांना आलेली अनेक पत्रें तात्यांनीं आपल्या पत्रव्यवहारांत छापलेलीं आहेत. त्यावरुन दोघांचा संबंध कसा अगदीं घरोब्याचा होता. हें वाचकांना माहीतच आहे. दरवर्षीं कोल्हटकर उन्हाळ्यांत महिनाभर पुण्यास येऊन राहात. व अनेकवेळां तात्यांच्याकडे येत.

पण त्या भेटीच्यापेक्षांहि साताऱ्यास तात्यांच्याकडे कोल्हटकर आले तो प्रसंग आजहि माझ्या डोळ्यासमोर उभा आहे. तात्यांची कन्या कमलाबाई देशपांडे यांच्या विवाहसमारंभाकरितां तात्या सहकुटुंब साताऱ्यास गेले होते. तेथें समारंभाकरितां व तात्यांना आपलें नवें नाटक वाचून दाखविण्याकरितां कोल्हटकरहि आले होते. पहिल्या दिवशीं लग्नसमारंभ असल्यानें दोघां तात्यांना खाजगी संभाषणास फारसा वावच मिळाला नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं चहा-नंतर दोघेहि तात्या वरच्या मजल्यावर जाऊन बसले. आणि कोल्हटकर पेटी वाजवून आपल्या नाटकांतील पद्यें म्हणण्यांत व दोघेहि तात्या विनोदी हास्यांत इतके रममाण होऊन गेले कीं बारा केव्हां वाजून गेले त्याचें त्यांना भानहि राहिलें नव्हतें. वरच्या मजल्यावर चाललेलें ते त्यांचें हंसणें खिदळणें ऐकून आम्हां खालच्या मजल्यावरील मुलांना काय वाटलें असेल त्याची वाचकांनींच कल्पना करावी. एरवीं पुण्यास तात्यांच्या वरच्या मजल्यावरील खोलींत वाद-विवाद चाललेले आम्हांस नेहमींच ऐकूं येत. पण लहान मुलांप्रमाणें हंसण्या-खिदळण्यांत दंग झालेले दोघे तात्या पाहिल्यावर आम्हांला त्यावेळीं जी गंमत वाटली असेल ती सारी औरच ! बारा वाजल्यावर वर जाऊन मी दारांत उभा राहिलों. तें पाहतांच कोल्हटकर तात्यांना म्हणाले, 'अरे, बारा वाजले कीं

१२।७। ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना

 नवक्रम ५५६२७१ वि: निबंध 

क्र. ३२०२ नों दि २०१३।७१

काय? बाकी आपल्या हंसण्यानींच पोट इतकें तुडुंब भरलें आहे कीं आतां जेवणार तरी काय? पण चला, उठूं या आतां, ' असें म्हणून ते खालीं आले. आणि पुन्हां रात्रीं दोघेजण जे माडीवर जाऊन बसले ते सबंध रात्रभर! त्यांचा गाण्याचा, बोलण्याचा, हंसण्याचा सारखा धिंगाणा खालीं ऐकूं येत होता. पुण्यास कांहीं वेळां या दोघां तात्यांच्या बैठकींत राम गणेश गडकरीहि सामील होत. आणि मग विनोदाच्या आणि शाब्दिक कोट्यांच्या ज्या लाटांवर लाटा उसळत त्यांचें वर्णन करणें कठीण!

तात्यांना गाण्याची, पेटी वाजविण्याची, क्रिकेट खेळण्याची, नदींत पोहण्याची मनापासून फार आवड. पण त्यांचें जीवनच इतकें सार्वजनिक झालें होतें कीं वरीलसारख्या गोष्टींत लक्ष घालण्यास त्यांच्याजवळ वेळच शिल्लक नसे. घरांत पेटी तंबोरा आणून ठेवलेला असावयाचा पण आठवड्यांतून एखादा तासही त्यांत खर्च करण्यास त्यांना सांपडत नसे.

पोहण्याचा हव्यास मात्र प्लेगमध्यें शहराच्या बाहेर आंबराईत राहात असत त्यांना थोडासा पुरविण्यास मिळाला. आंबराईच्या आसपासच्या शेतांत पोहण्या-सारख्या मोठ्या विहिरी बऱ्याच होत्या. आणि प्लेगकरितां आंबराईत राहात असतां या पोहण्याची हौस आंबराईतील सगळेच नागरिक फेडून घेत असत. तात्या आम्हां मुलांनाहि आपल्याबरोबर नेत व पोहणें शिकवीत. आंबराईंत असेपर्यंत हा कार्यक्रम जवळ जवळ रोजच चाले. प्लेगच्या दिवसांत त्यांना भेटावयास येणारांची संख्याही घटे. यामुळें या दिवसांत त्यांना विसावा मिळे, पण विसाव्याचा उपयोग करीत तो मात्र हरतऱ्हेच्या वाचनांत व लेखनांत. शरीर-प्रकृती उत्तम त्यामुळें प्रुफें तपाशीत असतां घरीं पुष्कळ वेळा छातीइतकें उंच एक मेज होतें त्यावर प्रुफें ठेवून उभ्यानेच तास दोन तास प्रुफें तपाशीत. एक वर्षीं तात्या आजारी असल्यानें सिंहगडास जाऊन राहिले होते. पंधरा दिवसांत ते पूर्ण बरे झाले. परत येतांना आम्ही सर्व बैलगाडींतून येत होतों. पण एक दोन मैल गेल्यावर तात्या खालीं उतरले व दहा मैल पायीं चालतच आले. अशी उत्तम देहयष्टी!

तात्यांच्या वडिलांना तात्यांच्या आयुष्यांतील उच्चांक पाहावयास सांपडला नाहीं, पण तात्यांच्या मातोश्रींना मात्र तो पाहाण्याचें भाग्य लाभलें. टिळका

७७३८

तुरुंगांतून सुटून परत आल्यानंतर व्याख्यानाचे कार्यक्रम जवळजवळ रोजच चालत म्हटलें तरी चालेल. व्याख्यानाहून परत येतांना तात्या हातांत हारतुरे घेऊन येत. त्यांची वाट पाहात त्यांच्या मातोश्री नातवंडांना घेऊन दाराशेजारींच बसत. तात्या घरांत आले कीं, आपल्या हातांतला हार ते आईच्या हातांत टाकीत व नातवंडें त्या फुलांशीं खेळून आजूबाजूला फुलें आणि पाकळ्या उधळीत. थोडया वेळाने केरसुणीने तीं साफ करणें हा तात्यांच्या मातोश्रींचा रोजचाच व्यवहार असे आणि तो मोठ्या आनंदानें, अभिमानानें व हंसतमुखानेंच त्या करीत.

म्हातारपणीं केसरीचें संपादकत्व सोडल्यानंतर घरीं ते बराच वेळ घालवीत या वयांत त्यांचीं मुलें मोठीं होऊन नातवंडें, पंतवंडेंहि घरांत खेळूं लागलीं होतीं. पुष्करणीच्या बंगल्यांतील खालच्या मजल्यावरच्या मोठ्या हॉलमध्यें चहा पिण्या-करितां ते येऊन बसले म्हणजे आपल्या मुलांनीं व सुनांनींही आपल्या भोंवती येऊन बसावें व गप्पागोष्टी कराव्या असें तात्यांना वाटे. पण जेथें मुलांनाही थोडा संकोच वाटे तेथें सुना काय गप्पागोष्टी करणार ? पण नातवंडें पणतवंडें मात्र त्यांची ही इच्छा पुरी करीत व त्यांच्या अंगाखांद्यावर लोळण्याची इच्छाही तृप्त करीत. गेलीं वर्ष दोन वर्षं तात्या संध्याकाळीं फारसें बाहेर जात नसत. मुलें, सुना बाहेर गेलेलीं असत. तेव्हां पटांगणांत नातवंडें खेळत असत तीं पाहात बसण्यांतत तात्या व ताई समाधान मानून घेत !

—सह्याद्रि मासिक, नोव्हेंबर १९४७

: सात :

# दोन प्रवासी

'सखा सप्तपदी' हा मंत्र ज्याला स्फुरला तो ऋषि महान् द्रष्टा असला पाहिजे यांत शंका नाहीं. चार घटका एकत्र प्रवास केल्यानें एखादयाचा स्वभाव आणि जीविताकडे पाहण्याची त्याची दृष्टि हीं जशी अचूक लक्षांत येतील, तशी लक्षांत येण्यास एरवीं चार वर्षे पुरणार नाहींत! जीविताला यात्रेची वा प्रवासाची उपमा रूढ होऊन बसली आहे तिचेंही मर्म हेंच असावें. जीवन हा दीर्घ प्रवास असला तर छोट्या प्रवासांत त्याचें प्रतिबिंब उमटावें यांत नवल कसलें? निदान मला तरी याची प्रचीति एकदा चांगलीच आली! म्हणजे अद्‌ल घडली किंवा खिशाला खार लागला म्हणून नाहीं तो प्रसंग माझ्या ध्यानांत ठसलेला. तसें कांहींच झालें नाहीं, किंबहुना मौज हीं कीं प्रसंग असा कांहीं नव्हताच!

आगगाडीच्या प्रवासांत एकदां सहज माझ्या डब्यांत दोन प्रवासी बसले होते. तसें पाहिलें तर चार घटकाही पुऱ्या त्यांच्या सांगातीं मी काढल्या नसतील. एक माझ्या ओळखीचा म्हणून त्याच्याशीं मी दोन शब्द बोललों तरी. दुसऱ्याशीं तर तोंडही उघडलें नाहीं. पण तेवढ्यानें त्या दोघांच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचें मला दर्शन होऊन गेलें. पण अधिक पाल्हाळ कशाला?

त्याचें असें झालें. यशस्वी डॉक्टर या नात्यानें मला नेहमी बाहेर गांवीं बोलावणीं येत. त्या दिवशीं पहाटे भुसावळच्या स्टेशनवर मेलची वाट पाहात मी उभा होतों. दिवस ऐन पौषाचे. थंडी मी म्हणत होती. स्टेशनवर गार झोंबणारा वारा सुटला होता. अंगांत जाड वरकोट होता, तोंडांत लठ्ठ सिगार होता, तरी कुडकुडायची पाळी होती. गाडी स्टेशनमध्यें येतांच हातांतील

हँडबॅग सरसावीत मी तडक समोरच्या सेकंडक्लास डब्यामध्यें शिरलों. समोरच्य बांकावर कोणी तरी निजलेलें असून दिवा मालविलेला होता. मींही दिवा लावला नाहीं. दार बंद केलें, दुसरा सिगार शिलगावला व भपकारे सोडीत बसलों.

लवकरच बाहेर तांबडें फुटलें, व आंत डब्यांतही थोडथोडें दिसूं लागलें. समोरच्या बांकावर पाहतों तों कोणी तरी करवतकांठीं उपरणें पांघरून घेऊन निजले होते. डोक्याशीं बांधलेला होल्डऑल तसाच विनउलगडलेला होता, व त्यावर पगडी ठेवलेली होती. थंडीनें कुडकुडल्यामुळें गृहस्थानें पाय पोटाशीं घेतले होते.

आतां स्वच्छ दिसूं लागलें होतें. होल्डऑलवरील पगडीचा हिरवा रंग पाहतांच मला एकदम आठवण झाली व माझ्या तोंडून एकदम उद्गार निघाले, 'अरे, रावसाहेब रुद्राक्ष तर नव्हेत ?'

रावसाहेब अर्धवट जागेच असावे. माझे शब्द ऐकतांच ते उठून बसले. नमस्कार-चमत्कार झाला. "आज भारीच थंडी आहे, नाहीं डॉक्टर ?" उपरण्याची टापशी बांधत रावसाहेब म्हणाले.

"भारीच; मी तरी अशी कधीं पाहिली नव्हती बोवा ! पण रावसाहेब, आपल्याला पुढल्याच स्टेशनवर उतरायचं वाटतं ?" बांधलेल्या होल्डॉलकडे पाहात मी म्हणालों.

"तें कां म्हणून ? कलकत्त्यालाच निघालों आहे कीं मी."

"मग मागच्या स्टेशनवरच बसलात कीं काय ?"

"तसं नव्हे ! काल रात्रीं मुंबईहूनच निघालों. सनातन वर्णाश्रम संघाची परिषद होती, ती आटोपली आणि रात्रींच निघालों."

मी नुसता रावसाहेबांच्या बिनसोडलेल्या होल्डॉलकडे पाहातच राहिलों. गृहस्थ चांगला सेकंड क्लासमध्यें बसला आहे, बरोबर बिस्तरा घेतला आहे, पण तो न सोडतां सबंध रात्र उपरणें पांघरून पाय पोटाशीं घेऊन काढली. फुटूं येणारें हसूं लपविण्याकरितां मी पुन्हां माझा सिगार शिलगावला. पण रावसाहेबांच्या न सोडलेल्या होल्डॉलकडची माझी नजर दुसरीकडे जाईना.

माझी नजर ओळखून रावसाहेबच म्हणाले, "बिस्तरा नाहीं सोडला झालं ! हो सोडा आणि पुन्हा बांधा, हवी कशाला कटकट !"

" कां ? आज विठू गडी नाहीं वाटतं बरोबर ? "

" विठू आहे कीं ! पण असं काय आपल्याला महिनाभर गाडींत बसायचं आहे ? दोन रात्री तर अवध्या काढायच्या ! "

यावर काय बोलणार ? हसूं येत असलेलें दिसूं नये म्हणून खिडकींतून मी बाहेर पाहूं लागलों. सूर्याचीं कोवळीं किरणें आतां बाहेर फांकलीं होतीं व धुक्याची पांढरी शुभ्र उबदार दुलई सृष्टि हलक्या हातानें हळूहळू सारीत होती. पहातां पहातां गाडी पुढील स्टेशनवर थांबली आणि एक वृद्ध, तोंडाला सुरकुत्या पडलेली अशी एक युरोपियन स्त्री आमच्याच डब्याकडे येऊं लागली. तिच्या एका हातांतील मनगटावरून एक काळी कातडी पिशवी लोंबत होती व दुसऱ्या हातांत पायांशीं घुटमळणाऱ्या दोन काळ्या कुलुंगी कुत्र्यांची सांखळी धरलेली होती. बाई आंत येऊन बसली आणि मांडीवर त्या दोन कुत्र्यांना बसवून त्यांना कुरवाळूं लागली. मागून हमाल सामान आणीतच होता. एक मोठा होल्डऑल, दोन सुटकेसिस, दोन लहान हँडबॅगा, एक लाकडी चौकटींत बसविलेला पाण्याचा कुजा, एक टेनिसची रॅकेट वगैरे सामान हमाल रचीत असतां वर्तमानपत्राचा पोऱ्या आला. त्याच्याकडून दोन वर्तमानपत्रें व तीन मासिकें बाईनें विकत घेतलीं. गाडी सुरू होतांच बाईनें आपली हँडबॅग उघडली आणि चष्मा डोळ्याला चढविला व आंतील विणकाम काढून विणण्यास सुरवात केली !

मला वाटलें बाई चांगल्या लांबच्या प्रवासाला निघालेली असावी; पण समोरच्या सूटकेसवर तिचा पत्ता लिहिलेला होता तो पाहतों तों तिला फक्त इटारसीपर्यंतच जावयाचें होतें. म्हणजे कांहीं तासांचाच प्रवास करावयाचा होता. हा विचार मनांत येतांच मी तिच्या सामानाकडे, शेजारीं पडलेल्या मासिकांकडे, हातांतील विणकामाकडे आणि मांडीवर खेळणाऱ्या कुत्र्यांकडे नुसता पाहतच राहिलों !

थोड्या वेळानें माझी नजर पुन्हा पलीकडच्या बाकाकडे वळली आणि दोन रात्रींचा प्रवास नुसता होल्डऑल व हिरवी पगडी यांच्या सहाय्यानें, आणि तोही मिरचीकडे नुसतें पाहून जेवणाऱ्या मारवाड्याप्रमाणें होल्डऑल नुसता

साथीला ठेवून प्रवास करणाऱ्या रावसाहेबांकडे पाहून माझ्या मनांत विचारांची नुसती गर्दी उसळली.

माझ्या शेजारीं दोन बांकांवर बसलेल्या ह्या दोन व्यक्ति म्हणजे जीविताकडे पाहणाऱ्या दृष्टीच्या दोन मूर्तीच जणूं! एकाला आयुष्यांत मिळालेला शंभर वर्षांचा काल हाही धर्मशाळेंत घटकाभर काढण्याइतका कसा तरी ढकलायचा काल, तर दुसऱ्याला मिळालेला प्रत्येक क्षण म्हणजे उद्योगाला आणि उत्साहाला उत्तेजन देणारें जणूं आव्हानच !

थोडयाच वेळांत माझें स्टेशन आल्यानें अधिक विचार करायला मला वेळच मिळाला नाहीं; पण त्या दिवशीं गाडींत पाहिलेल्या त्या दोन चित्रांचा ठसा माझ्या मनावर इतका खोल उठलेला आहे कीं आज त्या गोष्टीला पंधरा वर्षें होऊन गेली तरी तो जणूं काल उठावा तसा ठसठशीत आहे !

—रामनारायण रुइया कॉलेज वार्षिक १९४०

# श्रेष्ठ वाङ्मय कसें निर्माण होईल ?

"पैशानें उत्कृष्ट साहित्य निर्माण करतां येतें काय ?" *हा प्रश्न "खतानें उत्तम पीक काढतां येतें काय ?" या प्रश्नासारखा आहे. पैशाचें आणि साहित्याचें नातें खताच्या आणि पिकाच्या नात्याच्या जातीचें आहे. खतानें पीक फोफावून येण्यास उत्तम मदत होईल; पण पीक कोणत्या जातीचें आणि दर्जाचें निघेल हें नुसत्या खतावरून ठरणार नाहीं; तर जें बी पेरलें असेल त्याच्या पिंडगत गुणावरून तें ठरणार आहे. या पिंडगत गुणाच्या आविष्काराला योग्य सामुग्री पुरविणें हें खताचें काम. पिंडगत गुणामध्यें बदल करण्याचा मगदूर खतामध्यें नाहीं. हाच दृष्टान्त वाङ्मयनिष्पत्ति व पैसा यांचा आहे. पैसा म्हणजे सुखसोयी, साधनसामुग्री व स्वास्थ्य हीं मिळविण्याचें साधन. पण अशीं साधनें कितीहि पुरविलीं तरी ज्याला मूळचें लेखनकलेचें देणें नाहीं व ज्याची त्या देण्यावर परिश्रमपूर्वक व्यासंग करण्याची तळमळ व तयारी नाहीं, त्याच्या हातून उत्कृष्ट वाङ्मय निर्माण होईल ही आशा निराशाच पदरांत टाकील. मोठमोठ्या बक्षिसांची जाहिरात देऊन ग्रंथ मागविण्यांत येत असलेले आपण पाहतों. पण जाहिरातीबरहुकूम लिहिलेले ग्रंथ वरिष्ठ दर्जाचे उतरत नाहींत असाच सामान्य अनुभव नाहीं कां ? याचें कारण उत्कृष्ट ग्रंथ निर्माण होण्याचें आद्य कारण ग्रंथकाराची बुद्धिमत्ता हीच होय. पण त्या बुद्धीचा

---

* हा प्रश्न मनोहर मासिकानें अनेक साहित्यिकांपुढें मांडला होता व त्यांचे उत्तरात्मक लेख छापले होते. वरील लेख हा शेवटचा लेख होय.

विकास होण्यास पैशाची म्हणजेच सुखसोयीची व साधनसामुग्रीची मदत होत नाहीं असें मानणें मात्र चुकीचें होईल.

या ठिकाणीं मराठी संतकवींची आठवण साहजिकच होईल. कोणत्याहि सरदारदरकदाराच्या आश्रयाची अपेक्षा न करतां केवळ आत्मोद्धाराच्या आणि लोकोद्धाराच्या भावनेनें प्रेरित होऊन या संतांनीं अव्वल दर्जाचें वाङ्मय निर्माण केलें पण ते निष्कांचन होते म्हणून त्यांच्या हातून कांचनमय वाङ्मय निर्माण झालें अशांतला भाग नाहीं किंवा ते संत होते म्हणून सर्वोत्कृष्ट कवि झाले असेंहि नाहीं. संतपणाच्या सहचर्यानें कवित्व येतें तर सर्वच संत अव्वल दर्जाचे कवि झाले असते. पुष्कळांनीं काव्यें रचिलीं, पण ज्ञानेश्वर तुकारामाची उंची इतरांना कशी गाठतां येणार ?

उत्कृष्ट वाङ्मयाला अवश्य असणाऱ्या गुणांपैकीं एक गुण संतवृत्ति ही पुरवूं शकते. तो म्हणजे तळमळ, निष्टा, श्रद्धा हा होय. पण तेवढ्या एका गुणावर कांहीं उत्कृष्ट वाङ्मय निर्माण होऊं शकत नाहीं. तें निर्माण होण्याला लेखनांतील कलात्मक दृष्टि असावी लागते.

दुसरें म्हणजे हे संतकवि अकिंचन वृत्तीनें राहात त्यामुळें त्यांची प्रतिभा अधिक तेजाळ झाली असें म्हणणेंहि गैर ठरेल. ते निष्कांचन होते कीं लक्ष्मीवंत होते हा मुद्दा संतकवींसंबंधीं गौण असून त्यांच्या ठिकाणीं तळमळ आणि जिव्हाळा होता हा मुद्दा अधिक महत्त्वाचा होय. निष्कांचनत्वाच्या बाबतींत हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जनतेंत धार्मिक श्रद्धा जागृत असल्यानें संतकवींच्या चरितार्थाची काळजी घेणारा शिष्यवृंद तयार असे. त्यांच्या गरजा अत्यल्प असत आणि त्या सहज भागविल्या जात. त्यांचें अभंग वाङ्मय भावगीतात्मक असल्यानें त्याला अध्ययनाचीहि गरज बेताची असून मुख्य भांडवल अंतरींचा जिव्हाळा हें असे.

या संतकवींच्या उदाहरणावरून निष्कांचन वृत्तींतच प्रतिभा उत्तम फुलते असें अनुमान बांधणें जितकें असमंजसपणाचें होईल, तितकेंच उत्कृष्ट वाङ्मयाच्या निर्मितीला पैशाची मदत होणार नाहीं असें अनुमान बांधणेंही गैर ठरेल. पैसा म्हणजे स्वास्थ्य आणि सुखसोयी मिळविण्याचें साधन. ही साधनसंपत्ति अनु-

कूल असेल तर ज्याच्यावर प्रतिभेचा वरदहस्त आहे त्याच्या हातून अधिक विपुल असें वाङ्मय निर्माण होण्यास मदत झाल्याविना राहणार नाहीं. सांपत्तिक स्थिति अगदींच निकृष्ट असेल तर लेखकाची बरीचशी शक्ति जीवन नुसतें टिकवून धरण्यांतच खर्चीं पडेल. तशी ती पडणें हें श्रेष्ठ वाङ्मयाच्या निष्पत्तीला उपकारक नाहीं. अशाही स्थितींत एखादी प्रतिभा चमकल्याशिवाय राहात नाहीं. पण तो अपवाद होय.

पैशाला वर खताची उपमा दिली. त्या उपमेवरून अशी एक शंका सुचेल कीं वाजवीपेक्षां जास्त खत घातल्यानें पीक पुष्कळ येतें, पण तें फोफसें असतें; तसें पैसा मिळत गेल्यानें वाङ्मय वृद्धिंगत होईल, पण त्याचा कस वाढणार नाहीं असें नाहीं का होणार ? प्रकाशक पानांच्या संख्येवर पैसे मोजूं लागला म्हणजे पानांची संख्या वाढविण्याचा मोह लेखकाला पडणें अशक्य नाहीं हें सांगावयास नकोच. पण हा मोह उत्कृष्ट लेखकाला भुलवूं शकणार नाहीं. कांहीं लेखन जीविकेकरितांच केलें जातें तेथें हा प्रश्न उद्‌भवेल. तसेंच तेथें अभिरुचि थोडी खालावूनहि दोन पैसे मिळविण्याचा मोह पडण्याचा संभव असतो. पण उत्कृष्ट लेखनाच्या वाटेस हे मोह जाऊं शकत नाहींत. उलट दोन पैसे जास्त मिळाल्यामुळें जें स्वास्थ्य मिळेल तें स्वास्थ्य व्यासंग वाढविण्यांत तो खर्चीं घालील.

जेथें व्यासंगाची विशेष आवश्यकता असते अशा संशोधनात्मक लेखनास मात्र पैशाची मदत स्पष्ट होत असते. ज्ञानकोश खपविण्याकरितां केतकरांना जी पायपीट करावी लागली ती न लागती, तर केतकरांच्या हातून वाङ्मयांत अधिक भर खास पडती. नुसत्या पैशानें मात्र ज्ञानकोशासारखें काम होणार नाहीं. केतकरांच्यासारखा दुर्लभ योजक हा पाहिजेच. उत्कृष्ट लेखन हें हुकुमी केव्हांहि कोणीहि निर्माण करूं शकणार नाहीं. केवढीहि मोठी रकम खर्च करण्यास तयार झालांत तरी गीतारहस्य तुम्हांला लिहून घेतां येणार नाहीं. त्याला टिळकच जन्मास यावे लागतात. पण टिळकांनाहि सतत पांचसहा वर्षें तुरुंगातलें स्वास्थ्य न मिळतें व वाटेल तितके ग्रंथ विकत घेण्याची अनुकूलता नसती तर गीतारहस्य सध्यांच्या स्वरुपांत अवतीर्ण झालें असतें कीं नाहीं याची शंकाच आहे. अर्थात् लेखकाला स्वास्थ्य आणि साधनें मिळवून देणें हें जनतेचें कर्तव्य आहे हें तिनें विसरून चालणार नाहीं.

विकास होण्यास पैशाची म्हणजेच सुखसोयींची व साधनसामुग्रीची मदत होत नाहीं असें मानणें मात्र चुकीचें होईल.

या ठिकाणीं मराठी संतकवींची आठवण साहजिकच होईल. कोणत्याहि सरदारदरकदाराच्या आश्रयाची अपेक्षा न करतां केवळ आत्मोद्धाराच्या आणि लोकोद्धाराच्या भावनेनें प्रेरित होऊन या संतांनीं अव्वल दर्जाचें वाङ्मय निर्माण केलें पण ते निष्कांचन होते म्हणून त्यांच्या हातून कांचनमय वाङ्मय निर्माण झालें अशांतला भाग नाहीं किंवा ते संत होते म्हणून सर्वोत्कृष्ट कवि झाले असेंहि नाहीं. संतपणाच्या सहचर्यानें कवित्व येतें तर सर्वच संत अव्वल दर्जाचे कवि झाले असते. पुष्कळांनीं काव्यें रचिलीं, पण ज्ञानेश्वर तुकारामाची उंची इतरांना कशी गाठतां येणार ?

उत्कृष्ट वाङ्मयाला अवश्य असणाऱ्या गुणांपैकीं एक गुण संतवृत्ति ही पुरवूं शकते. तो म्हणजे तळमळ, निष्ठा, श्रद्धा हा होय. पण तेवढ्या एका गुणावर कांहीं उत्कृष्ट वाङ्मय निर्माण होऊं शकत नाहीं. तें निर्माण होण्याला लेखनांतील कलात्मक दृष्टि असावी लागते.

दुसरें म्हणजे हे संतकवि अकिंचन वृत्तीनें राहात त्यामुळें त्यांची प्रतिभा अधिक तेजाळ झाली असें म्हणणेंहि गैर ठरेल. ते निष्कांचन होते कीं लक्ष्मीवंत होते हा मुद्दा संतकवींसंबंधीं गौण असून त्यांच्या ठिकाणीं तळमळ आणि जिव्हाळा होता हा मुद्दा अधिक महत्त्वाचा होय. निष्कांचनत्वाच्या बाबतींत हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जनतेंत धार्मिक श्रद्धा जागृत असल्यानें संतकवींच्या चरितार्थाची काळजी घेणारा शिष्यवृंद तयार असे. त्यांच्या गरजा अत्यल्प असत आणि त्या सहज भागविल्या जात. त्यांचें अभंग वाङ्मय भावगीतात्मक असल्यानें त्याला अध्ययनाचीहि गरज बेताची असून मुख्य भांडवल अंतरींचा जिव्हाळा हें असे.

या संतकवींच्या उदाहरणावरून निष्कांचन वृत्तींतच प्रतिभा उत्तम फुलते असें अनुमान बांधणें जितकें असमंजसपणाचें होईल, तितकेंच उत्कृष्ट वाङ्मयाच्या निर्मितीला पैशाची मदत होणार नाहीं असें अनुमान बांधणेंही गैर ठरेल. पैसा म्हणजे स्वास्थ्य आणि सुखसोयी मिळविण्याचें साधन. ही साधनसंपत्ति अनु-

कूल असेल तर ज्याच्यावर प्रतिभेचा वरदहस्त आहे त्याच्या हातून अधिक विपुल असें वाङ्मय निर्माण होण्यास मदत झाल्याविना राहणार नाहीं. सांपत्तिक स्थिति अगदींच निकृष्ट असेल तर लेखकाची बरीचशी शक्ति जीवन नुसतें टिकवून धरण्यांतच खर्चा पडेल. तशी ती पडणें हें श्रेष्ठ वाङ्मयाच्या निष्पत्तीला उपकारक नाहीं. अशाही स्थितींत एखादी प्रतिभा चमकल्याशिवाय राहात नाहीं. पण तो अपवाद होय.

पैशाला वर खताची उपमा दिली. त्या उपमेवरून अशी एक शंका सुचेल कीं वाजवीपेक्षां जास्त खत घातल्यानें पीक पुष्कळ येतें, पण तें फोकसें असतें; तसें पैसा मिळत गेल्यानें वाङ्मय वृद्धिंगत होईल, पण त्याचा कस वाढणार नाहीं असें नाहीं का होणार ? प्रकाशक पानांच्या संख्येवर पैसे मोजूं लागला म्हणजे पानांची संख्या वाढविण्याचा मोह लेखकाला पडणें अशक्य नाहीं हें सांगावयास नकोच. पण हा मोह उत्कृष्ट लेखकाला भुलवूं शकणार नाहीं. कांहीं लेखन जीविकेकरितांच केलें जातें तेथें हा प्रश्न उद्भवेल. तसेंच तेथें अभिरुचि थोडी खालावूनहि दोन पैसे मिळविण्याचा मोह पडण्याचा संभव असतो. पण उत्कृष्ट लेखनाच्या वाटेस हे मोह जाऊं शकत नाहींत. उलट दोन पैसे जास्त मिळाल्यामुळें जें स्वास्थ्य मिळेल तें स्वास्थ्य व्यासंग वाढविण्यांत तो खर्चीं घालील.

जेथें व्यासंगाची विशेष आवश्यकता असते अशा संशोधनात्मक लेखनास मात्र पैशाची मदत स्पष्ट होत असते. ज्ञानकोश खपविण्याकरितां केतकरांना जी पायपीट करावी लागली ती न लागती, तर केतकरांच्या हातून वाङ्मयांत अधिक भर खास पडती. नुसत्या पैशानें मात्र ज्ञानकोशासारखें काम होणार नाहीं. केतकरांच्यासारखा दुर्लभ योजक हा पाहिजेच. उत्कृष्ट लेखन हें हुकुमी केव्हांहि कोणीहि निर्माण करूं शकणार नाहीं. केवढीहि मोठी रकम खर्च करण्यास तयार झालांत तरी गीतारहस्य तुम्हांला लिहून घेतां येणार नाहीं. त्याला टिळकच जन्मास यावे लागतात. पण टिळकांनाहि सतत पांचसहा वर्षे तुरुंगातलें स्वास्थ्य न मिळतें व वाटेल तितके ग्रंथ विकत घेण्याची अनुकूलता नसती तर गीतारहस्य सध्यांच्या स्वरुपांत अवतीर्ण झालें असतें कीं नाहीं याची शंकाच आहे. अर्थात् लेखकाला स्वास्थ्य आणि साधनें मिळवून देणें हें जनतेचें कर्तव्य आहे हें तिनें विसरून चालणार नाहीं.

श्रेष्ठ लेखनाला जितका आश्रय आज मिळतो आहे, त्याच्यापेक्षां पुष्कळ अधिक मिळणें अवश्य आहे हेंहि स्पष्ट म्हटलें पाहिजे. या बाबतींत मध्यम वर्गाचा आश्रय जितका मिळतो तितका ऐपतदारांचा मिळत नाहीं हा अनुभव ऐपतदारांना फारसा भूषणावह नाहीं. घरामध्यें आवश्यक असणाऱ्या वस्तूंमध्यें नामवंत पुस्तकांचा संग्रह ही एक अभिमानास्पद व आवश्यक वस्तू होय अशा प्रकारची परंपरा आपणांस रुजलेली नाहीं. महिना सात–आठशें रुपये प्राप्ति असणाऱ्या सुखवस्तु गृहस्थाच्या दिवाणखान्यांत खुर्च्या, कोचे, विजेचे पंखे, शोभिवंत वस्तूंनीं भरलेलें एखादें कपाट, रेडिओ वगैरेंपैकीं कांहीं कमी असेल तर मालकाला कमीपणा वाटतो. पण गीतारहस्य, ज्ञानकोश, समग्र केळकर, आपट्यांच्या कादंबऱ्यांचा संच वगैरेंसारख्यांपैकीं कांहीं संग्रहित नाहीं हें सांगण्यांत कमीपणा वाटत नाहीं. तो वाटेल अशी सामाजिक रूढि पडली पाहिजे. ती पडल्यानें चांगल्या वाङ्मयाच्या अभिवृद्धींत भर पडण्यास मदत होईल. एवढें वाचकवर्गाला खास करतां येण्यासारखें आहे. तें त्यानें करीत राहावें. त्याच्या दृष्टीनें भारदस्त व प्रतिष्ठित असणाऱ्या वाङ्मयाला त्यानें आश्रय देत असावें. श्रेष्ठ वाङ्मय निपजण्यास श्रेष्ठ लेखक निपजावा लागतो तो कसा व केव्हां निपजेल हें कोण सांगणार ? पण जो या दर्जाचा असेल त्याला अनुकूल व उत्साहवर्धक वातावरण आपण वाचकांनीं निर्माण केलें पाहिजे. श्रेष्ठ वाङ्मय निर्माण कसें होईल याची चिंता वाहणाऱ्या आपणां वाचकांच्या हातीं येवढाच उपाय आहे. *

—मनोहर, जून १९४५

* या निबंधाचें भाषांतर कांहीं हिंदी व गुजराती वृत्तपत्रांनींही छापलें होतें.

# कलेंतील चंचल अंश

कलेचें क्षेत्र हें जीवनाच्या क्षेत्रापासून आणि सामाजिक जीवनास सुसंगत करूं पाहाणाऱ्या नीतिनियमांच्या क्षेत्रापासून स्वतंत्र व अलग होय असा पक्ष मांडतांना ज्या युक्तिवादांचा अवलंब करण्यांत येतो त्यांपैकीं एक युक्तिवाद असा कीं, नीति ही चंचल, परिस्थितिसापेक्ष, परिवर्तनशील असून कला ही स्थाणु, स्थिर व परिस्थितिनिरपेक्ष असते हा होय.

कला आणि नीति या दोन्हींचेंहि आवाहन मानवी जीवनालाच आहे. नीति ही सामाजिक जीवनांतील संघर्ष दूर करून सुसंगतीचा आनंद व्यक्तिमात्रास प्राप्त करून देऊं इच्छिते. तर कला ही जीवनाची वास्तववादी व ध्येयवादी अशीं चित्रें रेखाटीत असते. दोहोंनाही मानवी जीवन हें अधिक सुसंगत, अधिक व्यापक, अधिक सुखकारक करावयाचें असतें. अर्थात् नीतीचा जीवनाशीं जसा संबंध आहे तसा कलेचाही जीवनाशीं आहे. यामुळें मानवी जीवनाचीच हीं दोन्हीं अंगें असल्यानें तीं सर्वस्वीं परस्पर असंबद्ध असणें संभवत नाहीं.

मग दोन्हीं क्षेत्रें अलग मानण्याचा मोह कां होतो ? तर काल्पनिक जीवन आणि व्यवहारिक जीवन हीं सर्वस्वीं भिन्न आहेत ही समजूत आपली झालेली असते म्हणून. नीतीचें क्षेत्र हें व्यावहारिक, सामाजिक जीवनाचें व कलेचें क्षेत्र हें काल्पनिक जीवनाचें हें खरें. पण काल्पनिक जीवन हें व्यावहारिक जीवनापेक्षां सर्वस्वीं भिन्न असतें असें नव्हे. काल्पनिकाचें क्षेत्र म्हणून स्वर्गाचीं जीं चित्रें कवींनीं रेखाटलीं आहेत त्याचें उदाहरण घेऊं. या स्वर्गांत कधीं दुष्काळ नाहीं, रोगराई नाहीं, वार्धक्य नाहीं, मरण नाहीं, अंधार नाहीं ( देवांची

सावली पडत नाहीं म्हणे. ), अज्ञान नाहीं, गुरुत्वाकर्षणादि नियतीचीं बंधनें नाहींत व अप्सरासमागमामुळें नीतीची बंधनें नाहींत—असा हा स्वर्ग होय ! व्यावहारिक जीवनापेक्षां हें काल्पनिक जीवन सर्वस्वीं भिन्न दिसतें. पण हें सुचलें कसें ? तर व्यावहारिक जीवनावरूनच स्वतंत्रपणें नव्हे. व्यावहारिक जीवनांत ज्या हालअपेष्टा प्रत्यक्ष अनुभविल्या त्यापासून जेथें सुटका होईल तो स्वर्ग, असें हें स्वर्गाचें काल्पनिक जीवन रेखाटलें आहे. आणि तें रेखाटण्याची स्फूर्ति ही असलें जीवन इहलोकीं या देहीं जगतां येणार नाहीं म्हणून कल्पनेनें तरी जगूं या, या विचारांतून उत्पन्न झालेली आहे. पण इहलोकीं आनंदी जीवन जगण्याची अशक्यता जसजशी घटत जाईल व निसर्गाचें हृद्गत हस्तगत करून दुष्काळ, रोगराई, अज्ञान ह्यांवर विजय मिळवितां येईल तसतसें या स्वर्गाच्या काल्पनिक चित्राचें आकर्षण कमी होत जाईल.

काल्पनिकांत रंगण्याची प्रवृत्तीच कमी होईल असें नव्हे. आज असाध्य वाटणाऱ्या गोष्टी उद्या पदरांत पडल्या तरी कल्पनाशक्ति ही त्यांच्याही पुढें नेहमीं धांव घेत राहणारच. ही कल्पना विलासाची **प्रवृत्ति** हा कलेचा चिरंतन अंश होय. पण कसल्या कल्पनेंत रंगणार हें सामाजिक परिस्थितीनुसार ठरत असल्यानें कल्पनेचा **विषय** हा कलेचा परिवर्तनशील असा अंश होय.

नीतीचेंही असेंच आहे. सर्वांना सुख मिळावें, सर्वांचें कल्याण व्हावें, म्हणून त्याग आणि संयम यांची जोपासना ही नीतीची मध्यवर्ति कल्पना. ती सामाजिक जीवन अस्तित्वांत आल्यापासून आजतागायत हजारों वर्षें कायम आहे. हा नीतिनियमाचा चिरंतन अंश होय. पण सर्वांचें जीवन सुखमय व्हावें या संकल्पांत ' सर्वांचें ' म्हणजे कोणाचें आणि किती जणांचें या विषयाच्या कल्पना बदलत आलेल्या आहेत. ज्याच्या हातीं सत्ता असते तो ह्या ' सर्व '; ची व्याप्ति स्वतःच्या वर्गापुरती मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न करितो आणि त्याला प्रतिकार करण्याचें सामर्थ्य इतरांना नसल्यामुळें सत्ताधिष्ठित वर्गांतील सर्वांचें सुख ज्येणेंकरून साधेल तेच नीतिनियम रूढ होऊन बसतात. अरिस्टॉटलच्या वेळीं सर्वांचे सुख या शब्दसंहतीमधील 'सर्व' मध्यें गुलामांचा समावेश होत नव्हता. ज्या समाजांत स्त्रियांना स्वातंत्र्य नाहीं त्या समाजांत सर्वांचें सुख म्हणजे सर्व

पुरुषवर्गाचें सुख हाच अर्थ रूढ होतो. पण प्रतिकाराचें सामर्थ्य दलित वर्गामध्यें जसजसें वाढत जातें तसतशी सर्व या शब्दाची व्याप्ति वाढत जाते. हा नीतीचा परिवर्तनशील असा अंश होय.

कलेचींही अशींच दोन अंगें आहेत. कल्पनेचा आनंद लुटण्याची प्रवृत्ति व त्या आनंदाचें प्राथमिक घटक जे सुसंगति, कलाटणी वगैरे, ते कलेचे चिरंतन अंश होत. पण कल्पनेचा विषय हा मात्र परिस्थिति सापेक्ष असा परिवर्तनशील अंश होय.

तो परिवर्तनशील कसा आहे हें उदाहरणानें पाहूं. भावसौंदर्य, रूपसौंदर्य हीं दोन्ही रेखाटण्याचा कला प्रयत्न करीत असते. ( कुरूपतेचेंही यथातथ्य वर्णन करण्यांत जें कौशल्य लागतें त्या कौशल्यांतही सौंदर्यप्रतीति होत असतेच. ) हें भावसौंदर्य व रूपसौंदर्य यांच्या कल्पना स्थलकालपरत्वें भिन्न भिन्न आढळतात. भावसौंदर्याचें बदलतें स्वरुप लक्षांत येण्याकरितां शृंगार, हास्य, बीभत्स या भावनांचे विषय बदलत आले आहेत हें पाहिलें म्हणजे पुरे. स्त्रीपुरुषांना परस्परांविषयीं वाटणारें आकर्षण हा शृंगाराचा पाया. या आकर्षणांत परस्परांच्या शारीरिक सौंदर्यावर प्राचीन काळीं भर असे. आजच्या कालांत शारीरिक आकर्षण कमजोर झालें नसलें तरी त्याच्या जोडीला बौद्धिक आकर्षणही आवश्यक होत चाललें आहे. स्त्रीला जोपर्यंत स्वातंत्र्य नव्हतें व ती भोग्यवस्तू म्हणूनच लेखली जाई तोंपर्यंत बौद्धिक आकर्षणाचें क्षेत्र अगदीं मर्यादित असलें पाहिजे. म्हणून राजदरबारीं वावरणाऱ्या संस्कृत कवींच्य काव्यांत शृंगारांचें आलंबन प्रामुख्यानें शारीरिक सौंदर्य हेंच असे.

हास्याच्या भावनेचाही विषय बदलत आला आहे. दलित वर्गाला जोंपर्यंत समाजांत महत्त्व नव्हतें तोंपर्यंत त्यांचीं दुःखें व आपत्ति हीं थट्टेचा व हास्याच विषय होता. दलितांच्याकडे पहाण्याचा दृष्टिकोन जसा बदलत गेला तसा त्यांचीं दुःखें हा सहानुभूतीचा विषय बनला. तसेंच बीभत्स भावनेचें. पूर्व काळीं ज्या गोष्टी बीभत्स वाटत नसत त्या आतां वाटूं लागल्या आहेत. भीम हा दुःशासनाची छाती फोडून त्याचें ताजें रक्त घटाघटां पितो आहे हें वर्णन पूर्वकालीं वीररसाला पोषक म्हणून उत्तेजक वाटत असेल, पण आजच्या वाचकाला तें बीभत्स वाटणार नाहीं का ?

या सर्व ठिकाणीं पूर्वीं ज्या विषयांना अनुलक्षून भाव उद्दीपित होत असत त्या विषयांत फरक पडलेला आहे व त्यामुळें मूळ उपजत प्रेरणा व भावना कायम असल्या तरी त्यांचें रूप बदलत चाललें आहे. **उपजत प्रेरणा व भावना यांना नवें रूप देणें यांतच मानवाचें मानवत्व आहे.** क्रोध ही उपजत भावना असली तरी सात्विक क्रोध हें तिचें स्वरुप उपजत नव्हे. तें मानवानें बुद्धिपुरस्सर तिला दिलेलें आहे व तें समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीनें उपकारक म्हणून दिलेलें आहे. माणसाच्या आवडीनिवडी परिस्थिती-प्रमाणें बदलत आल्या आहेत व त्याप्रमाणें कलेचे विषय बदलत आलेले आहेत.

कलेच्या दृष्टीनें विषयांना महत्त्व नसून त्याच्या आविष्काराला, सजावटीला, मांडणीलाच सर्वस्वीं महत्त्व आहे असें म्हणणेंही योग्य नव्हे. तसें असतें तर विषय बदलण्याचें तरी कारण काय होतें ? कलेचा उपभोक्ता जर अविष्काराच्यां कौशल्याखेरीज इतर कांहीं पाहणार नसेल, विषय कोणता आहे याची फिकीर करणार नसेल तर देवादिकांच्या कथा रंगविण्याऐवजीं मानवी कथा रंगविणें, अद्भुतापेक्षां वास्तवतेवर भर देणें, नियतीशीं कराव्या लागणाऱ्या कलहापासून सामाजिक कलहाकडे आणि सामाजिक कलहाकडून अन्तःप्रवृत्तींतील कलहाकडे आधुनिक कला वळत चालली आहे असें जें म्हटलें जात आहे त्याला कांहीं अर्थच नाहीं असें होईल. यामुळें विषयाचें बदलत जाणारें रूप हा कलेचा चंचल अंश होय असें निष्पन्न होतें. मात्र चंचल शब्द येथें चांगल्या अर्थी म्हणजे विकासशील या अर्थानें योजिला आहे हें मुद्दाम सांगावयास पाहिजे. नाहींतर चंचल म्हणजे कमकुवत असा अर्थ सुचेल. पण तो येथें अभिप्रेत नाहीं हें वाच-कांनीं विसरूं नये.

भावसौंदर्यापेक्षां रूपसौंदर्यांतच चंचलपणा अधिक दिसून येतो. स्थलकाल-परत्वें सौंदर्याच्या कल्पनांनीं भिन्नरूपें धारण केलेलीं आहेत. पाय बारीक असणें हें चीनमध्यें सौंदर्याचें चिन्ह गणलें जात असे हें उदाहरण गाजलेलें आहे. डोळ्यांचा रंग निळा अधिक गहिरा कीं काळा अधिक गहिरा, केशकलापाला सुवर्णाचा वर्ण अधिक खुलतो कीं कृष्णवर्ण अधिक खुलतो, चंपक गौर वर्ण हा अधिक आकर्षक कीं घननील श्याम हा अधिक मोहक याविषयीं स्थलकालपरत्वें

अभिरूचि कलाटणी खात असलेली आढळते. रूपप्रसाधनांमध्येंही हीच तऱ्हा. या विषयासंबंधीं वन्य लोकांच्या आवडीनिवडीचें जें निरीक्षण करण्यांत आलें आहे तें बोधप्रद आहे. पुष्कळशा वन्यजातीमध्यें पशूंचीं शिंगें, दांत, नखें हीं अलंकार म्हणून वापरलीं जातात. हे लोक शिकारी वृत्तीचे असतात व मारलेल्या पशूंचीं शिंगें धारण करणें हें शौर्याचें दर्शक असल्यानें शिंगें हीं त्यांना भूषणभूत वाटत असावीं. किंवा शिंगें व दांत हीं चकचकीत, गुळगुळीत, कमानदार व टिकाऊ अशी असल्यानेंही आवडत असावीं. लोखंडाचीं कडीं दागिने म्हणून कांहीं वन्य लोक वापरतात. शेती करणारे लोक फुलाफळांचा उपयोग रूपप्रसाधनाच्या कामीं करूं लागतात. अशा रीतीनें रूपप्रसाधनाचीं म्हणजेच कलेच्या क्षेत्रांतील विषयाची व साधनांची आवडनिवड बदलत आलेली आहे.

लिव्हिंगस्टन या प्रवाशानें दिलेलें एतद्विषक उदाहरण फार मौजेचें आहे. झांबीजीच्या वन्य लोकांत फिरत असतां त्यानें पहावें तो प्रत्येक स्त्रीच्या वरच्या ओंठांत एक एक मोठें वळें आढळे! वरच्या ओंठाला भोंक पाडून त्यांत सबंध तोंड झांकेल असें वळें हा प्रकार आहे तरी काय म्हणून त्यानें एका म्हाताऱ्याला विचारलें कीं, ' म्हातारबाबा तुमच्या सगळ्या बायांनीं हें ओंठांत कशापायीं घातलें आहे?' म्हातारा आश्चर्यानें उद्‌गारला, ' कशापायीं असं काय येड्यावाणी विचारतां? मग काय नुसताच ओठ भुंडा ठेवावयाचा म्हणतां? अहो राव, बाप्यांना मिशा, कल्ले असतात. म्हणून ते फक्कड दिसतात. पण या बायांनीं जर वळं घातलं न्हाई तर त्यांचं त्वांड भुचं आणि वंगाळ दिसेल कीं?' या उद्‌गारावरून कलेल्या व सौंदर्याच्या कल्पना कशा बदलत आलेल्या आहेत हे उमगून येईल. मात्र सौंदर्याच्या सर्वच कल्पना बदलतात असा पक्ष मांडावयाचा नाहीं हें सांगावयास नकोच.

—धनुर्धारी, दिवाळी अंक १९४५

# ललित कला आणि ललित वाङ्मय यांतील समानतेच्या मर्यादा.

पाश्चात्य काव्यशास्त्रांत काव्य आणि ललित कला यांची सांगड प्राचीन काला-पासून घालण्यांत आली आहे. नृत्य, गायन, वास्तु, शिल्प, चित्र या ललित कलांचा व साहित्यकलेचा त्याच्यांत एकत्रच विचार करण्यांत येतो. या सर्वांची जाति एक, गोत्र एक, कुल एक असें समजण्यांत येतें. या सर्व कलांना ललित कला या नांवानें संबोधण्यांत येतें आणि त्या सर्व कलांत एकरूपानें प्रगट होणाऱ्या लालित्याची मीमांसा करण्यांत येते.

## स्वतंत्र उपाधि, स्वतंत्र मर्यादा

पण त्या त्या कलांतील लालित्याचे कांहीं घटक स्वतंत्र आहेत. त्यांचा विसर पडला म्हणजे लालित्य-मीमांसेंत घोटाळा अुत्पन्न होतो. विशेषतः वाङ्मय आणि शिल्पगायनादि ललित कला या दोहोंमध्यें महत्त्वाचा फरक आहे. तो लक्षांत न घेतां वाङ्मयाच्या मीमांसेवरून निघणारे निष्कर्ष शिल्पादि कलांना सरसकट लागू केले तर दोहोंनाहि अन्याय होईल.

वास्तु, शिल्प, चित्र, नृत्य, गायन व काव्य या ललित कला होत. या सर्व कलांत दिसून येणारे असे कांहीं समान गुण आहेत. रमणीयता, प्रमाणबद्धता साम्यविरोधी खुलावट हे असे कांहीं गुण होत. या गुणांमुळें या सर्वांना एक-सूत्रांत गुंफतां येतें. पण प्रत्येक कलेचें कांहीं वैशिष्ट्य आहेच. प्रत्येकीच्या कांहीं उपाधि, कांहीं बंधनें, कांहीं मर्यादा आहेत. त्या लक्षांत घेतल्या म्हणजे एकीला

जें साध्य होईल तें दुसरीला साध्य होणार नाहीं हा मुद्दा स्पष्ट होईल. शिल्प व चित्र यांचें उदाहरण घ्या. चित्रांत शिल्पांतल्याप्रमाणें दिसणारी मूर्ति तर दाखवितां येईलच, पण त्या मूर्तीच्या पार्श्वभागीं असणाऱ्या वनश्रीची शोभाहि चितारतां येईल. शिल्पाला तें शक्य नाहीं. वास्तु कलेंत प्रमाणबद्धता, समप्रामणता यावरच मुख्यतः सौंदर्य अवलंबून असतें. ( वास्तु कलेला शिल्पाची व चित्राची जोड ठेवण्यांत येते ती निराळी ). पण वास्तुकलेचें सौंदर्य हें प्रमाणबद्धतेवरच प्रामुख्यानें अवलंबून असतें.

## 'लेआकून'चें उदाहरण

जर्मन कलामीमांसक लेसिंग यानें शिल्प आणि काव्य यांची तुलना करून दोहोंत कसा फरक पडतो हें मार्मिकपणें दाखविलें आहे. *

शकपूर्व पहिल्या शतकांच्या सुमारास तयार झालेला एक शिल्पकलेचा नमुना सोळाव्या शतकांत एका संशोधकांना सांपडला. त्या शिल्पांत अपोलो देवाचा पुजारी लेआकून ( Leocoon ) व त्याचे दोन पुत्र यांना सर्पांनीं विळखे घातले असून त्यांना प्राणांतिक वेदना होत आहेत असें दाखविलें आहे. व्हर्जिल कवीनें याच प्रसंगाचें आपल्या इलियड काव्यांत वर्णन केलेलें आहे. आतां ग्रीक दंत-कथेप्रमाणें पाहिलें तर सर्पांनीं गुदमरून मारलें तें फक्त पुत्रांना. त्यांचा पिता लेआकून याला नव्हे. पण काव्य व शिल्पकृति या दोन्हींतहि पित्याचा समावेश आहे. अर्थात् कोणीतरी दुसऱ्याचें अनुकरण केलें असावें किंवा शिल्पकारानें कवीचें केलें असावें. कोणी कोणाचें केलें असावें हें इतिहाससंशोधनानें कसेंहि ठरो. पण काव्य आणि शिल्प या कलांचीं जीं बंधनें आहेत त्यांवरून स्वतंत्रपणें याचा निर्णय करतां येईल का ? लेसिंगच्या मतें, देतां आला पाहिजे. त्यानें स्वतः हाच प्रश्न उपस्थित केला असून असा निर्णय दिला आहे कीं, शिल्पकारानेंच कवीच्या काव्यावरून आपली कल्पना उचलली असली पाहिजे. कारण शब्दमय मूर्तीचें शिल्पांत रूपांतर करतांना जे फेरफार आवश्यक ठरतात तेच नेमके या शिल्पांत दिसून येतात. काव्यांत लेआकून हा आपल्या उपाध्यायाचा झगा घालून उभा आहे असें वर्णन आहे. शिल्पांत तो विवस्त्र दाखविलेला आहे.

* लेसिंगचें लेआकून, इंग्रजी भाषांतर फिलिमोर कृत.

एरवीं सर्पाच्या वेटोळयानें शरीराला पडणारा पीळ दिग्दर्शित करतां आला नसता. काव्यांत झग्याच्या आतील देहयष्टीचें शब्दचित्र काढतां येते. शिल्पांत ते शक्य नाहीं. दुसरें म्हणजे काव्यांत सर्पानें गळ्याभोंवतीं वेटोळीं घातलेलीं आहेत असें दर्शविलें आहे. शिल्पांत तीं वेटोळीं मांड्यांभोंवतीं दाखविलीं आहेत. एरवीं शरीराचा उर्ध्वभाग उठून दाखवितां आला नसता. तिसरें म्हणजे काव्यांत सर्पाच्या वेटोळ्यांनीं व्यथित झालेली व्यक्ति मोठमोठ्यानें किंकाळया फोडते आहे असें वर्णन आहे. पण शिल्पांत तसें दाखवावयाचें म्हणजे तोंडाचा आकार वेडावांकडा दाखवावा लागला असता व शिल्पाचें सादर्य कमी झालें असतें, म्हणून शिल्पकारानें तोंड घट्ट मिटून निरुपायानें वेदना सहन केल्या जात आहेत असें खोदलें आहे. या सर्व लक्षणावरून लेसिंगनें असा निर्णय दिला आहे कीं, शिल्पकारानेंच कवीचें अनुकरण केलें असावें. आतां कवीनें शिल्पकृतीवरून कल्पना घेतली असल्यास तोहि आपल्या कलेस योग्य ते फेरफार करीलच. तेव्हां लेसिंगचा निर्णय हा संभवनीय अनुमानाच्या स्वरुपाचाच समजला पाहिजे. ( शिवाय कांहीं संशोधकांच्या मतें, कोणीच कोणाचें अनुकरण केलें नसावें. ) पण त्याची मीमांसा येथें दिली आहे ती भिन्न साधनामुळें त्या त्या कलांच्या क्षेत्रमर्यादा कशा भिन्न होतात हें दाखविण्याकरितां दिली आहे.

## वाङ्मयाचें व्यापक क्षेत्र

या दृष्टीनें विचार केला तर असें दिसून येईल कीं वाङ्मयकलेचें क्षेत्र हें इतर सर्व ललित कलांपेक्षा अत्यंत व्यापक असें क्षेत्र आहे. इतकें कीं सुरेलपणा, प्रमाणबद्धता वगैरे कांहीं लक्षणें इतरांशीं समान असलीं तरी वाङ्मयकलेची स्वतःचीं कांहीं विशेष लक्षणें उरतातच तीं स्वतंत्रपणें लक्षांत घेतलीं पाहिजेत. चित्र किंवा शिल्प यांना गति दाखवितां येत नाहीं. तात्कालिक होणारी गति फक्त सूचित करितां येते. धनुष्याला बाण लावून दोरी कानापर्यंत खेंचलेली दाखविली तर बाण सुटणार हें सूचित केलें जाईल. पण कालक्रमानुसार अनेक घटनांचें वर्णन चित्र व शिल्प यांना साध्य नाहीं. भावदर्शनांतहि तोच प्रकार. एकच ठरीव भाव चेहऱ्यावर वठविण्याशिवाय चित्र व शिल्प अधिक काय करणार? भावविकासाला तेथें अवसरच नाहीं. विविध आकार आणि विविध

रंगरेषा ही जी शिल्प आणि चित्र यांचीं साधनें त्यांनीं त्या त्या कलांच्या साध्यांनाहि मर्यादा घातल्या आहेत. पण वाङ्मयाचें साधन जे कल्पनाप्रेरक शब्द ते अति लवचिक असल्यानें इतर ललित कलांच्या पायांत श्रृंखला असल्या तरी वाङ्मय हें त्यांच्या मानानें खैर विहार करूं शकतें.

चित्र, शिल्प, गायन, नृत्य यांच्यांत जी विचारप्रेरकता व भावनोद्दीपकता असते ती वाङ्मयाच्या तुलनेनें अल्प प्रमाणांत असते. क्रौंचवध पाहून वाल्मीकीचें अंतःकरण हळहळलें, या प्रसंगाचें चित्र काढावयाचें तर पारधी, पक्षी, वाल्मिकी व पार्श्वभूमि यांचें, तो प्रसंग डोळ्यापुढें उभा राहील असें चित्रण साधलें असेल तर तें चित्र उत्तम. पारधी व वाल्मिकी यांच्या चेहऱ्यावर यथोचित भाव उमटविणें हें कौशल्याचें काम. तें कौशल्य ज्या प्रमाणांत प्रगट झालें असेल त्या प्रमाणांत चित्राचें मोल ठरेल. पण चित्रांतली मुख्य कल्पना चित्राबाहेरची म्हणजे कवीची. ती कल्पना रंगरेखेनें वठविणें हें चित्रकाराचें काम. भावनोद्दीपकता आहे ती मूळ कल्पनेमध्यें आहे. क्रौंचवधाची गोष्ट माहीत नसणाराला चित्राचें मर्म योग्य तऱ्हेनें आकलन होणार नाहीं. म्हणून चित्राच्या खालीं विषयाचें नांव द्यावें लागतें. शिल्प कलेला तर तें अधिक आवश्यक. एल्फीस्टनकृत नग्न पुतळयाच्या खालीं जर 'आद्य मानव' हीं अक्षरें लिहीलीं नाहींत तर त्या पुतळ्याचें स्वारस्य बरेचसें कमी होईल. कोणाचा पुतळा वा कोणत्या प्रसंगाचें चित्र हें नुसत्याच कलाकृतीवरून कळत नाहीं. तें अन्य रीतीनें कळावें लागतें. तें कळलें म्हणजे त्याची मूर्तिमंत अनुकृति शिल्पांत वठली आहे हें पाहून उत्पन्न होणारी विचारपरंपरा किंवा उत्तेजित केलेली भावनासंगति ही, चित्रानें जो विषय रूढ कथेंतून निवडला असेल त्याच्यावर बरीचशी अवलंबून असते.

## स्वयंपूर्ण वाङ्मय कला

पण वाङ्मय कला ही स्वयंपूर्ण आहे. त्या त्या कलांना जें जें साधतें तें तें सर्व शब्दांच्या सहाय्यानें वाङ्मय एकत्र साधत असतें. त्याचें साधन जे शब्द ते विचारभावनांशीं साक्षात् संश्लिष्ट होत. वनश्रीचें चित्र रेखाटणें असल्यास कवि चित्रकारावर मात करूं शकेल. चित्रकार सृष्टिसौंदर्यांतील रंगरेखा, छायाप्रकाश

यांच्या सहाय्यानें वठवितां येईल तेवढेंच सौंदर्य म्हणजे चक्षुरिंद्रियाला प्रतित होणारें तेवढेंच सौंदर्य उठवूं शकतो. पण कवि त्याशिवाय त्या स्थलींच्या वृक्ष-वेलींतून दरवळणारा मधुर, मादक परिमल व तेथील विहंगवृंदांचें सुस्वर कूजन, तेथील जलाचा शीतल स्पर्श व अमृतोपम रुची वगैरेंचें वर्णन करुन सर्व इंद्रियांना प्रतित होणाऱ्या सौंदर्याचा एकत्रित अनुभव वाचकांस आणून देईल.

आणि हें शब्दचित्र असलें तरी रंगरेखाचित्रांपेक्षां तें कमी उठावदार असतें असें मुळींच नाहीं. उलट तें जास्त उठावदार असतें. कारण समर्पक शब्दांच्या कौशल्यपूर्ण योजनेनें वाचकांची कल्पनाशक्ति जागृत होऊन वाचक हा आपल्या कल्पनेप्रमाणें तें चित्र पूर्णतेला नेत असतो. रंगचित्र पाहत असतांनाहि प्रेक्षक स्वतःच्या कल्पनेची भर टाकीत असतोच, पण शब्दचित्रामध्यें या क्रियेला अवसर पुष्कळच अधिक.

गायनानें भावनोद्दीपन कांहीं प्रमाणांत होतें. पण अमुक एक भावना स्पष्टपणें आळवली जाते असें म्हणतां येत नाहीं. कांहीं रागांचीं व चालींची कांहीं भावनांशीं जी सांगड घातलेली आहे तींमध्यें साहचर्याचा परिणाम बराच असावा. ‘ उद्धवा शांतवन करि जा ’ हें करुण गीत एकदां लोकप्रिय झालें म्हणजे ती चाल करुणरसाची पोषक आहे असा ग्रह होऊन बसतो. कांहीं व्यक्तीमध्यें एका इंद्रियाचा अनुभव दुसऱ्या इंद्रियाच्या अनुभवाशीं कायमचा निगडित असतो. अशा व्यक्तींना कांहीं स्वर ऐकत असतां त्या स्वरांना वास येऊं लागतो व त्या स्वरांचे रंगही दिसूं लागतात या प्रकारांना मानसशास्त्रांत संश्लिष्टानुभूति Synesthesia असें म्हटलें जातें. पण एकंदरींत पाहतां गायनाचें मुख्य फल श्रवणेंद्रियतर्पण हेंच होय.

## वाङ्मयांत नीति-अनीति कां ?

वाङ्मय मात्र इतर कलांतील सौंदर्य घटकांचा एकत्र प्रत्यय आणून देतें. म्हणूनच इतर ललित कलांना आणि वाङ्मयाला जें क्षेत्र समान आहे, तेवढेंच वाङ्मयाचें क्षेत्र समजलें किंवा वाङ्मयाचें सर्व क्षेत्र इतर कलांनाहि आक्रमितां येईल असें मानलें तर दोहोंनाही अन्याय होईल. वाङ्मय आणि इतर ललितकला यांचें गणगोत पूर्णपणें एकच समजलें म्हणजे असा घोटाळा होण्याचा संभव

असतो. वाङ्मय ही एक ललित कला असल्यानें त्यांत नीति-अनीतीचे प्रश्न उपस्थित करणें हें गैर होय असें प्रतिपादन करणारांचा कांहींसा असाच घोटाळा होत असावा. Creative Criticism या ग्रंथांत स्पिंगर्न लिहितो कीं, काव्य हें नीतिप्रवण किंवा अनीतिप्रवण आहे हें म्हणणें एखादा सुरेल स्वर किंवा गोथिक प्रासादाची एखादी डौलदार कमान ही नीतिप्रवण किंवा अनीतिप्रवण आहे असें म्हणण्यासारखेंच अर्थशून्य आहे! या ठिकाणीं स्पिंगर्ननें वास्तुकला, गायनकला व काव्यकला यांची जी तुलना केली आहे तीच गैर आहे. स्वर हा संवादी असेल वा विसंवादी असेल, सुस्वर असेल वा कर्णकटु असेल, पण तो नीतिप्रवण किंवा अनीतिप्रवण आहे असा दावा कोणी कधीं मांडतो का? तसंच प्रासादाच्या कमानीचें. कमान ही डौलदार प्रमाणबद्ध असेल वा बेडौल असेल व त्याप्रमाणें ती सुंदर वा असुंदर ठरेल पण ती असुंदर असली म्हणजे अनीतिप्रवण असते असें कोण म्हणेल?

पण हा न्याय काव्याला कसा लागू होईल? काव्य हेंही ललित कला आहे. केवळ एवढ्याच नात्यावर तो लागू करणें अयोग्य होईल. काव्य ही ललित कला असल्यानें लालित्याचे नियम इतर कलांप्रमाणें काव्यालाही लागूं करणें आवश्यक, पण ते सर्व पाळून काव्याचे म्हणून कांहीं स्वतंत्र नियम असूं शकतात हें नाकारण्याचें कारण काय? त्या नियमान्वयें कांहीं प्रकारच्या काव्यांत तरी नीति अनीतीचे प्रश्न टाळतां येत नाहींत. मानव मानवेतर प्राणी या सर्वांना प्राणिजातिचीं लक्षणें समान आहेत, पण त्यामुळें इतर प्राण्यापेक्षां मानवांत जें जें अधिक आहे त्याकडे दुर्लक्ष करतां येत नाहीं. तसेंच काव्याचें. रामायणासारख्या काव्याचा आस्वाद घेत असतां राम–सीता–भरत इत्यादिकांच्या चारित्र्याचा विचार न करितां आस्वाद घेणें म्हणजे त्यांतील स्वारस्य नष्ट करून टाकण्यासारखें आहे. काव्याचें साधन जी अर्थपूर्ण शब्दसंपत्ति तिचा विचार व भावनांशीं साक्षात् संबंध आहे. त्यामुळें कथानकी काव्याच्या आस्वादानें नुसता आनंद न होतां नीति-अनीतिच्या विचार-भावनांनीं संपृक्त असा आनंद होत असतो. म्हणून अशा काव्यांत हे प्रश्न टाळतां येत नाहींत. उलट वास्तु, शिल्प, गायन या कलांमध्यें आकार, स्वर वगैरेचें सौंदर्य प्रामुख्यानें प्रतीत होत असल्यानें तेथें व

विशेषतः वास्तुकलेंत तर नीति अनीतीचा प्रश्न उपस्थित करणें म्हणजे या कलेवर निष्कारण बोजा टाकणें होय. यामुळेंच गोथिक कमान ही दोन्ही हात जोडून प्रार्थना करीत आहे असें दर्शविते व म्हणून ती अधिक सुंदर दिसते असें रस्किन-प्रमाणें प्रतिपादणें किंवा रामायणांतील एकपत्नीत्वाच्या व्रताला स्पिजर्नच्या मताप्रमाणें शून्य किंमत देणें हीं दोन्हीं वर्ज्यच होत. तात्पर्य वाङ्मय आणि इतर ललित कला यांना कांहीं गोष्टी समान असल्या तरी वाङ्मयाचें स्वतंत्र असें क्षेत्र आहे या मुद्याकडे दुर्लक्ष होतां कामा नये.

—धनुर्धारी, दिवाळी १९४४

# दिङ्नागाचें कुन्दमाला नाटक

संस्कृत साहित्यभांडार गडगंज असलें तरी त्याच्या मोठ्या भागाची स्थिति अद्याप गुप्तधनासारखी आहे. जुन्या राहत्या वाड्यांत ऐश्वर्यशाली पूर्वजांनीं बहुमोल जडजवाहीर पुरून ठेवलें आहे असा घराण्याच्या दप्तरांत उल्लेख असावा, पण ठावठिकाणा तर लागू नये अशी स्थिति संस्कृत भांडारांतील अनेक साहित्यरत्नांविषयीं झाली आहे. आज उपलब्ध असलेल्या वाङ्मयांत जुन्या ग्रंथकारांचीं शेंकडों नांवें आदरानें उल्लेखिलेलीं सांपडतात पण ते आज शब्दशः नामशेष होऊन राहिले आहेत. सर्वच ग्रंथ टिकणें शक्यहि नाहीं, तसें उपयुक्तहि नाहीं. म्हणून साहित्याच्या खाणींतील सुवर्णमिश्रित मातींतून सुवर्णकण तेवढेच काळाच्या चाळणींतून गळत गेले असते तर काय बहार झाली असती? असा विचार मनांत आल्याशिवाय राहत नाहीं. पण काळाच्या भट्टींत मातीबरोबर सोन्याचेंहि भस्म होत आलेलें आहे.

संस्कृतमधील नामशेष झालेल्या ग्रंथांकडे पाहिलें असतां या विधानाची सत्यता पटण्यास वेळ लागणार नाहीं. हे नष्ट झालेले ग्रंथ उपलब्ध ग्रंथांपेक्षां कमी योग्यतेचे असले पाहिजेत असा समज सकृद्दर्शनीं होण्यासारखा आहे. पण त्यांतील कांहींची योग्यता येवढी मोठी आहे कीं, त्यांचीं नुसतीं नांवें सांगितलीं तरी वरील समज दूर होईल. भासाचीं नाटकें आणि चाणक्याचें अर्थशास्त्र या ग्रंथांचीं योग्यता सर्वश्रुतच आहे; पण तीस चाळीस वर्षांपूर्वीं या सुप्रसिद्ध ग्रंथांचा पत्ता नव्हता! या एका उदाहरणावरून संस्कृत साहित्यांतील नष्ट धनाची मातब्बरी लक्षांत येईल. सुदैवानें संशोधकांच्या पायाळु दृष्टीला या धनाचे

५........

कांहीं हंडे सांपडूं लागले आहेत. त्यांपैकींच दिङ्नागाचें '**कुन्दमाला**' हें नाटक होय.

या गुप्तधनाचा बराच भाग दक्षिणेकडे सांपडतो. याचें एक कारण उत्तरेकडे आर्य संस्कृतीला वाईट दिवस आल्यावर दाक्षिणात्यांवर तिच्या संगोपनाचा भार पडला हेंच असावें. त्यांनीं तो किती चोख रीतीनें उचलला हें दाक्षिणात्यांतून निघालेली श्रीशंकराचार्यादि आचार्यांची परंपरा, व विजयनगरच्या विद्यारण्यांची संस्कृसाहित्यसंकलनात्मक कामगिरी यांवरून लक्षांत येईलच. भासाचीं नाटकें, चाणक्याकांचें अर्थशास्त्र, जुन्या ग्रंथकारांतील हजारांवर वचनें उद्धृत करणारा भोजदेवाचा शृंगारप्रकाश इत्यादि अनेक ग्रंथ दक्षिणेकडे सांपडले आहेत. त्यांतील प्रस्तुतचें नाटक हें एक होय.

या नाटकाचा कर्ता दिङ्नाग हा न्यायशास्त्रांतील पंडित म्हणून प्रसिद्ध आहे. आणि या पंडिताची तर्ककर्कशधी नाटकाच्या कोमल प्रांतामध्येंहि किती कौशल्यानें वावरे हें कुंदमालेंत पहावयास सांपडतें. कालिदासांच्या मेघदूतांतील—

**'दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावपेलान्।'**

या ओळींत दिङ्नाग पंडिताचा गर्भित उल्लेख आहे असें मल्लिनाथ व त्याच्या पूर्वीचा दुसरा टीकाकार दक्षिणावर्तनाथ हे दोघेहि मानतात. तें खरें असल्यास कालिदासानें ज्याच्या गर्वखंडनाविषयीं गर्भित उल्लेख करावा अशा प्रकारचा त्यावेळचा तो एक गाजलेला ग्रंथकार असावा. तो कालिदासाचा बहुधा समकालीन असून पांचव्या शतकाच्या प्रारंभीं होऊन गेला असावा, असें कुन्दमालेंच्या संपादकाचें मत आहे. तेव्हांपासून तों 'साहित्यदर्पण' कारांच्या काळापर्यंत कुंदमाला किंवा त्यांतील कांहीं भाग उपलब्ध असावेत असें साहित्यदर्पणांत कुंदमालेंतील घेतलेल्या एका श्लोकावरून दिसतें. 'भावप्रकाश' कार शारदातनय, 'बहुरुपमिश्र' आणि 'काव्यकामधेनुकार' या ग्रंथकारांनीं कुन्दमालेचा उल्लेख केलेला आढळत होता पण साक्षात् नाटक उपलब्ध नव्हतें, तें थोड्या वर्षांपूर्वी प्रथमच उपलब्ध झालें.

कुन्दमाला ही एक सुप्रसिद्ध सीतात्यागाच्या प्रसंगावर उभारलेली नाट्यकृति असून ती भवभूतिच्या 'उत्तररामचरिता' च्या जोडीला बऱ्याच अंशीं बसेल

अशा तोलाचा आहे. कुन्दाच्या फुलांची माला गुंफण्याची सीतेची कांहीं विशेष हातोटी होती; आणि वनवासांतील सुलभ प्रसूतीनंतर अशी माला गुंफून रोज गंगेस अर्पण करण्याचा सीतेनें क्रम ठेविला होता. पुढें यज्ञप्रसंगानें राम गंगा-तटाकीं आला असतां गंगेच्या प्रवाहांतून वहात असलेली कुन्दमाला पाहता झाला आणि सीता आसपास कोठें तरी रहात असली पाहिजे या विचारानें तो व्याकुळ झाला. या प्रसंगास उद्देशून या नाट्यकृतीला ‘ कुन्दमाला ’ हें नांव दिलें आहे.

रामकथा आधींच रमणीय आणि अवीट, त्यांत सीतात्यागाचा प्रसंग हा तर भावनाकल्लोलांनीं नुसता ओथंबलेला. प्राणापलीकडे प्रेम असतांहि केवळ लोका-राधनेस्तव पत्नीत्यागाच्या विरहानलांत स्वतःला पिचवून घेणारा रामचंद्र, गंगाजलाप्रमाणें विशुद्ध असतांहि त्यागाबद्दल पतीला दूषण न लावणारी व त्यावर अव्यभिचारी प्रेम करणारी सीता, केवळ भ्रातृ–आज्ञा म्हणून मातेप्रमाणें पूज्य अशा सीतेला गर्भमंथरावस्थेंत रानावनांत सोडणारा व त्याबद्दल मनांत स्वतःची अवहेलना करणारा लक्ष्मण, अशीं यांतील पात्रें. आणि अशा महोदार परंतु भवितव्यतेच्या गर्तेत सांपडलेल्या थोरांच्या भावनांचा खेळ हा या नाट-काचा मालमसाला ! त्यांतच यज्ञनिमित्तानें राम वनांत आल्यावर लवकुशांना पाहतो; पण बाप मुलांना ओळखीत नाहीं व मुलें बापाला ओळखीत नाहींत असा सर्वतोपरी नाट्यानुकूल प्रसंग ! सर्व वातावरणच काव्यमय. या प्रसंगावरील भवभूतीची दगडालाहि पाझर फोडणाऱ्या करुणरसानें परिपूर्ण अशी नाट्यकृति प्रसिद्धच आहे.

‘ कुन्दमाले ’ मध्यें भावनाविष्कार ‘ उत्तररामचरितां ’ तल्या इतका उत्कट नसला तरी उत्तररामचरिताच्या शेजारीं स्वतंत्र असें स्थान मिळण्याइतकें रचना कौशल्य व महनीय आणि लोकोत्तर व्यक्तींच्या भावनांचा आविष्कार हलक्या हातानें खुलविण्याची कोमलता कुन्दमालेमध्यें आहे. राम वनांत आल्यानंतर, स्वतः अदृश्य राहून सीता रामसन्निध राहते, ही नाट्यानुकूल रचना उत्तरराम-चरितांतल्याप्रमाणें कुन्दमालेंतहि आहे. पण कुन्दमालेंत शिवाय अशी खुबीदार योजना केली आहे कीं, वाल्मीकीच्या वरानें सीता तर अदृश्य होते, पण तिच्य

अंगावरचा शेला; रामास दिसूं शकतो. इतकेंच नव्हे, तर पुष्करणीमध्यें तिचें पडलेलें प्रतिबिंबहि रामाला दिसूं शकते ! त्यामुळें रामाची मनःस्थिति फारच चमत्कारिक होते.

त्यानंतर कथानकाला पुनः कलाटणी देण्याकरितां, तिलोत्तमा अप्सरा ही सीतेचें रूप धारण करून रामाची परीक्षा पहात आहे व रामाला दिसलेलें सीतेचें प्रतिबिंब व सांपडलेला शेला हा सर्व तिलोत्तमेचा खेळ होय अशी रामाची समजूत त्याचा मित्र विदुषक याजकडून करविली आहे. सीतेचें निर्व्याज प्रेम आणि रामाचें उदात्त वर्तन ह्याचें चित्र कवीनें यथातथ्य काढलेलें आहे. पहिल्याच अंकांत सीतेला वनांत एकटीच सोडून लक्ष्मण निघाला असतांहि सीतेची एकच चिंता म्हणजे पतीच्या कल्याणाविषयीं ! ती म्हणते, " श्रीरामचंद्राचें परिवारमंडळ जरि मोठें आहे, तरी तो यापुढें कसे दिवस काढील बरें ? कारण स्त्रियाच दुःखामध्यें साहाय्य करणाऱ्या असतात. " दुसऱ्या अंकामध्यें सीतेची सखी सीतेच्या प्रेमाची परीक्षा पहाण्याकरितां, राम लवकरच यज्ञ करणार असून यज्ञामध्यें सहधर्मचारिणीचा पाणिग्रहणविधि होत असतो असें मुद्दाम डिवचून बोलते. पण त्यावर सीता एवढेंच उत्तर करते कीं, " सखे, माझा आर्यपुत्राच्या हृदयावर प्रभाव आहे. त्याच्या हातावर नाहीं. " कुन्दमालेचें दर्शन रामास होतांच प्रियेची आठवण म्हणून ती कुन्दमाला हृदयाशी धरण्याचा मोह होणें सहाजिक असतांहि व सीतेच्या आठवणीनें चित्तव्याकूळ झालें असतांहि राम म्हणतो, " ही कुन्दमाला मला प्रिय असतांहि ती कदाचित् देवतेच्या पूजेची असावी या शंकेनें मला तिचा उपभोग घेववत नाहीं ! ". कुशलवांना पाहिल्याबरोबर रामाच्या अंतःकरणांत जो प्रेमाचा पान्हा फुटतो, जी गूढ अस्फुट पण गोड आशा तरंगू लागते तिचें चित्र पांचव्या सहाव्या अंकांत फार हृदयंगम काढलें आहे. तें सर्व प्रस्तुत नाटकांतच वाचलें पाहिजे. त्याचें दिग्दर्शन करण्यानें उपोद्घाताच्या मर्यादेचें अतिक्रमण मात्र होईल.

शेवटच्या एका उदात्त प्रसंगाचा उल्लेख करण्याचा मोह मात्र आवरत नाहीं. तो म्हणजे सीतेचा स्वीकार केल्यावर रामानें आपल्या हयातींत कुशाला राज्यावर बसविण्याचा. रामासमक्ष रामाच्या विनंतीवरून ऋषिवर्य वाल्मिकी कुशाला

'राज्याभिषेक' करतात आणि लगेच राम तमाम जनतेसमोर स्वतः कुशाला 'राजा' म्हणून संबोधून म्हणतो, "हें राजा, तुझ्या अनुज्ञेनें यौवराज्यपदावर लवाला अभिषेक करण्याची मी इच्छा करतों." हा देखावा चालू असतां वानप्रस्थाश्रमाचें उदात्त चित्र पहावयास मिळतें. भरतवाक्यांतील शेवटच्या चरणांत 'सकलीं वृद्धी असो गोधनीं!' हें वाचून कुन्दमालेच्या कालीं गोमातेला प्राप्त झालेलें महत्त्व लक्षांत येतें. तसेंच कुन्दमालेचा कर्ता दिङ्नाग हा बौद्ध मानला जात असतांहि त्यानें रामचरितच वर्णावयास घेतलें यावरून हिंदूंची धार्मिक सहिष्णुताहि ध्यानीं येते. असो.

कुन्दमाला नाटक संस्कृत वाचकांपुढें आल्याला दहाबारा वर्षें होऊन गेलीं. मराठी वाचकांच्या भेटीला मात्र तें यंदा १९३५ सालीं प्रथमच येत आहे. व त्याचें श्रेय 'मध्वभाष्यभाषांतर', 'छदोमंजरी' वगैरेंचे विद्वान लेखक पंडित रंगाचार्य रड्डी यांना आहे. प्रस्तुत नाटक मूळ संस्कृमध्यें छापलें गेलें तें तंजावर व म्हैसूर येथें सांपडलेल्या दोन प्रतींवरून. त्या दोन्ही प्रति अपूर्ण व अनेक ठिकाणीं कसरीनें खाल्लेल्या. दोन्ही प्रतींत प्राकृताची संस्कृत छाया दिलेली नाहीं. अशा स्थितींत छापलेलें पुस्तक परिश्रमानें प्रथम बसवून नंतर भाषांतर करावें लागतें हें सांगावयास नकोच. प्रस्तुत भाषांतर सुगम व सुंदर असून मूळ कृतींतलि रसास्वाद भाषांतरांत उत्तम चाखतां येतो. नाटकांतील मूळ पद्यांचें पद्यमय सरस भाषांतर कोल्हापूरचे डॉ. श्रीखंडे यांनीं केलें आहे. डॉक्टरांचें गीतगोविंदाचें सुश्लिष्ट भाषांतर 'सुश्लोकगोविंद' हें मराठी वाचकवर्गापुढें आहेच. प्रस्तुत कुन्दमालेला मराठी पेहराव चढवून या ग्रंथकारद्वयानें वाचकाला ऋणी केलें आहे. —नाटकाच्या प्रारंभींचा उपाद्घात.

# सावरकरांचीं भावगीतें

सावरकरांच्या स्फुट कवितांचा संग्रह आज प्रो. मायदेव प्रसिद्ध करीत आहोत. त्यांतील जें कवन माझ्या प्रथमच ऐकण्यांत आलें व ज्यानें माझ्या मनाला चटका लाविला तें कवन म्हणजे "ने मजसी ने परत मातृभूमीला। सागरा, प्राण तळमळला" हें होय.

वीस पंचवीस वर्षांपूर्वीची ती गोष्ट. आम्ही कांहीं स्नेहीमंडळी प्रतापगड, रायगड वगैरे शिवशाहींतील स्फूर्तिप्रद स्थळांचें दर्शन घेण्याकरितां सहल करीत चाललों होतों. वाटेत वाचण्याकरितां साहित्य घेतलें होतें तें सावरकरांचे पोवाडे व इतर कवनें ! अंदमानांत खितपत पडलेले सावरकर हे त्यावेळच्या तरुण पिढीला त्यागाची साक्षात् मूर्ति वाटत. मायभूमीपासून दुरावलेल्या पण मायभूमीचें दर्शन घेण्यासाठीं तळमळणाऱ्या त्यांच्या हृदयांत कोणत्या भावनांचे कल्लोळ उठत असतील याचीच आम्हीं मित्रमंडळी चर्चा करीत चाललों होतों. तोंच आमच्यापैकीं एकानें आपल्या पोतडींतून हस्तलिखिताची वही बाहेर काढली व त्या वहींतून 'सागरास' हें गीत गाऊन दाखविलें. त्या स्नेह्याला सुरेल आवाजाचेंहि देणें होतें. त्यावेळीं माझ्या मनावर जो परिणाम झाला तो आजहि नष्ट झालेला नाहीं. उत्कृष्ट भावगीताचे गुण त्या गीतांत एकवटले आहेत. साधीं सुटसुटीत चार कडवीं, निरर्थक पाल्हाळाचा अभाव, करुण रसाला अनुकूल असें 'अक्रुर' वृत्त व मायभूमीच्या विरहामुळें जिवाची होणारी तळमळ ही एकच एक भावना सर्वत्र खेळलेली. भावनेच्या अविष्काराला साजेल अशी प्रसादपूर्ण भाषा. कल्पनाविलास भावनेच्या तंत्रानें वागेल एवढ्याच बेताचा.

सावरकर इंग्लंडमध्यें असतांनाच सरकारची त्यांच्यावर अवकृपा झाली. मायभूमीला कदाचित कायमचे अंतरावें लागेल हें दृष्य त्यांना दिसूं लागलें. अशा स्थितींत सागराच्या कांठीं बसून आपल्या हृदयाची कथा ते सागरास सांगत आहेत. ज्या सागराच्या पृष्ठावरून मायभूमि सोडून आपण दूरदेशीं आलें। त्यालाच पुन्हां आपणांस परत घेऊन जाण्याविषयीं ते विनंती करीत आहेत.

**ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला !**

सागरा, तुझ्यावर विसंबून ना मी येथें आलों ? वाटलें, जसा सुखरूप तूं मला येथें घेऊन आलास, तसाच परतहि नेशील. परत गेल्यावर मातृभूमीच्या उद्धाराचें व्रत अधिक जोमानें, अधिक कार्यक्षमतेनें मला चालवितां येईल. पण माझी फसगत झाली.

**शुक पंजरिं वा हरिण शिरावा पाशीं ।**
**ही फसगत झाली तैशी ॥**

मी यथ आलों केवढ्या आशेने कीं, माझ्यांतील सुप्त शक्ति विकसित होतील, आणि त्याला येणारा फुलोरा मीं परत गेल्यावर मातृचरणीं वाहीन !

**गुणसुमनें मीं वेंचियलीं या भावें ।**
**कीं तिनें सुगंधा घ्यावें ॥**

पण आतां त्यांचा निर्माल्य होणार !

**जरि उद्धरणीं व्यय न तिचा हो साचा ।**
**हा व्यर्थ भार विद्येचा ॥**

सागरा ! तूं म्हणशील कीं, येथेंच राहिलास म्हणून काय बिघडलें ? काय येथल्या आकाशांत नक्षत्रें नाहींत, कीं येथल्या नगरींत प्रासाद नाहींत ? पण तुला सांगतों–

**नाभ नक्षत्रें बहुत एक परि प्यारा ।**
**मज भरतभूमिचा वारा ॥**
**प्रासाद इथें भव्य परी मज भारी ।**
**आइची झोपडी प्यारी ॥**
**तिजवीण नको राज्य मज प्रिय साचा ।**
**वनवास तिच्या जरि वनिंचा ॥**

सागरा ! तुला माझी हृदयव्यथा कशी रे बोलून दाखवूं ? सरित्पते, तुझ्या सरितेच्या विरहाची शपथ घेऊन तुला सांगतों कीं, माझा जीव तळमळतो आहे. काय ? फेसाच्या मिषानें तूं माझ्याकडे पाहून हंसतो आहेस ? हंस, बाबा ! तुझ्यावर स्वामित्व गाजविण्याची सत्ता आज आङ्ग्लभूमीच्या हातीं आहे. आणि माझी मायभूमि आज दुर्बल झाली आहे. पण सागरा, लक्षांत ठेव. वरवर अबला दिसली तरी माझी भूमि अबला नाहीं बरें. आणि तुला तरी आठवण असावयास पाहिजे कीं, तुला एका आचमनांत पिऊन टाकणारा पराक्रमी अगस्त्य माझ्या मायभूच्या कुशींतच जन्मास आला होता !

**अबला न माझि ही माता रे।**
**कथिल हें अगस्तिस आतां रे ॥**
**जो आचमनीं एक क्षणीं तुज प्याला ॥**
**सागरा प्राण तळमळला॥**

असें हें एक उत्तम भावगीत आहे. कवीच्या प्रथमच ऐकलेल्या एखाद्या चांगल्या कवनाचा ठसा मनावर खोल उमटून जातो. तसा या कवनाचा माझ्या मनावर उमटलेला आहे. पण मीं या कवनाचा मुद्दाम विस्तारानें उल्लेख केला याचें कारण म्हणजे सावरकरांच्या कवनाची भूमिका येथें स्पष्ट पहावयास सांपडते. सावरकरांच्या साहित्याचा स्थायीभाव देशप्रेम हा आहे, मग विषय कोणताहि असो. चुकलेलें कोंकरूं असो वा गाडीला जुंपलेला बैल असो. या प्रेमाच्या क्रियारुप अविष्काराचा जातिवंत अनुभव त्यांनीं चाखलेला आहे. आणि आपलें प्रतिभेचें देणें देशप्रेमाच्या अविष्क रांतच वेंचिलें गेलें पाहिजे अशी त्यांची तळमळ आहे.

सावरकरांच्या एका अत्युत्कट भावगीताचें हें विवेचन झालें. याच्या मानानें भावोत्कटतेनें जरा कमी अशीं कवनें ‘ सावरकरांची कविता ’ या संग्रहांत वाचकांस बरींच वाचावयास मिळतील. स्वतंत्रतेचें स्तोत्र, प्रियकर हिंदुस्थान, प्रभाकरास, सांत्वन, माझें मृत्युपत्र, जा झुंज, मला देवाचें दर्शन घेऊं द्या, तनुवेल ह्या कविता भावगीतांचे चांगले नमुने म्हणून उल्लेखिण्याजोगे आहेत. प्रियकर हिंदुस्थान ह्या कवितेंतील,

कस्तुरी मृग परिमलपूरित जिचें फुलावें रान।
प्रभातकाळीं कोकिल किलकिल कूजित आम्रोद्यान॥
आणि
तुझ्या जलांहीं अनंत पितरां दिलें तिलांजलिदान।
पुण्यभूमि तूं! पितृभूमि तूं! आमुचा अभिमान॥

हे चरण विशेषच हृद्य आहेत. तसेंच प्रभाकरास या कवितेंतहि वात्सल्यदर्शं आत्मलेखन किती सुंदर झालें आहे हें पहाण्यासारखें आहे. ते लिहितात.

परितुनि यौवनलतिकेला तूं पहिलें फूल फुले।
तनया, तनु थरथरली स्नेहें नेत्र स्निग्ध झाले॥
परंतु अमुचें अभिनव यौवन त्यांत पितृत्वाचा।
प्रथम समागम, गमुनी लज्जाविनय मना साचा॥
नवप्रसव तव जननी मजला दावित असतांहि।
गुरुजनमर्यादेनें त्यां बहु पाहियलें नाहीं॥
चोरूनि घ्यावें कधीं कधीं तव अर्ध चुंबनातें।
सुखोत्सवें तंव आपण होऊनि नयन झांकति ते॥
प्रभ्या प्रियकरा, होतासी बहु दिवस असा सखया।
अमूर्त तूं कल्पना एक मधु-मधुर अशी हृदया॥

परंतु तोच प्रभाकर मृत्युवंचकानें हरुन नेल्याचें त्यांना कळलें तेव्हां त्याच कवितेंत ते म्हणतातः—

हृदय जोंवरी प्रभ्या प्रियाळा! असाचि तिथ राहें।
पूर्वार्जित मद्हृदयगृह असे तुझेंचि तनया हें॥

आधुनिक कवींच्या प्रेमगीतांत मागें न पडणारी अशी तनुवेल ही कविताहि वाचकांनीं नजरेखालीं घालण्याजोगी आहे.

उत्कट काव्यगुणांनीं ओथंबलेलीं भावगीतें 'सावरकर कवितें'त फार आढळणार नाहींत. कारण सावरकरांच्या प्रतिभेचा कल काव्यगुणापेक्षां वक्तृत्व गुणांकडे कदाचित् अधिक झुकता असावा. वक्तृत्वाला ऐसपैस फैलाव मानवतो व शोभतो. पोवाड्यामध्यें या गुणांचा फायदा दिसून येतो. शिवाय त्यांची मनोघटना तर्कशील असल्यानें भावनेनें रंगतां रंगतां तार्किक प्रवचनाच्या प्रांतांत ते केव्हां

केव्हां शिरतात आणि त्या स्थळीं कवित्वाला उणेपणा येतो. तोंडाला फेंस आला तरी निमूटपणें गाडी ओढणाऱ्या बैलास पाहून कोणी हिंदु तुच्छतेनें हांसला. त्यावर ह्या बैलानें परक्याच्या निमूटपणें लाथा खाणाऱ्या हिंदूंची चांगलीच हजेरी घेतली. पण—

‘ जे. पी. बैलतसे महावृषभ सी. एस्. आय नंदी अशा।
देईना पदव्या मला मम धनी नाना जरी शुष्कशा ॥
देतो नित्य तृणास गार हिरव्या खाया पिण्यानें जला
नाहीं घेत मिठावरी कर नसे मी धन्य का आजला ?

असली भाषा वृषभाच्या तोंडीं कशी शोभेल ?

‘ बालविधवादुःखस्थितिकथन ’ म्हणून जी कविता आहे तिच्यांत बालविधवांच्या वकिली कैफियतीचा थाटच अधिक दिसतो. प्रासंगिक म्हणून मुद्दाम तयार केलेल्या काव्यांचा सामान्यतः हाच प्रकार असतो. पण सावरकरांचें जीवनच सामान्य कवीहून वेगळ्या प्रकारचें झाल्यानें त्यांच्या कवनांतील कांहींचे विषय हे स्वाभाविकपणेंच नाविन्यपूर्ण वठले आहेत. अंदमानांतील बंदिस्त परवशतेच्या जीवनानें त्यांच्या चरित्रपटांतील महत्त्वाची जागा व्यापून टाकली आहे. या जीवन खंडांतील विशिष्ट अनुभवांतून कांहीं कवनें निर्माण झालेली आहेत. कैद्याच्या पायांतील बेडी हें त्यांच्या परवशतेचें एक अखंड स्मरण जागविणारें मनःशल्य. पण या बेडीवर संतापून न जातां एखाद्या दागिन्याप्रमाणें ती स्वच्छ घासून पुसून ठेवावी लागावी हा एक दैवघटनेचा विक्षिप्त मासला आहे. बेडी न घासली तर गंजायची व गंजली म्हणजे अधिक खुपायची ! कैद्याला बेडी काळजीपूर्वक साफ करीत बसलेला पाहून त्या दृश्यांतील विरोध कोणाच्याहि मनाला चटका लावील.

फोडुनि तोडुनि जी जाळावी तीच कशी उजळावी।
आपण अपुलिची रे बेडी हौस तुझी ही वेडी !

बंदिवासांतील दुसरा अनुभव म्हणजे सुटका होण्यापूर्वीच मृत्यूच्या स्वाधीन व्हावें लागण्याची भीषण कल्पना. अशा वेळीं मृत्यूचा बेडर वृत्तीनें स्वीकार करण्यांत वीरवृत्तीचा एक विशेष अविष्कार दिसून येतो.

ये मृत्यो ! ये तूं ये, यावयाप्रती
निघालाची असशिल जरि ये तरी सुखें !
कोमेजुनि जावया भिवोत हीं फुलें
हीं द्राक्षें रसरशीत सुकुनि जावया
भ्यावें तें कां म्हणूनी तुजसि परी मी ?

देशसेवेमध्यें आयुष्याचें ज्यानें सोनें केलें त्याला मृत्यूच्या स्पर्शानें तें गंजेल ही भीति कशाला ?

जरि असेल त्या अंधःकारलतेला
फुलत दुज्या दिवसाचें फूल (पुनर्जन्म) तरी ही
भीति न मज, कीं येथें पेरिलें अम्हीं
फुलत आणि फुलत तेंच.

या विषयावरची सर्वांत उत्कृष्ट कविता आत्मबल ही होय. हुतात्म्याला अमानुष छळ सोसण्याची तयारी नेहमींच करावी लागते. ती सिद्ध होण्यास कोणताहि छळ बोथट ठरेल अशा वज्रवृत्तीचें कवच निर्माण करणारें हें छोटें कवन आहे. सत्याग्रही वीराच्या जिभेवर अखंड रुळावें अशी त्याची योग्यता आहे. फांसावर लटकणारे कांहीं हुतात्मे भगवद्गीतेंतील 'अच्छेद्योऽयमदाह्योऽयं' इत्यादि मंत्र म्हणतांना आढळून येतात. त्याच धर्तीवर सावरकर लिहितात :

अनादि मी अनंत मी अवध्य मी भला
मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला ?
लोटि हिंस्र सिंहाच्या पंजरीं मला
नम्र दाससम चाटिल तो पदांगुला
आण तुझ्या तोफांना क्रूर सैन्य तें
यंत्र तंत्र शस्त्र अस्त्र आग ओकतें
हलाहला ! त्रिनेत्र तो
मी तुम्हांसि तैसाची गिळूनि जिरवितो.

या वज्रकवच मंत्राची मोहिनी भावी वीरांना अखंड भारून टाकील यांत संशय नाहीं. —सावरकर-काव्य-समालोचन-ग्रंथ १९४३

# प्राचीन कवींतील अनुकरण प्रकार

अनुकरण हें उत्तमांतलें उत्तम गौरवीकरण होय असें सुभाषित आहे. प्राचीन कवींनीं एकमेकांचा गौरव–नुसत्या प्राक्कालीनांचाच नव्हे तर समकालीनांचाही–मुक्तकंठानें गायिला आहे. पण हे कवि नुसते कवि नसून संत असल्यानें गौरवोद्गारांत त्यांच्या संतश्रेष्ठत्वारच भर असे. यामुळें त्यांच्या कवित्वशक्तीचें मापन कसें केलें जात असे याचें प्रतिबिंब गौरवोद्गारांत पहावयास सांपडत नाहीं. हे कवि एकमेकांकडे संतत्वाच्या भूमिकेवरून पहात असल्यानें एकमेकांच्या काव्याचें काव्यदृष्ट्या म्हणजे गुणदोषविवेचनदृष्ट्या परीक्षण करण्यास त्यांचें मनच धजलें नसलें तर नवल नाहीं. पण जेथें मतें साक्षात प्रगट झालेलीं नसतात तेथें तीं अप्रत्यक्षपणें डोकावत असलेलीं न्याहाळून काढतां येतात. या अप्रत्यक्ष मतप्रगटीकरणांपैकीं एक प्रमुख प्रकार म्हणजे अनुकरण हा होय. अन्य कवींतील कोणते दृष्टान्त, कोणते प्रसंग, कोणतीं वर्णनें या कवींना त्यांचें अनुकरण करण्याइतकीं हृदयंगम वाटलीं हें अवलोकन केलें असतां त्यांची रसग्रहणदृष्टी अजमावतां येईल. हें अनुकरण अजाणतां व जाणूनबुजून असें दोन्ही तऱ्हेचें असतें. तुकारामानें उल्लेखिलेल्यासारखे ‘उष्टया पत्रावळी गोळा’ करणारे कवि सोडले तर एकमेकाच्यांतील सौंदर्य स्थळांचें अनुकरण करण्यांत त्यांना कमीपणाही वाटत नसे. महाराष्ट्र–वाङ्मय मंदिर हें समाईक मालकीचें आहे व तें शृंगारण्याचा यथाशक्ति प्रयत्न करीत रहावें अशी त्यांची भूमिका असे.

खेडेगावांतील ग्रामदेवतेचा उत्सव साजरा करावयाचा असला, म्हणजे गावांतील सर्व ग्रामस्थांनीं मिळून तो उत्तम रीतीनें साजरा होईपर्यंत झटावें व त्याबद्दल सामुदायिक अभिमान बाळगावा असा प्रघात पडलेला आहे. ज्याच्य

आंगांत जी कला असेल ती कला त्यानें उत्सवाच्या यशस्वितेच्या चरणीं वाहावी. मल्लजेठी असतील त्यांनीं कुस्ती पकड जुंपाव्या, गोड गळ्यावर भजन करणारे असतील त्यांनीं भजनाचा थाट उडवून द्यावा, कारुनारूंनीं मंदिरास रंगसफेती द्यावी, पोरासोरांनीं रंगीबेरंगी कागदांच्या माळा, पताका टांगून गांव शृंगारावा असा सर्वांचा उत्साह एकत्र येऊन एकमेकांच्या संगतींत आनंद लुटावा असा प्रकार आढळतो. शेवटीं भंडाऱ्याच्या दिवशीं प्रत्येक कुटुंबानें आपल्या घरांतील शिधा आणून भंडाऱ्यांत सामील करावा किंवा सिद्ध व पक्व अन्न आणून त्याचा अन्नकोट करावा अशी रीत आढळून येते. या सर्व प्रकारांत स्वतःचें वैशिष्ट्य मिरविण्यापेक्षां सामुदायिक आनंद लुटण्याची वृत्तीच प्रामुख्यानें वावरत असते.

प्राचीन मराठी कवींमध्येंही असाच प्रकार आढळतो. ज्ञानदेवें रचिला पाया। तुका झालासे कळस ॥ हा संत बहिणाबाईचा अभंग सुप्रसिद्ध आहे. या अभंगांत संतांनीं निर्माण केलेल्या वाङ्मयाला मंदिराचीच उपमा दिली आहे. आणि या मंदिराच्या उभारणींत ज्ञानेश्वर आणि तुकाराम अशांसारख्या अव्वल दर्जाच्या संतकवींच्या कामगिरीचा प्रामुख्यानें निर्देश करण्यांत आला असला तरी या मंदिराच्या भव्यपणांत आणि कलाकुसरीस अनेक संतकवींनीं हातभार लावलेला आहे हेंच बहिणाबाईला आपल्या अभंगांत प्रतिपादन करावयाचें आहे. हे सर्व संतकवि एकमेकांविषयीं आदर बाळगीत आणि आपलें काव्य सजवितांना पूर्वकवींच्या काव्यांतील रमणीय कल्पना आपल्या काव्यांत घेण्यास त्यांना कमीपणा वाटत नसे.

पूर्वकवींच्या काव्यांचें परिशीलन किंबहुना पठणही असल्यामुळें त्यांतील कांहीं सुरस कल्पना व दृष्टांत हे अजाणतांही त्यांच्या काव्यांत उतरत असत. पण कांहीं वेळेला जुन्या काव्याचा नव्या काव्यांत उठलेला पडसाद अगदीं स्पष्टही असतो. साधुसंत येती घरा। तोचि दिवाळी दसरा ॥ ही तुकारामाची वाणी प्रसिद्ध आहे. पण पूर्वकालीन एकनाथाची ओवी पहा, म्हणजे साम्य तेव्हांच नजर येईल. " जैं माझे भक्त आले घरा। तैं सर्व पर्वकाळ आले द्वारां। वैष्णवा तो दिवाळी दसरा। तीर्थें घरापैं येती ॥ तुकोबानें एकोबाच्या वाणीलाच उजळा दिलेला नाहीं का? तसेंच साधूची समता वर्णन करतांना ज्ञानेश्वरांनीं

लिहिलें आहे—ऊस हा जसा पाणीं घालून जीवन देणाराला गोडी देतो तसाच तो त्याला चरकांत पिळून टाकणारालाही पण देतो. ना तरी इक्षुदंडु । पाळी तया गोडु ॥ गाळी तया कडू । नोहेच जेवीं ॥ आतां हाच दृष्टांत तंतोतंत मोरोपंतांच्या भारतांतही कसा आला आहे तो पहा—

'पाळी जो त्यासि मधुर इक्षु तसा त्याहि अदय जो गाळी ।'

मोरोपंतानीं वामनपंडिताची भक्तिरसज्ञ वामन स्वामी या शब्दांनीं मुक्तकंठानें स्तुति केलेली आहे. त्या वामनाच्या उक्तीचा प्रतिध्वनि मोरोपंतांच्या उक्तींत उमटलेला पुढीलप्रमाणें दिसतो. वामन लिहितो : "तुझा अतर्क्य महिमा न कळे अनंता" तर त्याच धर्तीवर मोरोपंत लिहितो कीं : "अतर्क्य महिमा तुझा गुणही फार बा हे विधि."

आद्यकवि मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांचे ग्रंथ हे त्यांच्यानंतर होऊन गेलेल्या कवींच्या नित्य पठणांत असत, त्यामुळें पहिल्या कवींच्यातले सरस असे दृष्टांत अनेकवेळां पुढील कवींच्या काव्यांत डोकावतांना आढळतात. वर ज्ञानदेवींतील ऊसाचा दृष्टांत दिला आहे. मुकुंदराजांच्या विवेकसिंधूंतील ऊसाचा दृष्टांत पहा. मुकुंदराज म्हणतात कीं, ऊस वरून काळा दिसला तरी आंत रस गोडच असतो म्हणून नुसत्या भाषेच्या बाह्यांगावरून ग्रंथाची योग्यता ठरवूं नये. ऊसु कीरु दीसे काळा । परि घेणें रसाचा गळाळा । तैसे बोल आरुष परी झळाळा । दीसे वीवेकाचा ॥ आतां हाच दृष्टांत गुरुचरित्रकार सरस्वती गंगाधर यानें आपल्या बदलत्या भाषेंत मांडला आहे. तो लिहितो : "ग्रंथ कराल उदास । वाकुडा कृष्ण दिसे ऊस । परि अमृत निघे त्याचा रस । दृष्टी द्यावी तयावरी ॥" आणखी एक सुंदर साम्य पहा. मुकुंदराज लिहितो, ज्ञानांचा तारुवीं बैसोनी । कृपेचे सुवायें पेलुनी । देवेचीं तारका होउनी । तारावें मातें ॥ हेंच रमणीय रूपक गुरुचरित्रांत जवळ जवळ अशाच शब्दांत आलेलें आहे. तें असें, "ज्ञाननौकीं बैसवोनी । कृपेचा वायु पालाणुनी । हृदये तारक करूनी । तारावें मातें ॥" चंद्रदर्शनानें भरती येण्याचा दृष्टान्त हा अनेकांचा आवडता आहे. मुकुंदराज लिहितो, मग बोलिला तो योगिंद्रु । बारे तूं पूर्णचंद्रु । माझा बोध समुद्रु । उल्हासीला तुवां ॥ गुरुचरित्रकारांच्या पुढें ही ओंवीच जणुं काय असावी अशा प्रकारचे त्यांचे

शब्द पडलेले आहेत. ते असे : मग काय बोले योगींद्र। बा रे शिष्या तूं पूर्णचंद्र। माझा बोधसमुद्र कैसा तुवां उल्हासवील॥ चोखामेळ्याच्या ऐसा भक्त राजगुंडा ज्याचा तिहीं लोकीं झेंडा। या वर्णनाचाच रामदासाच्या 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिंही लोकीं झेंडा। या उद्‌गारांत पडसाद पडलेला दिसत आहे ना? लांकड.सारख्या कठोर पदार्थांचा नाश करणारा भ्रमर हा कोमल कमलामध्यें मात्र गुरफटून जातो हा संस्कृत सुभाषितकारांचा मार्मिक दृष्टांत अनेकांनीं वापरलेला आहे. ज्ञानेश्वर लिहितात : "जैसे भ्रमर भेदी कोंडे। भल तैसे काष्ठ कोरडे। परि कळिकेमाजी सांपडे। कोवळीये॥" हाच दृष्टांत एकनाथ आणि तुकाराम यांनींही आदरिला आहे. एकनाथ लिहितात "जो शुष्क काष्ट स्वयें कोरी। तो कोंवळ्या कमळामाझारी। भ्रमर गुंतला प्रीतिवरी। केसरमाझारी कुचंबो नेदी॥" याच प्रकारचे उद्‌गार तुकारामानें काढले आहेत. "नाहीं काष्टाचा गुमान। गोंवी भ्रमरा सुमन."

होनाजी बाळाची 'घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला' ही भूपाळी फार लोकप्रिय आहे. त्यांतील 'मुक्तता होऊं पाहे कमळिणी पासुनि भ्रमरा। 'पूर्व दिशे मुख धुतले होतसे नाश तिमिरा', 'प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्ष्मी' 'नेमनिष्ट वैष्णव ते विष्णुपूजा समर्पिति। स्मार्त शिवार्चन सक्त शक्तिते शाक्तहि आराधिति' या पंक्तींतील विचार व दृष्टांत होनाजीच्या पूर्वी होऊन गेलेल्या श्रीधरकवीच्या हरिविजयांत आधींच कसे प्रगट झाले आहेत ते पहा. श्रीधर लिहितो कीं, पूर्व दिशेनें मुख धुतलें। आरक्त कुंकुम निढळीं रेखिले। पक्षि उडोनि चालले। भ्रमर कमळांतून मुक्त झाले॥ कापडी तीर्थपंथें जाती। भक्त प्रातःस्मरणें गर्जति। वैष्णव विष्णुतें चिंतिती। शैव ध्यातीं शिवातें॥ पण खुद्द श्रीधरानें आणि कदाचित होनाजीनेंही हे विचार मुक्तेश्वरी भारतांतून उसने घेतलेले असावेत. मुक्तेश्वराच्या वनपर्वांत प्रभातकालचें मोठें सुरम्य वर्णन आहे. त्यांत मुक्तेश्वर लिहितो : 'शेष वेंचता अठरा घटिका। पूर्व दिशेनें क्षाळिले मुखा। कुंकुम रेखिले त्या तिलका। अरुणोदय बोलिजे॥ कापडी चालले तीर्थपंथे। भक्त स्मरती हरिहराते। शाक्ति चिंतिती शाक्ति प्रतिमा। सौर म्हणती सूर्यचि आत्मा॥

कोणत्याही कवीनें सरस कल्पना एकादी मांडली म्हणजे कालांतरानें ती समाईक मालकीची समजली जाते व तिचा सर्रास उपयोग करण्यांत येतो. असाच प्रकार वर दाखविलेल्या साम्यांत दिसून येईल. ' मनाचे श्लोक ' म्हणजे रामदासांचे हेच सर्वांच्या परिचयाचे. पण मनाचे श्लोक ही संज्ञा रामदासांच्या पूर्वीपासून आहे. नामदेव व एकनाथ या दोन श्रेष्ठ कवींनीही मनाचे श्लोक रचलेले आहेत. लाजो नको मना हरीच्या कीर्तना। संसारा पाहुणा दो दिवसांचा ॥ व अरे अरे मना सत्य धरा ध्याना। पंढरीचा राणा वेध ठेवी तयाचा। हे नामदेव व एकनाथ यांचे अभंग पहा. हीच परंपरा वामन पंडितानेंही चालू ठेवली. त्याचेही मनाचे श्लोक आहेत. श्रीधरकवीनें पांडवप्रताप लिहितांना मुक्तेश्वरी भारताचा जणुं कित्ताच आपल्या डोळ्यापुढें ठेविला होता. यामुळें मुक्तेश्वराची छाया श्रीधरावर अतोनात पडलेली दिसते. आपलें काव्य सजविण्याकरितां जुन्या कवींच्या काव्यांतून सरस कल्पना उचलून घेणें हा आपला हक्कच आहे, ही आपली वडिलार्जित जिंदगीच आहे, असेंच ते मानीत.

जुन्या कवींचें काव्य अपुरें राहिलें असल्यास तें पुरें करण्याचाही प्रयत्न झालेला दिसतो. मुक्तेश्वराच्या भारतापैकीं पहिलीं चार म्हणजे आदि, सभा, वन आणि विराट हीं पर्वें व सौप्तिक पर्व एवढींच उपलब्ध आहेत. तेव्हां बाकींची उरलेलीं पर्वें लिहून सर्व भारत पुरें करण्याचा प्रयत्न ( प्रयोग ) विष्णुदासनामा या कवीनें केलेला आहे. श्रीधर कवीवर मुक्तेश्वराची छाप दाट पडलेली असली तरी श्रीधरानें मुक्तेश्वराच्या ओंव्या जशाच्या तशा आपल्या काव्यांत समाविष्ट केलेल्या नाहींत. पण तसें करणाराही एक कवी आढळतो. तो म्हणजे नागपूर जवळील रामटेकचा मैराळ नांवाचा कवी हा होय. यानें लिहिलेल्या विराटपर्वामध्यें मुक्तेश्वरी विराटपर्वांतल्या सुमारें पांचशे ओंव्या जशाच्या तशा उधृत केल्या आहेत असें मुक्तेश्वराच्या विराटपर्वाच्या संपादकानें दाखवून दिले आहे !

या प्रकारचें एक अत्यंत आश्चर्यकारक उदाहरण आढळतें. तें म्हणजे कृष्ण दयार्णव ह्या कवीचें. याला रक्तपितीची व्यथा होती, त्यावर एकनाथांनीं स्वप्नांत येऊन सांगितलें कीं भागवतामृत सेवन करा म्हणजे रोग हरण होईल. त्याप्रमाणें

कवीनें भागवतांतील कृष्ण चरित्रावर हरिवरदा नांवाच्या टीकेस प्रारंभ केला. पुढें भागवतांतील कथा रुक्मीणीहरणापर्यंत येऊन पोंचल्यावर ज्या प्रसंगावर एकनाथांनीं आपलें कलम चालविलें आहे त्याच प्रसंगावर आपण कलम चालविणें योग्य नव्हे, नाथांच्यासारखी तेजस्वी वाणी आपल्याला साधणार नाहीं, पण ग्रंथ संपूर्णतेच्या दृष्टीनें प्रसंग तर सोडतांही येत नाहींत, तेव्हां नाथांचेच रुक्मीणी-हरण कृष्ण दयार्णवानें आपल्या भागवत ग्रंथांत जसेंच्या तसें उतरून घेतलें आहे ! तात्पर्य मागच्या पिढीतील धन घेऊनच पुढच्यानि त्यांत भर टाकीत चलावयाचे असते. मात्र ते करीत असतां पितृऋणाचें स्मरण जागृत ठेवावे म्हणजे झाले.

—मौज १९४१, दिवाळी अंक.

: चवदा :

# माटे यांचें ' उपेक्षितांचें अंतरंग '

दलितांचीं सुखदुःखें हीं ललित वाङ्मयाचा विषय होऊं शकतात ही जाणीव वाङ्मयांत अलीकडेच उदय पावली आहे. या जाणिवेनें रंगविलेलीं जीं समाज-चित्रें आपल्या वाङ्मयांत दिसूं लागलीं आहेत, त्यांत प्रो. माटे यांनीं " उपेक्षितांचें अंतरंग ' या पुस्तकांत रंगविलेल्या चित्रांचें मोल आगळें आहे. दलित-वर्गाच्या अंतरंगाचें माटे यांनीं जितकें सूक्ष्म निरीक्षण केलें आहे आणि तें जितक्या सहृदयतेनें केलें आहे तितकें करण्याला लागणारा दलितांचा निकट परिचय फारच थोडया लेखकांना लाभला असेल. माटे हे नुसते वाङ्मयसेवक नसून समाजसेवक आहेत आणि त्यांचें वाङ्मय हें त्यांच्या समाजोद्धाराच्या तळमळीच्या पोटीं निर्माण झालेलें आहे. अस्पृश्यांना अक्षर ओळख देण्याच्या कामांत ते आज इतकीं वर्षे खस्ता खात आलेले आहेत कीं अस्पृश्योद्धार व माटे हीं नांवें महाराष्ट्रांत कायमचीं निगडित झालीं आहेत.

माटे हे उघड्या डोळ्यांनीं आणि प्रेमळ मनानें उपेक्षितांमध्यें वावरत आले असल्यानें, समाजाचें, म्हणजे पांढरपेशा समाजाचें, लक्ष ज्या वर्गाकडे क्वचित्च वळतें, अशा कातकरी, हेटकरी, महार, मांग, वडार, रामोशी, चोर, दरोडे-खोर या वर्गांतील स्त्री-पुरुषांच्या काळजाचा ठाव त्यांनीं अचूक घेतला आहे. ' उपेक्षितांच्या अंतरगां 'चीं पानें उलटीत तुम्ही त्यांच्या मागोमाग हिंडाल तर डोंगराच्या एका प्रशस्त फरसावर बसलेला सत्या रामोशी, त्याच्या त्या मन-गटासारख्या जाड झुपकेदार मिशा आणि त्यावरून आपली पालथी मूठ फिर-विण्याची त्याची ऐट, त्याच्या भोंवतीं कोंडाळें करून बसलेले यल्ल्या, पांज्या, नरसू वगैरे इमानी अनुयायी, अमावास्येच्या किर्र रात्रीं त्यानें इंदापूरकरांच्या वाड्यावर घातलेला अचानक दरोडा आणि घरांतील मालकीण सावित्रीबाई इनें

त्यांना जेऊं घालतांच अन्नदात्याचें इमान राखण्यांत त्यानें दाखविलेलें औदार्य, शिपायांनीं काढण्या बांधून चालविलें असतां दंडाच्या शिरा टराटर फुगवून काढण्या तोडून उसाच्या माजलेल्या फडांत त्यानें मारलेली मुसंडी, त्याची रखेली रुक्मी हिनें केलेला त्याचा विश्वासघात आणि शेवटीं फांशीची शिक्षा झाल्यावर न्यायाधीशाच्या तोंडावर ‘साहेब आम्ही चोर नाहीं, रामाच चाकुर म्हनुशान आम्ही रामवंशी मंजी रामुशी झालु’ अशी केलेली गर्जना हीं सर्व तुम्हांस पहावयास व ऐकावयास सांपडतील. तुम्ही खंडोबाच्या पालीच्या जत्रेला पूर्वी गेला असाल. पण जत्रेच्या ठिकाणीं तुम्हीं आम्ही पहातों, काय ? तर हरतऱ्हेचीं मेवामिठाईचीं व खेळण्याचीं दुकानें, जुगाराचे अड्डे, गरगर फिरणारे घोडे किंवा पाळणे, जादूचे किंवा डोंबाऱ्यांचे खेळ आणि देवळांतील पूजाअर्चा इतकेंच. पण खंडोबा हा मांगाचा देव असून या जत्रेंत आजूबाजूच्या चौऱ्याशींतील टिपून सारा मांग समाज येथें जमत असतो याची कधीं आपण वास्तपूस्त केली आहे ? हीं ‘ उपेक्षित दृश्यें ’ लक्षांत येण्यास माट्यांसारख्या चौकस दृष्टीचा आणि व्यापक सहानुभूतीचा वाटाड्या आपल्या टोळींत हवा.

ते बरोबर असले, म्हणजे मग मात्र या वरवर रानवट आणि मुर्दाड दिसणाऱ्या मांगांच्या मनांत देवभक्ति, श्रद्धा, आत्मविश्वास वगैरेचें तेज कसें धगधगत असतें तें आपणांस दिसूं लागावयाचें. चोरीमारी करून फरारी झालेले मांगही या जत्रेंत नेम न टाळतां यावयाचे, त्याचा गैरफायदा घेणारे गुप्त पोलिस भोंवती टेहळणी करीत असायचे आणि त्यांची जहिरी विषारी नजर समोर दिसत असतांहि—जीव धोक्यांत घालूनहि—हे मांग खंडोबाचा भंडारा चुकवावयाचे नाहींत ! भोळ्या निष्ठेच्या पायीं ते फशींहि पडत, पण त्यांची खंडोबावरील श्रद्धा मात्र अढळ ! अशा एका पिऱ्या मांगाचें चित्र मांट्यांच्या सांगातीं तुम्हांस पाहावयास सांपडेल.

अशीं कितीतरी चित्रें तुम्हांस येथे पहावयास सांपडतील. आई आणि बाप या दोघांच्याहि मायेस मुकलेला पोरका दीनवाणा पोर बन्सीधर तुम्हांस येथें दिसेल. उंची पोशाख केलेले स्त्रीपुरुष ऐटीनें वरखालीं येरझारा करीत असतां इतकी आंबट चेहरा करून तीन त्रिकाळ लिफ्टच्या दाराशीं बसून राहिलेला

आणि ज्याच्या नुसत्या अस्तित्वांची जाणीवही कोणी कधीं न दाखविलेल्या त्याच्या हातांत बक्षिसाची पावली टाकतांच मृदु हास्यानें कृतज्ञता व्यक्त करणारा लिफ्टमन तुम्ही येथें पहाल. रातदिन कावाडकष्ट करून नेकीनें वागून चार पैसे शिल्लक टाकून आपल्या बायकोला येला, गोठ, जोडवी असे दागिने घेऊन देणारा तवा, आणि स्वतःच्या कमाईतून शिल्लक टाकून तवाला रंगीत पैरण वा फेटा घेऊन देणारी त्याची बायको मंजुळा, त्यांचें एकमेकांवरील गाढ प्रेम, दिवसभर वेगवेगळ्या ठिकाणीं कामधंदा करावयास लागल्यानें त्यांच्या प्रेमाचा झालेला कोंडमारा हीं सर्व तुम्हाला येथें दिसतील. राजकीय चळवळींत सांपडून जन्मठेप सजा झालेल्या नवऱ्याच्या स्मृतींशीं एकनिष्ठ राहून त्याच्याकडून वर्षा–सामाशीं येणाऱ्या पत्रानें जिवाचें समाधान करून सासूसासऱ्याचा योगक्षेम चालविणारी आणि अंतीं नवऱ्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली असतांच प्लेगनें मृत्युमुखीं पडणारी सावित्री, व आपल्याकडे वांकडया नजरेनें पाहून चारगटपणें बोलणाऱ्या बाळा गवंड्यावर विजेप्रमाणें कडाडून त्याला वरमायला लावणारी मोलकरीण सई अशांसारख्या स्त्रियांचे अनेक नमुने तुम्हांस पहावयास सांपडतील. तें मुळांतच पहा.

या पुस्तकांतील लेखांना गोष्टी हें नांव दिलेलें असलें, तरी त्या सर्वांनाच लेखकानेंच म्हटल्याप्रमाणें गोष्टी हें नांव शोभेल असें नाहीं. गोष्ट म्हटली म्हणजे त्यांत मध्यवर्ती प्रसंग, त्याच्याभोंवतीं बांधेसूद अशी मांडणी अशी अपेक्षा असते. तशी ती येथें सर्वत्र सांपडणार नाहीं. ही आपलीं धांवती समाजचित्रें आहेत म्हणाना. कांहींना तर लघुनिबंधांच्या गोटांत घालावें लागेल. पण लागेना कां? या सर्व लेखांमध्यें उपेक्षितांच्या अंतःकरणांतील खळवळीची आणि त्यांच्या भोंवतालच्या बाह्य परिस्थितीची जीं जिवंत उठावदार चित्रें रेखाटलीं आहेत, तीं सर्वच अवीट गोड अशी वाटतात. मग तीं गोष्टी आहेत कीं निबंध आहेत, कीं आणखी कांहीं आहेत, हें तात्त्विक चर्चेच्या हिशेबी कांहीं ठरो; लेखक प्रस्तावनेंत लिहितो कीं, "लघुकथेचें कांहीं तंत्र आहे म्हणून ऐकतों आणि तें मला अजून माहीत झालेले नाहीं, म्हणून मी सध्यां एवढेंच धोरण ठेवलेलें आहे कीं, आपण लिहिलेला मजकूर सुरस वाटावा"

पण सुरसतेपेक्षां वेगळें तंत्र तें कोणतें ? आतां गोष्ट परिणामकारक वठण्याकरितां तंत्रांत किंवा तिच्या मांडणींत अनेक परी करून पहाण्याला वाव असतो हें खरें, तरी शेवट सुरस होणें हाच म्हणजे सुरसता साधणें हेंच सर्व तंत्रांतील राजतंत्र ! पुष्पाचें पुष्पत्व म्हणजे त्याचें सौरभ, मग तें सोनचांफा असो, वा हिरवा चांफा असो !

— रुइया कॉलेज, वार्षिक १९४५.

: पंधरा :

# गुरुशिष्यसंबंध

मानवी जीवनांत जी अत्यंत पवित्र प्रेमळ व जिव्हाळ्याचीं अशी नातीं आहेत त्यांत गुरुशिष्य नात्याचा अंतर्भाव होतो. या नात्याची ज्या नात्याशी तुलना करितां येईल अशी फक्त दोनच दुसरी नातीं आहेत. ती म्हणजे माता व मूल आणि पति-पत्नी यांची नातीं होत. आणि तिन्हीमध्यें साम्यहि विलक्षण आहे. मातेचा जसा मुलावर परिणाम होत असतो तशाच प्रकारचा परिणाम गुरूचा शिष्यावर होत असतो ते सांगत बसण्याची आवश्यकता नाहीं. मूल हें सर्वस्वीं मातेचीच देणगी होय. मातेचा मुलावरील परिणाम हा मूल पोटांत असल्या-पासूनच सुरू होतो. त्याचा देह व मन ही तिच्या अन्नरसांतूनच निर्माण होत असतात म्हणूनच मातांनीं ह्या अवस्थेंत शुद्ध पवित्र आचार विचार राखावे ह्याविषयीं शास्त्रकारानीं बजावलें आहे. मातेच्या पोटांतून बाहेर आल्यावर कांहीं महिने तर मूल सर्वस्वी मातेवरच अवलंबून असतें आणि नंतर कांहीं वर्षे मुलांचा वेळ जास्तींत जास्त कोणाच्या संगतींत जात असेल तर तो मातेच्याच. आजूबाजूच्या जगाचे हरतऱ्हेचे ठसे त्याच्या ओल्या मनावर उठत असतात. मनाला आकार आणीत असतात. या बाल्य ठशांत मातेचा ठसा अत्यंत प्रभावी होय. मूल भित्रें निघावयाचें कीं धीट निघावयाचें वगैरेसारख्या महत्त्वाच्या बाबींची रूपरेषा बरीचशी याच वेळीं आंखली जात असते व तींत आमूलाग्र फरक पुनः केव्हांही होत नाहीं. बरीचशीं म्हणण्याचें कारण कांहीं गुणदोष मूळ पिंडगत असतात हेंही मान्य केलें पाहिजे हें होय.

पतीचा पत्नींवर होणारा परिणामही असाच चिरंतन स्वरुपाचा असतो. पति-पत्नींचा संबंध अशा वयोवस्थेंत जडला जातो कीं ज्या वयांमध्यें शरीरकोषांत व मनःकोषांत महत्त्वाचे फेरफार घडून येत असतात. पती हाच पत्नीचा या वेळीं आदर्श पुरुष असतो व त्याच्या आवडी-निवडी, चालचलणूक, आचार-विचार ही पत्नीच्या आयुष्यांत न कळतच प्रतिबिंबित होत असतात व तिच्या भावी आयुष्याचा ताणाबाणा याच वेळीं कायम केला जातो.

अशाच प्रकारचा चिरंतर संस्कार गुरुचा शिष्यावर होत असतो. उपनयन संस्काराला जें महत्त्व प्राप्त झालें तें याचेंच निदर्शक होय. पूर्वींच्या काळचे अनेक संस्कार लुप्त झाले असतां जे दोनच संस्कार अद्याप कायम ठाणें मारून उभे आहेत ते म्हणजे विवाह आणि उपनयन. हे दोन्ही संस्कार तुल्यबळ होत. कारण दोन्हींनीं पूर्व आयुष्याला सर्वस्वीं निराळे वळण लागत असते. वधूने वरा सांगातीं सात पावलें टाकलीं कीं, तिचें पूर्व आयुष्य समाप्त होऊन सर्वस्वीं नव्या आयुष्यास प्रारंभ होतो, पूर्वाश्रमीची आठवणही पुसून टाकण्याकरितांच जणू कांहीं ती आपलें नांव बदलते, बापाच्या जिंदगीवरील वारसा हक्कावर पाणी सोडते इतकेंच काय पण माहेरच्या माणसांचे सोयेर सुतकही पाळीत नाहीं. यापुढें ज्या नव्या कुलांत तिनें प्रवेश केलेला असतो ह्या कुलांतील कुलाचार, रीतभात, देवदेवळें वगैरे सर्व ती स्वीकारतें आणि लवकरच या नव्या कुलांशीं तद्रूप होऊन जाते.

उपनयन संस्कारानेंही बटूच्या आयुष्यक्रमांत प्राचीनकाळीं अशाच प्रकारचे परिवर्तन घडत असे. अध्ययनास योग्य वय प्राप्त झालें असतां बटूला गुरूच्या घरीं आणून सर्वस्वीं गुरूच्या हवालीं करण्यांत येई. गुरू त्याचें मौजींबंधन करून पूर्वींचें नांव बदलून नवें नामकरण करी. पुढें हा बटू गुरुच्याच घरीं व त्यांच्याच कुटुंबांचा जणू घटक अशा नात्यानेंच त्याच्या घरीं वावरे व गुरूही त्याच्या शिक्षणाचाच केवळ नव्हे तर त्याच्या अन्नाच्छादनाचाही भार आपल्या शिरावर घेई. अशा रीतीनें सुमारें दहा पंधरा वर्षें शिष्य हा गुरुशीं व गुरुच्या कुटुंबांशीं एकरूप झालेला असावे. आणि ही दहा पंधरा वर्षें म्हणजे मुलांच्या आयुष्यांतील अत्यंत संस्कारक्षम अशी वर्षें होत. अठरा वीस वर्षें उलटून जाई-

पर्यंत माणूस सज्ञान झाला असें मानण्यांत येत नाहीं. तोंपर्यंत त्याच्या शरीराची वाढ होत असते. मनाच्या विविध शक्ति विकसित होत असतात. प्रत्यक्ष अनुभवानें व्यावहारिक ज्ञानाचें बीजारोपण होत असतें. तारुण्यांत पदार्पण करणाऱ्या वयांतील मन म्हणजे ओली माती होय. तींवर जसे संस्कार होतील त्याप्रमाणें वानर वा विनायक तींतून निर्माण व्हावयाचा. मूळ पिंडगत गुणांत परिवर्तन होत नसलें तरी त्यांतील गुणांचे विकसन व अवगुणांचे आच्छादन व तेणेंकरून आयुष्याला इष्टानिष्ट वळण लागणें तें याच वयोवस्थेंत लागत असतें. या वयांत स्वभावांला जो घाट येतो तो पुढें बदलत नाहीं. शाडू खडक वाळली नाहीं तोंवर मूर्तीवर हात फिरवितां येतो व तिचे रूप अधिक नीटस करिता येतें. पण एकदां वाळली म्हणजे चेहरेपट्टी वज्रलेप होऊन जाते व मग रंगांरंगोटींत काय फरक पडेल तेवढाच. तीच स्थिती गुरुकुलांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांची. तेथून बाहेर पडण्यापूर्वींच त्याच्या मनाला नामरूप प्राप्त झालेलें असते. जगाकडे पहाण्याच्या दृष्टीची दिशा बहुशः ठरलेली असते. आवडी निवडीचे घुमारे डोकावूं लागलेले असतात. भावी यशापयशाचें बीजारोपण होऊन चुकलेलें असतें. तेव्हां जे संस्कार या वयांत आपण शिष्याच्या मनोभूमीवर करूं त्यांची इष्टानिष्ट फळें आमरणान्त त्यांस चाखावी लागणार आहेत हें अहर्निश ध्यानी बाळगून गुरुनें शिष्याशीं वर्तन ठेवलें पाहिजे. जेथे पूर्वींच्या पद्धतीप्रमाणें शिष्य गुरुच्या गृही अथवा गुरुच्या देखरेखीखालीं गुरुच्या सन्निध गुरुकुलांत राहतो तेव्हां गुरुचा छाप शिष्यावर मोठा वठत असतो. पण जेथें चार पांच तासच शिष्य गुरुच्या सन्निध घालवितो तेथेंही शिष्याच्या बुद्धीला व भावनांना वळण लावण्याच्या बाबतींत गुरुला पुष्कळ करतां येणें अशक्य नसतें.

ज्ञानदान व शीलसंवर्धन या दोन फार थोर देणग्या गुरुनें शिष्यास अर्पण करावयाच्या असतात.

**ज्ञानदान म्हणजे हरएक प्रकारचें ज्ञान शिष्यांस तयार पुरविणें असा अर्थ नव्हे. असें पुरवून कोण किती पुरविणार व ते किती पुरें पडणार ? तर शिष्याच्या मनामध्यें ज्ञानाची आवड उत्पन्न करणें, त्याच्या बुद्धीची भूक वाढविणें अथवा त्याच्या चौकसपणाला फुलविणें ही क्रिया महत्त्वाची होय.** जठरांत अग्नी

पेटलेला नसेल तर पोटांत लोटलेले अन्न पचत नाहीं. तसेंच गुरुनें शिष्याची जिज्ञासा जागृत न करतां शिष्यापुढें केलेलें प्रवचन गुरुच्या ओठांवरूनच वाऱ्यावर विरून जातें .अर्थात् गुरुनें शिष्याची ज्ञानलालसा वाढविली पाहिजे आणि ती वाढवावयाची म्हणजे खुद्द गुरुनेंच आधी ज्ञानाचा हव्यास जागविला पाहिजे. भारद्वाज ऋषीची वैदिक वाङ्मयांतील गोष्ट आहे कीं, या ऋषींनीं उभे तीन जन्म वेदाध्ययनांत घालविले आणि चौथा जन्म मिळाला तर काय कराल असें विचारलें तेव्हां ते उद्गारलें कीं, ‘ तोही पण वेदाध्ययनांतच घालवीन. ’

ज्ञानलालसेबरोबरच चिकित्सक वृत्तीचीही जोपासना करणेंही आवश्यक आहे, म्हणजे ज्ञान अथवा हरतऱ्हेची माहिती नुसती मिळेल तितकी ओरपून घेण्याची प्रवृत्ति न माजतां त्यावर स्वतंत्र विचार करण्याची संवय लागेल. ती लागणें असेल तर गुरूनें शिष्याला कसलाही प्रश्न विचारण्याला मनाई करूं नये, कोणत्याही प्रश्नाचें उत्तर देण्याचें टाळू नये आणि स्वतःस माहीत नसेल तेव्हां प्रांजळपणें तसें कबूल करण्यास कचरूं नये. गोपथ ब्राह्मणामध्यें मौद्गल्य व मैत्रेय अशा दोन आचार्यांची गोष्ट आहे. या दोघांमध्यें कांहीं विद्येसंबंधीं वाद झाला. त्यांत मैत्रेय हरला तेव्हां त्यानें केलें काय ? तर आपल्या शिष्यांना पढविण्याचें ताबडतोब बंद केलें व म्हणाला, जोंपर्यंत मलाच ही विद्या येत नाहीं तोंपर्यंत मी तुम्हांस शिकविण्याचें पाप करूं इच्छित नाहीं. असें म्हणून त्यानें आपल्या विद्यार्थ्यांना निरोप दिला व स्वतः मौद्गल्याच्या आश्रमांत जाऊन त्याचें शिष्यत्व स्वीकारून राहिला. प्रांजलपणाचा हा नमुना हेवा वाटण्यासारखा नाहीं काय ?

**चिकित्सावृत्ति जागृत ठेवावयाची तर कोणताहि प्रश्न टाळूं नका. मोठे जाचक आणि नाजूक प्रश्न कित्येक वेळां विचारले जातात पण विचारणारा कुचेष्टेखोर नाहीं अशी खात्री असेल तेव्हां कोणत्याही प्रश्नांचीं उत्तरें प्रांजलपणें व गंभीरपणें देणें अशक्य नसतें. उत्तरें देणें अशक्य असलें किंवा अवघड असलें तरी चिडखोर वृत्तीला मुळींच थारा देतां कामा नये. उलट थोड्या विनोदवृत्तीला जवळ केल्यास तिच्या सांगातीं काट्याकुट्यावरून उड्या मारत सहज जातां येईल.** शिष्य प्रश्न विचारतो तो स्वाभाविक जिज्ञासेनें विचारतो अशीच भावना बाळगिली पाहिजे. एकदां

गुरुजी काशी गया करून आले होते. क्षौर केल्यामुळें चेहरा अगदींच निराळा दिसूं लागला होता. अशा स्थितींत वर्गांत शिरतांच शिष्यांना हंसू न फुटलें तरच नवल. तर या वेळीं शिक्षकानें त्यांच्या हसण्यांत सामील होणें हाच खरा उपाय होता. व तोच गुरुजींनी अवलंबिला. त्यांनीं प्रथम आपल्या विद्रुप चेहऱ्याचें थोडें विनोदी वर्णन केलें व नंतर क्षौर कां करावें लागले वगैरे समजावून सांगितलें. त्यामुळें नैसर्गिक कुतूहल वृत्ति मारली न जातां तिला योग्य वळण मिळालें.

ज्ञानज्ञानापेक्षांही शीलसंवर्धनाची जोखीम अधिक महत्त्वाची होय. **या शीलसंवर्धनाचे मुख्य सूत्र म्हणजे आधि केलें, मग सांगितलें हें होय. जे जे गुण शिष्यांच्या अंगीं बाणावे अशी इच्छा असेल ते ते गुण गुरुच्या रोजच्या आयुष्यक्रमांत प्रतिबिंबित झालेले पाहिजेत. शिष्याचें शील सुसंस्कृत बनवावयाचें असेल, त्याला शिस्त लावावयाची असेल तर गुरुनें स्वतः अनेक पथ्यें संभाळलीं पाहिजेत.** वर मीं गुरुशिष्यसंबंधाला माता-मूल यांच्यातील संबंधाची उपमा दिली. तर माता ही आपल्या मुलाला आरोग्य लाभावें म्हणून किती पथ्य पाळतें हें ध्यानी आणा. मुलाला थंडी होऊं नये म्हणून स्वतः कोमट पाणी पिते आणि मुलाला अपचनाची बाधा लागूं नये म्हणून मनापासून आवडत असतांही वावडे पदार्थ सोडून देते. हीच वृत्ति गुरूनेंही स्वीकारली पाहिजे. या पथ्यापैकीं एक दोन महत्त्वाच्या पथ्याचा निर्देश करतो. मुख्य पथ्य म्हणजे 'आधि केलें मग सांगितलें' हें होय. गुरुनें शिष्यांना कांहीं श्लोक पाठ करून यावयास सांगितले आहेत असा एक साधा प्रसंग घ्या. आतां शिष्यानें जर ते तोंडपाठ म्हणून दाखवावयाचे तर गुरुनें ते तोंडपाठ आधी केले असणें अवश्य आहे. शिष्य अडखळला असतां गुरुला तत्काळ तोंडीं पुढचें सुचवितां आले नाहींत आणि पुस्तक उघडून पहावें लागलें म्हणजे गुरुची पुण्याई तितक्या अंशानें क्षीण झाल्याशिवाय राहत नाहीं. स्वतःला पाठ येत नसतां जर गुरु शिष्यावर गुरगुरु लागला तर त्या गुरगुरण्याला व्यासपीठापेक्षां गोठ्याचाच वास मारूं लागतो.

दुसरें पथ्य म्हणजे गुरुजनाविषयीं सामुदायिक अशी आदरभावना उत्पन्न करणें हें होय. या महत्त्वाच्या बाबीचें उल्लंघन कित्येक वेळां शिक्षकांच्या हातून होत असतें ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. शिक्षकांनीं एकमेकांची अपरोक्ष निंदा करावी व ती शिष्यांच्यासमोर करावी यापरतें अधिक उद्वेगजनक तें काय असणार? पण संध्याकाळीं घरीं आल्यावर गुरुभोंवतीं त्याच्या खास आवडत्या शिष्यांचे कडें पडलेलें असावें, मग शिष्यांनीं दुसऱ्या गुरूच्या कागाळ्या सांगाव्या आणि या गुरूनें त्या भिटक्या मारीत ऐकाव्या असले प्रकार तुम्ही पाहिले नाहींत काय? या प्रकारानें तत्कालिक अहंकाराला गुदगुल्या होऊन सुख वाटत असतें पण शिष्यांच्या मनांतील आदरभावना नासून टाकल्यानें तिची घाण शेवटीं तुम्हांलाच चिकटल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून सर्व शिक्षकवर्गाविषयीं आदर उत्पन्न होईल याविषयीं सर्वांनीच जपलें पाहिजे.

आणखी एक अत्यावश्यक पथ्य म्हणजे गुरुनें शिष्याची कुचेष्टा, हेटाळणी या पासून अलिप्त राहणें हें होय हेटाळणी करण्यास उद्युक्त होणें म्हणजे व्यासपीठावरील स्वतःची उच्च भूमिका विसरून शिष्यांच्या हमरीतूमरींत मिसळणें होय. लहान मुलांच्या बाबतींत तर विशेष लक्षांत घेतलें पाहिजे ते हे कीं त्याला उपरोधिक भाषा समजतच नाहीं. आणि त्यामुळें ज्या अपेक्षेनें ती वापरली जाते तिच्या अगदीं विपरीत परिणाम झालेला अनेकवेळां पहावा लागतो. एका घरीं आंबरस केला होता. आईनें मुलाला सामान्यपणें जितका घालावयाचा तितका म्हणजे तीन चार वाट्या रस घातला. पण मूल आणखी पाहिजे म्हणून हटून बसलें. शेवटी आईनें त्रागा करून सगळें पातेलेंच त्याच्यापुढें आदळलें व 'खा मेल्या, सगळं पातेलंच खा एकदांचा' असे म्हणून पातेलें त्याच्यापुढें सारून आपण दुसऱ्या कामास निघून गेली. थोड्या वेळानें येऊन पहाते तों मुलाचें सगळे आंग बरबटून घेतलेले व ओकेपर्यंत रस चापलेला! मुलाला वाटलें आईनें खरोखरीच सगळें पातेलें आपल्या हवाली केलें. तात्पर्य अशा प्रसंगीं उपरोधाचा अवलंब न करणेंच श्रेयस्कर.

गुरुशिष्याच्या संबंधांत शिक्षेचा उल्लेख करणें अपरिहार्य आहे. तेवढा करून पुरें करतो. शिक्षण आणि शिक्षा यांचें साहचर्य अखंड आहे. शिष्यांच्या आयु-

ष्यांत असे प्रसंग सामान्यपणें आल्याशिवाय राहत नाहींत कीं ज्यावेळीं शिष्याच्याच हिताच्या दृष्टीनें गुरुजींना शिक्षेचा अवलंब करावाच लागतो. अशा वेळीं शिक्षा ही केलीच पाहिजे. योग्य वेळीं आणि योग्य कारणाकरितां शिक्षा केली असतां शिष्यांच्या मनांत गुरुविषयीं अनादर उत्पन्न होण्याची मुळींच भीति नाहीं. शिक्षेच्या बाबतींत गुरूनें मातेचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवावें. मुलानें खोडी केली असतां माता मुलाला चोप देते, कांहीं वेळेला चांगला कडक चोप देते; मूल कांहीं वेळ फुरंगटून बसतें, बोलत नाहीं. पण कांहीं वेळानें आपसूखच आपण होऊन आईच्या कुशीत शिरतें व तीही थोड्या वेळापूर्वीचा प्रसंग विसरून त्याला कुरवाळूं लागते व क्षणार्धांत दोघे एकरूप होतात व जसें कांहीं झालेंच नाहीं अशा रीतीनें पुनः आपआपल्या उद्योगास लागतात. हीच वृत्ति गुरुने स्वीकारली पाहिजे. शिक्षा करावयाच्या प्रसंगीं अवश्य केली पाहिजे पण तदनंतर शिष्य पुनः नम्रभावानें आला असतां त्याला मोकळ्या मनानें जवळ घेतला पाहिजे. म्हणजे क्षणार्धांत दोहोंच्याही मनांतील किल्मिष झडून जाऊन प्रेम आणि आदर यांचें साम्राज्य प्रस्थापित होते. असे साम्राज्य ज्या ठिकाणीं अवतरले असेल तेथेंच सद्विद्या आणि सच्चारित्र्य अवतीर्ण होतात.

—वऱ्हाड शाळापत्रक, जून १९३६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. (स्थळ प्रत)
७७६५
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम ७५६५२ वि: निबंध
क्रमांक २७०२ नों दि: २०।३।६९

# शास्त्रीय पारिभाषेचा बागुलबुवा

शास्त्रीय परिभाषेची उणीव ही मराठींतून सर्व विषय शिकविण्याच्या मार्गांतील एक महत्त्वाची धोंड म्हणून नेहमीं पुढें करण्यांत येते. भौतिक शास्त्रें सोडलीं तर तत्त्वज्ञान, इतिहास, अर्थशास्त्र, राजशास्त्र वगैरेंतील परिभाषा त्या त्या विषयांतील प्रौढ विचार प्रगट करण्याइतपत मराठींत आजही तयार आहे. असें असतांही ते ते विषय आज कॉलेजमध्यें इंग्रजींतूनच शिकविले जातात. पण ते उद्यां मराठींतून शिकवावयाचे म्हटलें तर शिकवितांच येणार नाहींत असा वाद कोणी घालणार नाहीं. मराठींतून शिकविल्यानें इंग्रजी भाषेचें ज्ञान आधींच तुटपुंजें आहे तें आणखी घसरेल, किंवा परप्रांताशीं वा परदेशाशीं व्यवहार करितांना अडचणी डिंवचू लागतील, किंवा संकुचित प्रांताभिमान अधिक आवळला जाईल, अशा कल्पनांनीं घेरल्यामुळें मराठी भाषेचा पुरस्कार करण्यास कोणी कोणी कचरतात. पण अशांचाहि रोख असें म्हणण्याचा नसतो कीं, कोणत्याहि प्रौढ विषयाचें प्रतिपादन करण्याचा मगदूरच मराठी भाषेंत नाहीं.

आणि तसें कोणी म्हणूं तरी कसें शकेल ? राजवाडे, खरे, सरदेसाई, यांचें लिखाण डोळ्यापुढें असतांना इतिहासाची प्रौढ चर्चा मराठींत करतां येणार नाहीं अशी शंका येईलच कशी ? आणि तत्त्वज्ञान किंवा अध्यात्म या विषयांसंबंधीं बोलावयाचें, तर ज्ञानेश्वरांपासून टिळकांच्यापर्यंत मराठी ग्रंथकारांनीं या विषयांतील भाषा इतकी उत्कृष्ट रीतीनें कमावून ठेवली आहे कीं, या विषयांतील कोणताहि प्रौढ विचार प्रगट करण्यास मराठी भाषा लुली आहे, असें उच्चारण्यास जीभच वळणार नाहीं. तोच प्रकार राजकारण, अर्थशास्त्र वगैरे विषयांचा.

या विषयांची भाषा वर्तमानपत्रांच्या ऐरणीवर अहर्निश ठोकून घडविली जात आहे. क्वचित ती ओबड धोबड दिसली तरी तिच्यांतूनच नवीन नवीन सुबक नग बाहेर पडत आहेत. पहिल्या महायुद्धाच्या काळीं पाणबोट, हवाईदल, असें कितीतरी शब्द प्रथमच नांवारूपास आणले गेले. ही नित्याच्या व्यवहाराची भाषा शब्दांकरितां कधीं अडून बसलेली नसते. वेळेच्या दडपणाखालीं जो शब्द सुचेल तो घेऊन ती व्यवहार चालू ठेवते. अशांतूनच हळूहळू योग्य अशी परिभाषा निर्माण होत असते. अयोग्य, अपक्व असते ती जीवनकलहांत निखळून पडून जाते. पण परिभाषा सिद्ध नाहीं म्हणून कोणी अडून बसत नाहीं. हाच न्याय कमी अधिक प्रमाणांत सर्वच विषयांना लागू पडत असतो.

पण भौतिकशास्त्रांना तो लागू करितां येईल कीं नाहीं याबद्दल मात्र प्रामाणिक शंका सुचण्यासारखी असते. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, अध्यात्मशास्त्र, साहित्यशास्त्र हे सर्व विषय आज कॉलेजांत इंग्रजींतच शिकविले जातात हे खरें. पण उद्यां ते सर्व मराठींतून शिकवावयाचे म्हटलें तर तें मोठें जड जाईल, असा पक्ष कोणीच मांडणार नाहीं. तथापि रसायन, पदार्थविज्ञान, वगैरेसारखीं शास्त्रें उद्यां मराठींतून शिकविण्याचें ठरलें तर तीं शिकवितां येतील कीं नाहीं, याबद्दल मात्र प्रामाणिक शंका येण्यासारखी आहे. हीं शास्त्रें पूर्वीं आपणांमध्यें होतीं, पण त्यावेळीं बाल्यावस्थेंत होतीं. त्यांची त्यावेळची तोकडी भाषा आजचा त्यांचा प्रौढ व्यवहार चालविण्यास पुरी पडणार नाहीं. या शास्त्रांची जोपासना आज पाश्चात्य राष्ट्रांमध्यें होत आहे व त्यांतील परिभाषा अर्थातच पाश्चात्य भाषांना मातृस्थानीं असणाऱ्या ग्रीक, लॅटिन भाषांच्या अनुरोधानें बनविली जात आहे. ती आपणांस सर्व नवीच आहे. मराठींत परिभाषा तयार नाहीं. तेव्हां असले विषय उद्यां मराठींतून शिकवावयाचे म्हटलें तर हें जमायचें कसें ?

या प्रश्नाचें उत्तर देण्याचा अधिकार ह्या भौतिक शास्त्राचें अध्यापन जे करीत आहेत त्यांचा आहे. इतरांचा नाहीं. पण त्यांनींच जर खणखणीतपणें सांगितलें, कीं ' उद्यांपासून हे विषय मराठींतून शिकवा असें जर ठरवाल तर उद्यांपासून शिकविण्यास आमची तयारी आहे ! ' तर मग हा प्रश्न निकालांतच

निघाला म्हणावयाचा. पण असें आव्हान स्वीकारणारी मंडळी आहेत का? हो! आहेत तर. आणि म्हणून तर या चार ओळी मी मुद्दाम लिहीत आहें. ही मंडळी त्या त्या विषयांतील उच्चतम शिक्षण देणारी अशी आहेत. त्यांचे विचार नुकतेच मला समक्ष ऐकण्यास सांपडले.

गेल्या महिन्यांत टिळक विद्यापीठाच्या कार्यवाहांनीं एक खाजगी सभा बोलावली होती. टिळक विद्यापीठाचें विशेष असें कार्य सध्यां कांहींच नसल्यानें त्या विद्यापीठानें एकादा नवीन उपक्रम हातीं घ्यावा, अशी सूचना विद्यापीठाच्या हितचिंतकांकडून करण्यांत आली. तदनुसार परिभाषिक शब्दकोशाच्या रचनेचें काम विद्यापीठानें हातीं घ्यावें असें ठरून त्या योजनेबाबत तज्ञांचीं मतें अजमाविण्याकरितां पुण्यास व मुंबईस खाजगी सभा बोलावण्यांत आल्या होत्या.

मुंबईच्या सभेस रॉयल इन्स्टिटयूटचे प्रि. परांजपे, व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयूट्चे प्रि. जोशी, प्रो. धारप, प्रो. केळकर, मेडिकल कॉलेजचे डॉ. परांजपे, डॉ. कुरुलकर, व सिडनहॅम कॉमर्स कॉलेजचे प्रो. नातू वगैरे मंडळी उपस्थित होती. कार्यवाहांनीं आपली पारिभाषिक शब्दकोशाची योजना समजावून सांगितली व त्याबाबत योग्य सल्ला व मदत देण्याविषयीं विनंति केली. अशा प्रकारच्या उपक्रमाला जरूर ती मदत करण्यास सर्व मंडळी तयार होती. योजनेबद्दलच्या सहानुभूतिबद्दल दुमत असण्याचें कारणच नव्हतें. पण चर्चेमध्यें मुख्य प्रश्न निघाला तो असा कीं, आजवर रसायनादि भौतिक शास्त्रांवर मराठींमध्यें वाङ्मय जें निर्माण झालें नाहीं तें कोशाभावीं झालें नाहीं कीं अन्य कांहीं कारणानें? किंबहुना, आधीं कोश कीं आधीं वाङ्मय?

कोशाच्या उपयुक्ततेविषयीं वाद नसला तरी आधीं कोश व मग वाङ्मय हा प्रकार 'आधीं कळस मग पाया रे' या जातीचा नाहीं का? कोश पुढें ठेवून वाङ्मय निर्माण करण्याचा प्रयत्न झाला तर तें वाङ्मय रुक्ष आणि बोजड झाल्याविना राहणार नाहीं. समर्पक शब्द सुचतात ते विवेचनाच्या ओघांत सुचत असतात. अशा प्रसंगीहि क्वचित् कोशापासून मदत होईल ती अवश्य घ्यावी. पण कोणत्याहि एका शास्त्राची कोशगत परिभाषा पुढें ठेऊन त्या विष-

याचें समग्र विवेचन करण्यास कोणी प्रवृत्त होईल तर त्याचें लिखाण बोजड होण्याचाच फार संभव. अशा प्रयत्नानें भाषांतरदेखील साधणार नाहीं. विवेचनाचा ओघ ही मुख्य महत्त्वाची गोष्ट. इंग्रजींत ज्या ज्या क्रियेला किंवा वस्तूला शब्द आहे त्या त्या ठिकाणीं मराठींत प्रतिपारिभाषिक शब्द योजणें, या दिशेनें केलेला प्रयत्न रुक्ष व म्हणूनच निष्फळ झाल्याविना राहणार नाहीं. प्रतिशब्द म्हणून बरोबर नेमका एक शब्द सुचो वा न सुचो प्रतिपाद्य विषयाचा आशय मराठींत उतरला म्हणजे झालें हें धोरण ठेवलें पाहिजे. कांहीं नवे शब्द विवेचनाच्या ओघांत आपोआप सुचतील. व जेथें असा नवा शब्द सुचणार नाहीं तेथें तसा सुचेपर्यंत मूळचाच इंग्रजी शब्द तसाच वापरला म्हणूनहि मोठेंसें बिघडत नाहीं. प्राचीन कालींहि आपल्या पूर्वजांनीं ज्योतीषा-मध्यें होरा द्रेष्काणकेंद्र, त्रिकोण वगैरे सारखे पांच पंचवीस परकीय शब्द जसेच्या तसे घेतलेच कीं नाहीं ? असल्या थोड्या शब्दांनीं भाषेची प्रकृति ढासळत नाहीं. तेव्हां परिभाषेकरितां अडून बसण्यांत अर्थ नाहीं. कोशाचेंही वर्धन सुरूं पाहिजे व ते चालू आहे हें समाधानकारक होय.

दुसरें असें कीं परिभाषानिर्मितीचे प्रयत्न यापूर्वीं झालें नाहींत असें नाहीं पण जे झालें त्या प्रमाणांत ग्रंथनिर्मिती मात्र झालेली नाहीं. आणि जेव्हां ग्रंथनिर्मितीची हौस होती तेव्हां परिभाषेच्या अडचणीला अवास्तव महत्त्वहि फारसें देण्यांत आलेलें आढळत नाहीं. आज शंभर वर्षांत मराठी भाषेची कार्यक्षमता नवीन कल्पना व्यक्त करण्याच्या बाबतींत पुष्कळ वाढवलेली आहे. पण शंभर वर्षांपूर्वीं अव्वल इंग्रजींत पाश्चात्यांचें शास्त्रीय ज्ञान मराठींत आणण्याचा जो प्रयत्न झाला त्यावेळीं परिभाषेकरितां कोणी अडून बसला नाहीं. इंग्रजी अंमल सुरूं झाल्यावर अवघ्या पंधरा वर्षांनीं हरि केशवजी या नामांकित ग्रंथकारानें सिद्धपदार्थ विज्ञान विषयक संवाद, या नांवाचा, मोठ्या आकाराचा, तीन चारशें पानांचा ग्रंथ लिहीला. आधीं तो विषय साहेबाकडून समजून घ्यावयाचा व नीट ध्यानीं उतरला म्हणजे आपल्या साध्यासुध्या भाषेंत मांडावयाचा म्हणजे केवढा खटाटोप. पण तो अंगिकारला म्हणूनच तो ग्रंथ आजहि वाचण्यासारखा उतरला आहे.

शंभर वर्षांपूर्वींचा हा उपक्रम तसाच चालू राहिला असता तर आज मराठींत शास्त्रीय वाङ्मय चांगलें नांवरूपाला आलें असतें. पण शिक्षणाची बोधभाषा

इंग्रजीच असावी, असें सरकारचें धोरण एकदां निश्चित झाल्यावर ग्रंथनिर्मितीचा झरा आटून गेला. कॉलेजांत सर्व विषय इंग्रजींतून शिकवावयाचे तर शास्त्रीय प्रौढ ग्रंथ मराठींत लिहीण्याची यातायात कराच कशाला ? आणि केली तरी ते ग्रंथ वाचणार कोण ? तात्पर्य, शास्त्रीय ग्रंथाची वाण आहे ती शास्त्रीय विषय मराठींतून शिकविण्याची संधी मिळत नाहीं या आपत्तीचें फळ होय, पारिभाषिक कोषाच्या अभावाचें नव्हे, असा निष्कर्ष त्या दिवशींच्या सभेंत काढण्यांत आला. म्हणजे पारिभाषिक कोषाचें महत्त्वच नाहीं असें सुचविण्याचा आशय नव्हता, तर वाङ्मय आधीं व कोश नंतर या मुद्यावर जोर होता. पण कोश तयार आहेत तरी वाङ्मय तयार नाहीं अशी स्थिती आहे. ती स्वराज्यांतच पालटेल. सर्व प्रकारचे शास्त्रीय विषय सर्व कॉलेजांतून उद्यां मराठींत शिकविण्यास सुरवात झाली तर ते विषय शिकविणाऱ्या अध्यापकांना सुचतील ते शब्द वापरून निर्वाह करावाच लागेल. पण अशा रीतीनें विषय प्रतिपादनाला तोंड लागलें म्हणजे त्या ओघांत शब्द स्फुरूं लागतात, याचा अनुभव आल्यावांचून राहणार नाहीं. एकाला एक शब्द सुचेल, दुसऱ्याला दुसरा शब्द सुचेल असे शब्द ग्रंथनिविष्ट होऊं लागले म्हणजे त्यांतल्या त्यांत जो अधिक अर्थवाहक असेल तो टिकेल. असे बरेच शब्द वापरण्यांत येऊं लागले म्हणजे विद्वत्परिषदेनें त्यांतील पारिभाषिक म्हणून कोणते वापरण्यांत यावे याविषयीं निर्णय देणें क्रमप्राप्त होईल. निरनिराळया देशी भाषेंत शास्त्रीय वाङ्मय तयार झालें म्हणजे सर्व देशी भाषांत मिळून मुख्य मुख्य पारिभाषिक शब्द एकरूप असावेत असा प्रयत्न करावा लागेल.

शास्त्रीय ज्ञानाचा फैलाव जनतेंत फार मोठ्या प्रमाणावर होणें असेल तर तें वाङ्मय निर्माण करण्याच्या उद्योगास लागणें हाच राजमार्ग. आणि त्या राजमार्गावर हा उद्योग येऊन चालूं व्हावयाचा तर रसायनशास्त्रादि विषय हे कॉलेजांतील वर्गामध्येंहि मराठींत शिकविण्यास सुरवात करणें हें अपरिहार्य होय. प्रमुख पारिभाषिक शब्द अपरिहार्य तितके सुरवातीस जसेच्या तसे घेऊन शिकविण्यास प्रारंभ करण्यासहि कांहींच हरकत नसावी. प्रारंभीं हा प्रकार थोडासा धेडगुजरी व बेंगरूळ दिसेल. पण हळू हळू भाषा तयार होईल. मराठींत रुळण्यासारखे

'रेडियो' 'मोटार' असे कांहीं शब्द पूर्ण रुळूनहि जातील. पण प्रास्ताविक बेंगरूळपणा स्वीकारुनहि ते ते विषय मराठींत शिकविण्याचा उपक्रम सुरू झाला पाहिजे.

अशा उपक्रमामुळें विषयाचें ज्ञान अधिक पक्कें होईल. या विषयीं वर उल्लेखिलेल्या सभेंत कांहींनीं उस्मानिया विद्यापिठाचा अनुभव निवेदन केला. तो लक्षांत घेण्यासारखा आहे. तेथें सत्ता पाठीशीं उभी असल्यानें संकल्पित गोष्टी तात्काल व्यवहारांत उतरवितां येतात. गेलीं कित्येक वर्षें या विद्यापीठांतील सर्व उच्च शिक्षण एकमेव उर्दूमधून देण्यांत येत असे. तेथील शिक्षकांचा तो अनुभव उत्तेजक आहे कीं नाहीं? याबाबत वैद्यकशास्त्रासंबंधीं जो अनुभव सांगण्यांत आला तो तरी सर्वस्वीं उत्तेजक असाच होता. मुंबई, मद्रास, वगैरे विद्यापीठांच्या वैद्यकीय परिक्षांचे जे परीक्षक आहेत त्यांपैकीं कांहीं उस्मानिया विद्यापीठाचेहि परीक्षक आहेत. आणि त्यांचा अनुभव असा कीं उस्मानिया विद्यापीठांतील विद्यार्थ्यांचें ज्ञान मुंबई व मद्रास या विद्यापीठापेक्षां रतिभरही कमी नाहीं! उर्दूत शास्त्रीय ग्रंथ तयार नसल्यानें इंग्रजी ग्रंथाचें सरसहा भाषांतर प्रथम करण्यांत आलें. पण याही बाबतींत असा अनुभव निवेदन करण्यांत आला कीं, असल्या केवळ भाषांतरानें निर्वाह होत नाहीं. आत्मीयतेनें व जिव्हाळ्यानें विषय शिकविणें ही मुख्य गोष्ट. तसा शिकविला गेला तरच तो मनांत ठसतो. यामुळें कांहीं प्राध्यापकांनीं ही भाषांतरें बाजूस सारलीं व आपल्या व्याख्यानांच्या स्वतंत्र टिपणी विद्यार्थ्यांस देण्यास सुरवात केली, यामुळें विषयाचें ज्ञान पक्कें झालें, असा त्यांचा अनुभव आहे.

उर्दू ही उस्मानिया विद्यापीठाच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांची मातृभाषा नसल्यानें उर्दूची सक्ति विद्यार्थ्यांवर करणें हा इंग्रजीची सक्ति करण्यासारखाच जुल्म होय. (आतां ही सक्ति उठली आहे हें वाचकांना अवगत आहेच.) या दृष्टीनें उस्मानिया विद्यापीठाचें उदाहरण अनुकरणीय मुळींच नाहीं. पण या ठिकाणीं मी त्या विद्यापीठाचा दाखला दिला आहे, तो ज्या भाषेंत शास्त्रीय परिभाषा तयार नाहीं त्या भाषेंतूनही उच्च शिक्षण देण्याचा उपक्रम करण्याचें ठरलें तर परिभाषेच्या अभावीं तो कोलमडून पडत नाहीं हें दाखविण्यापुरताच. जपानचा दाखला याच तऱ्हेचा आहे. जपाननें आरंभीं अनेक प्रौढ विद्यार्थी पाश्चात्य देशांत पाठवून गृहितविद्य करून आणले. पण नंतर त्यांनीं आपल्या जपानी भाषेंतूनच

शिक्षण देण्याचा उपक्रम केला. ज्ञान परकीयांचें घेतलें तरी त्याचा प्रसार मातृभाषेंतूनच होऊं शकतो. फक्त जागतिक ज्ञानांत भर टाकण्यासारखें अगदीं अव्वल दर्जाच्या उच्च संशोधनात्मक विषयांचें प्रतिपादन मात्र इंग्रजीच्या द्वारें करणें कांहीं काल अवश्य होईल, पण बाकीचे सर्व विषयांचें विवेचन मातृभाषेंतून होण्यास कांहींच प्रत्यवाय नसावा.

शेवटीं एका शंकेचा विचार करूं. बाजारांत इंग्रजी परिभाषिक शब्दच ओळखले जात असल्यानें आम्ही मराठी शब्द वापरूं लागलों तर आमचें पदोपदीं अडणार नाहीं का? ही शंका सहज सुचण्यासारखी आहे. कारण रसायनादि द्रव्यें व यंत्रें आज परदेशांतून मागविलीं जात आहेत. पण ह्या सर्व जिनसा आपल्या देशांत पुढें मागें लवकरच तयार होऊं लागणार आहेत ना? निदान तशी महत्त्वकांक्षा बाळगणें हें इष्ट आहे ना? मग तें जसजसें साध्य होईल तसतसे आपले शब्दहि बाजारांत रुढ कां होणार नाहींत? कांहीं परकी शब्द कायम रहातील. बरेचसे नवे तयार होतील. पण एकंदरींत व्यवहार मातृभाषेंतून सुरूं झाला तर शास्त्रीय ज्ञान समाजांत पसरण्यांत मदतच होईल. ती होणें असेल तर पारिभाषिक शब्दकोशाची वाट पहात न बसतां त्या त्या विषयावरील ग्रंथसंपत्ति निर्माण करणें हाच उत्तम मार्ग. कॉलेजांतून हे विषय मराठींत शिकविण्याची संधी मिळेल तर त्या प्रकारच्या ग्रन्थनिर्मितीला फार मोठें प्रोत्साहन मिळेल.

मौज दिवाळी अंक १९४४

: सतरा :

# माझ्या आवडीचे ग्रंथ

मनोविकासावर व्यापक व चिरंतन परिणाम करणाऱ्या ग्रंथाचें वाचन बहुधा तरुण वयांतच घडतें. शरीराप्रमाणें मनाची वाढहि अनुभव आणि ग्रंथावलोकन यांनीं सूक्ष्म रूपानें अहर्निश चालूच असते. पण शरीराच्या बाबतींत तारुण्यांत पाऊल टाकतांच जशी एकदम डोळेफोड अशी द्रुतगतीनें वाढ होते, तद्वत जीवनांतील क्रांतिकारक अनुभवानें व तसेंच क्रांतिकारक ग्रंथाच्या परिशीलनानें मनाचा विकास कांहीं वेळेला एकदम फार मोठी झेप घेत असतो. शरीररचनेंत क्रांतिकारक फरक पडण्यास शरीर रचनेंतील अंत:स्रावी ग्रंथी या कारणीभूत होतात असें शरीरशास्त्र सांगतें, तर मनोरचनेंत क्रांतिकारक फरक घडवून आणण्यांस ग्रंथ हें कारणीभूत होत असतात. साक्षात् अनुभवापेक्षांहि पुष्कळ वेळां ग्रंथाचेंच कार्य मनोविकासांत प्रभावी असतें असें मी म्हणतों याचें कारण साक्षात् अनुभव हा विचाराचा कच्चा माल असतो, तर ग्रंथांत त्याची संगत लावून, मीमांसा करून तो पक्का चिरस्थायी स्वरूपांत आपणांस मिळत असतो. अनुभवाचा अर्थ लावण्याचा व्यासंग नसणाऱ्या सामान्य माणसाचा अनुभव मनोविकासाच्या दृष्टीनें फुकट जात असतो. मनो-भूमींत हर तऱ्हेच्या अनुभवांचे नुसते ढीग येऊन पडले म्हणजे मनोविकास होत नाहीं. हे ढीग म्हणजे कंत्राटदाराच्या वखारींतील ढिगासारखे होत. त्या मालांतून प्रासाद उठण्यास वास्तुशिल्पकारच हवा. म्हणूनच आपणास नवीन वाटणाऱ्या विचारसरणीचा ग्रंथ वाचण्यांत आला म्हणजे दृष्टी पूर्वीपेक्षां एकदम विशाल होते.

या दृष्टीनें कोणत्या ग्रंथांमुळें माझें विचारक्षेत्र वाढलें असें पाहूं लागलों म्हणजे **टिळकांचें गीतारहस्य, विवेकानंदांचे लेख व भाषणें** आणि **एनरिको फेरी** याचा **सायंटिफिक सोशॅलिझम** हा ग्रंथ या तीन ग्रंथांनीं विचार संपत्तींत व विचारसरणींत महत्त्वाची भर टाकली असें मला वाटतें. गीता-रहस्य हा ग्रंथ मी कॉलेजमध्यें शिकत असतांनाच प्रथम प्रसिद्ध झाला. त्या वेळीं किती उत्सुकतेनें, किती आधाशीपणानें म्हटलें तरी चालेल, आम्ही विद्यार्थ्यांनीं तो वाचला असेल याची कल्पनाच केलेली बरी. साहित्याच्या क्षेत्रांत इतकी विलक्षण खळबळ उडवून सोडणारा ग्रंथ आधुनिक मराठी वाङ्मयांत तरी दुसरा झाला नाहीं. ग्रंथकाराचें असामान्य विभूतिमत्त्व आणि ग्रंथांतील गाढ पांडित्य यांनीं सुशिक्षित वाचकाच्या मनाची अशी पकड घेतली कीं या ग्रंथाच्या प्रसिद्धीनंतर कांहीं महिने घरीं दारीं चर्चेला दुसरा विषयच नाहींसा झाला होता. हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेला जैन पंडित हेमचन्द्र याच्या 'प्राकृत व्याकरण' या ग्रंथाविषयीं असें सांगतात कीं राजा सिद्धराज यानें या ग्रंथाची दरबारी थाटानें हत्तीवरून मिरवणूक काढली आणि शेवटीं ग्रंथ आपल्या हिरेमाणिकांनीं भरलेल्या जामदारखान्यांत आणून ठेवला. गीता-रहस्याला असाच विलोभनीय सन्मान लाभला होता. सम्राटाच्या जामदारखान्या-पेक्षांहि श्रेष्ठ असा जो जनतेचा हृदयकोष त्या कोषामध्यें या ग्रंथाची स्थापना झाली होती. टिळकांच्या राजकारणांतील प्रतिस्पर्ध्यांनीं या ग्रंथावर सडकून टीकाहि केली. पण या टीकेचा आम्हां विद्यार्थ्यांवर—आणि बहुतेक विद्यार्थी टिळकांचेच चहाते होते—येवढाच परिणाम झाला कीं गीतारहस्याचें परि-शीलन एरवीं झालें नसतें त्यापेक्षांहि अधिक निष्ठेनें आमच्याकडून झालें. विद्वद्वर्य भांडारकरांचें वैष्णविझम अँड शैविझम हेंहि पुस्तक याच सुमारास प्रसिद्ध झालें होतें आणि त्यांतहि गीतेविषयीं विवेचन केलेलें होतें. या ग्रंथांतील विद्वत्तेचें मोल आज मी जाणूं शकतों. पण त्याकाळीं गीतारहस्यांतील तो भाषेचा आणि विवेचनाचा प्रचंड ओघ आणि वैष्णविझममधील तीं तोळा मासे मोजून वापरलेली भाषा आणि तें त्रोटक विवेचन यामुळें भांडारकरांच्या ग्रंथाची आम्ही विद्यार्थी आपापसांत कुचेष्टा करीत असूं.

गीतारहस्याचा माझ्यावर जो परिणाम झाला तो त्यांतील गीतेच्या विवेचनापेक्षां त्याला जोडलेला जो नऊशें पानाचा प्रस्तावनेवजा ग्रंथ आहे त्याचा. या एकाच ग्रंथाच्या वाचनानें पौर्वात्य आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानविषयक अनेक मौलिक ग्रंथ वाचण्याचें श्रेय वाचकांस लाभतें. अनेक वर्षांच्या सतत चिंतनाचा परिपाठ येथें पहावयास सांपडतो. ग्रंथांतील प्रकरणाच्या आणि प्रकरणांतील परिच्छेदांच्या मांडणींत क्वचित् पाल्हाळ व पुनरुक्ति वाटली तरी ती एकंदरीनें इतकी बेमालूम साधलेली आहे कीं विचारसरणीची अखंड माला गुंफण्याच्या दृष्टीनें मला हा ग्रंथ आदर्शभूत वाटतो.

विवेकानंदांचे ग्रंथ व भाषणें यांतहि कांहीं काल मी रंगून गेलों होतों. विवेकानंदांच्या लेखांत व भाषणांत विवेक आणि भावना यांचा मोठा मनोहर मिलाफ आढळून येतो. वाचकाच्या हृदयांत शिरण्याची त्यांची हातोटी अनुपम आहे. परिभाषिक संज्ञा टाळून वेदांताचें नव्या धर्तीनें त्यांनीं असें विवरण केलें आहे कीं त्यांचीं अन्तिम प्रमेयें सर्वस्वीं स्वीकारण्यास तयार नसणारें मनहि त्यांच्या वक्तृत्वाच्या लोंढ्यांत वाहून जावें.

तिसरा ग्रंथ एनरिको फेरी याचा सायंटिफिक सोशालिझम हा होय. समाजसत्तावादावरचा मीं वाचलेला हा पहिलाच ग्रंथ होय. या नंतर अनेक ग्रंथ वाचले. पण एखाद्या नव्या विषयावर पहिलाच ग्रंथ जो वाचला जातो तो ग्रंथ जर चांगल्यापैकीं असेल तर त्याचा विशेष खोल असा ठसा मनावर वठला जातो. डार्विनच्या जीवनकलहाच्या प्रमेयाचा आधार घेऊन मात्सन्याय अथवा बळी तो कान पिळी या तत्त्वाचें जें समर्थन करण्यांत येतें त्याचा फोलपणा या ग्रंथांत दाखवून दिला आहे आणि भांडवलशाहीनंतर समाजसत्ता ही समाजाच्या विकासांतील अपरिहार्य अशी अवस्था कशी आहे याचें विवेचन केलें आहे.

इतर अनेक ग्रंथांचा उल्लेख करितां येईल. पण लेखणी हातांत घेतल्यावर जे पहिले तीन ग्रंथ आठवले तेच नमूद केले आहेत.

—समीक्षक फेब्रु. १९४१

# अव्वल इंग्रजींतील काहीं अनुवाद व अनुवादक

आज इंग्रज हिंदुस्थानचें राज्य हिंदुस्थानीयांच्या हवालीं करून जात आहेत. सुमारें सव्वाशें वर्षांपूर्वी जेव्हां त्यांनीं महाराष्ट्र जिंकला त्यानंतरच्या पहिल्या काळांतील गद्यवाङ्मयाचा आढावा घेतल्यास पेशवाई अस्तंगत होऊन राज्यांतर झालें तेव्हांपासून पुढील पन्नास वर्षांचा काळ जो लोटला त्याचें वाङ्मयदृष्ट्या नामाभिधान करावयाचें तर त्यास **भाषांतराचा काळ** असें म्हणावें लागेल. जुनी घडी विस्कटून नवी घडी बसवायला जो काळ लोटतो त्यांत अन्य भाषेंतील विचारसंपदा आपल्या भाषेंत प्रविष्ट करणें ही प्रथम प्रक्रिया होय. या अमदानींत भाषांतरें झाली तीं इंग्रजी, संस्कृत व फारशी अशा तीन भाषांतून झालीं. पैकीं मी आज आपणांपुढें इंग्रजी भाषेंतून मराठींत झालेल्या भाषांतरासंबंधींच दोन शब्द बोलणार आहे. * एकतर संस्कृतमधून मराठींत आणलेल्या वाङ्मयसंपत्तीविषयीं याच व्याख्यानमालेंत स्वतंत्र विवेचन होणार आहे. व दुसरें म्हणजे गीर्वाण वाणींतून मराठींत भाषांतर करणें वा रूपांतर करणें हा प्रकार पूर्व परिचित व रूळलेला असाच होता. फारशींतून मराठींत भाषांतरें झालीं, तरी त्यांची संख्या अल्प. तसें पाहिलें तर ३०० वर्षांच्या राजकीय वर्चस्वामुळें फारशी भाषेचा परिणाम मराठीवर सडकून झाला.

---

* मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयांत झालेल्या व्याख्यानमालेंतील एक व्याख्यान.

फारशी शब्दांचा तर पूर लोटलाच, पण मूळचा मराठी भाषेचा घाटही थोडासा बदलावा असे फेरफार करणारे अगर, गैर अशीं अव्ययें व दरसाल दरशेंकडा असा नामाआधीं अव्यय घालण्याचा प्रकार अशा अनेक गोष्टी मराठींत घुसल्या, नव्हे स्थाईक होऊन बसल्या. तथापि फारशी वाङ्मयाचा मात्र फारसा परिणाम झाला नाहीं. उलट मुसलमान हे येथें राज्यकर्ते म्हणून वावरत असले तरी संस्कृतमधील ग्रंथसंपत्तीचें मोल ते ओळखून होते. यामुळें अल्बेरुणीपासून अबुलफाजलपर्यंत संस्कृतमधील विचारसंपदा फारसींत संक्रमित करण्याचाच उलट प्रयत्न दिसून येतो.

इंग्रजी राज्य अवतीर्ण झाल्यापासून मात्र सर्व देखावा पालटला. इंग्रजी वाङ्मयाचें प्रौढ स्वरूप ज्यांनीं प्रथमतः अवलोकन केलें असेल त्यांना मृच्छकटिक नाटकांतील मैत्रेयाला वसंतसेनेचा सप्तकक्ष प्रासाद पाहून वाटेल तसें वाटलें असावें. आपण एखाद्या नाट्यसृष्टींत आलों असें वाटून ते विस्मयानें, कुतुहलानें भारून गेले असले तर नवल नाहीं. मराठी वाङ्मयाच्या उद्यानांतील तीं भारत-रामायणें, अभंग-पदें, पोवाडे, लावण्या यांचे प्रौढ वृक्ष त्यांच्या परिचयाचे होते. पण इंग्रजी वाङ्मयाच्या नवीन उद्यानांत पाऊल टाकतांच भिन्न आकाराचे, भिन्न फलपुष्पांचे, भिन्न गुणधर्मांचे असे असंख्य लतावृक्ष हारीनें लावलेले पाहून मन थक्क झाल्याशिवाय कसें राहिलें असेल ? मराठी वाङ्मयांत तोंवर बखरी सोडल्या तर गद्याचा म्हणण्यासारखा प्रचार नव्हताच. सर्व वाङ्मय पद्यांच्या पोशाखांत मिरवत असे. नाटकें, कादंबऱ्या यांचा तर वावर नव्हताच. त्यांच्याविषयीं रुचीच नाहींशी झाली होती. संत कवींनीं संस्कृतमधील भारत रामायणांच्या अनेक आवृत्त्या काढल्या. एकट्या रुक्मिणी-स्वयंवराची कथा अनेक कवींनीं घोळून घोळून गायिली. रामायणांची संख्या शताधिक झाली. महाकाव्याच्या धर्तीवर कांहीं रचना झाली. पण शाकुंतल, उत्तर रामचरित्र किंवा बाणभट्टाची कादंबरी यांकडे लक्ष गेलें नाहीं.

अशा प्रकारच्या पूर्व वाङ्मयाकडून नव्या इंग्रजी वाङ्मयाकडे वळल्यावर वाचकांची 'आश्चर्यवत् पश्यति' सारखी स्थिति होणें अपरिहार्य होतें. काव्य, नाटक, कादंबरी, चरित्रें, प्रवासवर्णनें, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, रसायन—एक ना

दोन, ज्ञानाच्या अनेक शाखा येथें पूर्ण फुललेल्या आणि डंवरलेल्या दृष्टीस पडूं लागल्या, आणि यांतील कोणती रोपटीं आपल्या उद्यानांत आणूं, कोणत्यांचे कलम करूं, कोणत्यांचें बी धरून ठेवूं असें झालें नसेल तरच नवल! त्यांतही छापण्याच्या कलेमुळें वाङ्मयप्रसाराचें एक अजब साधन हातीं आलेलें! त्यामुळें लोकहितवादी, चिपळूणकर, गुंजीकर वगैरेंनीं हरएक विषयाचें ज्ञान मराठींत आणण्यास आपणांस वाहून घेतलें. पन्नासावर वर्षे लोटल्यावर म्हणजे चांगले १८७४ सालीं गुंजीकरांनीं एका व्याख्यानांत उद्गार काढले होते कीं, ईश्वर कृपेनें आपणांस इंग्रजी ग्रंथांचें जसें सहाय्य मिळालें तसें पूर्वी कोणत्याही देशी लोकास मिळालें नसेल. ज्या पाहिजे त्या विषयावर ग्रंथ आहेत! आणि हे शिकावे हीच आमच्या शहाण्या इंग्रज सरकारची इच्छा. हें आमचें केवढें भाग्य! पृथ्वीवर जे जे कांहीं नवीन शोध होताहेत ते जसे कांहीं आम्हांकरितांच. *

राज्य गेल्यावर विद्येंतील मागासलेपणाची जाणीव तीव्रतेनें व्हावी यांत नवल नाहीं. पण इंग्रज हा आपणांपेक्षां विद्येनें पुढारलेला आहे ही जाणीव स्वराज्य नांदत असताना नानाफडणीसाच्या वेळींही उदयास आली होती. एरवीं सवाई माधवरावांना हरतऱ्हेचें व्यावहारिक शिक्षण मिळावें या हेतूनीं नानांनीं जेव्हां शिक्षकांची योजना केली तेव्हां ते डॉ. फिडले या फिरंग्यास शिक्षक म्हणून कां बोलाविते, आणि एका नदीवर पूल बांधावयाचा आहे आणि पाणी तर हटत नाहीं अशा प्रसंगी बेकर नांवाच्या इंग्रजी इंजीनिअरचा धांवा नाना कां करते! आपणांतील बुद्धि नष्ट झाली नव्हती. जुन्या ग्रंथावर प्रचंड टीका-उपटीका लिहून कीस काढण्याइतकी बुद्धीची सूक्ष्मता कायम होती. विद्येच्या उपासनेस मदत म्हणून वा पारितोषिक म्हणून दक्षिणेच्या रूपानें सढळ हातानें खर्च होई. पण ती ज्यांना मिळे त्यांची जी यादी प्रसिद्ध आहे त्यांत वैद्यकशास्त्र सोडलें तर व्यावहारिक उपयोगाच्या शास्त्राची योग्यता ओळखलेली दिसत नाहीं. रसायनादि शास्त्रांची वाढ खुंटलेली होती. आणि इतिहास, भूगोल, अर्थशास्त्रादि विषयांचाही परामर्श घेतला जात नव्हता अशा स्थितींत इंग्रजी वाङ्मयाच्या वैभवशाली अजबखान्यांत आल्यावर काय पाहूं आणि काय न

* ( वि. विस्तार पु. ७ अंक ४, पान ८० )

पाहू असें झालें नसतें तरच नवल ! अशा काळांत या नव्या विद्येतील ज्ञान-भांडार जेवढें आपल्या देशी भाषेमध्यें उपलब्ध करून देतां येईल तेवढें देणें याचेंच अगत्य फार.

त्याची सुरवात भाषांतरानें व्हावी हें स्वाभाविकच होतें. ४०–५० वर्षांनंतर स्वतंत्र निर्मिती डोकावूं लागली. मोचनगड, मुक्तामाला यांसारख्या स्वतंत्र कादंबऱ्या, थोरले माधवराव, जयपाळ यांसारखीं स्वतंत्र नाटकें, राजा शिवाजी-सारखें काव्य किंवा ग्रँड डफच्या इतिहासावरील कीर्तन्यांची टीका, लोकहित-वादींची शतपत्रें असले स्वतंत्र प्रयत्न १८५० च्या सुमारास उदयास येऊं लागले. मात्र त्यानंतरहि भाषांतरें चालूं होतीं, पण स्वतंत्र ग्रंथांतील विचारांचीहि मूळ स्फूर्ति इंग्रजी वाङ्मयांतूनच उदय पावे. अद्यापही हा काल संपलेला नसून जागतिक वाङ्मयाची उंची वाढविण्यासारखें मौलिक वाङ्मय मराठींत अद्याप अल्पच आहे.

राज्यक्रांतीनंतर पहिलीं कांहीं वर्षे भाषांतराचें वळण पडावें हें वरील सर्व प्रकार लक्षांत घेतला असतां अपरिहार्य होतें, तसें आवश्यकही होतें. शिवाय त्याला सरकारचेंही प्रोत्साहन व पाठबळ होतें. नवीन राज्यकर्ते विद्येंत चांगले पुढारलेले असल्यानें राज्य ताब्यांत घेतांच ज्या पहिल्या गोष्टीकडे त्यांनीं हात घातला ती म्हणजे विद्येचा प्रसार ही होय. इंग्रजी विद्येंत निष्णात अशी पिढी तयार करणें हें राज्यकारभाराचे दृष्टीनें इंग्रजी राज्यकर्त्यांना हिताचें होतेंच. शिवाय नव्या विद्येनें दिपून जाऊन तिच्यांत हीनगंड तयार होण्याचाही संभव होता, आणि ख्रिस्ती कार्यप्रसारालाही मदत होणार होती. पुढें विद्यापीठामध्यें मातृभाषेला मज्जाव करण्यांत आल्यानें राज्यकर्त्यांचा हेतु स्पष्टच झाला. पण कोणत्याही हेतूनें कां होईना इंग्रजी वाङ्मयाशीं परिचय झाला ही गोष्ट एकंदरीनें हितावह अशीच झाली. नदीमुखानें अफाट समुद्रांत प्रवेश व्हावा तद्वत इंग्रजी भाषेच्या मुखानें जागतिक विचारप्रवाहांत विहार करण्याचें साधन उपलब्ध झालें. नुसते नवनवे विचार हातांशीं आले एवढेंच नव्हे तर ते प्रगट करण्याची पद्धतीहि अधिक सोईची, ठाकठिकीची अशी दिसून येऊं लागली. या बाबतींत इंग्रजी वाङ्मयाचें अनुकरण करणें फायद्याचें आहे हें स्वदेशाभिमानी

चिपळूणकरांनींही स्पष्टपणें प्रतिपादलें आहे. ‘ भाषादूषण ’ निबंधांत ते लिहितात, “ इंग्रजींतल्यासारखे शास्त्रीय ग्रंथ, व्याख्यानें, निबंध वगैरे लिहितांना ग्रंथांची एकंदर रचना इंग्रजी ग्रंथांच्याच धारणीवर केली पाहिजे. म्हणजे मजकूर कलमवार लिहून विरामचिन्हेंहि जशी इंग्रजीच्या नमुन्यावर मराठींत मांडतात त्याप्रमाणें लिहिण्याचा एकंदर झोंकही बहुधा इंग्रजीसारखाच असल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ” ही नवी धारणी साधण्यांत भाषांतर हे प्रारंभींचें साधन होय.

आतां भाषांतरित वाङ्मयाकडे साक्षात् वळूं. तिकडे वळलें म्हणजे प्रथम एक कांहींसा चमत्कारिक देखावा दृष्टीस पडतो. भाषांतराकरितां म्हणून निवडण्यांत आलीं तीं पुस्तकें बहुधा शालोपयोगी पुस्तकें होतीं. भाषांतर करणारे ते जाडे विद्वान, चक्रीपागोटे घालणारे दशग्रंथी व्यासंगी पंडित होते, आणि त्यांनीं भाषांतराकरितां घेतलेली पुस्तकें कोणतीं ? तर प्राथमिक बालबोध गणित, भूगोल, इसापनीति, वेताळपंचविशी अशांसारखीं ! हा प्रकार पाहून शर्यत जिंकणाऱ्या तल्लख अश्वराजास छकड्यास जुंपलेलें पाहिलें असतां चमत्कारिक वाटेल तसेंच हेंहि चमत्कारिक वाटलें तर नवल नाहीं. पण याबाबत हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, भाषांतरकार बहुतेक सरकारी नोकर होते. कोणत्या पुस्तकांचें भाषांतर करावें हें विद्याखातें ठरवी, आणि तें जे ठरवी तें शिक्षण-क्रमांत कोणती उपयोगी पडण्यासारखीं असतील त्या दृष्टीनें. ज्ञानवर्धनाच्या अनेक विषयांवर जेथें औषधालाही पुस्तकें नव्हती तेथें त्या त्या विषयांवरील प्रारंभिक पुस्तकांचीं सरळ भाषांतरें करवून घेणें हें अगत्याचेंच होतें. त्या दृष्टीनें पाहिलें असतां पहिल्या पांच पन्नास वर्षांत भाषांतराचा जो उद्योग झाला तो बराच आस्थेवाईक झाला असून उपयुक्त होता असेंच म्हटलें पाहिजे.

या भाषांतरकारांपैकीं जर्विससारखे कांहीं इंग्रज होते. ( आतां कोणातरी शास्त्र्याच्या हातास हात लावून ते भाषांतर करीत हें सांगावयास नकोच ). तरी या जर्विस साहेबानें अंकगणित, बीजगणित, भूमिति, महत्वमापन वगैरे गणितांच्या अनेक शाखांवरील हटन आणि कॅसल यांच्या प्रौढ ग्रंथांची जीं भाषांतरें केलीं तो मोठाच उद्योग त्यांनीं केला असें म्हटलें पाहिजे. जर्विस हा इंजीनिअर असून नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचा अधिकारी होता. गणित विषयां-

वरील त्यानें केलेल्या भाषांतराचें शिळेवर छापलेले चांगले चारपांचशें पानांचे असें प्रौढ ग्रंथ आहेत. दुसरे एका पुस्तकांचें नांव ( Marathi Numeration ) महाराष्ट्र भाषेचें क्षेत्रफळ, घनफळ, गणित, वहिवाट वही आणि नाण्याचें तपासणीचें वर्तमान ' असें आहे. त्याच्या मुखपृष्ठावर लिहिलें आहे कीं, " मूळ पुस्तकें इंग्रजीत आहेत. त्यांचे **कवी डॉकतर चार्लस हटन आणि कांस्टेल** ( कॅसलचा उच्चार ) साहेब. त्या पुस्तकाचे भाषांतर जर्विससाहेब यांनीं महाराष्ट्र भाषेंत केलें. दगडावर छापले १८२८. " यांतील अर्धवट ज्ञानानें वापरलेल्या कवी शब्दाकडे आपलें लक्ष गेलें असेलच. एकाराच्या प्रकाराचे प्राबल्यही बरेंच दिसते. उदाहरणार्थ ' एकादे पुज्यांत कांहीं अर्थ नाहीं. ' ( पृ. ८ ) तिसऱ्यें स्थळीचा अंक शतगुणभाव दाखवितो ! ( पृ. ९ ) ' न्यूटन अग्लिस्थानचा म्होटा ज्योतिषी १६४२ जन्मला व १६९७ मध्यें मरण पावला. तेव्हां मरतेंसमयीं त्यांचें वय किती होतें तें सांगा ' असली उदाहरणें वजाबाकींत दिली आहेत. साकळ रीतीची माहिती देतांना डाव्येकडे मांडिले पदास अग्रसर म्हणतात. आणि उजवीकडे मांडिल्ये पदास उपाग्रसर म्हणतात. ( पृ. ११७ ) असे नवे शब्द तयार केले आहेत. अशा रीतीनें मराठींत नीटपणें समजूत पडेल अशा पद्धतीनें अंकगणित, बीजगणित, भूमिती वगैरे गणितांच्या शाखांचीं भाषांतर रूपानें मराठींत साधलें त्या प्रकारे सोय लाविली आहे. गणिताचे बाबतींत जर्विस यानें जी कामगिरी बजावली तशी वैद्यकाच्या बाबतींत जॉन मॅकलेनन् यानें बजावलेली आढळते. त्यानें १८५८ मध्यें ' औषध कल्पनाविधी ' ' निदान ', ' शारीर ' वगैरे ग्रंथ शास्त्री लोकांच्या सहाय्यानें मराठींत प्रसिद्ध केलें १८३५ सालीं वेळ या साहेब बहादुरांनीं ' शिल्पविद्या या विषयाचे निबंध ' यावर ग्रंथ लिहिला.

साहेबांचे हे प्रयत्न चालू असतां इंग्रजींतून मराठींत भाषांतर करतांना ज्या अडचणी येत त्या टाळण्याची कांहीं दिशा दिसावी म्हणून इंग्रजीतील वाक्य-प्रयोगास जुळेसे मराठी वाक्य प्रयोग एकत्र केले तर सोईचें पडेल असें पाहून १८३९ च्या पूर्वींच ( या वर्षीं दुसरी आवृत्ति तयार झाली ) जॉन विल्सन यानें

वाक्यावळी या नांवाचें पुस्तक तयार केलें. त्याचें इंग्रजी नांव Idiomatical exercises, illustration of the phraseology & structure of the English & Marathi languages. पुस्तकांत नित्त्याच्या बोलींतील वाकप्रचार घेतले असून ते नाम, विशेषण, नियमित क्रियापदे, अनियमित क्रियापदे अशा चार भागांत विभागले आहेत. इंग्रज लोकांना मराठी शिकण्यास या पुस्तकाचा चांगला उपयोग होत असावा. वाक्यें निवडलीं आहेत तीं मुद्दामच छोटीं, व नित्याच्या व्यवहारांत उपयोगी अशीं आहेत. असल्या पहिल्या पहिल्या प्रयत्नांत भाषांतराच्या कांहीं गमती आढळावयाच्याच 'ती दुर्व्यवस्थेंत पडली आहे. ( She is in adversity ). Arguments वादप्रमाणें, Auction निलाम forest निर्राम, 'त्याला बहुत कृपालुत्व आहे', तो आपल्या 'भावावर प्रीति ठेवितो', तो खडांनें ( खडूनें ) लिहितो, देवळांतील घड्याळाचे किती वाजले ! ( by the church clock ). घडयाळांत किती वाजले त्याच्याऐवजी घड्याळाचे किती वाजले असें विचारलें असता बारा वाजले असें हसत उत्तर येईल याची या इंग्रज बहादुरास काय कल्पना? आम्ही गर्व न भोगावा ( Inulge conscit ) त्यानें मोठा अप्रेमा दाखविला ( disaffection ) औषधाच्या दोन मोतादा ( doses ) घेतल्या. गोधूळ मुहूर्ता ( dusk ) म्यां त्याला पाहिला वगैरे.

विल्सन साहेबाच्या प्रयत्नामागून शेट डोसाभाई सोराबजी मुनशी यानें इडयुम्याटिकल सेनटेनसेस या नांवाचें पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न १८४३ मध्यें केला. त्यानें मूळ इंग्रजी वाक्यांचे हिंदुस्थानी, गुजराती, व फारशी अशा तीन भाषांत भाषांतर दिले आहे. याचेच मराठी भाषांतर १८६२ मध्यें वामन कृष्ण शास्त्री गद्रे यांनीं केलेलें उपलब्ध आहे. शेट डोसाभाई यांनीं साहेबांच्या विशेष गरजा लक्षांत घेऊन व्यापारी, लष्करी, कोर्टकचेरी वगैरेंत उपयोगी पडणाऱ्या वाक्प्रयोगांचीच निवड केली आहे. पुढील वाक्यांवरून साहेबाच्या गरजा डोसाभाईनें कशा ओळखल्या होत्या याची कल्पना येईल! पहिल्यानें तो काम करीना पण मी जुलमानें करविलें. ( पृष्ठ ८७ ) 'लोणी, दूध, आंडी, गवत, कोंबड्या, वगैरे माझ्यानें कांहीं देववत नाहीं. सारांश माझें गांवांत कांहीं नाहीं असें पाटील सांगतो. परंतु त्याला चांगला मार द्याल तर जें जें तुम्ही मागाल तें सर्व तो आणून देईल! ( पृष्ठ ९७ ). त्या लुच्या पोरास सांगायला त्यांस सांग कीं त्या

पोराला कांहीं काम करण्यास सांगितलें असतां तो पुन्हा हंसेल तर त्याच्या अंगाची चांबडी लोंबवीन (पृष्ठ ९४). तो मोरीवाटे पळून गेला नसता, तर पकडला जाऊन उपाशी मारता (पृष्ठ १०४). त्या परगण्यांतील लोक असें वाईट अन्न खात होते कीं त्याचे त्यांना कसें पचन होतें तें मला समजत नाहीं. वगैरे. यावरून डोसाभाई साहेबाची भाषा आणि विचार यांची कल्पना येईल आणि सगळ्यांत विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे पुस्तकाच्या शेवटीं डोसाभाईनें एक कोर्टमार्शलचा संपूर्ण नमुनाही दिला आहे हा होय !

खुद्द साहेबाच्या नांवावर जी भाषांतरे मोडतात त्यांत त्यांना येथील शास्त्र्यांची मदत असे. पहिल्या आवृत्तीवर क्वचित शास्त्र्यांच्या मदतीचा उल्लेख असे पण पुढील आवृत्तींत तोही काढून टाकण्यांत येई. (मोल्सवर्थ व कॅन्डी यांच्या हाताखालच्या पंडितांनीं जो प्रथम कोश तयार केला तो आतां कोठे दिसेनासा झाला आहे याबद्दल दादोबांनीं खेदोद्गार काढले आहेत (पृ. २०) साहेबांची उद्योगशीलता मात्र वाखाणण्यासारखी होती. कोणतेही काम अंगावर घेतलें म्हणजे त्याची अविरत पाठ पुरवावयाची व त्याकरितां अविश्रांत श्रम करावयाचे ही इंग्रजांची पद्धत प्रसिद्ध आहे. विद्येच्या प्रसाराच्या बाबतींत त्यांचा हेतू सामान्यतः राज्यकर्त्यांचा असावयाचा तसाच म्हणजे स्वतःच्या स्वामित्वाची छाप टाकण्याचाच होता. त्यासंबंधीं त्यांतल्यात्यांत उदार दृष्टीचा मुत्सद्दी जो एल्फिस्टन त्याचीच साक्ष दिली म्हणजे पुरे. १८२४ सालीं त्यानें आपली शिक्षणविषयक विचारपत्रिका लिहिली. मिशनऱ्यांचें म्हणणें पडलें कीं नव्या शिक्षणक्रमांत ख्रिश्चन धर्माचाही शिरकाव असावा. पण एल्फिस्टननें पाहिलें कीं उघडपणें असें होऊं दिलें असतां लोक निष्कारण बिथरतील. हें धूर्तपणें जाणून एल्फिसटननें या सूचनेस नापसंती दर्शविली. त्या संदर्भात तो लिहितो कीं ख्रिश्चन धर्माचें शिक्षण मुद्दाम देण्याची गरजच नाहीं. कारण माझी खात्री आहे कीं आमच्या नव्या विद्येच्या पाठोपाठ ते आल्याविना राहणारच नाहीं. उलट तुम्ही उघडपणें ख्रिस्ती धर्माचा उपदेश करूं लागतात म्हणजे लोक बिथरून मात्र जातील. (I am Covinced that the conversion of the natives must infallibly result from the diffusion of

knowledge and if then fortunately they are not aware of the connections or all attacks on their ignorance they would bereigoreusly resisted as if they were on their religion-( Writings of Elphistan:106 ) कोणत्याही धोरणानें कां होईना इंग्रजी वाङ्मयांत संचित झालेले हरएक विषयाचें ज्ञान आणण्याचा मराठींत जो उपक्रम एल्फिस्टन प्रभृतींनीं सुरू केला तो देशास उपकारक असाच होता.

इंग्रजी विद्येनें भाळून जाऊन आपला धर्म टाकण्यास नवसुशिक्षित तयार होतील हा एल्फिस्टनची कल्पना अगदींच निराधार नव्हती. रामकृष्णपंत मोडक, विष्णुपंत करमरकर, बाबा पदमजी, शाहूराव कुकडे वगैरे मंडळींनीं आपल्या धर्मावर लाथ मारलीच ना ! आणि दादोबा हरिकेशवजी वगैरे मंडळी आपआपल्या आसनीं डळमळूं लागली होती. मात्र आपली मूळपरंपरा भक्कम असल्यानें आपला तोल सावरला गेला. पण इंग्रजींतील ज्ञान मराठींत उतरण्यांत भाषेचें वैभव आपण वाढवतो आहोंत व मराठ्यांचें एक निष्ठास्थान आपण बळकट करीत आहोंत हें जेव्हां धूर्त सरकारच्या लक्षांत आलें तेव्हां त्यांनीं आपला पवित्रा एकदम बदलला आणि ताबडतोब मातृभाषेला विद्यागृहांतून बाहेर घालविलें. ते विद्यापिठाच्या जन्मकालाच्या सालींच ! तेथून पुढें तिचें विद्यामंदीर जे सुटलें ते अद्यापी म्हणजे ९० वर वर्षें झालीं तरी तिला विद्या-मंदिरांत अद्यापीही योग्य तें मानाचें स्थान मिळालेलें नाहीं. आपणांस आज या पुढच्या काळाचा विचार कर्तव्य नसल्यानें विस्तारपूर्व काळांत भाषांतर रूपानें देशी भाषेच्या मळ्यांत कोणकोणतीं नवीं पिकें काढण्यांत आलीं त्याचा आढावा तेवढा घ्यावयाचा आहे. पैकीं जर्विस प्रभृतीं यांनीं जे परिश्रम घेतले त्याबद्दल वर लिहिलेंच आहे. या इंग्रज बहादुरांपैकीं मेजर कॅन्डी याची मिजास व ऐट, कांहीं वेगळीच ? हा पाठशाळेचा सुपरिंटेंडेंट असून सरकारच्या आश्रयानें छापलें जाणारें प्रत्येक पुस्तक तपाशीं आणि मराठी भाषेच्या चुका दाख-विण्याचा उद्योग, उपद्व्यापही करी. मराठी ही ज्यांची मातृभाषा त्यांच्यापेक्षां आपणांस मराठी अधिक शुद्ध येतें अशी तो ऐट आणी. सरकारनें भाऊ महाजन यांच्याकडे एका इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर करण्याचें सोपविलें होते पण कँडी साहेब ढवळाढवळ करणार असेल तर मी मुळींच काम पत्करणार

नाहीं असें त्यांनीं साफ सांगितलें असें म्हणतात. त्याकाळीं भाषांतराकरितां मोबदला हजार दोन हजार रुपये मिळण्यासारखा होता, हें आणखी सांगितलें म्हणजे भाऊ महाजन याचा बाणेदारपणा आणि कॅन्डीच्या वटवटीबद्दल त्यांना वाटणारी चीड या दोहोंची नीट कल्पना येईल. ' प्रभाकर ' पत्रांत याविषयीं गवगवाही झाला असावा. त्याला उद्देशून कॅन्डी साहेब, ज्ञानोदयांत लिहितो, " प्रभाकर कर्त्यानें व त्यांस पत्रें पाठविणारांनीं कितीएक महिन्यांपासून प्रभाकरपत्रांत कॅन्डी साहेब यांची निंदा चालविली आहे. तर या विषयावर मी थोडेसें लिहितो. या देशांतील लोकांस ज्ञानप्राप्ति व्हावी व त्यांचें कल्याण व्हावें या हेतूनें मी जीव लावून मेहनत करीत आहे. असें माझें मन मला साक्ष देतें. यामुळें ' प्रभाकर ' पत्रांत माझेविषयीं जो घोर द्वेषभाव प्रगट केला आहे तो पाहून मला फार आश्चर्य वाटलें. मराठी भाषांतरें तपासण्याचें काम मजकडे बहुत वर्षांपासून आहे. या भाषांतरकारांपैकीं बहुतेकांना इंग्रजी भाषेचें ज्ञान आहे खरें, परंतु त्यांनीं आपल्या जन्म भाषेचा अगदीं अभ्यास केलेला नाहीं. त्यामुळें परकी भाषेंतील ज्ञान स्वभाषेंत सुंदर रीतीनें आणतां येत नाहीं. हें भाषांतर कर्ते इंग्लिश भाषेचें ज्ञान प्राप्त झाले आहे तेवढ्यानें विलक्षण फुगून गेले आहेत. त्यांच्या ग्रंथांत मी अशुद्धें काढलीं त्याचें त्यांस अर्थातच फार वाईट वाटलें. ' प्रभाकर ' कर्ता लिहितो कीं पंडितांच्या मदतीवांचून कॅन्डी साहेबास दोन ओळीचें देखील भाषांतर व्हावयाचें नाहीं. तर प्रभाकर कर्ता पुढें येऊन मजबरोबर भाषांतर करण्याचा प्रसंग करील तर मी सिद्ध आहे. फार लांब नको. माझी निंदा करतांना प्रभाकर कर्त्यानें ज्या वाक्यानें आपल्या मनांतील अर्थाचें उद्घाटन केलें आहे तें वाक्यच किती दुष्ट आहे पहा. तो लिहितो, ' त्याच्यानें दोन ओळी भाषांतर करतां यावयाचें नाहीं. ' हें वाक्य अगदीं अशुद्ध आहे. शुद्ध लिहिण्याचे दोन प्रकार आहेत. त्याच्यानें करवणार नाहीं किंवा त्यास करतां यावयाचें नाहीं. या चुका परक्या देशांतून येऊन आपली भाषा शिकणारे लोक काढतात ह्या गोष्टीची प्रभाकरकर्त्यास लाज वाटावी. दोन ओळी भाषांतर हेहि बोलण्याचे चालीस विरुद्ध आहे. दोन ओळीचे भाषांतर अशी लोकांत बोलण्याची चाल आहे."(ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे पृ.१८७-८८) आहे कीं नाहीं साहेबी ऐट! शेवटीं कॅन्डी लिहितो, " आतां इतकेंच

सांगतों कीं ज्या भाषांतर करणाऱ्याविषयीं मी वर लिहिलें आहे ते इंग्लिश भाषेंतल्या चालीप्रमाणें मराठी लिहिलें आहे त्याच्यांवर. ते इंग्लिश भाषेंतल्या चालीप्रमाणें मराठी लिहिणें जर सोडून देतील तर त्यांचे ग्रंथ चांगले आहेत असें मी आपलें मत देण्यास अगदी तयार आहे." कॅन्डी साहेबाची ही तक्रार अगदींच निराधार नव्हती. राजभाषेची तेजी तळपत असल्यानें देशभाषांकडे लक्ष देण्याचें सुशिक्षितांना अगत्य वाटेनासें झालें होतें. मातृभाषेची उपासना केल्यानें व्यावहारिक कोणताच लाभ पदरीं पडण्याचा संभव नव्हता. आणि म्हणूनच गुंजीकर चिपळूणकर यांना या अनावस्थेविरुद्ध जोराचा प्रचार करावा लागला.

स्वतःच्या नित्याच्या व्यवहाराच्या भाषेपेक्षां परकी मुद्दाम शिकलेली जी भाषा तिच्यांतील चुका माणसाच्या अधिक त्वरित लक्षांत याव्या हा सर्वांचा अनुभव आहे. परकी भाषा शिकतांना ती शुद्ध स्वरूपांत आत्मसात करण्याविषयीं मुद्दाम प्रयत्न केला जात असतो व ती वापरतांनाही सावधगिरीनें वापरण्यांत येते. यामुळें कँडीच्या दृष्टीत भाषांतरकाराच्या चुका विशेष खुपत असल्या तर नवल नाहीं. कदाचित् तो विशेष चोखंदळही असेल. थोडा आढ्यतेखोरही असावा. पण असल्या चोखंदळाच्या तोंडूनही गौरवोद्गार काढविणारा भाषांतरकार निघालाच! त्याची योग्यताहि तशीच होती. म्हणून त्याचा ग्रंथ भाषांतर असूनहि आपल्या गोड भाषेमुळें इंग्रजी अंमलांतील मराठी ग्रंथांपैकीं महत्वाचा उल्लेखनीय ग्रंथ म्हणून मान्यता पावला आहे. हे भाषांतरकार मुंबईत वाळकेश्वरी राहणारे कोंकणस्थ ब्राह्मण सदाशिव काशिनाथ **छत्रे** हे होत. यांचेविषयीं लिहितांना कँडी लिहितो, "इसापनीति व बालमित्र या ग्रंथाचे भाषांतरकर्ते जे सदाशिव काशिनाथ छत्रे ह्यांस मी इतके मोठे मानतो कीं हल्लींच्या मराठी लोकांत त्यांसारखा भाषांतर करणारा दुसरा कोणी नाहीं असें मला वाटतें." मात्र पुढें लगेच कँडी लिहितो की "छत्रे किंवा बाळ गंगाधरशास्त्री यांचे ग्रंथ उत्कृष्ट खरे. तरी त्यांत अनेक प्रकारचे दोष होते. ते दोष काढून टाकण्याविषयीं मी फार परिश्रम केले. या श्रमाचें सार्थक झालें किंवा नाहीं हें मी त्या ग्रंथाच्या ज्या प्रती छापल्या त्या पूर्वींच्या प्रतींशीं ताडून पाहिल्या असतां लोकांस

नाहीं असें त्यांनीं साफ सांगितलें असें म्हणतात. त्याकाळीं भाषांतराकरितां मोबदला हजार दोन हजार रुपये मिळण्यासारखा होता, हें आणखी सांगितलें म्हणजे भाऊ महाजन याचा बाणेदारपणा आणि कॅन्डीच्या वटवटीबद्दल त्यांना वाटणारी चीड या दोहोंची नीट कल्पना येईल. 'प्रभाकर' पत्रांत याविषयीं गवगवाही झाला असावा. त्याला उद्देशून कॅन्डी साहेब, ज्ञानोदयांत लिहितो, "प्रभाकर कर्त्यानें व त्यांस पत्रें पाठविणारांनीं कितीएक महिन्यांपासून प्रभाकरपत्रांत कॅन्डी साहेब यांची निंदा चालविली आहे. तर या विषयावर मी थोडेसें लिहितो. या देशांतील लोकांस ज्ञानप्राप्ति व्हावी व त्यांचें कल्याण व्हावें या हेतूनें मी जीव लावून मेहनत करीत आहे. असें माझें मन मला साक्ष देतें. यामुळें 'प्रभाकर' पत्रांत माझेविषयीं जो घोर द्वेषभाव प्रगट केला आहे तो पाहून मला फार आश्चर्य वाटलें. मराठी भाषांतरें तपासण्याचें काम मजकडे बहुत वर्षांपासून आहे. या भाषांतरकारांपैकीं बहुतेकांना इंग्रजी भाषेचें ज्ञान आहे खरें, परंतु त्यांनीं आपल्या जन्म भाषेचा अगदीं अभ्यास केलेला नाहीं. त्यामुळें परकी भाषेंतील ज्ञान स्वभाषेंत सुंदर रीतीनें आणतां येत नाहीं. हें भाषांतर कर्ते इंग्लिश भाषेचें ज्ञान प्राप्त झाले आहे तेवढ्यानें विलक्षण फुगून गेले आहेत. त्यांच्या ग्रंथांत मी अशुद्धें काढलीं त्याचें त्यांस अर्थातच फार वाईट वाटलें. 'प्रभाकर' कर्ता लिहितो कीं पंडितांच्या मदतीवांचून कॅन्डी साहेबास दोन ओळीचें देखील भाषांतर व्हावयाचें नाहीं. तर प्रभाकर कर्ता पुढें येऊन मजबरोबर भाषांतर करण्याचा प्रसंग करील तर मी सिद्ध आहे. फार लांब नको. माझी निंदा करतांना प्रभाकर कर्त्यानें ज्या वाक्यानें आपल्या मनांतील अर्थाचें उद्घाटन केलें आहे तें वाक्यच किती दुष्ट आहे पहा. तो लिहितो, 'त्याच्यानें दोन ओळी भाषांतर करतां यावयाचें नाहीं.' हें वाक्य अगदीं अशुद्ध आहे. शुद्ध लिहिण्याचे दोन प्रकार आहेत. त्याच्यानें करवणार नाहीं किंवा त्यास करतां यावयाचें नाहीं. या चुका परक्या देशांतून येऊन आपली भाषा शिकणारे लोक काढतात ह्या गोष्टीची प्रभाकरकर्त्यास लाज वाटावी. दोन ओळी भाषांतर हेहि बोलण्याचे चालीस विरुद्ध आहे. दोन ओळींचे भाषांतर अशी लोकांत बोलण्याची चाल आहे."(ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे पृ.१८७–८८) आहे कीं नाहीं साहेबी ऐट! शेवटीं कॅन्डी लिहितो, "आतां इतकेंच

सांगतों कीं ज्या भाषांतर करणाऱ्याविषयीं मी वर लिहिलें आहे ते इंग्लिश भाषेंतल्या चालीप्रमाणें मराठी लिहिलें आहे त्याच्यांवर. ते इंग्लिश भाषेंतल्या चालीप्रमाणें मराठी लिहिणें जर सोडून देतील तर त्यांचे ग्रंथ चांगले आहेत असें मी आपलें मत देण्यास अगदी तयार आहे." कॅन्डी साहेबाची ही तक्रार अगदींच निराधार नव्हती. राजभाषेची तेजी तळपत असल्यानें देशभाषांकडे लक्ष देण्याचें सुशिक्षितांना अगत्य वाटेनासें झालें होतें. मातृभाषेची उपासना केल्यानें व्यावहारिक कोणताच लाभ पदरीं पडण्याचा संभव नव्हता. आणि म्हणूनच गुंजीकर चिपळूणकर यांना या अनावस्थेविरुद्ध जोराचा प्रचार करावा लागला.

स्वतःच्या नित्याच्या व्यवहाराच्या भाषेपेक्षां परकी मुद्दाम शिकलेली जी भाषा तिच्यांतील चुका माणसाच्या अधिक त्वरित लक्षांत याव्या हा सर्वांचा अनुभव आहे. परकी भाषा शिकतांना ती शुद्ध स्वरूपांत आत्मसात करण्याविषयीं मुद्दाम प्रयत्न केला जात असतो व ती वापरतांनाही सावधगिरीनें वापरण्यांत येते. यामुळें कँडीच्या दृष्टीत भाषांतरकाराच्या चुका विशेष खुपत असल्या तर नवल नाहीं. कदाचित् तो विशेष चोखंदळही असेल. थोडा आढ्यतेखोरही असावा. पण असल्या चोखंदळाच्या तोंडूनही गौरवोद्गार काढविणारा भाषांतरकार निघालाच! त्याची योग्यताहि तशीच होती. म्हणून त्याचा ग्रंथ भाषांतर असूनहि आपल्या गोड भाषेमुळें इंग्रजी अंमलांतील मराठी ग्रंथांपैकीं महत्वाचा उल्लेखनीय ग्रंथ म्हणून मान्यता पावला आहे. हे भाषांतरकार मुंबईत वाळकेश्वरी राहणारे कोंकणस्थ ब्राह्मण सदाशिव काशिनाथ **छत्रे** हे होत. यांचेविषयीं लिहितांना कँडी लिहितो, "इसापनीति व बालमित्र या ग्रंथाचे भाषांतरकर्ते जे सदाशिव काशिनाथ छत्रे ह्यांस मी इतके मोठे मानतो कीं हल्लींच्या मराठी लोकांत त्यांसारखा भाषांतर करणारा दुसरा कोणी नाहीं असें मला वाटतें." मात्र पुढें लगेच कँडी लिहितो की "छत्रे किंवा बाळ गंगाधरशास्त्री यांचे ग्रंथ उत्कृष्ट खरे. तरी त्यांत अनेक प्रकारचे दोष होते. ते दोष काढून टाकण्याविषयीं मी फार परिश्रम केले. या श्रमाचें सार्थक झालें किंवा नाहीं हें मी त्या ग्रंथाच्या ज्या प्रती छापल्या त्या पूर्वींच्या प्रतींशीं ताडून पाहिल्या असतां लोकांस

समजेल " ( पृ. १८८ ). आपण शोधलेल्या ग्रंथावरील मुखपृष्ठावर मेजर कँडी यांनीं शोधला असा जाड्या ठशांत उल्लेखही करण्याची कँडी दक्षता घेई ! असो. आतां कँडीच्या कठीण परिक्षेस उतरलेले श्रेष्ठ भाषांतरकार जे छत्रे त्यांचेकडे वळूं.

छत्रे यांचे विशेष गाजलेलें असें भाषांतर म्हणजे बाळमित्र भाग १ हें होय. त्यांतहि विशेष असा कीं, छत्रे यांना इंग्रजी व संस्कृत या दोन्ही भाषांचें ज्ञान बेताचेंच होतें असें देव सांगतात. त्यांच्या नांवापुढें शास्त्री हें उपपद नसल्यानें ( त्यांचे शिष्य जे बाळशास्त्री जांभेकर त्यांच्याहि पुढें आहे ) त्यांचा संस्कृताशीं परिचय बेताचाच असावा आणि बाळमित्राचें लेखन चालूं असतां मूळ इंग्रजी पुस्तक समजून घेण्यास त्यांना बाळशास्त्री यांची मदत घ्यावी लागत असे असें देव यांनीं लिहिलें आहे. तेथें आल्यावर ते एका मिशनऱ्याजवळ इंग्रजी शिकले. नंतर ते इंजिनियरच्या ऑफिसांत रैटर होते याचवेळीं इंग्रजांना इंग्लिश शिकलेला व लोकांवर वजन असलेला असा कोणी गृहस्थ असला तर शाळा तपासनीस ( मुक्तसर ) म्हणून हवा होता. आणि योगायोगानें ज्या मिशनऱ्यापाशीं छत्रे इंग्रजी शिकले होते त्यानें शिफारस केल्यावरून छत्रे यांचीच या जागेवर नेमणूक झाली.

**जर्विस** साहेबांनीं जे मराठी ग्रंथ प्रकाशित केले त्यांत त्यांना छत्र्यांची मोठी मदत होती. जर्विस हे नेटिव्ह स्कूल सोसायटीचे सूत्रधार असून छत्रे हे कांहीं काल त्याच संस्थेचे नेटिव्ह सेक्रेटरी होते. १८२९ सालीं त्यांनीं पेन्शन घेतलें. दादोबा लिहितात कीं 'पेन्शन घेतल्यावर त्यांच्या मनांत उपयोगी इंग्लिश ग्रंथांची मराठी भाषांतरें लोकोपकारार्थ करून आपल्या आयुष्याचा सद्व्यय करावा असें होतें. त्या करितां त्यांनीं वाळुकेश्वरी एक स्वतःची धर्मशाळा घेतली. छापखाना घ्यावा असाहि विचार होता.' पण पेन्शन घेतल्यावर लागलीच पुढील वर्षी त्यांना मृत्यूनें गाठलें. छत्रे यांचेवेळीं पेन्शन लवकर घेतां येत असावें. कारण छत्रे यांनीं पेन्शन घेतलें त्यावेळीं त्यांचें वय अवघें चाळीस एकेचाळीसच्या घरांत होतें. मृत्यूपूर्वी दोनच वर्षे त्यांनीं चारपांच पुस्तकें भाषांतरद्वारां मराठींत आणलीं. तीं म्हणजे इसापनीतिकथा, वेताळपंचवीशी, बालमित्र, सिंहासनबत्तिशी शिवाय बोधकथा ( ताराचंद दत्तात्रय

पुस्तकाचे भाषांतर ) व बोधवचन अशी आणखी दोन पुस्तकांची नोंद प्रो. पोतदार यांनीं दिलेली आहे. यांपैकीं इसापच्या कथा आणि वेताळपंचविशी या अव्वल दर्जाच्या नीतिकथा म्हणून गाजलेल्या असून जगाच्या वाङ्मयांत समाविष्ट झालेल्या आहेत. बाळमित्र हें ज्याचें भाषांतर आहे तें Berquin's children's friend पुस्तक मात्र फ्रेंच किंवा इंग्रजीमध्येंहि विशेष गाजलेलें नाहीं. असें असूनहि ते मराठीच्या पोषाखांत इतकें खुलून निघालें आहे कीं साधासुधा गोड मराठी भाषेचा ऐन इंग्रजी अंमलाच्या प्रारंभीचा नमुना म्हणून दाखवा असें कोणी हटकलें तर खुशाल या पुस्तकाकडे बोट दाखवावें ! पुस्तक इंग्रजी भाषेच्या दडपणांतून अजीवात सुटलें आहे असें नव्हे. 'बोका ज्यास जेवावयास आवंतला होता' किंवा 'असा मनोरथ करून बिदीतून पळूं लागला' असे प्रकार डोकावतातच. तरीही मराठी वाङ्मयांत त्यानें अढळ स्थान पटकावलें आहे.

प्रसिद्ध वैय्याकरणी दादोबा यांना छत्रे यांच्या हाताखालीं शिक्षण घेण्याचेंहि भाग्य लाभलें होतें. ते आपल्या आत्मचरित्रांत छत्रे यांच्या बुद्धिमत्तेविषयीं व भाषासौंदर्याविषयीं लिहितात "बाळमित्राचा भाग तयार होऊन त्याचीं पत्रें छापीत होते त्यावेळीं मी वरच्या वर्गांत गेलों होतों. मी इंग्रजी स्कूलांत असतां छत्रे आमच्या वर्गांत केंव्हा केंव्हा स्वसंतोषानें येऊन आम्हांस इंग्लिश पुस्तकांचा मराठींत अर्थ समजावून देत. इसापनीतिकथा व बाळमित्र हे छत्रे यांचे दोन्ही ग्रंथ फार सुरस झाले होते. ती भाषांतरें असे त्या वेळेस कोणास वाटत नसे. मराठींत सरस रीतीनें लिहीणारे हेंच पहिले. त्यांच्या मागून आम्ही सर्व लिहीणारे झालों. त्या काळीं सदाशिव काशिनाथप्रमाणें इंग्लिश भाषा जाणणारे या मुंबई इलाख्यांत एतद्देशीय लोकामध्यें कोणीच नव्हते. यांनीं कोठून कसे या भाषांचें ज्ञान संपादन केलें हें बरोबर समजत नाहीं." आपल्या व्याकरणाच्या प्रस्तावनेमध्येंहि दादोबा लिहितात कीं 'महाराष्ट्र भाषेंत शुद्धरीतिनें वाक्य योजना करून रसभरित असे पहिले ग्रंथ सदाशिव काशिनाथ छत्रे यांनीं रचिले म्हणून त्यास **गद्यात्मक ग्रंथांचे जनक म्हटल्यासहि चालेल.**' भरतखंडाच्या अर्वाचीन कोशकारांचा अभिप्रायहि असाच ठसठशीत

आहे. " छत्रे यांस इंग्रजी भाषा जी येत होती व तीच्या योगाने जी विद्वत्ता त्यांचे अंगी होती ती आताच्या सवातीन हात किताबवाल्यांच्या बरोबरीची जरी नव्हती तरी तेवढ्यावर जे जे ग्रंथ त्यांनी लिहीले ते इतके उत्कृष्ट उतरले आहेत की किताबवाल्यांच्या हातून अजून एकहि ग्रंथ तसा झाला नाही किंवा नसेल; आणि कदाचित् झाला असल्यास त्याप्रमाणे उत्तमहि उतरला नसेल. "

विष्णुशास्त्री चिपळूणकर तर बाळमित्रावर बेहद्द खूष दिसतात ! रसात्मक काव्य हें काव्याचें लक्षण सांगून त्याचीं उदाहरणें म्हणून बाळमित्रातील ' काटेरी झाड ' आणि ' तीन मित्र ' असे दोन सरस उतारे ते देतात आणि मग लिहितात ' हें सगळें पुस्तकच काव्यमय आहे असें म्हटलें असता चालेल. आपल्या मराठींत हें भाषांतर इतकें उत्कृष्ट वठलें आहे कीं तें परभाषेतलें असेल अशी शंकासुद्धा येत नाहीं. " असो. अशारीतीनें कँडी, दादोबा, निबंधमालाकार अशा भिन्न भिन्न क्षेत्रांतल्या रसिकांकडून ज्यांनीं वाहवा मिळविली त्यांची धन्यच म्हटलीं पाहिजे. आणि छत्रे यांच्या भाषेंत आहेच गोडवा तसा. छत्रे यांच्यानंतर हा गोडवा पुढील ग्रंथकारांत दिसत नाहीं. निबंधमालाकार तर लिहितात कीं " बाळमित्र वाचलें असतां मराठीची दुर्दशा वीसपंचवीस वर्षांत किती झाली हें पुरतेपणीं चित्तावर ठसून फार वाईट वाटतें व पुढील पंचवीस वर्षांकडे नजर देण्यास भय वाटतें. ' शास्त्रीबुवांचें हें भय निराधार ठरलें हें आज कोणास सांगावयास नको. खुद्द शास्त्रीबोवांनी ज्या भाषेला प्रौढ स्वरूप प्राप्त करून देण्यांत मोठी कामगिरी केली त्या भाषेच्या भवितव्याविषयीं निराश होण्याचें कारण नव्हतें. शास्त्रीबोवांच्या पूर्वीहि जांभेकर, लोकहितवादी, गुंजीकर वगैरे विद्वानांनी मायभाषेची सेवा करण्याचे व्रत चालू राखलेलेंच होते. अर्थात् शास्त्रीबोवांची तक्रार होती ती त्याकाळच्या सुशिक्षितामध्यें जी अनास्था मायभाषेसंबंधीं फैलावू लागली होती त्याला अनुलक्षून होती.

मराठी भाषेमध्यें कुवत एकंदर कमीच असें जें छत्रे यांचे मत होते तेंहि जातां जातां नमूद केलें पाहिजे. बालमित्राच्या प्रस्तावनेंत ते लिहितात कीं या भाषेंत ( मराठींत ) शब्दसंग्रह थोडा असून, भाषणाची शैलीही प्रौढ नाहीं. " असो.

आतां छत्र्यांच्यानंतर विविधज्ञानविस्तारपूर्व कालखंडांत होऊन गेलेल्या आणखी एकदोन भाषांतरकारांची आपण ओळख करून घेऊं. त्यापैकीं जे

आपल्या भाषांतरनैपुण्याच्या जोरावर सुप्रीम कोर्टाच्या चीफ ट्रान्स्लेटरच्या हुद्या-पर्यंत चढले ते सद्गृहस्थ म्हणजे **हरी केशवजी पाठारे** हे होत. यांचे एक छोटें चरित्र त्यांचे चिरंजीव रामचंद्र हरी यांनीं लिहिलें आहे. यावरून पाहतां हे सोमवंशी क्षत्रीय जातीचे असून यांचा जन्म गिरगावांत १८०४ या सालीं झाला. यांचें मूळचें उपनांव पुरव असें होतें. यांचे आजे गोपाळजी सोनजी विद्वान् व भक्तिपरायण असून काळपुरूष पाहणें वगैरे विद्या त्यांना अवगत असल्यानें अमुक दिवशीं आपण इहलोक सोडून जाणार हें त्यांनीं आधींच सांगून ठेविलें होतें. हरी केशवजींचे वडील केशवजी हे शिल्पशास्त्रज्ञ असून पालवाचे रस्त्यावरील शेणव्यांचें ठाकूरद्वार हें त्यांनीं बांधलें. आजोबांनीं हरी केशवजी-कडून लहानपणींच मोरोपंत वामन यांचीं कांहीं कवनें पाठ करून घेतलीं होतीं. त्यांचेपुढें रीतसर प्राथमिक शिक्षण रॉबर्टमनी स्कूलमध्यें झालें. रे. केर्नी हे त्यांना इंग्रजी शिकवीत व ख्रिस्ती धर्माचे गोडवेही त्यांचेपुढें गात असावेत. कारण या रेवरंडाच्या संगतींत हरी केशवजींची हिंदुधर्मावरील श्रद्धा ढळूं लागून ते ख्रिस्ती होण्याच्या बेतांत होते. अशा प्रसंगीं त्यांचे आजे गोपाळजी यांनीं ज्यांचा स्वतः आपण उपदेश घेतला होता त्या नाथसांप्रदायी ज्ञानेश्वरीभक्त शामराजतात्या केसकर यांची गाठ घालून दिली व त्यांनीं हरी केशवजींच्या सर्व शंका निरसन करून त्यांची डळमळलेली वृत्ती स्थिर केली. शिक्षण संपल्यावर हरी केशवजींनीं जर्विस साहेबांच्या इंजिनिअरिंग शाळेंत चीफ क्लार्कची नोकरी धरली. पुढें चढत चढत वरिष्ठ न्यायालयाचे श्रेष्ठ भाषांतरकार झाले. हरी केशवजींचे आजे व वडील या दोघांनाही ८५।८७ असें मोठे दीर्घायुष्य लाभलें होतें. त्यामानानें हरी केशवजींना अल्पवयांतच म्हणजे वयाच्या ५४ व्या वर्षीं १८५८ मध्यें इहलोकची यात्रा संपवावी लागली. याचें कारण कदाचित् दादोबांच्या पुढील उद्गारांत आढळेल. ते लिहितात कीं, ' हरी केशवजींनीं मदीरापाननिषेधक एक लहानसें मौजेचें पुस्तक रचून छापलें होतें. परंतु दैवगती अशी विलक्षण कीं, उतारवयांत तेच स्वतः या प्राशनाच्या स्वाधीन झाल्यासारखे होऊन मृत्यु पावले.' हरी केशवजींच्या भाषांतरित ग्रंथापैकीं यात्रिक क्रमण या पुस्तकाच्या अनेक आवृत्ति प्रसिद्ध झालेल्या आहेत. या आवृत्यांवर हरी केशवजींचें नांव मात्र छापलें जाऊं नये हें चमत्कारिक वाटतें! 'यात्रिक क्रमणा'चा

मूळ ग्रंथ Pilgrim's Progress हा असून इंग्रजी भाषेंतील धर्मपर वाङ्मयांत बायबलच्या खालोखाल त्याचा दर्जा मानण्यांत येतो. छत्रे यांच्या भाषेइतका गोडवा यांत उतरला नसला तरी भाषांतर एकंदरीनें चांगलें वठलें आहे. पुस्तकाचें नांव यात्रिक क्रमण हें मात्र फारसें सरस नाहीं. 'परलोकचा यात्रिकरु' किंवा अशासारखें एकादें सुगम नांव हवें होतें. यात्रिक हा शब्दही कांहींसा खडबडींतच. तरी एकंदर भाषांतर नीटस आहे. कांहीं कल्पना येण्याकरितां एक लहानसा परिच्छेद वाचून दाखवितो.

'ते समयीं यात्रेकरु पुसुं लागले, आम्ही या पुण्यभूमिस जाऊन काय करूं ? त्याजवर ते पुरुष बोलूं लागले, तुम्ही जे श्रम केले त्यांची तेथें विश्रांतीफळें भोगाल. तुम्ही जो शोक केला त्याच्या आनंदरुप परिणामाचा अनुभव घ्याल. तुम्हीं जे पेरलें आहे त्याचा संग्रह कराल; तुम्ही प्रार्थना केल्या, नेत्रांनी आसवे गाळली, व राजाकरितां दुःखें भोगली त्यानिमित्त सुखप्राप्तीचा उपभोग कराल. तुमच्या ठायीं देहसंबंधी दुर्बलता म्हणून तुम्हांस ज्याची सेवा पृथ्वीवर करावयास आयास होत असतात त्याची सेवा तेथें आनंदघोषे करून उपकारत्वेनें करुन नित्य कराल, आणि जेंव्हा तो न्याय करण्यास सिंहासनावर बसेल तेंव्हां तुम्हीहि त्याच्याबरोबर बसाल. नंतर तो कर्ण्याच्या शब्दानें परत आपल्या नगरास येईल तेव्हा तुम्हीहि परत येऊन त्याच्याबरोबर अक्षय रहाल." (पृ. २६१-६२ यात्रिक क्रमण आ. ४ थी) यावरून भाषांतराची कल्पना येईल. हरि केशवजींच्या चरित्रास विनायक कोंडदेव ओक यांची प्रस्तावना आहे त्यांत त्यांनीं हरि केशवजींच्या भाषांतर नैपुण्याचा एक नमुना दिला आहे तो आजमितीस फारसा सरस वाटत नाहीं. Great men are more modest than persons of ordinary ability. याचें हरि-केशवजींनीं भाषांतर केलें आहे तें म्हणजे 'बुद्धिवान पुरुष हे अल्पगुणी मनुष्यापेक्षां बहुदा विशेष संकुचित आढळतात.' असें केलें आहे. यांतील Modest याचें भाषांतर विनीत, नम्र, विनयशील अशासारख्या शब्दांनीं आज आपण करतों. त्यामुळें 'मनुष्ये संकुचित असतात' यांतील संकुचित शद्ब कानाला चमत्कारीक लागतो. पण ओक यांनीं नेमक्या याच शब्दाचें विशेष कौतुक केलेलें पाहून मौज वाटते! ओक लिहितात 'भाषांतर या दृष्टीनें हें किती बरोबर

आहे हें मार्मिक शिक्षकांस सहज कळेल. अगदीं इंग्रजी पद्धती धरली आहे ही त्यांतल्या वाक्यरचनेची गोष्ट एकीकडे असो. ( खुद्द ओकांचें हें वाक्य मात्र थेट इंग्रजी धर्तीवर आहे ) Modest या शब्दाचें भाषांतर संकुचित या शब्दानें केलेलें आहे तें त्यांच्या स्वतःच्या युक्तीचें आहे.' ओकांनीं प्रस्तावना लिहिली तीही १९११ सालीं. माणसें संकुचित असतात या ऐवजीं संकोचीवृत्तीचीं असतात असा तरी प्रयोग हवा होता. असो.

हरि केशवजींच्या ' यात्रिक क्रमणा ' मध्यें कांहीं पद्येंहि आलीं आहेत. आणि त्यांचें भाषांतरहि सरस आहे. उदाहरणार्थ पुढील संध्यावर्णन पहा—

सूर्यास्तीं कपिशांगीं संध्यारमणीं करावया केली
नीलांधकारवसना नेसुनि आकाशमंदिरीं ठेली.

हें मूळ पद्याचें पद्यमय भाषांतर गद्यभाषांतरापेक्षांहि अधिक खुलून शोभतें. याचें कारण म्हणजे पद्याची वाट वामनमोरोपंतादिकांच्या पायीं चांगली मळलेली होती. गद्याच्या रानांतहि बखरकारांनीं वाट पाडलेली असली तरी त्या वाटेनें जाणारे मुशाफीर थोडे होते. आणि त्या वाटेची फारशी प्रसिद्धि नव्हती. वामन मोरोपंतादिकांच्या काव्याचें पठण प्रचारांत असल्यानें त्या धर्तीवर श्लोक रचणें हें सुलभ होतें. पण या कवींनीं रूढ केलेली संस्कृतप्रचुर भाषा गद्यांत समावण्यासारखी नव्हती व त्यामुळें गद्य अवघड वाटलें असावें. तरीही ' सिद्धपदार्थविज्ञान विषयक संवाद' 'रसायनशास्त्र विषयक संवाद' ह्या दोन भौतिकशास्त्रविषयक ग्रंथाचा उल्लेख केला पाहिजे. हे दोन्ही ग्रंथ गुरुशिष्यसंवादरूपानें लिहिले असून हरी केशवजींची विषय समजावून सांगण्याची पद्धति फार सुगम आहे. हे दोन्ही ग्रंथ चांगले प्रौढ चार पांचशें पानांचे असून त्यांतील शास्त्रीय उपकरणांच्या आकृति मोठ्या सुबक आहेत. ह्या शास्त्रांची वाढ अलिकडे झपाट्यानें होत असल्यानें एतद्विषयक पुस्तकें कालोघाबरोबर मागें पडणें स्वाभाविक आहे. पण एरवीं आजहि पुस्तक वाचण्याजोगीं आहेत. शंभर वर्षांपूर्वी १८३३ व ३७ सालीं जेव्हां ती प्रथम प्रसिद्ध झालीं त्यावेळच्या वाचक वर्गाला तर तें एकअभ्दुतरम्य स्वप्न वाटण्याजोगें होतें. हरि केशवजींनीं फेरिश साहेबाकडून हे शास्त्रीय विषय चांगले समजावून

घेऊन आत्मसात् करून त्यांचे सुबोध भाषांतर मराठींत वठवावें हें फारच प्रशंसनीय आहे. हरि केशवजींची हीं पुस्तकें डोळ्यापुढें असतां न्यायमूर्ती रानड्यांनीं आपल्या ६७ सालच्या मराठी पुस्तकावरील अहवालांत There is not a single text book good or bad on Natural Science असा शेरा मारला आहे. त्यावरून त्यांच्या नजरेतून हे ग्रंथ सुटले असावे असें वाटतें ! दादोबा लिहितात 'हे दोन्ही ग्रंथ हरि केशवजींच्या हातून फार सरस झाले. ते अथवा त्यांचे कर्ते यांची मी लिहीतों आहे या कालीं १८५१ मध्यें थोड्यांस माहिती असेल.'

शास्त्रीय पुस्तकांचीं भाषांतरें करतांना पारिभाषिक शब्दांची उणीव ही मोठीच अडचण असते. या बाबतींत हरि केशवजींनीं हायड्रोजन, ऑक्सिजन असले पदार्थवाचक पारिषिक शब्द मूळ इंग्रजीच कायम ठेवले आहेत. आणि त्यांचे तें धोरण योग्य असेंच होतें. पारिभाषिक शब्द तयार होईपर्यंत वाट पहात ते बसते किंवा उमज पडण्यास अवघड असे नवेच पारिभाषिक शब्द हर ठिकाणीं बनविते तर मराठी भाषेंत नवनवे भौतिक शास्त्रीय विषय उतरतेच ना. आज देखील अखिल भारतीय शास्त्रीय परिभाषा सिद्ध आणि संमत होई-पर्यंत जरूर तेथें जरूर तेवढें मूळ इंग्रजी कायम ठेऊनहि शास्त्रीय विषयांचें ज्ञान मराठी भाषेंत उपलब्ध करून देणें सर्वस्वीं इष्ट आहे. हरि केशवजींच्या नंतर सुमारें ५० वर्षांनीं रसायन शास्त्रावर मराठींत ग्रंथ रचना करणारे बाळाजी प्रभाकर मोडक लिहीतात कीं " मराठी पारिभाषिक शब्द साधारण लोकांच्या कानीं पडल्यानें त्यांचा परीचय त्यांस ज्यास्त लवकर होण्याचा संभव आहे व असले शब्द ऑक्साइड, क्लोराइड या अपरिचित शब्दापेक्षां फार लवकर तोंडास लागतात. परंतु ही गोष्ट केव्हां संभवनीय होईल ? जेव्हां सृष्टिज्ञान व रसायनशास्त्र यांचा अभ्यास सर्वत्र चालू होऊन हे शब्द शेंकडों लोकांच्या तोंडी ऐकूं येऊं लागतील तेव्हां. ज्या पदार्थास मराठी नांवें आहेत किंवा संस्कृत भाषेच्या आधारें सहज देतां आलीं ती दिलीं आहेत. बाकी शब्द इंग्रजीच ठेवले आहेत. कारण पोट्याश, फॉस्फरस वगैरे शब्द लोकांच्या तोंडी फार बसून गेले असून हे पदार्थ विकणारे लोक इंग्रजच असल्यानें त्यांच्या-वांचून चालत नाहीं."

या शास्त्रीय पुस्तकाशिवाय १९३८ सालीं एका इतिहासविषयक इंग्रजी पुस्तकाचें इंग्लंडचा वृत्तांत म्हणून भाषांतर केलें आहे. मूळ पुस्तकाचें नांव दिलेलें नाहीं. वरील शास्त्रीय ग्रंथ हे संवादात्मक आहेत तर ह्या इतिहासाच्या ग्रंथाचें वैशिष्ट्य म्हणजे तो पत्ररूपानें मांडिला आहे. पहिले पत्राची सुरवात अशी आहे—

'चिरंजीव राजश्री गोविंदपंत मुक्काम पुणें या प्रत काशिनाथ विठोबा मुक्काम मुंबई अनेक आशिर्वाद उपरि. तुम्ही येथून गेला त्यावेळीं विनंती केली होती त्याप्रमाणें मी तुम्हास सदैव पत्र पाठवित जाईन आणि तुमची बुद्धि वाढावयाजोगे वर्तमान लिहीत जाईन. ते वर्तमान कोणते तर इंग्लंड देशीचें लोक आता येथें राज्य करतात ते जेणे करून इतक्या चातुर्यास व वैभवास पावले त्या गोष्टी समजल्या असतां मोठ्या उपयोगी पडतील याकारितां तो वृत्तांत मी लिहावयास आरंभिला आहे तो वाचीत जावा.' हरी केशवजींचा आणखी एक भाषांतरित ग्रंथ म्हणजे Chamber's Moral Classbook चें मराठी भाषांतर 'नीतिग्रंथ' हा होय (१८४६) यांतील पुढील चार वाक्यें पहा—'आपण ज्या देशांत जन्मलों व आपलें पालन पोषण झालें त्या देशाची प्रीति करणें ही एक आपल्या स्वाभाविक वृत्तींतीलच एक वृत्ति होय. आपला देश इतर लोकांस कितीहि तुच्छ वाटो, परंतु ही प्रीति प्रायः सर्व देशी जन्मलेल्या मनुष्याच्या मनांत वागती. ही वृत्ति लोकांचे ठायीं आपल्या भूविषयीं आस्था उत्पन्न करिती. त्यास त्या भूमिवर इतर देश चढ करू लागले असतां त्याजपासून तीचा बचाव करावयास प्रवृत्त करिती' (पृ. २१८) याशिवाय हरी केशवजींनीं मंडलीकांच्या सहाय्यानें मिसेस मोर्सेट व मिल यांच्या ग्रंथाधारें देशव्यवहारव्यवस्था हा अर्थशास्त्रीय ग्रंथ तयार केला (१८५१) व स. रा. दीक्षित व विष्णु अमृतराव यांनीं तयार केलेलें शास्त्रीय ज्ञानदर्शन हें तपासून दिलें.

हरी केशवजींच्या नंतर भाषांतरकार म्हणून ज्यांनीं कीर्ति संपादन केली ते लेखक म्हणजे ज्यांच्या बुद्धिमत्तेवरून त्यांचे गुरुजी त्यांना बृहस्पती म्हणून संबोधित असत ते **कृष्णशास्त्री चिपळूणकर** होत. हरी केशवजींप्रमाणें हेही सरकारी नोकरींत कांहीं काल भाषांतरकार म्हणून होते. आपल्या कालखंडांत

पडणारा यांचा भाषांतरीत सुप्रसिद्ध ग्रंथ म्हणजे 'अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी ' हा होय. या ग्रंथानें मराठी वाङ्मयांत अढळ स्थान मिळविलेलें आहे. ग्रंथ मोठा असल्यानें शास्त्रीबोवांच्या हातून त्यांतील पहिले पांच भाग तेवढे उतरूं शकले. पण सुदैवानें तो पुरे करणारे दोन लेखक लाभल्यानें मराठींत तो आता संपूर्ण स्वरुपांत उपलब्ध आहे. या दोन गृहस्थांपैकीं पहिले शास्त्रीबोवांचे खुद्द चिरंजीव व सुप्रसिद्ध निबंधमालाकार विष्णुशास्त्री हे होत. त्यांनीं सातव्या भागाचें भाषांतर केलें. त्यांच्या हातून राहिलेला भाग त्यांचे शिष्य पुणें येथलि किताबखान्याचे मालक हरी कृष्ण दामले यांनीं पुरा केला. कृष्णशास्त्री यांनीं प्रथम रूढरीतीप्रमाणें संस्कृत शास्त्रांत प्राविण्य मिळविलें पण मग बदलता काल लक्षांत घेऊन इंग्रजीवरहि प्रभुत्व संपादन केलें. त्यांचें भाषांतर मोठें सरस उतरलें आहे. हा ग्रंथ सुप्रसिद्ध व सर्वत्र उपलब्ध असल्यानें त्यांतील एकादें अवतरण वाचून मी आपला वेळ घेत नाहीं. प्रस्तावनेंतील चार वाक्यें मात्र उध्दृत करतों. त्यावरून भाषांतराकरितां एकादा प्रौढ विचारसमृद्ध ग्रंथ निवडण्याऐवजीं करमणुक करणारा हा सुरस गोष्टींचा ग्रंथ का निवडला या विषयीं शास्त्रीबोवांची विचारसरणी लक्षांत येईल. ते लिहितात ' देशांतल्या करमणुकीची सुधारणा होणें हे एकंदर देशसुधारणेतील मोठेंच कलम समजले पाहिजे. कोणी म्हणेल विद्याकलाकौशल्य या विषयीचे ग्रंथ वाचल्यापासून मोठा लाभ खरा. पण सुरस व चमत्कारिक खऱ्या पण कल्पित व खोट्या अशा गोष्टी वाचल्यापासून काय नफा आहे? या शंकेवर असें उत्तर आहे कीं या गोष्टी क्वचित कल्पित असल्या तरी त्यांतील मनुष्यस्वभावाविषयीं वगैरे वर्णन खरे असते व त्याच्या ज्ञानापासून चातुर्य प्राप्त होते. असल्या गोष्टी वाचक उत्कंठतेने वाचतो व जलद वाचण्याची संवय होते.' शास्त्रीबोवांचें जॉनसनच्या ' रासेल 'चें भाषांतरही प्रसिद्धच आहे.

या कालखंडात पडणारा शास्त्रीबोवांचा आणखी ग्रंथ म्हणजे मिलच्या ग्रंथाधारें लिहीलेला अर्थशास्त्रपरिभाषा हा ग्रंथ होय. ( १८५५ ) प्रस्तावनेंत शास्त्रीबोवा लिहीतात ' प्राचीन कालच्या बहुतेक ग्रंथकारांचे असे लेख आहेत कीं संपात्ति ही जगांत मोठ्या अनर्थास कारण आहे. परंतु वास्तविक पहातां असे अनर्थ होतात म्हणून धन उत्पन्न करूं नये असा उपदेश करणें म्हणजे अजीर्ण

होऊन लोक मेले किंवा घरास आग लागून त्यांत जळाले म्हणून शहाण्यानें जेऊं नये व घरांत राहूं नये असा उपदेश करण्यासारखे होय. " शास्त्रीबोवांच्या ग्रंथापूर्वी या विषयास लक्ष्मीशास्त्र नांव देऊन एक पुस्तक लिहिलें गेल्याचें ऐकिवांत आहे असें ग. ज. आगाशे यांनीं आपल्या 'अर्थशास्त्राची मूलतत्वें' ( १८९१ ) या भाषांतरित ग्रंथाच्या पहिल्या पानाच्या तळटीपेंत म्हटलें आहे. ( नेनेः अर्वाचीन मराठी साहित्यः ओतूरकर ) शास्त्रीबोवांच्या पुस्तकापूर्वी दोन वर्षे ( १८५३ ) 'संपत्तिविवेचन' नावांचे पुस्तक ना. बा. पटवर्धन यांनीं दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीच्या आज्ञेवरुन केलें. त्याच्या प्रस्तावनेंत ग्रंथकार लिहितो 'मूळ इंग्रजी ग्रंथात प्रतिपादित जो विषय त्याची भाषा पाहिली असतां केवळ आठ वर्षांच्या मुलासहि समजाया जोगी आहे. परंतु मराठी भाषा अगदीच कोती तेंव्हा हा ग्रंथ मूळ इंग्रजी प्रमाणें उतरला नसेल हें काय सांगावयास पाहिजे ? " ( अर्वाचीन मराठी साहित्य पृ. ४५५ )

छत्रे, हरि केशवजी, कृ. चिपळूणकर या तिघांच्या नंतर आणखी कांहींचा उल्लेख करून पुरे करतों. त्यापैकीं पहिले छत्रे यांचे शिष्य बाळशास्त्री जांभेकर हे होत. अत्यंत तैल बुद्धीचे, अनेक भाषाकोविद, देवनागरी लिपीचे अभिमानी व सार्वजनिक कामाची हौस असलेले म्हणून यांची प्रसिद्धी होती. नेटिव्ह असल्यानें रॉयल एशियाटिक सोसायटीचे सभासद म्हणून स्वीकार झाला नव्हता मात्र. त्यांचे प्राचीन शिलालेखावरचे लेख सोसायटी आपल्या मासिकांत छापीत असे ! (जीवनवृत्त खंड २ पृ. ५२१ ) पण त्यांच्या हातून इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित किरकोळ शालोपयोगी भाषांतरापेक्षां अधिक कांहीं ग्रंथरचना मराठींत झाली नाहीं. त्यांचें प्रमुख लिखाण भाषांतराचें नसून मूळ इंग्रजींतच तें लिहिलें गेलेलें असल्यानें भाषांतरकारांच्या प्रस्तुत आढाव्यांत त्याचा पुसटता उल्लेख करतों म्हणजे पुरे. दुसरे भाषांतरकार महादेवशास्त्री कोल्हटकर हे होत. हे कांहीं काळ पुणें कॉलेजात मराठीचे प्राध्यापक होते. त्यांनीं शेक्सपिअरच्या अथेल्लोचें मराठींत भाषांतर केलें आहे. पण समग्र होण्यापूर्वीच त्यांना मृत्यूनें गाठल्यामुळें त्यांचे भाचे ज. स. ग. गाडगीळ यांनीं प्रसिद्ध केलें. या नाटकांत मुळांतील पात्रांची अथेल्लो वगैरे नांवें तशीच कायम ठेवली आहेत. पुढील कालांत शेक्सपिअरच्या

बहुतेक सर्व नाटकांची भाषांतरें झालीं त्यासंबंधीं आज कांहीं बोलावयास नको. कोल्हटकरांचा दुसरा एक ग्रंथ म्हणजे कोलंबसाचा वृत्तांत हा होय. हा रोबेर्सन-कृत अमेरिकेच्या इतिहासाच्या द्वितीय पुस्तकावरून महाराष्ट्र भाषेंत केला. ( सन १८४९ शिक्षा मंडळाच्या आज्ञेवरून ) हें भाषांतर सरस आहे. त्या मानानें अथेल्लोचें भाषांतर थोडें बोजड वाटतें.

वरीलशिवाय ग्रँड डफच्या पुस्तकाचे बाबा साने कृत भाषांतर व मंडलीक कृत इतिहास भाषांतर वगैरे अनेक भाषांतरें याच कालखंडांत मोडतात. पण आतां आपला अधिक वेळ न घेतां येथेंच थांबतों.*

* १९४४ मध्यें मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयानें चालविलेल्या गुंजीकर शताद्वि व्याख्यानमालेंतील एक पुष्प.

# रसचर्चेचें चर्वितचर्वण !

गेल्या दोन तीन वर्षांत रसचर्चेचें चर्वितचर्वण बरेच चालू आहे. रस हा चर्वणाप्राणच असल्यानें त्याचें चर्वितचर्वण झालें तर रसिकाला संतोषच होईल ! पण रसाचें चर्वण निराळें आणि रसचर्चेचें चर्वण निराळें. हें चर्चेचें चर्वण सर्वांना गोड लागेलच असें मात्र नाहीं. गोड लागावयाचें तर राहूंच द्या, पण चोखतां चोखतां त्यांतील रस नाहींसा होऊन आतां नुसतां त्यांत चोथा उरला आहे, तेव्हां तो शुष्क चोथा चघळत बसण्यापेक्षां फेकून दिलेलाच बरा नाहीं का असेंही अलीकडे कांहींना विचारावेसें वाटूं लागलें आहे. दुसऱ्या कांहींनीं जुन्या रस-कल्पनेंत नव्या रसांची भर घातली तर रस-कल्पनेला नवी गोडी उत्पन्न होईल असा उपचार सुचविला आहे. तिसऱ्यानें काव्यांतील रस पिळून निघाल्यानें चोयट्या चघळीत बसण्यापेक्षां काव्यांतील सुगंध आतां आपण सेवन करूं या, असें मत प्रदर्शित केलें आहे. चौथे विचारतात कीं, रस व सुगंध हे दोन्ही आनंदाचे प्रकारच ना ? मग रस किंवा गंध हे पर्यायशब्द वापरण्यापेक्षां त्या सर्वांपासून मिळणारा जो आनंद तोच रस असा व्यापक शब्दच कां वापरूं नये ? व रसांचे वीर, करुण वगैरे वर्गीकरण करण्याचें सोडून देऊन रसिकाला जर सर्वच रसापासून आनंद होतो तर काव्याचा प्राण हा रस मानण्याऐवजीं आनंद हाच मानणें अधिक युक्त नाहीं कां ? आणखी एक मत तर असें आहे कीं, रस, रीती, अलंकार वगैरे जीं काव्याचीं आंगोपांगें म्हणून चर्चिलीं जातात तीं सर्वच सोडून विशदीकरण किंवा प्रगटीकरण Expression हेंच काव्याचें वैशिष्ट्य म्हणून कां मांडलें जाऊं नये ? अशी ही भिन्नभिन्न विचारसरणींची गुंतागुंत आपल्यापुढें सध्यां उभी करण्यांत येत आहे. या गुंतागुंतींत संस्कृत काव्य-

मीमांसकांनीं काव्याचा आत्मा म्हणून ज्याचा पुरस्कार केला आहे तें रसतत्व गुदमरून गेल्यासारखें दिसूं लागले तर त्यांत आश्चर्य कसलें ?

या गुदमरलेल्या अवस्थेंतून रस-कल्पनेला मोकळेपणा द्यावयाचा तर तिच्या भोंवतीं वर उल्लेखिलेली जी गुंतागुंत माजलेली आहे ती मोकळी केली पाहिजे. ही गुंतागुंत मोकळी तर व्हावयाची नाहींच पण खुद्द रस-कल्पनेचा गळाच उत्तरोत्तर दाबला जाणार आहे अशीही विचारसरणी मांडली जात आहे. तेव्हां प्रथम तिचाच उल्लेख करूं. ही विचारसरणी **प्रो. पंगू** यांनीं मांडली आहे. ते लिहितात कीं, 'आजच्या बुद्धिवादी जीवनांत कोणतीच भावना स्थिर होणें मुष्कील. तेथें स्थायीभाव उत्कटलेला जाऊन रसस्वाद घेणें ही फार दूरची गोष्ट आहे असें माझें मत आतां झालें आहे.' ( साहित्य फेब्रु. १९४८ ) हे उद्गार म्हणजे एखाद्या निराश झालेल्या मनांतून उमटणाऱ्या उद्गारासारखे दिसतात. पण इतके निराश होण्यासारखी परिस्थिति खरोखरच आजकाल प्राप्त झाली आहे का ? आजच्या काळींही जनतेसमोर जयजयकार गरजणारे कुसुमाग्रजासारखे कवी आपल्यांत वावरत आहेतच ना ? संस्कृतीच्या विकासाबरोबर कविप्रतिभेचा संकोच होत जाईल असें जें भविष्य मेकॉलेनें शंभर वर्षांपूर्वीच मांडलें होतें, तें फोल ठरलें असेंच गेल्या शतकाचा इतिहास सांगत उभा आहे ना ? मग बुद्धिवादाच्या गळचेपानें भावनेचें उत्कटत्व जाऊन ती पंगू होत चालली आहे असा पक्ष मांडणें म्हणजे वस्तुस्थितीकडे मुद्दाम डोळेझाक करणें नव्हे काय ? वरील विचारसरणीला कविवर्य काळेले यांनीं पुढील अंकांतच उत्तर दिलें असल्यानें त्यांतील उद्गार उद्धृत करून आपण पुढें जाऊं. कविवर्य लिहितात कीं, " आमची भावना आतां बुद्धिनिष्ठ झाली म्हणून भिण्याचें कारण काय ? आमच्या भावनांचीं पिकलेलीं पानें जळत असलीं तरी नवीन धुमारा जोरांत फुटत आहे, तेव्हां रसयुग संपलें नहीं " आणि तें कधींच संपावयाचें नाहीं !

बुद्धि, कल्पना व भावना ह्या ज्या मनोव्यापारांच्या तीन पद्धती त्यांत व्यक्तीपरत्वें व परिस्थितीपरत्वें भरीवपणांत फरक पडेल. पण बुद्धीच्या प्रकाशाचा कितीही प्रचंड झोत भावनेवर पडला तरी भावना ह्या वितळून जात नाहींत तर त्या निरनिराळीं आश्रयस्थानें पाहून प्रतिष्ठित होतात एवढेंच.

अलीकडे धर्मभावनेला ओहटी येऊं लागलेली दिसत असली तर राष्ट्र-भावनेला भरती येत चाललेली आपण आपल्या डोळ्यासमोर पहात आहोंतच ना ? बुद्धीचा जोरकसपणा वाढत जाईल तशा भावना व कल्पना लुल्या होत जातील असे नव्हें, तर होईल तें येवढेंच कीं भावना व कल्पना यांना वारेमाप मोकाट सुटूं न देतां त्या प्रत्यक्ष व्यवहारिक जीवनाशीं अधिक जुळत्या मिळत्या होतील अशा करण्याकडे मानवतेचा कल वाढूं लागेल. म्हणजे इहलोकीं अलभ्य वाटणाऱ्या आनंदपूर्ण जीवनाचें स्वर्गीय स्वप्न रंगविण्यांत रंगून न जातां इहलोकीचें जीवनच स्वर्गमय कसें करता येईल यांत कविप्रातिभा अधिकाधिक मोहून जाईल.

मात्र असें होत असतां काव्य हें वेदान्त व विज्ञान यांत विलीन होत जाऊन त्याला स्वतंत्र असें स्थानच रहाणार नाहीं अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. अशी भीति नाहीं तरी निदान संशय उत्पन्न होण्यासारखे विचार मात्र पाश्चात्य कलामीमांसक **क्रोचे** यानें मांडले आहेत तेव्हां त्याच्याकडे वळूं या. त्यानें कलेची व्याख्या दिली आहे ती अशी कीं, कला म्हणजे व्यक्तीकरण अथवा विशदीकरण होय. विशदीकरण कशाचें हें स्पष्ट करण्याचें महत्व त्याला वाटत नाहीं. कारण त्याच्या मते कला म्हणजे सुव्यक्तीकरण, अथवा निराकाराचे साकारीकरण, आणि काव्यांत निराकाराला साकाराचें रूप देण्यांत येतें तें भाषेच्या रूपानें देत असल्यानें कला, प्रगटीकरण व भाषा ही सर्व एकरूपी होत.

The identification of language and poetry is unavoiadable having established the conception of art as intuition and intuition as expression and therefore implicitly its identity with language. ( Aesthetics पृ. ५१ ).

विदर्भ साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत डॉ. देशमुख यांनीं या सुव्यक्तीकरणाचा अथवा Expression चा उल्लेख केला आहे. तेथेंहि नुसत्या Expression या शब्दाच्या त्या उल्लेखामुळें गैरसमज होण्यासारखा आहे. ते लिहितात "पाश्चात्य काव्यमीमांसेकडे वळल्यास काव्याच्या मुळाशीं असलेलें तत्व म्हणजे Emotion, feeling किंवा Expression असें त्यांनीं म्हटलेलें आढळून येतें. या सर्व कल्पनांचा समावेश व्यापकतेनें 'भाव' या संज्ञेंतच होणार

नाहीं का ? " यापैकीं Emotion व Feeling हे भाव या अर्थाचेच शब्द आहेत तेव्हां समावेशाचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. पण Expression ह्या शब्दाला भाव' या सञ्ज्ञेत कसें सर्वस्वीं बसवितां येईल ? Expression म्हणजे प्रगटीकरण, अथवा सुव्यक्तीकरण. पण सुव्यक्तीकरण कशाचें हें स्पष्ट केलें पाहिजे. कल्पना, भावना व विचार या सर्वांनाच आपण भाषेच्या द्वारें तोंड फोडीत असतो. मग जेथें सुप्त मन:पिंडाना वाचा फोडली आहे त्या सर्वच ठिकाणीं कला उसळून बाहेर येत आहे असें म्हटलें तर वेदान्त, विज्ञान आणि काव्य या सर्वांचे प्रांत सर्वस्वीं एक होतील ! या तिन्ही प्रांतांना कांहीं भाग समान असतो हें मान्य पण प्रत्येकाचें वैशिष्ट्य सांगतांना त्याच्या प्रभावी प्रांतावर भर द्यावयाचा असतोना ? तसा भर न दिल्यास व कला म्हणजे विशदीकरण असेंच ठांसून सांगितल्यास कलेचें स्वरुप स्थूल व ढोबळ केलें जातें. असेंच स्वरुप वर उल्लेखिलेल्या इटालियन कलामीमांसक क्रोचे यानें मांडलें आहे. पण तसें करण्यांत वेदान्त, विज्ञान आणि कला ही एकस्वरुपी होत असा पक्ष मांडून त्यानें घोटाळा मात्र उत्पन्न केला आहे. त्याचें सूत्र एवढेंच दिसतें कीं सुप्ताला वाचा फोडणें हेंच कलेचें ध्येय. मग ती वेदांताची असो, विज्ञानाची असो वा कलेची असो ती सर्व एकस्वरुपाची असें त्यानें प्रतिपादन केलें आहे. घोटाळा उत्पन्न केला आहे असें म्हटलें आहे तें सहेतुकच म्हटलें आहे. म्हणजे असें कीं त्याला कांहीं निराळें तत्व मांडावयाच आह असें नाहीं. कलेची व्याख्या करतांना तो लिहितो कीं, कला ही स्वयंस्फूर्तीच्या पोटीं जन्मास येत असते. Art is intution. पुढें स्पष्टीकरण करतो तें असें कीं, ' स्फूर्तीला एकसूत्रीपणा आणि अखंडता आणण्याचें काम मात्र भावनेचें आहे. What gives coherence and unity to the intuition is feeling. म्हणजे भावनेला या नाहीं त्या दरवाजानें स्फूर्ति-मंदिरांत आणून महत्वाचें स्थान द्यावेंच लागतें. आणि मग प्रगटीकरणावरच जो जोर दिला जातो तो कांहींसा ठिसूळ होतो. प्रगटीकरणावरच जोर दिला म्हणजे काय प्रगट केलें जातें याचें महत्व लुलें होतें. पण उत्कृष्ट काव्यामध्यें भावना व त्या प्रगट करण्याची शैली या दोन्हींनाही महत्व असते. असें जर आहे तर प्रगटीकरणास अधिक महत्व देण्यांत मिळविलें काय ? 'वागर्थौ इह संपृक्तौ' या भाषेंत कालिदास शब्द आणि अर्थ या दोहोंनाहि महत्व देतो, नुसत्या शब्दाला अथवा अर्थाच्या

प्रगटीकरणाला महत्व देत नाहीं. पण **क्रोचे**साहेब प्रगटीकरणालाच अधिक महत्व देतांना आढळतात. ते म्हणतात कीं, ' शब्द आणि अर्थ हे अभिन्न असल्यानें कला म्हणजे स्फूर्ति व स्फूर्ती म्हणजे तिचें भाषेंत प्रगटीकरण ' Art is intuition & intuition is expression.* पण प्रगटीकरणावरच भर दिला म्हणजे काव्य, विज्ञान, वेदान्त यांतील भेदच नाहींसा होईल. कारण सर्वच ठिकाणीं प्रगटीकरण हेंच ध्येय असलें तरी कशाचें प्रगटीकरण यालाही स्वतंत्र स्थान आहेच ना ? क्रोचेनें याला महत्त्व न देतां काव्य आणि वेदान्त या दोहोंना एकाच स्वरूपाचें लेखिले आहे (पृ. ७५) वेदान्त, विज्ञान व काव्य ह्या सर्वांनाच सुप्त मनःस्थितीला भाषेच्या द्वारें व्यक्त स्वरूप द्यावयाचें असतें. पण प्रत्येकाची दृष्टि भिन्न असते. आणि त्यांतच त्यांचें वैशिष्टय समावलेलें असतें. स्फूर्ति व प्रतिभा ही वेदान्त, विज्ञान व कला या सर्वांनाच जन्म देत असते. पण एकाच आईच्या पोटीं जन्मास आलेलीं भावंडें स्वतंत्र असें कांहीं वैशिष्टय घेऊनच जन्मास येतात. यामुळेंच त्यांना व्यक्तित्व येतें. तोच प्रकार वेदान्त विज्ञान व काव्य यांचा ! त्यांचा जन्म प्रतिभेच्या पोटींच होत असतो. पण असें असतांही त्या प्रत्येकाला स्वतःची म्हणून कांहीं आत्मीयता असतेच. वेदांतील ' द्वा सुपर्णा सयुजा सखाया ' अशा आत्मा परमात्म्याच्या रूपकांत वेदान्त हा काव्याला हाताशीं धरून नेत आहे तरी प्रमुख स्थान वेदान्तालांच आहे, तात्पर्य प्रगटीकरणावरच नुसता भर देऊन काव्य विज्ञान व वेदांत ही सर्व एक आहेत असा पक्ष जो या तत्वज्ञानानें मांडला आहे तो अतिरंजित आहे हें सांगावयास नकोच.

असाच कांहींसा प्रकार **डॉ. देशमुखांच्या** भाषणांत दिसतो. ते लिहितात 'नवे जुने काव्यमीमांसक रससिद्धांत हा संपूर्ण काव्यसृष्टीला पर्याप्त नाहीं हें अंधुकपणें जाणत असूनही त्याचेंच चर्वितचर्वण करतांना दिसतात. याचें मुख्य कारण रस हा काव्याचा आत्मा होय हें भ्रामक गृहित तत्त्व होय.' प्रथम असें सांगितलें पाहिजे कीं, रसाशिवाय इतर आनंदाच्या प्रकाराचीही जाणीव, नुसती अंधुक नव्हे तर स्पष्ट जाणीव संस्कृत काव्य मीमांसकांना नाहीं असें नाहीं. ' रीतिः आत्मा काव्यस्य '

* Essence of Aesthetics by Croce. पृ. ५१

असा रोखठोकपणें प्रतिपादन करणारा संस्कृत काव्यमीमांसक होताच ना ? एकानें तर रसोत्कटता आणि कल्पना विलास या दोहोंनाहि स्वतंत्र पण उच्च असें स्थान दिलेलें आहे. हा काव्यशास्त्रकार मम्मटाच्या काव्यप्रकाशावर प्रदीप नांवाची टीका लिहिणारा गोविंद हा होय. काव्यप्रकाशांतील काव्याच्या व्याख्येवर भाष्य करतांना तो लिहितो कीं, ‘ तददोषौ शद्वार्थौ अनलंकृतिः पुनःक्वापि ’ याचा अर्थ “नीरसे स्फुटालंकारविरहिणि न काव्यम् यतः रसादिः अलंकारश्च **द्वयं** चमत्कार हेतुः ” असा घेतला पाहिजे. या मतांत रस आणि अलंकार म्हणजेच भावना व कल्पना या दोहोंनाही त्यानें महत्व दिलेलें आहे. मग असें असतां भावनोत्कटतेला म्हणजे रसालाच आत्मा म्हटलें जातें तें कां तर कल्पनाविलास व भावनोत्कटता या दोहोंची तुलना करितां कल्पनाविलासापेक्षांहि भावनेला अथवा रसाला अधिक महत्व दिलें पाहिजे याकरितां. पण तें तरी कां ? तर भावनेचा जेथें अविष्कार नसेल तेथें कल्पनाविलासाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळेल, पण भावनेला अथवा रसाला प्राधान्य असेल तेथें कल्पनेला भावनेच्या तोंडाकडे पाहूनच आपली पावलें टाकावीं लागतात. आणि यामुळेंच रसाला महत्व दिलें असल्यानें त्या मताची नुसतें **भ्रामक** या मतानें बोळवणी करणें युक्त होणार नाहीं.

पण याहोपेक्षां डॉ. देशमुखांच्या भाषणांत घोटाळा झालेला दिसतो तो हा कीं रससिद्धांताला भ्रामक म्हणून एकीकडे नांवें ठेवीत असतांना दुसरीकडे ते काव्यांत भावनेला प्राधान्य देतातच. फक्त सर्व कला प्रांताला समावेषक अशी एखादी मूर्त संज्ञा हवी असल्यास भावगंध ही नवीन संज्ञा सुचवितों असें म्हणतात. आता ही गंधसंज्ञाही संस्कृत काव्यमीमांसकांना सुचली नव्हती असें नव्हे ! या गंध संज्ञेचाहि उल्लेख भरताचार्यानें प्राचीन कालीं केलाच आहे ! म्हणजे गंध आणि रस या दोन्ही कल्पना भरताच्या पुढें होत्या. ‘ लोकेच प्रसिद्धं हि **गंधेन रसेन** वा सर्वमेव भावितम् इति ’ त्यापैकीं रसालीं त्यानें प्राधान्य दिलें व तेंच चर्वणाप्राण या रसाच्या कल्पनेनें पुढें रूढ झाले ते रास्तच होय. आतां सर्व कलांना भावरसापेक्षां भावगंध ही कल्पना अधिक लागू आहे असें देशपांडे यांनीं मांडलें आहे पण याचें समर्थन करतांना गंध ही संज्ञा अतिरिक्त व्यापक अर्थानें त्यांना योजावी लागली आहे. म्हणजे संगितापासूनचा आनंद हा शब्दगंध,

शिल्पापासूनचा आनंद हा स्पर्शगंध, चित्रापासून रूपगंध ! गंध शब्दाची व्याप्ति इतकी जर पातळ केली तर त्यांतला गंधपणाच नाहींसा होईल. यापेक्षां या ठिकाणीं अधिक काय म्हणूं ? प्राचीन आचार्यांनीं आपल्या रस या शब्दाच्या रूपकावरची नजर कायम ठेवून त्याचा अतिरेकी उपयोग केला नाहीं हेच योग्य नव्हे कां ? रस त्या कल्पनेला कमीपणा देण्याकरितां ' रस इत्यादिक साहित्यांतील दगडांचा चूर ' ही ' बी ' कवीची ओळ उद्घृत करून रसध्वनीचे सर्व पाठबंधारे फोडून टाकणारी 'पिंगा' 'चांफा' वगैरे काव्यें आहेत असें मत देशपांडे यांनीं मांडलें आहे. पण रसाला दगडाच्या चुराची उपमा देणाऱ्या ' बी ' कवींनीं ' गंधालाही ' अशीच एखादी उपरोधक उपमा दिली नसती काय ? देशमुख लिहितात कीं, डॉ. माधवराव पटवर्धन यांना रसव्यवस्थेचें वैयर्थ्य जाणलें. त्यांतील सर्व अडचणी जाणूनहि तिच्यांत सुधारणा सुचविल्या. पण विधायक मार्ग सुचविला नाहीं " हें वाक्य वाचून डॉ. देशमुख तरी विधायक मार्ग सुचवतील अशा अपेक्षेनें वाचक पुढें वाचू लागतो पण त्यांनीं सुचविलेला विधायक मार्ग कोणता ? तर रसाच्या ऐवजीं **गंध** हा होय ! तुम्ही म्हणाल कीं नुसता गंध नव्हे भावगंध ही संज्ञा त्यांनीं सुचविली आहे. तेव्हां त्याहीसंबंधीं खुलासा असा केला पाहिजे कीं भाव हा शब्द संस्कृत काव्यमीमांसकांनीं वापरला आहे तो रसाचें बीज या अर्थी. त्याचीच परिणती रसांत होत असते असे ते प्रतिपादन करीत असतात. भरतालाही हेंच अभिप्रेत आहे. ' न भावहीनोऽस्ति रस: न भावो रस वर्जितः ' हें भरताचें वचन उद्धृत करून देशमुख लिहितात कीं, भरतानें रसाची योग्यता देतांना भावाची महती ओळखली असावी ' पण इतकें चुचकारून लिहिण्याची आवश्यकताच काय ? एकट्या भरतानेंच कशाला रसाची चर्चा करणाऱ्या सर्वच शास्त्रकारांनीं भावाला डोळयाआड कधींच केलेलें नाहीं. भाव पुष्ट झाला म्हणजे त्याचा रसस्वाद घेतां येतो अशीच उपपत्ती मांडली गेली आहे. मग वाद उर-तोच कोठें ? देशपांडे लिहितात कीं ' भरतानें भाव कल्पनेस रसाहून कोणत्याही बाबतींत कमी दर्जा दिलेला नाहीं ' पण यांत दर्जा देण्याचा प्रश्न नाहीं. बीजा-तून वृक्ष निर्माण होतो असें म्हणतांना बीजाला कमीपणा का आपण देत असतों ? पण बीजांतून उंसाचें कांड तयार होईल तेव्हांच त्याचा रस आपणास चाखतां येतो. बीजांतहि उसाचे रसादि सर्व गुण सुप्त रूपानें असलेच पाहिजेत पण

त्याची चव आपणांस कशी चाखतां येणार ? म्हणूनच आस्वादकालीं बीजाचा उल्लेख न करितां उसाचें बीं चाखीत बसतो असें म्हणण्यापेक्षां ऊस चाखीत बसतो असें आपण म्हणतों त्यांत उसाच्या बियांना किंवा ' डोळ्यांना ' कमीपणा देण्याचा प्रश्न नसतो. यास्तवच **भावरस** अशा संज्ञेऐवजीं **रस** ही एकेरी संज्ञा वापरण्यात प्राचीनांना भावाचें विस्मरण झालें आहे असें मानण्यास जागाच नाहीं. तेव्हां रसाच्या ऐवजीं नुसती गंध अशी संज्ञा न वापरता भावगंध अशी संज्ञा सुचविल्यानें भावाला जें योग्य स्थान पूर्वाचार्यांनीं दिलें नव्हतें तें नव्यानें प्रथमच दिलें जात आहे अशीही समजूत करून घेण्याचें कारण दिसत नाहीं.

असो. देशमुखांच्या अध्यक्षीय भाषणाविषयीं अधिक न लिहितां शेवटीं एवढेंच लिहितो कीं रसचर्चा ही अपुरी आहे हें दाखविण्याकरितां रसाऐवजीं फक्त गंध हा शब्द त्यांना सुचवावयाचा आहे येवढेंच. तो शब्दहि भरताला सुचलेला होता त्याचा उल्लेख वर केलाच आहे. पण ' पिंगा ' किंवा ' चाफा ' ही काव्यें जर रसाचे पाटबंध फोडतात असें प्रतिपादन करावयाचें तर तींच काव्यें गंधालाही दूरवर फेकून नामशेष करतात असें नाहीं कां म्हणतां येणार ? 'सतारीचे बोल' किंवा 'झपुर्झा' यांत रस नसतो असें एकीकडे प्रतिपादन करीत असतां दुसरीकडे त्यांत गंध मात्र असतो असें सुचविलें तर तें टिकेल का ? होईल तें येवढेच कीं काव्यरस या रूपकाच्याऐवजीं काव्यगंध हें रूपक योजल्यानें रसव्यवस्थेचें वैय्यर्थ असे शब्द योजण्याऐवजीं गंधव्यवस्थेचें वैय्यर्थ असे शब्द योजावे लागतील येवढेंच काय ते !

तसेंच ' जेथें जीवन-मूल्येंच बदललीं तेथील नव्या काव्याला जुने सिद्धान्त ते किती म्हणून ताणणार ' असाही प्रश्न देशमुख यांनीं टाकला आहे. रस हें जुनें रूपक फेंकून गंध हें नवें रूपक योजल्यानें जीवनाच्या नव्या बदललेल्या मूल्याची एक अभिनव व्यवस्था लावता येते ह्या कल्पनेंतील फोलपणा आपण आतां पाहिलाच.तसेंच जीवन-मूल्येंच बदललीं आहेत हें विधानही पारखलें पाहिजे. कारण जीवनाचीं मूल्येंच बदललीं आहेत हेंही विधान सर्वस्वीं टिकण्यासारखें नाहीं. सामाजिक जीवनाचीं मूलभूत मूल्यें सर्वस्वीं बदललेलीं आहेत का ? तीं हजारों

वर्षे स्थिरच आहेत. ‘ सर्वे नः सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ’ हें वेदवाक्य, अथवा ‘ परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ’ हें भारतांतील उद्गार, किंवा ‘ अहिंसा सत्यं अस्तेयं शौचं इंद्रियनिग्रहः ’ हा स्मृतिकाराचा आदर्श आज हजारों वर्षे लोटली तरी पहिल्या इतकाच धगधगीत आहे ना ? विज्ञानाच्या वाढीमुळें जीवनाकडे पहाण्याची दृष्टी बदलत असून स्वर्गीय सुखाच्या कल्पनेंत रमण्यापेक्षां इहलोकींचें जीवनच स्वर्गमय करूं अशी आकांक्षा मानव आतां बाळगूं लागला आहे व ‘ सर्वे सुखिनः ’ यांतील सर्व शब्द आता अस्पृश्य व निग्रो यांच्या सकट सर्वांना उद्देशून वापरण्यांत येऊं लागला आहे हें स्पष्ट आहे. एवढया मर्यादित अर्थी जीवनाचें मूल्य बदलत आहे असें म्हणतां येईल. पण वर उल्लेखिल्याप्रमाणें ‘ परोपकारः पुण्याय पापाय परपीडनं ’ हीं जीवनमूल्यें तर बदललेलीं नाहींतच फक्त तीं अधिक व्यापक होत चाललीं आहेत. ‘ सर्वे नः सुखिनः सन्तु ’ असें उपनिषद-कार म्हणतात तेव्हां त्यांच्या डोळ्यापुढें सर्वे या शब्दानें जो लोक-समुदाय येत असेल त्यापेक्षां आजच्या कवींच्या पुढें अधिक व्यापक समुदायाचें चित्र उभें रहात असेल. पण याही बाबतींत आजचा काल फार पुढें गेला आहे असें नाहीं. सहाशें वर्षांपूर्वी ‘ हें विश्वचि माझें घर ’ असें चित्र ज्ञानेश्वर रेखाटत होतेच ना ? वाहतुकीचीं साधनें प्रचंड प्रमाणांत वाढल्यानें आज ‘ विश्वचि माझें घर ’ हें विधान सार्थ होण्याच्या मार्गावर येत चाललें आहे. पण रशिया आणि अमेरिका हीं दोन बलिष्ठ राष्ट्रं जोंपर्यंत एकमेकांवर गुर्गुरत आहेत तोंवर ‘ हें विश्वचि माझें घर ’ ही कल्पना प्रत्यक्ष व्यवहारांत उतरण्याचा काल आजही दूर क्षितिजावरच पहावा लागत आहे. तेव्हां अलीकडील कालांत जीवनमूल्येंच बदलूं लागलीं आहेत म्हणून नव्या काव्याला जुने सिद्धान्त लावतांना ते किती म्हणून ताणणार असा प्रश्न विचारण्यांत स्वारस्य नाहीं. आणि रसाच्या रूपकाच्या ऐवजीं गंधाच्या रूपकानें नवीन जीवनमूल्यें अधिक सार्थकतेनें सुचविलीं जातील ही कल्पना तर बिनबुडाची होय हें वर दाखविलेंच आहे.

दुसरें एकजण असें सुचावितात कीं रसाचें चर्वितचर्वण आतां उमाप झालें रसापासून रसिक वाचकहो, तुम्ही आनंदच लुटणार ना ? मग आतां रस कल्पनेचा चोथा अधिक चघळत न बसतां मूळ रसाच्या गोडीवर, आनंदावरच अधिक

भर देणें उचित होणार नाहीं का ? **प्रा. वा. ल. कुलकर्णी** या प्रश्नासंबंधीं लिहितात कीं "कोणत्याही कलाकृतीच्या परिशीलनानें रसिकाला होणाऱ्या आनंदाला रस ही पदवी देण्यास हरकत नसावी. त्या रसाला कोणतें नांव द्यावयाचें हा प्रश्न गौण आहे, अनावश्यक आहे. वर्गीकरणानें व नामकरणाच्या अट्टाहासानें आपण रसाच्या विविधतेला बाध आणीत आहों. रसांची गटवारी करून त्यांचा संकोच करणें तरी सोडून दिलें पाहिजे," ( साहित्य डिसेंबर १९४९ ) वर्गीकरणाच्या व नामकरणाच्या अट्टाहासालाच विरोध करावयाचा असेल तर तो मान्य होण्यासारखा आहे. कारण अट्टाहासानें पाऊल पुढें पडणें कठीणच. पण रसाला नांव कोणतें द्यावें हा प्रश्न गौण आहे येवढेंच सांगून न थांबतां नांव देणें अनावश्यक आहे असा पक्ष जेव्हां मांडला जातो तेव्हां मात्र तो चिंत्य ठरतो. कारण वर्गीकरण व त्याला सूचक असें नामकरण हा शास्त्रीय विचारसरणीचा मूलभूत पायाच होय ! मग तें शास्त्र रसायनशास्त्र असो अध्यात्मशास्त्र असो अथवा काव्य शास्त्र असो. सर्व शास्त्रांची याच वाटेनें पाउलें पुढें पडत चाललेली आढळतात ना ? या वाटेनें भौतिक शास्त्रांनीं फार मोठा पल्ला गाठला आहे. तो पल्ला गांठायला मानसशास्त्राला किती काल वाट पहावी लागेल याचा अंदाज करण्याइतकीही वाढ या शास्त्राची झालेली नाहीं. पण म्हणून त्या दिशेनें प्रयत्न चालू आहेत ते झिडकारून कां द्यावयाचे ? उदाहरणार्थ मॅगडुगलसारख्या मानसशास्त्रीय अभ्यासकानें मूलभूत भावनांची कांहीं संख्या सुचविली आहे. ती सर्वांना मान्य आहे असें मुळींच नाहीं. पण त्या दृष्टीनें प्रयत्न सोडून देणें इष्ट मानून तो प्रयत्नच टाळला तर मानसशास्त्राची प्रगतीच थंडावेल ! तोच प्रकार काव्य-शास्त्राचा. रसांत परिणत होणाऱ्या भावनांचें वर्गीकरण करून वीररस करुण-रस ह्याप्रकारें त्यांचे भेद मानणें यानेंच निरनिराळ्या काव्यांतील वैशिष्ट्यें दर्श-विण्यास झाली तर मदत होईल. तसेंच आनंदास्वादाकरितांच रसिक काव्याकडे वळत असला तरी आनंदाचे सर्व प्रकार एकच स्वरूपाचे नसतात हेंही विसरता कामा नये. फळाफळांमध्यें कांहीं समान गोडीचा धर्म असला तरी प्रत्येकाच्या गोडीचें स्वतःचें म्हणून वैशिष्ट्य असतेंच ना ? आम्र आणि द्राक्ष ही दोन्ही गोडच. पण या दोहोंची गोडी सर्वस्वी एक नव्हे. आम्र आणि द्राक्ष यांच्या चवींत जसा फरक असतो तसा त्यांच्या आकारांत, रंगांतही असतो व त्यावरूनच त्यांचें स्वत्व दर्श-

विण्याकरितां अनेक नांवें योजावीं लागतात. गुणांचें आणि अलंकाराचेंहि स्वतंत्र नामकरण याच दिशेनें होत चाललेलें आहे. सर्वच गुणांत आणि अलंकारांत मूळरूपाला आकर्षक करण्याचे धर्म असतातच; पण तेवढयाच कारणाकरितां सर्व गुणांचें व अलंकाराचें एकच गुण अथवा अलंकार या शब्दानें वर्णन करावें असें म्हणणें रास्त होईल कां ? अलंकारांतील सूक्ष्मभेद दाखविण्याच्या भरांत कांहीं संस्कृत काव्यमीमांसक अतिरेकाला गेले आहेत हें निराळें ! पण म्हणून अलंकारांतील उपमा, विरोध, उत्कर्ष, वगैरे भेद न पाहतां सर्वच अलंकारांना नुसतें अलंकारच म्हणून थांबावयाचे असेल तर काव्यशास्त्राचें क्षेत्रच संकुचित होऊं लागेल. तोच प्रकार रसाच्या प्रकरणीं लागू आहे. सर्व रसास्वादांत आनंद असतो हें मान्य. पण हें मान्य म्हणजे तो आनंद सर्वस्वी एकच स्वरूपाचा असतो हें मान्य नव्हे. श्रृंगाररसांतील आनंद आणि करुण रसांतील आनंद हें सर्वस्वी एक स्वरूपाचे नव्हेत. उत्तररामचरित्रांतील वज्राला पाझर फोडणारा करूण रसाचा आस्वाद घेत असतां वाचकांच्या डोळ्यांतून अश्रू गळूं लागतात तें सर्वस्वीं आनंदाचें निदर्शक नसतात. रामाशीं समरस होऊनच वाचक अश्रू गाळीत असतो. रामाशीं समरस होतांना स्वतःचें व्यक्तित्व तो सर्वस्वीं विसरत मात्र नाहीं. यामुळें शोकरस हा आस्वाद्य असला तरी तो श्रृंगाररसाशीं सर्वस्वी एकरूप ठरत नाहीं. सांजा आणि श्रीखंड दोन्ही चविष्ट पण श्रीखंडांतील चवींत गोडीच्या जोडीला आंबटताही असते. म्हणूनच त्याची चव निराळी. तोच प्रकार श्रृंगार, वीर, करुण वगैरे रसांचा. या सर्वांत आनंदाचा कांहीं भाग समान आहे. पण तो असूनहि प्रत्येकाचें वैशिष्ट्य आपणांला हटकल्याशिवाय रहात नाहीं. मानसशास्त्रांलाही नुसती भावना ही संज्ञा वापरून न थांवतां शोक, क्रोध वगैरेंत त्यांचे प्रत्येकाचें स्वत्व प्रगट करणें आवश्यक होते. तोच न्याय काव्यशास्त्राला लागू. मूलभूत भावना कोणत्या याविषयीं एकमत नसतांही प्रत्येक मानसशास्त्रज्ञ त्या कोणत्या असाव्यांत याविषयीं आपले विचार मांड-याचा प्रयत्न चालू ठेवतोच ना ! मग काव्यशास्त्राला मात्र रसांच्या नामांची वर्गीकरणाची आवश्यकता नाहीं हे प्रतिपादण्यांत स्वारस्य काय ? किंवा भारतीय काव्य मीमांसक भोज व शार्मण्य, विदेशीय मीमांसक फ्राइड यांनीं श्रृंगार व लैंगिकता यांचें माजविलेले अतिरेकी एककल्ली स्तोम स्वीकारण्यांत हंशील काय ?

आतां रसांतील भावना या पूर्वींसारख्या तुटक व एकस्वरूपी न राहतां त्या अधिक अधिक मिश्र व संघटनात्मक होत चालल्या आहेत म्हणून त्यांचे पृथःकरण व वैशिष्ट्य पूर्वींसारखें रेखाटणें अवास्तव होईल या मुद्यावरही ते झिडकारण्याचें कारण नाहीं. कां ? तर भावना संघटित व व्यापक झाल्या तरी ज्या प्रमुख भावनेभोंवतीं त्या संघटित असतात त्या प्रमुख भावनेचें नांव रसाला देणें अयुक्त होणार नाहीं. 'प्राधान्येन व्यपदेशः' हें सूत्र इतर क्षेत्रांत लागू पडतें तसेंच काव्यशास्त्रालाही लागू करणें अवास्तव ठरणारें नाहीं. 'तात्पर्य मानसशास्त्र ज्याप्रमाणें भावनांचे प्राथमिक, संमिश्र वगैरेचे आपल्या तऱ्हेनें वर्गीकरण करीत असते, तसेंच काव्यशास्त्रानेंही रसांच्या वर्गीकरणाचा प्रकार चालू ठेवणेंच इष्ट होय. हें वर्गीकरण कळल्यानें काव्याच्या आस्वादांत भर पडेल असा पक्ष मांडावयाचा नाहीं हें सांगावयास नकोच ! पण काव्यशास्त्राची भूमिका ही काव्यापासून निराळी असल्यानें काव्यरसाच्या स्वरूपाचा, वर्गीकरणाचा, नामकरणाचा प्रस्ताव सोडून देणें मात्र इष्ट नव्हे.

तो सोडून न देतां व केवळ जुन्या सकुंचित गटवारीला चिकटून न राहतां त्यांत नवी सुधारणा सुचवावी अथवा भर टाकावी असे जे प्रयत्न चालू आहेत त्याकडेच आतां वळू या. त्यापैकीं कविवर्य **अनिल** यांनीं आपल्या नभोवाणींतील भाषणांत सुचविलेल्या प्रक्षोभ रसाची गांठ घेऊं या. पूर्वाचार्यांनीं आठ किंवा नऊ रस मानले म्हणून आपण तेवढेंच मानावे किंवा पूर्वीच्यांतला एक वगळला तर तेवढाच भर टाकून संख्या कायम ठेवावी असा पक्ष मला मांडावयाचा नाहीं हें येथें सांगावयास नकोच. काव्याच्या विकासाचा मागोवा घेत काव्यशास्त्रानें पाउलें टाकली पाहिजेत ह्या बाबतींत दुमत होण्याचें कारण नाहीं. भक्तिरसानें जनतेच्या भावना उचंबळून येत असतां केवळ पूर्वाचार्यांनीं तो रस मानला नाहीं म्हणून आपणही मानणें युक्त नव्हे हा स्वतःला 'तर्केषु कर्कशधी' मानणाऱ्या जगन्नाथ पंडिताचा तर्कही मान्य होण्यासारखा नाहीं. प्राचीनांनीं आठ रस मानले म्हणून नववा मानूंच नये असा दावा शांतरसाच्या बाबतींत पूर्वी मांडला गेला असावा. पण बौद्ध धर्मानें निवृत्ति व निर्वाण यांचा जारीनें पुरस्कार केल्यावर जें वाङ्मय निर्माण झाले त्यांतील रस हा शांतरस या नांवानें स्वीकारला गेलाच ना ? त्याच दृष्टीनें भक्तिरसाचा पुरस्कार करणें योग्य ठरेल. 'घोटवांन

लाळ ब्रह्मज्ञाना हातीं मुक्ता आत्म स्थिती सांडवीन ' अशा एकनिष्ठेनें ज्या भक्ति भावनेचा पुरस्कार करण्यांत आला तिनें असंख्य भक्तगणांची हृदयें थरारुन गेलीं. नसतीं तरच आश्चर्य. अशा रसाचा श्रृंगार-रसांत अंतर्भाव करणें अशक्य होतें. ' विराणी ' सारखे कांहीं अभंग वरवर पहातां श्रृंगाराचा वेश धारण करताना दिसले तरी मराठी वाङ्मयापुरतें पाहतां त्यांची संख्या अल्प असून ते विठाइ माउलीच्या पुढें फिक्की पडणारी आहे. तेव्हां श्रृंगारांचा एक पोटभेद म्हणून भक्तीचा अंतर्भाव त्यांत करणें योग्य झाले नसते. पण दुसरा एक पर्याय सुच-विण्यांत आला आहे तो मात्र अधिक व्यापक स्वरूपाचा आहे. तो म्हणजे रसाचे श्रृंगार हें रूढ नांव बदलून त्याच्या जागीं प्रेम हें नांव रूढ करणें हें होय. प्रेम या संज्ञेंत पत्निप्रेमाबरोबर मातृप्रेम, देवप्रेम ( भक्ति ) राष्ट्रप्रेम या सर्व प्रेममय जिव्हाळयाच्या भावनांचा समावेश होऊं शकेल. राष्ट्रप्रेमाला राष्ट्रभक्ति हा शब्द रूढ झाला तो यथार्थच होय. कारण राष्ट्रभक्तींत राष्ट्राकरितां तिळतिळ तुटणाऱ्या आपुलकीच्या भावनेवर भर असतो. ' ने मजसि ने परत मातृ-भूमीला । सागरा प्राण तळमळला ' अशा काव्याचें या ठिकाणीं सहज स्मरण होईल. म्हणूनच पत्नि, माता, ईश्वर, जनता, राष्ट्र या सर्वांविषयीं वाटणारी आपुलकीची व आकर्षक भावना व्यक्त करण्याकरितां व पूर्वीच्या शारिरिक आकर्षणाच्या जोडीला मानसिक आकर्षणाची भर पडत चालली आहे हें सुच-विण्याकरितां रसचर्चेत श्रृंगाराच्या जागीं प्रेम ही संज्ञा रूढ झाल्यास ती अधिक व्यापक व शास्त्रीय ठरेल असें मला वाटतें.

आतां तुतारीसारख्या काव्याकडे वळूं या. म्हणजे वीररस ही संज्ञाही व्यापक अर्थी रूढ करणें संयुक्तिक होईल हें पाहूं. तुतारीचा आस्वाद घेत असतां तेथें मनावर संस्कार होतो तो वीरवृत्ति जागृत करण्यासारखाच असतो. ' गत शतकांचीं पापें घोरे । क्षालायाला तुमचीं रुधिरें । पाहिजेत रे स्त्रैण न व्हा तर । हें जें कवीचें आव्हान आहे तें जनतेच्या मनांतील सुप्त वीर वृत्तीला उफाळून काढणारेच आहे ना? शूर हे प्रत्यक्ष रणांगणावर शस्त्रांनीं लढणारे असोत अथवा लेखणींच्या फट-काऱ्यानें शत्रूवर हल्ला करून त्याकरितां तुरुंगवास पत्करणारे असोत. ज्याच्या रक्तांत वीर्य नसेल त्याला शत्रूवर चालणारी तरवार जशी झेपणार नाहीं तशी तुरुंगवासाची

शिक्षा ठोठावणाऱ्या सरकारवर उघडपणें लेखणी फिरविण्याचेंही धैर्य होणार नाहीं. यामुळें शस्त्रानें झगडणारे शिवाजी व बाजीराव, आणि लेखणी व वाणीचे फटकारे मारणारे टिळक व गांधी हे वीररसाचे पुरस्कर्ते मानणें अयोग्य ठरूं नये. म्हणूनच केशवसुतांच्या तुतारीसारख्या काव्याकरितां प्रक्षोभाची नवीन भावना मानण्यापेक्षां प्रक्षोभ हा वीरवृत्तीचेंच एक स्वरूप मानणें युक्त होणार नाहीं कां? दुसरें असें कीं जनतेची जी सुप्त भावना प्रक्षुभित केली ती तरी झगडण्याची म्हणजे वीर्याचीच ना? आतां झगडा भिन्न भिन्न स्वरुपाचा असला तरी वीरवृत्तीसंपन्न असणाराच झगडा देऊं शकतो; भीरु देऊं शकणार नाहीं. म्हणून तुतारीचा उत्साह हा वीर वृत्तीच्या इतका निकट येतो कीं त्याला स्वतंत्र्य असें फारसें उरतच नाहीं. उलट पूर्वीच्या मीमांसकानीं वीराचे दानवीर धर्मवीर हे जे प्रकार मानले आहेत त्यांचा अन्तर्भाव वीर रसांत करणें म्हणजे वीर रसांतील वीर्य अगदींच पातळ करणें असे मला वाटतें! त्या पेक्षां तुतारी काव्यांतील रस हा वीर रसाशीं पुष्कळच अधिक जुळता आहे. प्रक्षोभरस हा वीररसाशीं अगदीं जुळता असल्यानें त्याला स्वतंत्र स्थान देण्याचे कारण दिसत नाहीं असा पक्ष मांडण्यांत पूर्वाचार्यांनीं मानलेल्या रस संख्येत नवीन भर टाकण्या सारखें काव्यच निर्माण झालेले नाहीं असें मला सुचवायचे नाहीं हें सांगावयास नकोच. तसे काव्य निर्माण होत आहे. तुतारी सारखें काव्य मात्र या रीतीनें नवें नव्हे. आतां तुतारी काव्यनिर्मात्या केशवसुताच्याच 'झपुर्झा' या काव्याकडे वळा म्हणजे एक निराळाच काव्य प्रकार दृष्टी समोर उभा राहील. यातील रस कोणता? 'हास्य निमाले'। अश्रु पळाले। प्रकाश गेला। तिमिर हरपला। या मानसिक अवस्थेंतले हे चित्र आहे. अशी काव्ये प्राचीनकाळी आपल्याकडे नव्हतीच असे नव्हे. उपनिषदांत असली काव्ये आहेत याची मुद्दाम आठवण करून देण्याचीही अवश्यकता नाहीं. मग त्यांच्याकडे काव्यशास्त्रकारांची दृष्टी कां वळली नाहीं? एकतर उपनिषदांत काव्य असलें तरी त्यांचा भर तत्वज्ञानावर आहे हें सांगावयास नकोच. पण याहीपेक्षां अधिक महत्वाची बाब म्हणजे रसचर्चेला ज्यानें प्रथम प्रौढ स्वरुप दिलें त्या नाट्यशास्त्रकार भरताला नाटकांतील पात्रांच्या भावनांचीच चर्चा करावयाची होती. व त्या भावना बहुजन समाजाला सुलभ व आकर्षक अशा असावयाच्या तर बहुजन समाजाच्या रोजच्या जीवनांतीलच भावनांना नाटकांत

प्रगटविणें योग्य होतें. द्वंद्वांतीत अशी औपनैषदिक वृत्ति बहुजन समाजाला पचविण्याला कठीण आणि नटाला ती रंगभूमिवर उठवून दाखविणें त्याहूनही कठीण. यामुळेंच अशा प्रकारचीं नाटकें लिहीली गेलीं नाहींत. आणि म्हणून नाट्यशास्त्रकार भरतानें उपनिषदांत प्रगट होणाऱ्या उदात्त रसाचा अन्तर्भाव नाट्यशास्त्राच्या रसचर्चेंत केला नाहीं हें सहाजिक होतें. पुढील काळांतील काव्यशास्त्रांकारांनीं याकडे वळावयास पाहिजे होते. पण पुढील काळांत उपनिषदासारखी काव्यमय वेदान्तचर्चा सामान्यपणें जी मागें पडली ती पडलीच. तात्पर्य ' झपुर्झा ' सारख्या काव्यांतील रसाचे नामाभिधान करतांना प्राचीन औपानिषदिक काव्याकडेही दृष्टी वळवून पूर्वाचार्यांनीं मानलेल्या रससंख्येंत उदात्तासारख्या रसाची भर टाकणें इष्ट होईल.

रस संख्येंत भर टाकणें शास्त्रविरुद्ध नव्हेच. पण ती भर टाकतानां नव्या रसांतील नाविन्य कसोशीनें पारखूनच स्वीकारलें पाहिजे याकडे मात्र लक्ष वेधलें पाहिजे. आणि तें वेधण्याकरितां **आचार्य जावडेकरांनीं** सुचविलेल्या नव्या क्रांतिरसाकडे आतां वळूंया. ('नवभारत' जुलै १९५० पहा ) झपुर्झाकडून क्रांतिरसाकडे वळण हें सहज सुचण्यासारखेच आहे. कारण जावडेकरांनीं क्रांतिरसाचें वर्णन करतांना ' सुखदुःखे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ ' ही स्थितप्रज्ञाची लक्षणें क्रांतिकारक कर्मयोग्याला लागू पडतात असें म्हटलें आहे. त्यांचें हें मत पारखून घेतलें पाहिजे. कारण स्थितप्रज्ञ क्रांतिकारक जरी घेतला तरी क्रांति येईल तेव्हां येवो म्हणून थंड बसणारा नसतो. तसा असेल तर युद्धाला प्रवृत्तच होणार नाही. स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठीं क्रांति घडवून आणण्याकरितां तो धडपडत नसला तरीही जनतेच्या कल्याणाकरितां म्हणा कीं उच्च ध्येयवादाचा पुरस्कार करण्याकरितां म्हणा जर तो क्रांति घडवून आणण्याकरितां झगडत असेल तर त्या झगडण्याच्या रसांतच म्हणजे वीररसाच्या भावनेंतच तो रंगलेला दिसेल. क्रांति हे वीराच्या झगडण्याचें अंतिम पर्यवसान होय. त्यांत रस नसून तें टोंक गांठण्याकरितां वाटेल त्या संकटांना धडाडीनें तोंड देण्याऱ्या वीरश्रींच्या भावनेंतच वीररस आहे. वीरश्रीनें अखंड झगडण्याचें पर्यवसान क्रांतींत होत असतें. या पर्यवसानांत रस नसून

त्याकरितां कराव्या लागणाऱ्या झगडण्यांत रसचर्वणा असून ती चर्वणा वीर रसाचीच होय. 'सुखदुःखे समे कृत्वा' ही जी गीतेंतील क्रांतिकारकांची मनोवृत्ति म्हणून उध्दृत केली आहे तीही क्रांतिकरतां झगडणाऱ्यांना लागू पडणारी नसून फक्त फारच उच्च पातळीवरच्या स्थितप्रज्ञांना लागू पडण्यासारखी आहे. आणि त्याही बाबतींत स्थितप्रज्ञ हा यशानें हूरळून जाणाऱ्या किंवा अपयशानें निराश होणाऱ्या भावनेच्या पलीकडे गेलेला असला तरी क्रांति घडवून आणण्याकरितां आपली सर्व शक्ति वाहून घेण्याच्या भावनेच्या पलीकडे गेलेला नसतो हेंही विसरून चालणार नाहीं. त्याचें पर्यवसान क्रांतींत होवो अथवा न होवो. स्थितप्रज्ञ हा यशापयशाच्या पलीकडे गेलेला असला तरी क्रांतीकरतां झगडा देणें यांतच तो रमलेला असतो हें मान्य केलें पाहिजे. आतां रमलेला असतो हें वर्णनच स्थितप्रज्ञाला लागू नाहीं असें म्हणावयाचे असेल तर अधिक विवेचनास जागाच उरत नाहीं ! कारण सर्वच भावनांच्या पलीकडे जो गेला व जो सर्वस्वीं द्वंद्वांतीत झाला तो क्रांतीच्या भावनेच्याही पलीकडे गेला असें म्हणावें लागेल. तेव्हां द्वंद्वांतीताचा अर्थ या मनःस्थितीच्या बाबतींत मर्यादितच घेतला पाहिजे. म्हणजे क्रांति होवो अथवा न होवो. जय मिळो अथवा न मिळो. ध्येयाकरितां झगडण्यांतल्या आनंदांत दंग असणारा तोच स्थितप्रज्ञ अशा अर्थीच द्वंद्वातीत हा शब्द घेतला पाहिजे. स्थितप्रज्ञ हा स्वार्थाच्या पलीकडे गेलेला असला तरी आनंदाच्याहि पलीकडे गेलेला असतो असा पक्ष मांडला तर ब्रह्मास्वाद या शद्बांनाही अर्थ राहणार नाहीं. अद्वैताच्या अवस्थेंत भावनाच जेथें सुप्त होते तेथें ब्रह्मानंद या शद्बाला तरी अर्थ कसा उरणार ? म्हणूनच भक्तिरसांत अखंड मुरलेल्या तुकोबांना ' घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्ता आत्मस्थिति सांडवीन । अशा रीतीनें भक्तिरसाचा पुरस्कार करावा लागतो.

भक्तिरसाच्या बाबतीतही जावडेकरांची विचारसरणी पारखूनच घेतली पाहिजे. भक्तिरसाच्यासंबंधीं जावडेकर जे लिहितात कीं "अलीकडे मानसशास्त्रांत आत्मा, आत्मसुख हे शब्द लिहिणें अशास्त्रीय मानलें जातें, पण त्याचबरोबर भक्तिरसाची महती गाण्यांत येते ही परस्पर विसंगति आहे " तेथेंही माझ्यामतें यांत विसंगति मानण्याचें कारण नाहीं. कारण भक्त ज्या ईश प्रेमांत किंवा

भक्तींत रंगलेला असतो ती भावना मानसशास्त्राच्या कक्षेबाहेरील नाहींच. भक्ति हा प्रेमादराचाच प्रकार आहे. प्रेम व भक्ति ह्या भावना वास्तविक व कल्पित अशा दोन्ही विषयावर केंद्रित होऊं शकतात. मानवता राष्ट्रीयता अशा भावनाही मनःकल्पित ध्येयावरच आधारलेल्या असतात ना? तशीच आत्मा व ईश्वर या कल्पनावर उभारलेली भक्ति ही भावना. भक्तिरसपूर्ण काव्य लिहिणाऱ्या संताचा आत्मा व ईश्वर यांच्यावर विश्वास होता हें स्पष्टच आहे. पण भक्तीची व प्रेमाची भावना ही मानवी मनाची भावनाच आहे. तिचा विषय जो ईश्वर तो श्रद्धेनें वा कल्पनेनें मनापुढें उभा केला जातो. संतांची ईश्वरावर श्रद्धा होती म्हणूनच त्यांच्या वाणींतून उत्कृष्ट काव्य निर्माण झालें. ती श्रद्धा आतां पूर्वीसारखी उरली नाहीं. म्हणून त्या प्रकारचें काव्य-हि मागें पडलें आहे. तथापी आजही आपण संतांच्या अभंगांची गोडी चाखूं शकतो याचें कारण भक्तानें ईश्वर प्रसन्न होईल किंवा नाहीं ही श्रद्धा डळमळली असली तरी भक्ताची देवावरील भक्ति ही मुलाच्या आईवरील भक्ति सारखीच उत्कट असतें हें होय. भक्ति ही भावना इतर भावनाप्रमाणेंच असून तिचा विषय हा देशभक्ति, जनताभक्तिं, मानवताभक्ति या प्रमाणेंच ईशभक्ति हा होऊं शकतो. भक्तिरसाला मान्यता देणें म्हणजे आत्मा परमात्मा यांना मान्यता देण्यासारखेच होय असेंही प्रतिपादन करता येणार नाहीं. आत्मा परमात्मा या नुसत्या कल्पना मानल्या तरी त्या खऱ्या मानून त्यांत संत व वि रंगतो हें मान्य केलेंच पाहिजे. आणि असें जर आहे व आधुनिक वाचकही कल्पनेनें संताच्या भावनेशीं एकरूप होऊं शकतो हें जर मान्य केले तर भक्ताची आस्वादक वृत्ति ही मानसशास्त्रास अमान्य होण्याचें कारणच नाहीं. भक्त रंगतो ते विषय वास्तविक कीं काल्पनिक हें तपासण्याचें कार्य तत्वज्ञानाचें, मानसशास्त्राचें व विज्ञानाचें. रसिक हा श्रृंगार वीर वगैरे रसस्वादांत जसा रंगतो तसाच भक्तिरसांतही रंगतो. रंगण्याच्या भावनेच्या पाठीमागें आत्मा गृहीत धरला पाहिजे असा पक्ष मांडला म्हणजे तो सर्वच रसांना लागू होईल व मग आचार्य जें म्हणतात कीं 'आत्मा आत्मसुख याचें विवेचन करणारें निराळें अध्यात्मशास्त्र मान्य करून त्या आधारें शांतरस, भक्तिरस व क्रांतिरस यांची मीमांसा केली पाहिजे' त्यालाही अर्थ उरत नाहीं. 'मन रामीं रंगले' ही भक्ताची वृत्ति जी भावना

दर्शविते ती भावना मानसशास्त्राला अमान्य होण्याचें कारण नाहीं. श्रद्धाही भावनाही मानसशास्त्राला मान्यच. श्रद्धावानाला आत्म्याचें जें स्वरुप पटतें ते कल्पित कीं वास्तविक याची चर्चा करण्याची काव्यशास्त्राला आवश्यकता नाहीं. भक्तिभावना, प्रेमभावना या मानवी मनाच्या भावना आहेत. त्यांचे विषय आत्मा, ईश्वर, जनता, कांहीं असो. भावना ही सत्यच होय. त्या करितां आत्म्याशीं तिचा संबंध लावला पाहिजे असा निष्कर्ष निघत नाहीं.

ज्या क्रांतिरसाच्या अनुषंगानें हा विषय उपस्थित झाला त्या क्रांतिरसाकडे पुन्हां एकदां वळून मला असें प्रतिपादन करावयाचें आहे कीं क्रांति हा रस नसून तिच्याकरितां झगडण्यांत जो रस निर्माण होतो तो वीररस होय. वीराच्या पराक्रमाचा अंत क्रांतींत होत असतो. त्या क्रांतीकरतां झगडण्यांमध्यें अनुभवास येणारा आनंद हा वीररसाचा आनंद होय. झगडणारी वृत्ति ही वीरवृत्ति, मग तो झगडा शस्त्रास्त्रांनीं झगडला जावो वा विचारांनीं व भावनांनीं लढला जावो. क्रांति हा झगडा नसून झगड्याचा शेवट आहे. म्हणूनच त्याचें रसत्व मानणें युक्त दिसत नाहीं. वीररसापेक्षां क्रांतिरस हा स्वतंत्र आहे हें सिद्ध करण्याकरितां जावडेकर लिहितात कीं, ' केशवसुतांच्या काळांत नव्या व जुन्या विचारांचा कलह चालू होता. दोनही पक्ष स्वतःला देव व प्रतिपक्षाला दानव म्हणत असत. यापैकीं खरे देव व खरे दानव कोण यांचा विवेक करण्यांत केशवसुतांचे क्रांतिकारकत्व दिसून येते." म्हणजे केशवसुतांची विचारसरणी क्रांतिकारक असेल, पण रसाचा आस्वाद रसिक घेतो तो मुख्यतः या विचारसरणीचा नसून त्या विचारसरणीशीं सलग्न असणाऱ्या भावनेचा. ती भावना झगडण्याची अथवा वीरत्वाची होय. जावडेकर पुढें लिहितात कीं, ' केशवसुत केवळ वीररसाचेच भोक्ते असते तर ते जुन्या पक्षास देवपक्ष म्हणून गौरवूं शकले असते. पण ते वीररसाचे केवळ अंध भोक्ते नव्हते. ' जावडेकर यांना या ठिकाणीं नक्की काय प्रतिपादन करावयाचें आहे हें मला तरी नीट उमगत नाहीं. केशवसुत हे वीररसाचे केवळ अंधभक्त नव्हते असें म्हणण्यांत जुनें काव्यशास्त्रकार जेव्हां जेव्हां वीररसाची उदाहरणें देतात तेव्हां तीं केवळ अंध भक्तांनींच देतात असें कां जावडेकरांना सुचवावयाचे आहे ? वीररसाचे सर्वमान्य

सुप्रसिद्ध उदाहरण म्हणजे लंकेहून सीतेला सोडवून आणण्याकरितां झगडणाऱ्या श्रीरामचंद्राच्या वीर भावनेचें. रामाचा हा झगडा सत्याकरितां होता. अंध भोक्त्याचा नव्हता. तेव्हां रामाचा झगडा हा समाजाच्या उत्कर्षाकरितां तसाच केशवसुतांचाही समाजाच्या उत्कर्षाकरितांच म्हणूनच वीररस हाच क्रांति घडवून आणण्यांत वीरांच्या भावनांतील रस मानणें सयुक्तिक नव्हे का? त्याचा स्थायी भाव, उत्साह हा भरतानें दिला आहे. उत्साह ही भावना सर्व झगड्याच्या मुळाशीं असते. उत्साही ज्याकरितां झगडतो तें ध्येय कालपरत्वें व्यक्तिपरत्वें बदलेल, पण वीररस हा उत्साहाच्या भावनेवर अधिष्ठित असून त्याचें पर्यवसान क्रांतींत होत असतें. संताच्या उत्कट भक्तिभावनेचें पर्यवसान मोक्षांत–अद्वैतांत म्हणजे ईश्वराशीं एकरूप होण्यांत होतें. पण ही शेवटची क्रांति हा चर्वणाप्राण रस नसून तें अंतिम ध्येय साध्य होण्याच्या पूर्व कालांतील ‘ घालीन लोटांगण वंदीन चरण ’ अशा भक्तिभावनेंत तो चर्वणाप्राण आहे. जावडेकर लिहितात “ केशवसुतांच्या क्रांतिरसाचा आस्वाद घेणाराला ज्ञान योग्याची शांति, भक्तियोग्याची प्रीति आणि कर्मयोग्याची वीरवृत्ति यांचा उपयोग नवी समाजसृष्टी निर्माण करण्याकरितां येईल हें दाखवून दिलें आहे. ” म्हणजे वीरवृत्तीच्या जोडीला शांति आणि भक्ति यांची जोड दिली म्हणजे त्या वृत्तींतून क्रांतिरस निर्माण होतो अशी आणखी एक पुस्ती त्यांनीं जोडली आहे. पण क्रांतीची वृत्ति ही शांती व भक्ति याच्या साहचर्यानें पुष्ट होते कशी याचा मला तरी उलगडा होत नाहीं.

आतां हें चर्वितचर्वण आटोपतें घेण्याच्या शेवटी एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा तो म्हणजे भाव, विभाव व व्यभिचारी भाव या भरताने रूढ केलेल्या संज्ञाचा. पैकीं व्यभिचारी हा शब्द तर मराठी साहीत्यशास्त्राला खटकल्याशिवाय राहणार नसल्यानें तो सोडून देणेंच युक्त. पण मला याही पुढें जाऊन असें सुचवावयाचें आहे कीं विभावादि संज्ञा मराठी काव्यशास्त्रानें सर्वस्वीं स्वीकारण्याचें कारण नाहीं. रंगभूमीवर तेथील चित्ररंगीत पडदा, नटांचा पोशाख, त्यांचे हावभाव ह्या सर्वांनीं मिळून नटाच्या ठिकाणीं नायकाचा आभास निर्माण करावयाचा असतो. उलट काव्यांत वा कादंबरींत दोन पात्रांची नुसती संभाषणें वाचत असतांही वाचक त्यांच्याशीं तद्रूप होत असतो. त्या पात्रांचे रूप वेष वगैरे वर्णन न केलें

तरी चालतें. कारण वाचक आपल्या कल्पनेनें त्या पात्रांचीं चित्रें आपल्या मनःचक्षूपुढें उभी करीत असतोच. म्हणून नाट्येतर ललित वाङ्मयांतील आस्वादस्वरूपांच्या चर्चेत विभाव, अनुभाव यांना विशेष महत्व उरत नाहीं. नाट्याच्या रसस्वरूपाच्या चर्चेतही आजच्या मराठी वाचकाला सुलभ वाटतील अशा संज्ञा योजणें युक्त असल्यानें विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव या संज्ञा-पैकीं अनुभाव ही कायम ठेवून विभाव व व्यभिचारी भाव यांना उद्दीपनभाव व संचारीभाव अशासारख्या संज्ञा रूढ करणें इष्ट होईलसें वाटतें. अलंकार संख्येची सूक्ष्म पिंजण्यानें झालेली अवाढव्य वाढ व मराठी वाचक वर्गाला अपरिचित अशी त्यांचीं नांवें या दोहोंतही सुधारणा अवश्य आहे याची चर्चा मी काव्यलोचनांत केलेलीच आहे. तसेंच विभाव व्यभिचारी भाव या संज्ञा बदलाव्या असें येथें सुचवीत आहें.

असो रस हा चर्वणाप्राण असला तरी रसचर्चा ही अधिक चघळत बसतां बेचव होत असल्यानें येथेंच आतां थांबतों.

———

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्वक्रम
अनुक्रम ५४६७९ वि: निबंध
क्रमांक २९०२ नों दि २०।३।६९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७७६६

REFBK-0007768
REFBK-0007768

नवें प्रकाशन



# कला आणि कलास्वाद

लेखक : प्रा. श्री. दा. भालेराव, बी. ए.

प्रस्तावना : डॉ. मोतीचंद्र, एम्. ए., पीएच्. डी.

( डायरेक्टर, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई )

गेले बरें ते दिवस ! पण खरेंच गेले का ? एक काळ असा होता कीं जेव्हां भारतीय संस्कृति व भारतीय कलांनीं प्रगतीचें शिखर गांठलें होतें आणि आजही जागतिक कलांचा विचार करतां भारतीय चित्र, शिल्प, नृत्य, संगीतादि कलांचें स्थान वरच्या दर्जाचें आहे हें लक्षांत आल्याशिवाय राहत नाहीं. पण अशा अभिमानास्पद परंपरेच्या सर्वसामान्य भारतीयाला भारतीय चित्रकला, शिल्प व वास्तु या कलांचें रसग्रहण करितां येत नाहीं. ही घटना अत्यंत शोचनीय अशी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनामुळें सर्वसामान्य माणसाला कलात्मक दृष्टि देण्याचें कार्य व्हावें हा हेतु.

या महत्त्वपूर्ण पुस्तकाच्या प्रकाशनानें मराठींतील तुटपुंज्या चित्रकला-विषयक पुस्तकांत अत्यंत मोलाची अशी भर पडणार आहे. ● प्रस्तुत पुस्तकांत १ कला आणि शिक्षण, २ कलास्वादाची आवश्यकता, ३ कलेची उपयुक्तता, ४ चित्रकलेंतील सार्वदेशीय तत्त्वें व कांहीं पद्धति-विशेष *(Styles)*, ५ भारतीय चित्रकलेची तात्त्विक पीठिका, ६ कलावंत आणि त्यांच्यापुढील प्रश्न, आणि भारतीय चित्रकलेचें ऐतिहासिक धांवतें दर्शन इत्यादि महत्त्वाचीं प्रकरणें आहेत. माध्यमिक शाळांतून चित्रकला विषय शिकविणाऱ्या शिक्षकांकरितां 'शिकवितांना काय करावें ?' नांवाचें परिशिष्ट जोडलें असून त्याचा शिक्षकांना उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं. ● भारतीय चित्र, शिल्प, वास्तु या कलांचे प्रातिनिधिक नमुने देऊन प्रत्येकाचें विस्तृत रसग्रहण दिलेलें आहे. ● शालान्त परीक्षेस चित्रकला हा विषय घेऊन बसणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त, इतकेंच नव्हे तर, केवळ Text book म्हणूनच त्याचा उपयोग होईल. ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना किंवा चित्रकलेच्या विशेष अभ्यासकांना मार्गदर्शक होईल असें हें पुस्तक आहे. ● नयनमनोहर रंगीत चित्रांनीं नटलेल्या सुमारें २५ आर्ट प्लेटस् आकार ७॥"×१०" किंमत ८ रुपये. ● आपल्या खाजगी वा सार्वजनिक ग्रंथालयासाठीं आपली प्रत आजच राखून ठेवा.

एकमेव विक्रेते : **वसंत आत्माराम गांगल**, बी. ए. [ ऑनर्स ]

**प्रतिभा प्रकाशन**, १० डोंगरेबाग, मुंबई २८

**मॉडेल आर्ट इन्स्टिट्यूट प्रकाशन, मुंबई २८**